# विद्यार्थी समूह मार्गदर्शिका

## (शाळा/वर्ग स्तर)











राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# विद्यार्थी समूह मार्गदर्शिका
## (शाळा/वर्ग स्तर)











राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# विद्यार्थी समूह मार्गदर्शिका (शाळा/वर्ग स्तर)


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. संजय यादव (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **श्रीम. ज्योती शिंदे**
  उपसंचालक, मानव संसाधन विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **डॉ. दत्तात्रय थिटे**
  सहायक संचालक, संशोधन व सीपीडी विभाग,
  रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीम. राजेश्वरी संधानशिवे**
  कार्यक्रम अधिकारी, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. शैलेश दखने**
  विषय सहायक, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तांत्रिक साहाय्य** : **डॉ. सतिश सातपुते**
  विषय सहायक, संशोधन विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. स्वाती वनारसे**
  लघुलेखक, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : जुलै २०२५
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

नमस्कार,

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020) मध्ये शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम असावे, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. या दृष्टिकोनातून, शाळांमध्ये विद्यार्थ्यांची स्वभाववैशिष्ट्ये, कौशल्ये, आवड व क्षमता यानुसार अनुभवाधारित शिक्षण देणे अत्यावश्यक ठरते.

राज्य शासनाने तयार केलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा : शालेय शिक्षण–२०२४ द्वारे शिक्षण ही मूल्याधारित, सामाजिकदृष्ट्या संलग्न आणि बहुआयामी प्रक्रिया म्हणून स्वीकारण्यात आली आहे. या चौकटीमध्ये संज्ञानात्मक (Cognitive), सामाजिक–भावनिक (Socio-emotional), शारीरिक (Physical), नैतिक व सामाजिक (Ethical-Social) या चार मुख्य विकासक्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी केवळ वर्गखोलीतील अध्यापन पुरेसे नसून, विद्यार्थ्यांना विद्यार्थी समूह–उपक्रमांत सक्रिय सहभाग देणे गरजेचे आहे. PGI व SQAAF यांचे निर्देश देखील हेच अधोरेखित करतात की शाळांनी सहशालेय उपक्रम, जीवनकौशल्य विकास, नेतृत्व प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सहभागावर भर द्यावा.

एकविसाव्या शतकातील कौशल्यांना अनुसरून, राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये अधिकाधिक विद्यार्थी समूह स्थापन करावेत. हे समूह तांत्रिक, वैज्ञानिक, कलात्मक, सामाजिक, खेळ, छंद व जीवनकौशल्य यासारख्या विविध क्षेत्रांवर आधारित असतील. या समूहांमुळे शिक्षण प्रक्रियेत कृतीशीलता, सामाजिकता, विज्ञाननिष्ठा, समता आणि उपयोजित ज्ञान यांची वाढ होईल. याकरिता परिषद स्तरावर विविध विभागांच्या कार्यशाळेत या उपक्रमाचा संपूर्ण आराखडा निश्चित करण्यात आला आहे. सर्व विषय विभागांनी विविध विद्यार्थी समूहांची रचना व कार्यप्रणाली निश्चित केली आहे. या माहितीच्या आधारावर तयार करण्यात आलेली ही 'विद्यार्थी समूह मार्गदर्शिका – (शाळा व वर्ग स्तर)' शाळांसाठी एक मार्गदर्शक साधन ठरेल. यात प्रत्येक समूहाचे उद्दिष्ट, कामकाजाची रूपरेषा, उपक्रमांची उदाहरणे आणि अंमलबजावणीची कार्यपद्धती यांचा समावेश आहे. शाळांनी आपल्या स्थानिक गरजांनुसार आणि संसाधनांचा विचार करून या समूहांचे सुयोग्य व्यवस्थापन करावे, अशी अपेक्षा आहे.

शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) मध्ये नमूद केल्यानुसार, सक्रिय शाळा ही अशी संस्था असते ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा परिपूर्ण विकास घडवून आणता येतो. या दृष्टीने ही पुस्तिका एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. शेवटी, शाळांनी या पुस्तिकेचा वापर करून विद्यार्थ्यांसाठी उत्स्फूर्त, अनुभवाधारित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, हीच अपेक्षा आहे. भविष्यात या उपक्रमाच्या माध्यमातून गुणात्मक शैक्षणिक परिणाम निश्चितच दिसून येतील, असा मला विश्वास आहे.


**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| • | मार्गदर्शक सूचना | १ |
| • | विद्यार्थी समूह उपक्रम | २ |
| १. | मराठी विषय समूह | ६ |
| २. | English Language Club | १७ |
| ३. | हिंदी विषय समूह | २८ |
| ४. | उर्दू विषय समूह | ३९ |
| ५. | इतिहास विषय समूह | ५१ |
| ६. | भूगोल विषय समूह | ६० |
| ७. | नागरिकशास्त्र विषय समूह | ६८ |
| ८. | अर्थशास्त्र विषय समूह | ७५ |
| ९. | गणित विषय समूह | ८३ |
| १०. | विज्ञान विषय समूह | १०१ |
| ११. | क्रीडा समूह | ११३ |
| १२. | छंद व सहशालेय उपक्रम समूह | १३६ |
| १३. | विद्यार्थी संघटना समूह | १४५ |
| १४. | चालू घडामोडी समूह | १५० |
| १५. | सामान्य ज्ञान समूह | १५६ |
| १६. | स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूह | १६२ |
| १७. | पर्यावरण संवर्धन समूह | १७४ |
| १८. | आधुनिक तंत्रज्ञान समूह | १९० |
| १९. | शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह | १९५ |

| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २०. | सामाजिक कार्य व सर्वेक्षण समूह | २१८ |
| २१. | वाचन समृद्धी समूह | २२४ |
| २२. | समाज माध्यम व प्रसिद्धी समूह | २२९ |
| २३. | खगोलशास्त्र समूह | २३४ |
| २४. | माजी विद्यार्थी समूह | २४२ |
| २५. | प्रगतशील विद्यार्थी समूह | २४७ |
| २६. | पाककला व परसबाग समूह | २५४ |
| २७. | व्यावसायिक शिक्षण समूह | २६५ |
| २८. | तक्रार निवारण समूह | २७१ |
| २९. | मानसिक क्षमता व आव्हानात्मक प्रश्नपेढी समूह | २७४ |
| ३०. | Foreign Language Club | २८२ |
| ३१. | समता सहकार्य समूह | २८७ |
| ३२. | आर्थिक साक्षरता समूह | २९३ |
| ३३. | आपत्कालीन व्यवस्थापन समूह | ३०३ |
| ३४. | स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन समूह | ३१२ |
| • | श्रेयनामावली | ३१८ |

# मार्गदर्शक सूचना

१) प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विद्यार्थी समूह स्थापन करून कार्यान्वित करणे आवश्यक राहील. शालेय अभ्यासक्रमाशी सुसंगत असे समूहातील उचित उपक्रम निवडावेत. तसेच उपक्रमांची पुनरावृत्ती टाळावी.

२) समूहासाठीच्या मार्गदर्शिकेत विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्रत्येक समूहाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. तथापि शाळांनी याबाबत गरजेनुसार उचित कार्यवाही करावी.

३) समूहांची निवड करताना स्थानिक विविधता, वैशिष्ट्य, उपलब्धता, गरजा, शाळा/वर्गाची विद्यार्थी संख्या यांचा प्राधान्याने विचार करावा.

४) समूहांमध्ये विद्यार्थ्यांची निवड करताना विद्यार्थ्यांची आवड, कौशल्य, व व्यक्तिमत्त्व विकासाच्या गरजा विचारात घ्याव्यात. तसेच सदर समूह निवडीबाबत त्यांना ताण येणार नाही याची काळजी घ्यावी.

५) समूहाच्या सुयोग्य कार्यान्वयनासाठी आवश्यकतेनुसार मासिक/द्वैमासिक/त्रैमासिक/सहामाही/वार्षिक बैठक घेणे बंधनकारक आहे.

६) वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्याला क्षमतेनुसार एकापेक्षा अधिक समूहात सहभागी करून घेता येईल.

७) प्रत्येक विद्यार्थी किमान एका तरी समूहात समाविष्ट असेल याची खात्री करावी.

८) समूहाद्वारे आयोजित करावयाचे उपक्रम निवडण्याची लवचीकता मुख्याध्यापकास राहील.

९) शालेय विषयांशी पूरक अशा अधिकाधिक समूहांची शाळा/वर्ग स्तरावर स्थापना करावी.

१०) वर्गाचा स्तर, वयोगट व समूहाचे उद्देश विचारात घेऊन शाळा व वर्ग पातळीवर समूहाची स्थापना करावी व समूहाचा मार्गदर्शक/सुलभक म्हणून संबंधित शिक्षकाने जबाबदारी पार पाडावी.

११) शाळा/वर्ग स्तरावर स्थापन केलेल्या समूहाचे योग्य समन्वयन मुख्याध्यापकांनी करावे.

१२) मुख्याध्यापकांनी समूह स्थापना व कार्यान्वयनाचा अहवाल गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करावा.

१३) सर्व गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांनी विद्यार्थी समूहाचे सतत मार्गदर्शन, पर्यवेक्षण व सनियंत्रण करावे.

१४) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी शाळाभेटी दरम्यान विद्यार्थी समूहाचे सुयोग्य सनियंत्रण करावे.

१५) शाळेबाहेरील तज्ज्ञ व्यक्तीही समूहाशी जोडल्या जातील हा प्रयत्न करावा.

१६) कोणत्याही मार्गदर्शक/सुलभक शिक्षकाने २/३ वर्षांत आपली भूमिका उत्तरोत्तर कमी करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक कार्यप्रवण करावे.

१७) विद्यार्थी समूहाच्या सदर मार्गदर्शिकेत दिलेल्या ३४ विषयांव्यतिरिक्त नवीन विद्यार्थी समूह देखील स्थापन करता येऊ शकेल. फक्त तो समूह सदर ३४ समूहांमध्ये समाविष्ट होऊ शकणार नाही याची शाळा स्तरावरच खात्री करावी आणि नंतरच असा समूह स्थापन करावा. अशा नवीन विद्यार्थी समूहासाठी सदरच्या पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात. त्याची प्रत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस तात्काळ पाठवावी, परंतु मान्यतेची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. यावर संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने योग्य ते अभिप्राय द्यावेत. असे प्राप्त प्रस्ताव संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेस आवश्यक दुरुस्त्यांसह पाठवावेत.

१८) विद्यार्थी समूहाच्या प्रभावी सनियंत्रणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने एका अधिव्याख्यात्याची जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी व ती सर्व शाळांना कळवावी.

१९) विद्यार्थी समूह स्थापना, कार्यान्वयन व जिल्ह्यातील विविध स्तरांवरील सुयोग्य समन्वयनासाठी उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा. याविषयी कोणतीही शंका असल्यास जिल्हा नोडल अधिकारी यांचेशी संपर्क करावा.

# विद्यार्थी समूह उपक्रम

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण, कौशल्ये आणि सामाजिक जाणीव विकसित करणे हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून शाळांमध्ये विद्यार्थी समूह उपक्रम कार्यान्वित करण्यात येत आहे.

## विद्यार्थी समूह उपक्रमाची आवश्यकता :

'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' च्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यासाठी आणि एकविसाव्या शतकातील गरजा, आव्हाने पूर्ण करण्यासाठी प्रस्तुत विद्यार्थी समूह उपक्रमाची आवश्यकता आहे. विद्यार्थी समूह उपक्रमाची अंमलबजावणी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास साहाय्यभूत ठरणार आहे. जेणेकरून या समूहांच्या अंमलबजावणीची आवश्यकता पुढील बाबींच्या विकासास उपयुक्त ठरणार आहे.

१) **कौशल्य विकास :** विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमावर आधारित ज्ञानच नव्हे, तर जीवन कौशल्ये (Life Skills) जसे की, संवाद कौशल्ये, नेतृत्व क्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता, गटकार्य (Teamwork) आणि चिकित्सक विचार (Critical Thinking) विकसित करण्याची संधी मिळेल.

२) **सुप्त गुणांना वाव :** प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. या समूहांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार कला, विज्ञान, क्रीडा, साहित्य अशा विविध क्षेत्रांमध्ये स्वतःला व्यक्त करण्यास आणि आपले कौशल्य अधिक विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

३) **सामाजिक आणि भावनिक विकास :** समूहात काम करताना विद्यार्थ्यांना एकमेकांशी जुळवून घेणे, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव या बाबींचा विचार करावा लागतो. यामुळे त्यांचा भावनिक आणि सामाजिक विकास होतो.

४) **शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी :** औपचारिक शिक्षणाबरोबर वर्गाबाहेर, आवडीच्या विषयांवर आधारित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी आणि प्रेरणादायी वाटते. यामुळे त्यांची शाळेतील उपस्थिती आणि शिक्षणातील रुची वाढण्यास मदत होईल.

५) **नेतृत्व आणि जबाबदारीची भावना :** विद्यार्थ्यांद्वारेच हे समूह चालवले जात असल्याने, त्यांना स्वतः पुढाकार घेणे, निर्णय घेणे आणि जबाबदारी स्वीकारणे या गोष्टी शिकायला मिळतात, ज्यामुळे भविष्यातील सक्षम नागरिक निर्माण होतील.

६) **रोजगारक्षमतेला चालना :** विशिष्ट कौशल्ये (उदा. कोडिंग, रोबोटिक्स, कला) विकसित करणारे समूह विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्याची वाटचाल करण्यास मदत करतील.

## विद्यार्थी समूहांचे क्षेत्र :

बालकांच्या विकासातील शालेय प्रक्रियेत 'सुरक्षित आणि प्रेरक वातावरण' असणे हा त्यांचा विकास आणि अध्ययनाचा पाया असतो. त्याअनुषंगाने सर्व उपक्रमांमध्ये विविधता व आव्हाने असतात. प्रत्येक बालक स्वतःच्या गतीने शिकते प्रत्येकाच्या अध्ययन गरजा लक्षात घेतल्या जातात. या तत्त्वांचा विचार करून राज्यातील सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये विविध समूह स्थापन केले जातील. विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला, चिकित्सक वृत्तीला, ऊर्जेला वाव देणारे समूह प्रकार सदर विद्यार्थी समूह मार्गदर्शिकेत देण्यात आलेले आहेत.

## अपेक्षित परिणाम :

सदर उपक्रम महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास साहाय्यभूत ठरेल. ते परीक्षाभिमुख विद्यार्थी न राहता, समाजात सकारात्मक बदल घडवणारे, सर्जनशील आणि आत्मनिर्भर नागरिक बनतील.

## शाळेत विद्यार्थी समूह तयार करण्यासाठी सूचना :

शाळेमध्ये विद्यार्थी समूह उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणीकरिता खालील सूचनांचा विचार करणे आवश्यक आहे.

## विद्यार्थी समूह अंमलबजावणी :

### १) उद्दिष्ट निश्चित करा :

**मूलभूत उद्दिष्ट :** विद्यार्थी समूहांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना भविष्यासाठी तयार करणे.

**विशिष्ट उद्दिष्टे :** प्रत्येक समूहाचे (उदा. विज्ञान समूह, कला समूह) नेमके काय उद्दिष्ट असेल, हे निश्चित करणे. (उदा. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, कलात्मक कौशल्ये वाढवणे)

### २) विद्यार्थ्यांच्या आवडी जाणून घ्या :

**सर्वेक्षण :** विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून त्यांना कोणत्या विषयांमध्ये किंवा उपक्रमांमध्ये अधिक रस आहे, हे जाणून घ्या. यामुळे त्यांना आवडणारे आणि ज्यात ते उत्साहाने सहभागी होतील असे समूह तयार करता येतील.

**चर्चासत्र :** विद्यार्थ्यांशी थेट चर्चा करून त्यांच्या कल्पना आणि अपेक्षा समजून घ्या.

### ३) विद्यार्थी समूहांची निवड निश्चित करा :

विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार आणि शाळेतील उपलब्ध साधनसामग्रीनुसार विविध प्रकारचे समूह निश्चित

करा. हे समूह शैक्षणिक आणि बौद्धिक, कलात्मक आणि सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक आणि सेवाभावी व कौशल्य आधारित अशा विविध वर्गवारीतील असावेत. समूहांशी संबंधित सविस्तर माहितीनुसार समूह स्थापन करा.

### ४) शिक्षकांचा सहभाग :

**मार्गदर्शक शिक्षक :** प्रत्येक विद्यार्थी समूहासाठी एक उत्साही आणि संबंधित विषयाची आवड व अनुभव असलेला शिक्षक 'मार्गदर्शक' म्हणून नियुक्त करा.

**सुलभन :** विद्यार्थी समूहांना कसे मार्गदर्शन करावे, विद्यार्थ्यांना सक्रिय कसे ठेवावे आणि त्यांची कौशल्ये कशी विकसित करावित यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी, गटशिक्षणाधिकारी विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांचे शाळाभेटींद्वारे सुलभन करावे.

### ५) समूहाची रचना आणि कार्यपद्धती :

**विद्यार्थी नेतृत्व :** प्रत्येक समूहात विद्यार्थीच अध्यक्ष, सचिव आणि इतर पदांवर काम करतील अशी रचना करा. यामुळे त्यांना नेतृत्व आणि जबाबदारीची जाणीव होईल.

**लोकशाही पद्धत :** नेतृत्व निवडताना किंवा महत्त्वाचे निर्णय घेताना लोकशाही पद्धतीचा अवलंब करा, जेणेकरून विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची ओळख होईल.

**नियमित बैठका :** प्रत्येक समूहाच्या नियमित बैठका आणि उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करा.

**नियम आणि कार्यपद्धती :** समूहाच्या कामकाजासाठी साधे आणि स्पष्ट नियम तयार करा.

### ६) पालकांना सहभागी करून घ्या :

**माहिती द्या :** पालकांना विद्यार्थी समूहांच्या स्थापनेबद्दल, त्यांच्या उद्दिष्टांबद्दल आणि मुलांच्या विकासातील त्यांच्या भूमिकेबद्दल माहिती द्या.

**सहभाग :** पालकांना समूहांच्या काही उपक्रमांमध्ये (उदा. प्रदर्शन, कार्यक्रम) सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करा.

### ७) मूल्यांकन आणि सुधारणा :

**नियमित आढावा :** विद्यार्थी समूह कसे काम करत आहेत, त्यांचे उद्दिष्ट साध्य होत आहे का, याचा नियमितपणे आढावा घ्या.

**अभिप्राय (Feedback) :** विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून अभिप्राय घ्या आणि त्यानुसार उपक्रमांमध्ये सुधारणा करा.

**यश साजरे करा :** समूहांच्या यशोगाथा इतरांसोबत शेअर करा आणि यशस्वी उपक्रमांचे कौतुक करा.

### ८) प्रोत्साहन :

उत्कृष्ट समूह कार्यासाठी शाळा स्तरावर प्रशस्तिपत्र द्यावे.

**‘समूहातील एकत्रित प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा पाया!‘**

**निष्कर्ष :** ‘विद्यार्थी समूह’ हा उपक्रम विद्यार्थ्यांना **‘शिक्षित‘ आणि ‘सक्षम‘** नागरिक बनवण्याचा पाया आहे. शिक्षक, पालक व समुदाय यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी होऊ शकतो.

आपली शाळा विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापलीकडील अनुभव आणि कौशल्ये देणारे एक समृद्ध व्यासपीठ बनवू शकेल. यासाठी सदर मार्गदर्शिकेत दिलेल्या यादीतील समूह स्थापनेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

❑❑❑

# १. मराठी विषय समूह

## प्रस्तावना :

मराठी भाषा प्राचीन व समृद्ध भाषा आहे. आपल्या विविध साहित्यिक, कवी, लेखक व्यक्तींनी मराठी भाषेला अधिक समृद्ध केलेले आहे. मराठी भाषेने शतकानुशतके केलेल्या प्रवासाचाच परिपाक म्हणून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषेने राज्याला सांस्कृतिक व सामाजिक ओळख निर्माण करून दिलेली आहे. मराठी भाषेचे जतन, संवर्धन व विकास करण्यासाठी राज्य कटीबद्ध आहे व त्याची सुरुवात शालेय स्तरापासून करणे अपेक्षित आहे.

## मराठी भाषा समूह संकल्पना :

सद्यस्थितीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषेचे जतन, संवर्धन व विकास करणे गरजेचे आहे. मराठी भाषेला अधिकाधिक समृद्ध व संपन्न करणे महत्वाचे आहे. मराठी भाषेच्या साहित्याच्या दृष्टीने अनेक कसदार साहित्यिक, कवी, लेखक, समीक्षक यांची मराठी भाषेच्या प्रांतात अधिकची भर पडणे, मराठी भाषेच्या साहित्याचा प्रांत अधिकाधिक समृद्ध होणे, मराठी भाषेतील साहित्याचे समीक्षण होणे व पर्यायाने दर्जेदार उत्तमोत्तम साहित्य कलाकृती मराठी भाषेमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे. या सर्व ध्येयांच्या साध्यतेसाठी शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यामध्ये तशी दृष्टी विकसित होणे व तशा संधी मुलांना मिळणे यासाठी शालेय स्तरावर विकसित करण्यात आलेला स्वप्रेरणेने व उत्स्फूर्तपणे कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक गट म्हणजे मराठी भाषा समूह होय.

## मराठी भाषा समूहाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबाबत आवड निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या साहित्याबाबत जाणीव निर्माण करणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या साहित्याबाबत समीक्षणात्मक दृष्टिकोनाची निर्मिती करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबाबत संशोधनात्मक वृत्ती निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या शास्त्रशुद्ध साहित्य लेखनाबाबत जाणीव जागृती करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या अनुषंगाने सर्जनशील विचार क्षमता निर्माण करणे.

८) मराठी भाषेत जतन, संवर्धन करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेतील अर्थार्जनाच्या संधीची जाणीव निर्माण करणे.

१०) समूहातील सदस्यांची त्याच्या आवडीच्या क्षेत्रानुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे. सर्व सदस्यांना समूहातील विविध कामकाजाच्या पद्धतीचा अनुभव मिळण्याची खात्री करणे.

११) मराठी भाषा समूह या करिता आवश्यक समूहांतर्गत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.

१२) समूहाच्या कामकाजात समन्वय राखण्यासाठी दर दोन ते तीन आठवड्यांनी बैठका घेणे तसेच उपक्रम राबविण्यासाठी नियोजन करणे.

१३) मराठी भाषा समूहाने घेतलेल्या समूहाच्या कामकाजाचा इतिवृत्तांत ठेवणे .

१४) मराठी भाषा समूहाने घेतलेल्या कार्यक्रमास प्रसिद्धी देणे.

१५) मराठी भाषा समूहाने राबविलेल्या कार्यक्रमातील कामाच्या खर्चाचे ताळेबंद ठेवणे.

१६) समूहाच्या कामकाजात सहभागी असलेले तज्ज्ञ व पालक यांच्याशी समन्वय ठेवणे.

**शालेय मराठी भाषा समूहाची रचना :**

| अ.क्र. | रचना | पद |
|---|---|---|
| १) | मराठी भाषा विषय शिक्षक | मार्गदर्शक/समूहप्रमुख |
| २) | शाळेतील इतर मराठी भाषा शिक्षक. | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थी/विद्यार्थिनी (संख्या : स्तरनिहाय, प्रत्येक इयत्तानिहाय व तुकडीनिहाय विद्यार्थी एक ते दोन विद्यार्थी अशी विद्यार्थी संख्या. | सदस्य |
| ४) | मराठी भाषा समूहाच्या विषयाशी संबंधित कार्य करण्यासाठी समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती. | सदस्य |

**मराठी भाषा समूहाची जबाबदारी व कार्य :**

१) मुख्याध्यापकांनी व मराठी विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने मराठी भाषा समूह स्थापन करणे.

२) मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमाची निश्चिती करणे.

३) मराठी भाषेच्या अनुषंगाने निश्चित केलेल्या उपक्रमांचे आयोजन करणे.

४) समूहाच्यावतीने स्थानिक कवी, लेखक, समीक्षक यांच्या व्याख्यानांचे किंवा परिसंवादाचे आयोजन करणे.

५) समूहाद्वारे राज्याने निश्चित केलेले उपक्रम राबविणे. (उदा. मराठी भाषा गौरव दिन, मराठी भाषा पंधरवडा, आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस, वाचन प्रेरणा दिवस, वाचन चळवळी)

६) समूहाद्वारे शाळेमध्ये मराठी भाषेतील स्तराधारित पुस्तके तसेच इतर वितरीत केलेले वाचन साहित्यांच्या साहाय्याने वाचन संस्कृतीचा विकास करणे.

७) समूहाद्वारे राज्याने आयोजित केलेल्या नामांकित साहित्यिकांचे विविध व्याख्याने किंवा परिसंवादाचा लाभ शाळेतील सर्व विद्यार्थी घेत आहेत याबाबतची खात्री करणे.

८) समूहाद्वारे वाचन कोपरा याची निर्मिती करणे व त्याद्वारे शाळेतील वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या साहित्यिक सर्जनशीलतेचा अविष्कार करणे.

९) समूहाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शुद्धलेखन नियमांची जाणीव करून देणे, हस्ताक्षर योग्य तऱ्हेने काढणेबाबत तसेच निवेदन कौशल्य, अभिवाचन कौशल्य वृद्धी, शब्दकोश पाहणी यासाठी विशेष प्रयत्न करणे.

१०) समूहाद्वारे विद्यार्थ्यांच्या भाषिक सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळावे याकरिता शालेय स्तरावर वार्षिक अंकाची निर्मिती करणे व त्याद्वारे शालेय विद्यार्थ्याच्या भाषिक कलाकृतींना वाव देणे.

११) समूहाद्वारे संमेलनामधील पुरस्कार प्राप्त मराठी साहित्याबाबत चर्चासत्राचे आयोजन करणे.

१२) समूहाद्वारे मराठी भाषा विषयक वार्षिक नियोजन तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

१३) मराठी भाषेच्या विकासाकरिता स्थापन झालेल्या विविध राज्यस्तरीय व इतर संस्थाच्या कार्याची माहिती देणे.

१४) मराठी समूहाद्वारे व शाळेमार्फत आयोजित केलेल्या उपक्रमाचा अहवाल तयार करणे.

**विद्यार्थ्यांच्या मराठी भाषा समूहाद्वारे मराठी भाषा विषयाच्या अनुषंगाने खालील उपक्रम राबवता येतील :**

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | जून | घोषवाक्य | शाळेत विविध विषयावर व मराठी भाषेसंदर्भात घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करावे. |
| | | गीत गायन | शालेय स्तरावर बडबडगीते, पारंपारिक गीते यांच्या गायनाच्या अनुषंगाने स्पर्धेचे आयोजन करावे. |
| | | कथाकथन स्पर्धा | शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वावर आधारीत विविध कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. कथाकथनाच्या माध्यमातून मराठीतील शुद्ध शब्द आवाजातील चढ-उतार, पात्रनिहाय संवादफेक या बाबी समजून देण्याकरिता समूहाने कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. उत्कृष्ट कथाकथन करणाऱ्या विद्यार्थ्यास गौरविण्यात यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | अभिवाचन | उत्कृष्ट अभिवाचनाचे उत्तम सादरीकरण विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी मराठी भाषा समूहातील सदस्यांना विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार एखाद्या कथेमधील काही भागाचे अभिवाचन करून दाखविण्यात यावे. शक्य झाल्यास स्थानिक कलाकारांच्या माध्यमातून देखील अभिवाचनाचे उत्तम नमुने सादर करता येतील. अधिकाधिक विद्यार्थ्यांना अभिवाचनाची संधी द्यावी. विद्यार्थ्यांना या बाबीचे अध्ययन अनुभव मिळण्यासाठी अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| | | वाचन उपक्रम | विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी दिवस निश्चित करून शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकांचे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात यावे व त्याचे वाचन करण्याकरिता विद्यार्थ्यांना वेळ देण्यात यावा. वाचलेल्या पुस्तकावर अभिप्राय देण्यास सांगावे. |
| | | म्हणी सांगा | विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील भाषिक सौंदर्य समजावून देण्यासाठी परिपाठामध्ये दररोज एका म्हणीचा समावेश करावा व त्या विद्यार्थ्यास म्हणींचा अर्थही स्पष्ट करून सांगण्यास सांगावे. त्याची हस्तपुस्तिका तयार करुन त्याचे जतन करावे. |
| २) | जुलै | समूहगट चर्चा | विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व व विद्यार्थ्यांच्या गरजानुसार गटातील चर्चेचे विषय असावेत. विद्यार्थ्यांचे आवश्यकतेनुसार गट करावेत व समूह चर्चा घडवून आणावी. वाचन केलेल्या कलाकृतींची आणि वयानुरूप विषयांच्या विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी समूहचर्चा आयोजित करावी. गटामध्ये विचारमंथन करून मिळणारी तथ्य, शिकवण, लक्षात आलेली वैशिष्ट्ये यावर चर्चा करावी. |
| | | सुंदर हस्ताक्षर स्पर्धा | हस्ताक्षर वळणदार असण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करावे. सुंदर हस्ताक्षराचे नमुने भित्तिपत्रकात लावावेत. |
| | | शब्दकोडी | विविध शब्दकोडी देऊन कमी वेळात शब्दकोडे सोडवणे या संदर्भात स्पर्धेचे आयोजन करावे तसेच मोठ्या गटासाठी शब्दकोडे निर्मिती अशा स्पर्धांचे आयोजनही करता येईल. मराठी शब्दसंपत्ती वाढवणे याकरिता विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत व प्रत्येक गटाने दहा ते पंधरा मराठी शब्द शोधून शब्दकोडी तयार करावी. तयार झालेला संच इतर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | प्रसंगनाट्य | विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती आणि तात्काळ विचार करण्याची क्षमता विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांचे गट करून एखादी प्रसंगनाट्याची संकल्पना द्यावी. (उदा. गावातील आठवडा बाजार). विद्यार्थ्यांना ठराविक वेळ दिला जावा व त्यावर आधारित शीघ्रतेने नाटक तयार करून सादर करण्यास सांगावे. शालेय स्तरावरील नाटकाच्या संहिता लेखनाबाबत तज्ज्ञाचे मार्गदर्शनाचे आयोजन करावे. |
| | | मी निवेदक | शिक्षकांनी समूहातील विद्यार्थ्यांना व इतर विद्यार्थ्यांना विविध बाबीचे निवेदन किंवा कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करण्याची संधी द्यावी. उत्तम निवेदनाची तंत्र समजावून द्यावेत. |
| ३) | ऑगस्ट | वादविवाद स्पर्धा | समूहाने मुलांचे अनुभवविश्व व वयानुरूप संवेदनशील बाबी, विविध सामाजिक समस्या व इतर अनुषंगिक विषयावर वेगवेगळे विषय देऊन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करावे. |
| | | शब्दभेंड्या स्पर्धा | विद्यार्थ्यांसाठी शब्दभेंड्या स्पर्धेचे आयोजन करावे याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत. विद्यार्थ्यांना एक शब्द द्यावा. शब्दाच्या शेवटच्या शब्दावरून पुढील गटास शब्द सांगण्यास द्यावा/द्यावे व याप्रमाणे गटांची स्पर्धा घेतली जावी. |
| | | नाट्यीकरण | विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय देण्यात यावेत तसेच त्यावर नाट्यीकरण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना प्रासंगिक विषय देऊन अथवा जनजागृतीवर विषय देऊन नाट्याचे सादरीकरण करण्यास सांगावे. |
| | | चित्रवाचन | विद्यार्थ्यांच्या गटाने स्पर्धेचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांना चित्र वाचनासाठी चित्र उपलब्ध करून देऊन चित्र वाचनाचे आयोजन करण्यात यावे. |
| | | साहित्यसंमेलन | विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण होण्याकरिता शालेय स्तरावर मराठी भाषा विषयाकरिता स्थानिक कवी, लेखक, साहित्यिक, समीक्षक यांच्या सहभागाने साहित्य संमेलनात आयोजन करण्यात यावे व विद्यार्थी व शाळेतील शिक्षक यांच्या साहित्याकृतीकरिता व्यासपीठ निर्माण करून द्यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ४) | सप्टेंबर | ग्रंथ प्रदर्शन | शाळेमध्ये उपलब्ध असलेली पुस्तके व पालकांकडे असलेली पुस्तके या सर्वांच्या मदतीने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात करण्यात यावे. |
| | | काव्यवाचन | शाळेतील मुलांनी लिहिलेल्या कविता, शिक्षकांनी लिहिलेल्या कविता तसेच पालकांच्या कविता यांच्या अथवा प्रसिद्ध कवींच्या काव्य वाचनाची स्पर्धा घ्यावी. |
| | | वाचनकट्टा | विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी वाचनकट्टा ही संकल्पना राबवावी. यामध्ये ठरावीक वेळेत विद्यार्थ्यांना पुस्तकांची उपलब्धता करून देण्यात यावी व विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनास प्रवृत्त करावे. समूहाने प्रत्येक विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील याची खात्री करावी. |
| | | पुस्तक जत्रा उपक्रम | केंद्र स्तरावर या उपक्रमाचे आयोजन करावे. केंद्रातील शिक्षकांनी एकत्र येऊन पुस्तकाचे प्रदर्शन भरवावे. शिक्षण परिषदांमध्ये याबाबतचे नियोजन करण्यात यावे. |
| | | व्याख्यान परिसंवाद | परिसरातील तसेच स्थानिक मराठी साहित्यिक, लेखक, कवी यांचे मराठी भाषेच्या अनुषंगाने विविध विषयाच्या अनुषंगाने व्याख्यान आयोजित करावे. |
| ५) | ऑक्टोबर | हस्तलिखितांचे प्रदर्शन | विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी लिहिलेल्या काही हस्तलिखितांचे शाळास्तरावर प्रदर्शन आयोजित करण्यात यावे. तसेच पुस्तक लेखन करण्यासाठी आवश्यक बाबींचे मार्गदर्शन करण्यात यावे. |
| | | लेखक, कवी मुलाखत | स्थानिक परिसरातील लेखक, कवी यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्तम मुलाखत घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. |
| | | मराठी पॉडकास्ट | विद्यार्थ्यांना नामांकित साहित्यिकांची ओळख करून देण्याकरिता शिक्षकांनी नामांकित साहित्यिकांचे पॉडकास्ट सादर करावेत. |
| | | कविता लेखन | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढवण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना कविता लेखनाची संधी द्यावी. उत्कृष्ट कविता वाचन कोपरामधील फलकावर प्रदर्शित कराव्यात. |
| ६) | नोव्हेंबर | एकांकिका | विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता विद्यार्थ्यांना एकांकिका सादर करण्याची संधी देण्यात यावी. उत्कृष्ट एकांकिका सादर करणाऱ्याकरिता स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | मी समीक्षक | विद्यार्थ्यांमध्ये समीक्षणाची दृष्टी विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांना वयोगटानुसार वाचन साहित्य व कथा देण्यात यावी त्याचे वाचन करण्याकरिता वेळ देण्यात यावा. विद्यार्थ्यांचे गट करावेत व सदर वाचन साहित्य, कथा याबाबत समीक्षणात्मक विचार मांडण्याची संधी देण्यात यावी. शाळेत उपलब्ध असलेली पुस्तके वाचून त्याचे समीक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे. |
| | | कथालेखन | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढवण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना कथा लेखनाची संधी द्यावी. उत्कृष्ट कथा लेखनास वाचन कोपरामधील फलकावर प्रदर्शित करावे. कथा लेखन कसे करावे याबाबत तज्ज्ञाद्वारे मार्गदर्शन करावे. बालसाहित्य उपलब्ध करून द्यावे व त्याचे वाचन व लेखन शैलीचे निरीक्षण करण्याची संधी द्यावी. |
| ७) | डिसेंबर | चित्रकथा/चित्रकविता तयार करणे. | विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्ती आणि वर्णनात्मक कौशल्ये विकसित करण्याकरिता सदर उपक्रम राबविता येईल, यामध्ये विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक चित्र दिले जाईल (उदा. गावातील मळा) त्या चित्रावर आधारित कथा अथवा कविता तयार करून स्तरानुसार त्या-त्या इयत्तांना वाचून दाखवावी. |
| | | ऑडिओ बुक विकसन | विद्यार्थ्यांना मराठी विषयाकरिता तंत्रज्ञानाची संधी मिळावी याकरिता ऑडिओ बुक विकसन करावे, विद्यार्थ्यांचे गट करावे. विद्यार्थी गटाने मिळून मराठी कथा, कविता किंवा पाठ्यपुस्तकात समाविष्ट धडे ऑडिओ स्वरूपात सादर करण्याची संधी देण्यात यावी. ध्वनीमुद्रक साधनांचा वापर करावा. संपादित ऑडिओ बुक डिजिटल लायब्ररीत अपलोड करावे. |
| ८) | जानेवारी | मराठी भाषा पंधरवडा | शासनाने जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा घोषित केलेला आहे त्या करिता असलेल्या शासन निर्णयात नमूद उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. |
| | | वक्तृत्व स्पर्धा | विद्यार्थ्यांमधील भाषण कौशल्य, सादरीकरण कौशल्य, विषय समज वाढवण्याकरिता विद्यार्थ्यांना विषयाचे वाटप करावे व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वक्त्यांची ध्वनीमुद्रित भाषणे ऐकवावीत. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ९) | फेब्रुवारी | आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन | (२१ फेब्रुवारी) आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या परिपत्रकात नमूद कार्यक्रमांचे आयोजन करावे. |
| | | मराठी भाषा गौरव दिन (२७ फेब्रुवारी) | मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासन निर्णयात दिल्याप्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. लेखक, कवी, साहित्यिक अथवा नामवंत व्यक्तीच्या व्याख्यानाचे आयोजन करावे. विविध साहित्य प्रकारांची कालखंडानुसार वयानुरूप ओळख करून द्यावी. |
| | | साहित्यिक सप्ताह | मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून कवी कुसुमाग्रज अथवा नामांकित साहित्यिक यांच्या प्रसिद्ध साहित्याचे दररोज ठराविक इयत्तानुसार वाचन करण्यात यावे. सदर उपक्रम एका आठवड्याकरिता राबविण्यात यावा. |
| १०) | मार्च | बातमी/जाहिरातलेखन स्पर्धा | विद्यार्थ्यांना वयोगटानुरूप बातमी लेखनाचे/जाहिरातीचे कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना बातमीचा/जाहिरातीचा विषय देण्यात यावा व त्यावर आधारित बातमीचे/जाहिरातीचे लेखन करण्यास सांगावे. उत्कृष्ट बातमी लेखन/जाहिरात लेखनाच्या नमुन्यास बक्षीस देण्यात यावे. |
| | | प्रश्नमंजुषा | विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेसंदर्भातील सामान्य ज्ञान विकसित करण्यासाठी प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात यावे यामध्ये लेखक व त्यांच्या साहित्य कलाकृतींची नावे, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कलाकृतींची माहिती, लेखक व त्यांची टोपणनावे, म्हणी व त्यांचे अर्थ विषयावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात यावी. |
| | | संवाद लेखन स्पर्धा | मराठीतील संभाषण कौशल्य, कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी संवाद लेखनाकरिता विषय देण्यात यावा व त्यावर आधारित संवाद लेखन करून घ्यावे. उत्कृष्ट संवादलेखनाचे नमुने भित्तिपत्रकात लावावेत. |
| ११) | एप्रिल | पोवाडा लेखन व सादरीकरण | सर्जनशील लेखन आणि सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी समूहामार्फत उत्कृष्ट पोवाड्याच्या नमुन्याचे सादरीकरण करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे गट करून एका विशिष्ट विषयावर (उदा. 'शाळेतील स्वच्छता') विद्यार्थ्यांना पोवाड्याचे लेखन करण्यास सांगावे व तयार केलेला पोवाडा परिपाठाच्या वेळी सादर करण्याची गटाला संधी द्यावी. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | मराठी गाणी तयार करणे | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक कौशल्ये विकसित करण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील नवीन गाणे तयार करण्याची व सादरीकरणाची संधी द्यावी. |
| | | विज्ञान नाटक तयार करणे | विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अभिव्यक्ती विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटामध्ये विज्ञान नाटकाकरिता विषय द्यावा. दिलेल्या विषयावर नाटक तयार करून सादर करण्यास सांगावे. |
| | | मार्गदर्शन वर्ग | विद्यार्थ्यांसाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुद्ध लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा पहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सूत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी मराठी विषयाच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन वर्ग घ्यावेत. |

## विद्यार्थी सूचना :

- समूहातील प्रत्येक सदस्यांनी मराठी भाषेच्या अनुषंगाने आलेल्या उपक्रमामध्ये सक्रियतेने सहभाग घ्यावा.
- समूहातील प्रत्येक सदस्यांनी वाचनकोपरा व भित्तिपत्रकावर आपल्या लेखन कृती याची भर घालावी.
- समूहातील प्रत्येक सदस्यांनी अनेक साप्ताहिक कार्यक्रमात गटाने सहकार्याने मिळून कामकाज करावे.
- समूहातील प्रत्येक सदस्यांनी मराठी भाषेच्या अस्मितेचे जतन व संवर्धन करावे.

## शिक्षकांसाठी सूचना :

- शिक्षकांची भूमिका ही मार्गदर्शकांची असावी.
- शिक्षकांनी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होतील यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा द्यावी.
- शिक्षकांनी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.
- शिक्षकांनी मुलांच्या लेखन कलाकृतीला अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याकरिता समूहाच्या मदतीने भित्तिपत्रकाची निर्मिती करावी.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लेखनाला नियतकालिकातून प्रसिद्धी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत.
- शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातील कृतीकरिता सादरीकरणाची समान संधी उपलब्ध करून द्यावी.

- विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या अनुषंगाने अधिकाधिक भाषिक वातावरण देण्याचा प्रयत्न करावा.
- मुलांना अधिकाधिक साहित्यकृतींचा वाव देण्याकरिता अधिकाधिक मजकूर समृद्ध वातावरण देण्याबाबतचे नियोजन करावे.

**अंतर्गत उपक्रम आयोजन करण्याकरिता सूचना :**

- शाळेमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात यावा.
- मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात यावे.
- विद्यार्थ्यांसाठी वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत.
- मराठी समूह कार्यक्षम रीतीने कार्यरत राहावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- सहभागी झालेले विद्यार्थी, तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक याबाबतचा माहिती अहवाल संकलित करावा.
- प्रत्येक उपक्रमाचे काही निवडक फोटो संग्रही ठेवावे.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

मराठी भाषा समूहाने शाळेतील इतर समूहाशी समन्वय साधावा. शाळेतील इतर समूहाशी संपर्कात राहून उपक्रमाच्या वेळा व दिनांक याबाबत समन्वय राखावा. काही उपक्रम इतर समूहासोबत एकत्रितरीत्या घेता येऊ शकतात त्यानुसार त्याचे नियोजन करावे. समूह प्रमुखाने व गटातील सदस्यांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**मराठी भाषा समूहाचे फायदे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये निम्न बोधात्मक क्षमतेपासून उच्च बोधात्मक क्षमतांचा विकास होईल.

२) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये सहजपणे व आनंददायी पद्धतीने अध्ययन निष्पत्तीच्या विकासास मदत होईल.

४) विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याविषयी आवड निर्माण होईल.

५) विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची सवय विकसित होईल.

६) विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कवी, लेखक, समीक्षक होणेकरिता प्रोत्साहन मिळेल.

**मराठी भाषा समूहास विभागाकडून देण्यात येणारी शैक्षणिक मदत :**

- नामांकित कवी, लेखक यांचे तंत्रज्ञानाच्या मदतीने व्याख्यानांचे आयोजन.
- नामांकित कवींच्या कविता वाचनाचे, कथा, वयानुरूप कादंबरी याच्या अभिवाचनाच्या कार्यक्रमांचे तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रक्षेपण.
- जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुद्ध लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा

पहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सूत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, मराठी विषयाच्या अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन वर्ग.

**भाषेसंदर्भाने असणारे दिनविशेष व कार्यक्रम :**

| अ. क्र. | दिनविशेष | दिनांक |
|---|---|---|
| १) | आंतरराष्ट्रीय भाषा दिन | २१ फेब्रुवारी |
| २) | मराठी भाषा गौरव दिन | २७ फेब्रुवारी |

## अहवाल लेखन प्रपत्र :

- जिल्ह्याचे नाव :
- तालुक्याचे नाव :
- केंद्राचे नाव :
- शाळेचे नाव :
- मुख्याध्यापकाचे नाव :
- यु-डायस क्रमांक :
- मराठी भाषा समूहाचे नाव :
- मराठी भाषा समूहाचे प्रमुख (शिक्षकाचे नाव) :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची संख्या :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची नावे :
- समूहातंर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक :

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | उपक्रम राबविलेला दिनांक/सप्ताह | उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा तपशील | उपक्रमातून निर्मित उत्कृष्ट साहित्य/ चित्रफिती/ध्वनिफिती व फोटोची लिंक |
|---|---|---|---|---|
| १) | | | | |
| २) | | | | |

**टीप :** उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलात शैक्षणिक वर्षात राबविलेल्या प्रत्येक उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाही या अनुषंगाने विविध मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणेही सोबत जोडावीत.

❑❑❑

# 2. English Language Club

## Introduction :

In today's globalized world, proficiency in the English language is an invaluable skill. Establishing English club in schools is an excellent way to promote language learning and cultural awareness among students. These clubs offer an engaging platform for students to enhance their linguistic abilities while also exploring the traditions, customs, and histories associated with various cultures. By participating in this club, students will gain confidence in their English language skills, foster a love for learning English language.

## Objectives of the English Language Club :

- **Improved Language Proficiency :** Regular practice in speaking, listening, reading, and writing in a structured and fun environment.
- **Cultural Awareness :** Exposure to different cultures through food, traditions, festivals, and history.
- **Social Engagement :** Opportunities to connect with peers who share similar interests in language and culture.
- **Leadership Opportunities :** Club officers can gain experience in managing and organizing events, fostering leadership and teamwork skills.
- **Building a Confidence :** Public speaking, presentations, and performances will help students gain confidence in using the language in real-world settings.

## Mode/Interaction of the Club members :

Face to Face (Club members can think about online way for regulating the club – as per the situation or any innovation at their level.)

## Structure of the Club :

### Who should be the Head of the club :

This can be a student-driven activity, with the head of the group being a student from an upper grade. This approach will encourage leadership development, ownership, and accountability. However, it is important that, in the early stages, students receive handholding support from teachers. The role of the teachers (facilitator) can be as follows:

### Role of Teachers (Facilitator) :

1) **Club Mentor :** A dedicated teacher (preferably an English teacher) to supervise, guide, and support students in their activities.
2) **Activity Facilitator :** Teachers will lead language-building activities (e.g., storytelling, discussions, debates) and help in resource provision.
3) **Progress Tracker :** Teachers will monitor and assess student progress in language skills, offering additional support if required.

4) **Resource Provider :** Teachers will help students access learning materials, books, and online resources.

## Who should be the members of the club?

According to the school's grade structure, two students from each grade will be selected as members of the club.

## What should be the criteria for selection/exclusion of the students?

There can be basic criteria for membership of the club which can be as follows

1) Interest in learning English (via a simple form or discussion or the English teacher of a particular class can give inputs).
2) Equal representation from different classes or grades.
3) Potential for growth, rather than existing proficiency


## What should be the scope of the activities?

The scope of activities for an English language club should be designed to enhance students' reading, writing, listening, and speaking skills interactively and enjoyably. (Mother tongue can be used for more clarity.)

| Areas of the Development | Activities |
|---|---|
| A) Academic skill enhancement<br><br>B) Communication Skills Development<br>C) Making learning English enjoyable<br>D) Creative and Fun Activities | 1) Vocabulary building<br>2) Grammar games (Tense-integrated activities) for ex. Tense Puppet Show, Tense board game.....<br>3) Reading aloud with proper pronunciation<br>4) Reading Comprehension<br>5) Interview Practice<br>6) Diary writing,Story Writing, Script Writing<br>7) Conversation<br>8) Role Plays<br>9) Group Discussions/Debates<br>10) Storytelling<br>11) Speech Competitions<br>12) Drama and Skits<br>13) Song and Poetry<br>14) Recitation<br>15) Quiz Competition<br>16) Poster and Slogan Making |

## What activities should be included in the club's annual calendar?

Month wise activities are given as follows to be conducted by English language club members. Club members can modify the activities under the guidance of a facilitator as per the situation/need.

| Timeline | Activities |
|---|---|
| **Month 1 (June) : Club Formation and Orientation** | **Introduction to the Club :** Overview of the objectives, club structure, and rules.<br>**Club Pledge :** Have students take a pledge to actively participate and practice English.<br>• **Icebreaker Activities**<br>Fun language games like 'Chinese whisper'-Chinese Whispers (also known as Telephone in some countries) is a classic game that demonstrates how information can be distorted or changed as it passes through multiple people. The game typically involves a series of players sitting in a circle or line, with the first player whispering a message to the next player, and so on. The final player then shares the message they received, and it's often compared to the original message to reveal any changes or miscommunications.…<br>**Instruction for facilitator :** Teacher is supposed to guide club members to conduct Fun language games like 'Chinese whisper.'<br>• **Vocabulary building**<br>'Listen to an Audio – Create a word cloud'<br>**Activity :** Creating a Word Cloud from an Audio<br>**Objective :** To visualize the main ideas and keywords from an audio recording.<br><br><br>**Instructions :**<br>1) Listen to the audio recording carefully.<br>2) Take note of the key words and phrases mentioned in the audio and make word cloud. |
| **Month 2 (July) : Skill Development** | • **Grammar Games**<br>Tense-integrated activities, All 4 type sentences – Declarative, Imperative, Interrogative, Exclamatory… for ex. Tense Puppet Show, Tense board game..., Complete the sentences…(A teacher can suggest any activity regarding tenses)<br>**Instruction for facilitator (Teacher) :** A teacher is expected to guide club members to conduct the games as per the grade levels.<br>• **Reading aloud with proper pronunciation**<br>Instruction for facilitator (Teacher) : Teacher is supposed to guide |

| Timeline | Activities |
|---|---|
| | club members to form the groups as per the grade levels like Grades 1-2, 3-5,6-8,9-10 and select the appropriate words /sentences for them to read with correct pronunciation. |
| **Month 3 (August) : Skill Development** | • **Poetry Recitation Program**<br>Club member will provide an opportunity of Poetry Recitation Program to the Students to memorize and recite poems in front of the class (Poems will be selected as per the grade levels like Grades 1-2, 3-5,6-8,9-10)<br>• **Express Yourself (Activity)**<br>Club member will encourage students to speak about their favourite books, person, hobbies, or topics they are passionate about. |
| **Month 4 September** | • **Guest Speaker Sessions :**<br>Club members will invite English language experts, storytellers, or authors to interact with students.<br>• **Language Quiz :**<br>Club members will organize an English language quiz covering grammar (Age appropriate questions are expected to be covered) |
| **Month 5 October (Communication)** | • **Debate and Discussion Sessions**<br>Club members will Organize debates on age-appropriate topics, focusing on improving speaking skills. (eg. Age appropriate Daily life topics) |
| **Month 6 November** | • **Diary writing, Story Writing, Script Writing**<br>Club members will arrange a session by inviting an expert for Diary writing, Story Writing, Script Writing |
| **Month 7 December Public Speaking** | • **Interview Practice**<br>Club members will provide a platform for practicing interview as per the grade levels.<br>• **Discussion and Application of Fluency Ideas with help of given resource**<br>For ex. Expressing opinions and ideas -Personal point of view, General point of view |
| **Month 8 January** | • **Speech Competitions**<br>Club members will organize Speech Competitions on various topics in English language. |
| **Month 9 February (Advanced Learning)** | • **English Drama/Play**<br>Club members will organize a small play or skit based on a popular English story or cultural theme. |

| Timeline | Activities |
|---|---|
| **Month 10 March** | • **Reading program**<br>Club members will organize 'Reading Program' and they will encourage students to read the provided material.<br>• **Instruction for facilitator**<br>Teacher is supposed to guide club members to form the groups as per the grade levels like Grades 1-2, 3-5, 6-8,9-10 and select the appropriate books for them to read. |
| **Month 11 April**<br>**Reflection and Year-End Celebration** | • **Poster and Slogan Making program**<br>Club members will organize poster and slogan Making program.<br>• **Language Proficiency Awards**<br>Club members will organize 'The Award Ceremony'<br>(Award certificates for different categories -Best Speaker, Best Writer, Best Performer, etc.).<br>• **Publishing (Flipbook) of student written things like Family information, Daily routine, Framed Questions' list,** |

## English language-related days to celebrate in schools :

**International Mother Language Day (February 21st)**

1) World Storytelling Day (March 20th) : Encourage students to share and celebrate stories in English Language.
2) National Reading Month (March in US, varies in other countries) : Promote reading habits and celebrate the joy of reading.
3) World Book Day (April 23rd) : Encourage students to read and celebrate their favourite books.
4) Shakespeare Day (April 23rd ) : Commemorate the birth and death of William Shakespeare with plays, poetry, and performances.
5) English Language Day (April 23rd) : Celebrate the English language with language-related activities, games, and events.
6) National Literacy Day (September 8th) : Promote literacy and reading skills with activities, quizzes, and competitions
7) National Poetry Day (October 1st in UK, varies in other countries) : Celebrate poetry with readings, workshops and student performances.

## What should be the procedures/rules for the functioning of the Club?

**General Procedures for the Club**

1) **Membership Rules :**
   - Open membership or a simple selection process.

- Members must attend a minimum of 70% of the sessions to remain active participants.
- New members can join at the start of each academic year to ensure consistency.

2) **Meeting Schedule :**
   - Meetings should be held weekly or bi-weekly, on a fixed day and time.

3) **Roles and Responsibilities :**
   - Teacher Coordinator : Ensures the club's objectives are met, guides activities, and monitors progress.
   - Student Leaders :
     - ✧ Club Head : Plans and organizes activities with the teacher.
     - ✧ Secretary : Records meeting minutes, attendance, and activity logs.
     - ✧ Activity Leader : Prepares games, challenges, and other exercises.

4) **Activity Structure :**
   - Each session should include :
     - ✧ Warm-up (5-10 mins) : Icebreakers, word games, or vocabulary exercises.
     - ✧ Main Activity (30-40 mins) : A planned exercise like storytelling, debates, role-plays, or reading aloud.
     - ✧ Wrap-Up (5-10 mins) : Summarize learning outcomes, provide feedback, and assign any follow-up tasks.

## Rules for Club Members

1) **Attendance and Punctuality :**
   - Members must attend sessions regularly and arrive on time.
   - Repeated absences without a valid reason may lead to suspension from the club.

2) **Active Participation :**
   - All members must participate actively in discussions, activities, and events.
   - Members should complete assigned tasks, such as writing assignments or preparing for a speech.

3) **Respect and Etiquette :**
   - Be respectful to teachers, peers, and guest speakers.
   - Avoid interrupting others when they are speaking.
   - Use English as much as possible during club activities.

4) **Discipline :**
   - Maintain a positive and supportive environment.
   - Misbehavior, such as teasing or discouraging peers, is strictly prohibited.

5) **Contribution to the Club :**

- Members are encouraged to suggest activities, themes, or improvements. Participation in special events or competitions organized by the club is expected.

## The coordination process among various clubs :

The coordination process among various clubs in a school can be a crucial aspect of ensuring successful club operations, minimizing conflicts and fostering a collaborative environment.

Some ways for the successful coordination process :

1) **Establishment of a Club Council :**

- Form a Club Council : Comprise representatives from each club, including the club president, vice-president, or designated representative.
- Define roles and responsibilities : Clearly outline the roles and responsibilities of Club Council members, including communication, event planning, and conflict resolution.

2) **Regular Meetings :**

- Schedule regular meetings : Hold bi-weekly or monthly meetings to discuss club events, share ideas, and address concerns.
- Agenda and minutes : Prepare a meeting agenda and take minutes to ensure transparency and accountability.

3) **Event Planning and Scheduling :**

- Shared event calendar : Maintain a shared calendar to track club events, ensuring no conflicts or overlaps.
- Event planning guidelines : Establish guidelines for event planning, including budgeting, promotion, and logistics.

4) **Conflict Resolution :**

- Establish a conflict resolution process : Develop a process for addressing conflicts or disputes between clubs, including mediation and arbitration.
- Designate a conflict resolution team : Appoint a team to handle conflict resolution, comprising representatives from the Club Council, school administration, and student government.

5) **Review and Evaluation**

- Regular review meetings : Hold regular meetings to review club progress, discuss challenges, and identify areas for improvement.
- Club evaluation forms : Distribute evaluation forms to club members and advisors to gather feedback and assess club effectiveness.

By implementing this coordination process, schools can foster a collaborative environment among clubs, promote effective communication and ensure successful club operations.

**What kind of support and encouragement can be provided by the education department or SCERT for the empowerment of this group? Also, what guidance can be provided throughout the year?**

The education department can support and guide a student language club :

1) **Support and Guidance**

- Assign a faculty advisor : Appoint a teacher or staff member fluent in the target language to guide and mentor the club.
- Language resources : Provide access to language learning resources, such as textbooks, language learning software, and online platforms.
- Guest speakers : Invite native speakers, language experts, or authors to share their experiences and insights with the club.
- Language exchange programs : Facilitate language exchange programs with other schools or institutions to promote linguistic and cultural exchange.
- Workshops and events : Organize workshops and other events to promote language skills and cultural awareness.

2) **Encouraging Participation :**

- Promote the club : Advertise the language club through school announcements, social media, and posters to attract interested students.
- Inclusive membership : Ensure that the club is open to students of all language proficiency levels and backgrounds.
- Recognition and rewards : Offer recognition and rewards for club members who demonstrate exceptional language skills, participation, or leadership.

3) **Monitoring Progress :**

- Regular meetings : Hold regular meetings with the club advisor and members to discuss progress, address concerns, and plan events.
- Language proficiency assessments : Conduct regular language proficiency assessments to monitor students' progress and identify areas for improvement.
- Club evaluations : Evaluate the club's effectiveness in promoting language skills and cultural awareness and provide feedback for improvement.

**List of online and offline resources/books/literature helpful for effective functioning of the group**

1) **Online Resources :**

- **BBC Learning English :** Offers free lessons, videos and activities on grammar, vocabulary and pronunciation.

Website : BBC Learning English

- **Duolingo :** A gamified language-learning app suitable for vocabulary, grammar, and speaking practice.

  Website : Duolingo
- **TED-Ed India :** Short and inspiring TED-Ed talks with subtitles, useful for comprehension and discussion.

  Website : TED-Ed.
- **All India Radio (AIR) Learning English Program :** AIR broadcasts programs like English Matters designed to improve English listening skills for Indian learners. Visit here.
- Oxford Reading Tree (Indian Editions)
- Beginner-friendly graded reading materials with colorful illustrations.

**2) Offline Resources**

- Newspapers for students (Easy Reading Sections)
- Newspapers like The Hindu and Times of India have student-friendly sections.
- British Council's Grammar References and Fluency book

### What other issues are helpful for the effective functioning of the group?

**1) Teacher Involvement :**

- Teachers play an essential role in supporting the club's activities by guiding students through language learning and cultural exploration. Their involvement ensures that the activities are educational and aligned with the curriculum. Teachers can also provide additional resources, such as language textbooks or access to educational platforms.

**2) Community Engagement :**

- Hosting public events, such as cultural presentations or community outreach, helps students apply what they've learned in a real-world context. It also strengthens the bond between the school and the community, promoting a shared interest in language and cultural exchange.

### An overview of the benefits and challenges to the school due to this group.

**1) Benefits to the School :**

- **Improvement in Student Skills**
  - Students gain confidence in speaking, listening, reading, and writing English, which positively impacts their academic performance.
  - Enhanced language skills help students better participate in class discussions and express themselves clearly.

- **Promotion of Creativity and Critical Thinking**
  - ✧ The club encourages creative activities like storytelling, debates and role-playing, which foster critical thinking and problem-solving skills.
  - ✧ Students develop their ability to think critically, express ideas clearly and engage with diverse viewpoints.
- **Development of Leadership and Social Skills**
  - ✧ Students take on leadership roles, gaining valuable experience in organizing activities, managing events, and collaborating with peers.
  - ✧ The club promotes teamwork, communication, and responsibility, all of which are essential life skills.
- Boost to School's Reputation
  - ✧ Success in competitions, events, and the overall performance of the club enhances the school's prestige and attracts positive attention from parents, the community, and education authorities.
  - ✧ It positions the school as one committed to holistic student development, going beyond just academic learning.
- Increased Student Engagement
  - ✧ The club offers an exciting alternative to traditional classroom learning, engaging students who may not otherwise excel in academics but shine in creative activities.
  - ✧ It creates a sense of belonging and purpose among students, keeping them motivated and involved in school life.

**2) Challenges to the School :**

- **Resource Limitations :**

  The club might require additional resources like books, materials and space, which can strain the school's budget and facilities.

  Not all schools may have the infrastructure to support the club's activities without disrupting regular academic schedules.

- **Time Management Issues :**

  Balancing club activities with academic responsibilities can be challenging for both students and teachers. Students may neglect their academic tasks if the club's activities are too frequent or demanding.

  Teachers might face additional workload in organizing and supervising the club, which could lead to burnout if not managed effectively.

- **Exclusion of Some Students :**

  If the club is selective or if activities are not designed to accommodate all skill levels, some students might feel left out or discouraged from joining.

  There is a risk of more confident students dominating discussions and activities, which may discourage shy or less proficient students from participating.

- **Annual Report :**

  Blank Template will be provided including following points

| Sr. No. | No. of Club Members (Grade wise) | Month wise Activities performed in the club | Achievements | Challenges | Innovation/ Addition in the club running | Links for Photos and Videos |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | | | | | |
| 2) | | | | | | |
| 3) | | | | | | |

**Conclusion** :

The clubs will not only enhance students' language proficiency but also provide a platform for creativity, community involvement, and personal growth.

By following the suggested timeline and activities, students can experience consistent progress in language acquisition, broaden their cultural awareness, and develop skills that will benefit them in their academic careers and beyond. These clubs create a dynamic, inclusive environment where students can collaborate, explore new languages, and gain a deeper understanding of the world around them.

❑❑❑

# ३. हिंदी विषय समूह

## प्रस्तावना :

हिंदी भाषा ही भारताची राजभाषा असून देशातील बहुतांश लोकसंख्या हिंदी भाषा बोलते, लिहिते आणि समजते. हिंदी भाषा केवळ एक संवादाचे माध्यम नसून, ती विचारांची, भावना व्यक्त करण्याची आणि सामाजिक संवाद व राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्याचे एक प्रभावी साधन आहे. हिंदी भाषेतील साहित्याला भारतीय संस्कृतीचा आरसा मानले जाते. कबीर, तुलसीदास, सूरदास, प्रेमचंद, महादेवी वर्मा, जयशंकर प्रसाद, निराला, पंत यांसारख्या कित्येक साहित्यिकांनी हिंदी साहित्याला जगभरात ओळख मिळवून दिली आहे. तसेच हिंदी भाषा विविध स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवा आणि इतर अनेक सरकारी व खाजगी क्षेत्रातील संधींसाठी उपयुक्त ठरते. पत्रकारिता, प्रसारमाध्यम, अनुवाद, शिक्षण, संशोधन अशा अनेक क्षेत्रांमध्ये हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यामुळे शालेय शिक्षणात हिंदी भाषा व साहित्याचे शिक्षण अत्यंत आवश्यक आणि उपयुक्त आहे.

## हिंदी समूह संकल्पना :

हिंदी भाषेचे महत्त्व लक्षात घेता शालेय स्तरापासूनच हिंदी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच हिंदी भाषा व साहित्याची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे हिंदी भाषा शिक्षणाची, त्यात साहित्य निर्मिती करण्याची, त्याचा आस्वाद घेण्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये तशी दृष्टी विकसित करण्यासाठी व तशा संधी मुलांना उपलब्ध करून देण्यासाठी शालेय स्तरावर विकसित करण्यात आलेला स्वप्रेरणेने व उस्फूर्तपणे कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक गट म्हणजे हिंदी भाषा समूह होय.

## हिंदी भाषा समूह उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेबाबत आवड निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेच्या साहित्याबाबत जाणीव निर्माण करणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेच्या साहित्याबाबत समीक्षणात्मक दृष्टीकोनाची निर्मिती करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेबाबत संशोधनात्मक वृत्ती निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेच्या शास्त्रशुद्ध साहित्य लेखनाबाबत जाणीव जागृती करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेच्या अनुषंगाने सर्जनशील विचार क्षमता निर्माण करणे.

८) हिंदी भाषेत जतन, संवर्धन करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेतील अर्थार्जनाच्या संधीची जाणीव निर्माण करणे.

१०) समूहातील सदस्यांची त्याच्या आवडीच्या क्षेत्रानुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे. सर्व सदस्यांना समूहातील विविध कामकाजाच्या पद्धतीचा अनुभव मिळण्याची खात्री करणे.

११) हिंदी भाषा समूहांतर्गत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.

१२) समूहाच्या कामकाजात समन्वय राखण्यासाठी दर दोन ते तीन आठवड्यांनी बैठका घेणे तसेच उपक्रम राबविण्यासाठी नियोजन करणे.

१३) हिंदी भाषा समूहाने घेतलेल्या समूहाच्या कामकाजाचा इतिवृत्तांत ठेवणे.

१४) हिंदी भाषा समूहाने घेतलेल्या कार्यक्रमास प्रसिद्धी देणे.

१५) हिंदी भाषा समूहाने राबविलेल्या कार्यक्रमातील कामाच्या खर्चाचे ताळेबंद ठेवणे.

१६) समूहाच्या कामकाजात सहभागी असलेले तज्ज्ञ व पालक यांच्याशी समन्वय ठेवणे.

### शालेय हिंदी समूहाची रचना :

शालेय स्तरांनुसार हिंदी समूह रचना असावी.

| अ. क्र. | रचना | पद |
|---|---|---|
| १) | हिंदी भाषा विषय शिक्षक | मार्गदर्शक/समूह प्रमुख |
| | शाळेतील इतर हिंदी भाषा विषय शिक्षक | सदस्य |
| २) | **संख्या :** स्तरनिहाय, प्रत्येक इयत्तानिहाय व तुकडीनिहाय विद्यार्थी संख्या असावी.<br>**निवडीचे निकष :**<br>विद्यार्थ्यांची निवड करत असताना वार्षिक साहित्य संमेलनामध्ये ज्या विविध स्पर्धा घेतल्या जातात उदा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, काव्यवाचन या सारख्या स्पर्धांचे विजेते तसेच उत्कृष्ट कविता, कथा लिहिणारे, वाचन कोपरा, विविध मासिके या मध्ये लेख लिहिणारे विद्यार्थी अथवा हिंदी भाषेची आवड असणारे व स्वेच्छेने मंडळात भाग घेऊ इच्छिणारे विद्यार्थी यामध्ये समाविष्ट करावेत या करिता निवड शिक्षकांमार्फत करण्यात यावी. | सदस्य |
| | एकापेक्षा अधिक विद्यार्थी पात्र असल्यास लॉटरी पद्धतीचा वापर करण्यात यावा. | |
| ३) | हिंदी भाषा समूहाच्या विषयाशी संबंधित कार्य करण्यासाठी समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती. | सदस्य |

## हिंदी भाषा समूहाची जबाबदारी व कार्ये :

१) मुख्याध्यापकांनी व हिंदी विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने हिंदी भाषा समूह स्थापन करणे.

२) हिंदी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमाची निश्चिती करणे.

३) हिंदी भाषेच्या अनुषंगाने निश्चित केलेल्या उपक्रमांचे आयोजन करणे.

४) समूहाच्या वतीने स्थानिक कवी, लेखक, समीक्षक यांच्या व्याख्यानाचे किंवा परिसंवादाचे आयोजन करणे.

५) समूहाद्वारे राज्याने निश्चित केलेले उपक्रम राबविणे. (उदा. हिंदी भाषा गौरव दिन, हिंदी भाषा पंधरवडा, आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस, वाचन प्रेरणा दिवस, वाचन चळवळी)

६) समूहाद्वारे शाळेमध्ये हिंदी भाषेतील स्तराधारित पुस्तके तसेच इतर वितरीत केलेले वाचन साहित्याच्या साहाय्याने वाचन संस्कृतीचा विकास करणे.

७) समूहाद्वारे राज्याने आयोजित केलेल्या नामांकित साहित्यिकांची विविध व्याख्याने किंवा परिसंवादाचा लाभ शाळेतील सर्व विद्यार्थी घेत आहेत याबाबतची खात्री करणे.

८) समूहाद्वारे वाचन कोपऱ्याची निर्मिती करणे व त्याद्वारे शाळेतील वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या साहित्यिक सर्जनशीलतेचा अविष्कार करणे.

९) समूहाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शुद्धलेखन नियमांची जाणीव करून देणे, हस्ताक्षर योग्य तऱ्हेने काढणे, निवेदन कौशल्य व अभिवाचन कौशल्य वृद्धी, शब्दकोश पाहणी यासाठी विशेष प्रयत्न करणे.

१०) समूहाद्वारे विद्यार्थ्यांच्या भाषिक सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळावे याकरिता वार्षिक अंकाची निर्मिती करणे व त्याद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या भाषिक कलाकृतींना वाव देणे.

११) समूहाद्वारे हिंदी साहित्य संमेलनामध्ये पुरस्कार प्राप्त साहित्याबाबत चर्चासत्राचे आयोजन करणे समूहाद्वारे वार्षिक नियोजन तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

१२) हिंदी भाषा समूहाने आयोजित केलेल्या उपक्रमाचा अहवाल तयार करणे.

## हिंदी भाषा समूहातर्फे खालील उपक्रम राबवता येतील :

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | जून | गीत गायन | शालेय स्तरावर बडबडगीते, पारंपरिक गीते यांच्या गायन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| २) | | सुंदर हस्ताक्षर स्पर्धा | हस्ताक्षर वळणदार असण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करावे. सुंदर हस्ताक्षराचे नमुने भित्तिपत्रकात लावावेत. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ३) | | शब्दभेंड्या स्पर्धा | विद्यार्थ्यांसाठी शब्दभेंड्या स्पर्धेचे आयोजन करावे. याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत व शब्द द्यावा. शब्दाच्या शेवटच्या शब्दावरून पुढील गटास शब्द सांगण्यास सांगावे. व याप्रमाणे गटांची स्पर्धा घेतली जावी. |
| ४) | | अभिवाचन | उत्कृष्ट अभिवाचनाचे उत्तम सादरीकरण विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी हिंदी भाषा समूहातील सदस्यांना विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार एखाद्या कथेमधील काही भागाचे अभिवाचन करून दाखविण्यात यावे. शक्य झाल्यास स्थानिक कलाकारांच्या माध्यमातून देखील अभिवाचनाचे उत्तम नमुने सादर करता येतील. अधिकाधिक विद्यार्थ्यांना अभिवाचनाची संधी द्यावी. विद्यार्थ्यांना याबाबीचे अध्ययन अनुभव मिळण्यासाठी अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| ५) | जुलै | वाचन उपक्रम | विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी दिवस निश्चित करून शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकांचे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात यावे व त्याचे वाचन करण्याकरिता विद्यार्थ्यांना वेळ देण्यात यावा व वाचलेल्या पुस्तकावर अभिप्राय देण्यास सांगावे. |
| ६) | | कथाकथन स्पर्धा | शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वातील विविध कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. कथाकथनाच्या माध्यमातून हिंदी भाषेतील शब्द, आवाजातील चढ-उतार, पात्रनिहाय संवादफेक या बाबी समजून देण्याकरिता समूहाने कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. उत्कृष्ट कथाकथन करणाऱ्या विद्यार्थ्यास गौरविण्यात यावे. |
| ७) | | म्हणी (कहावते) सांगा | विद्यार्थ्यांना हिंदी भाषेतील भाषिक सौंदर्य समजावून देण्यासाठी परीपाठामध्ये दररोज एका म्हणींचा (कहावते) समावेश करावा व त्या विद्यार्थ्यास म्हणींचा अर्थही स्पष्ट करून सांगण्यास सांगावे. त्याची हस्तपुस्तिका तयार करून त्याचे जतन करावे. |
| ८) | | शीघ्र नाटक | विद्यार्थ्यामध्ये कल्पनाशक्ती आणि तात्काळ विचार करण्याची क्षमता विकसित करण्याकरिता विद्यार्थ्याचे गट करून एखादी नाटकाची संकल्पना द्यावी. (उदा. भाजी मंडईतील गोष्टी, पर्यावरण रक्षण) |
| | | | विद्यार्थ्यांना ठरावीक वेळ दिला जावा व त्यावर आधारित तातडीने नाटक तयार करून सादर करण्यास सांगावे. शालेय स्तरावरील नाटकाच्या संहिता लेखनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शनाचे आयोजन करावे. |
| ९) | ऑगस्ट | मी निवेदक | शिक्षकांनी समूहातील विद्यार्थ्यांना विविध बाबीचे निवेदन किंवा कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करण्याची संधी द्यावी व उत्तम निवेदनाचे तंत्र समजावून द्यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १०) | | वादविवाद स्पर्धा | समूहाने मुलांच्या अनुभवविश्व व वयानुरूप संवेदनशील बाबी, विविध सामाजिक समस्या व इतर अनुषंगिक विषयावर वेगवेगळे विषय देऊन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करावे. |
| ११) | | नाट्यीकरण | विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय देण्यात यावेत तसेच त्यावर नाट्यीकरण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना प्रसंगी विषय देऊन अथवा जनजागृतीपर विषय देऊन समूहनाट्याचे सादरीकरण करण्यास सांगावे. |
| १२) | | समूह गटचर्चा | विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्व व विद्यार्थ्यांच्या गरजानुसार गटातील चर्चेचे विषय असावेत. विद्यार्थ्यांचे आवश्यकतेनुसार गट पडावेत व समूहचर्चा घडवून आणावी. वाचन आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाच्या विषयावर आधारित कथेवर चर्चा आयोजित करावी गटामध्ये विचारमंथन करून कथेतून मिळणारी शिकवण, मुख्य पात्रांची वैशिष्ट्ये यावर चर्चा करावी. |
| १३) | सप्टेंबर | हिंदी भाषा दिन | हिंदी भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. लेखक, कवी, साहित्यिक अथवा नामवंत व्यक्तीच्या व्याख्यानाचे आयोजन करावे. |
| १४) | | हिंदी भाषा पंधरवडा | हिंदी भाषा संवर्धन पंधरवडा (१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर) साजरा करण्यासाठी शाळेत विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावेत. |
| १५) | | काव्यवाचन | शाळेतील मुलांनी लिहिलेल्या कविता, शिक्षकांनी लिहिलेल्या कविता तसेच पालकांच्या कविता अथवा प्रसिद्ध कवींच्या काव्य वाचनाची स्पर्धा घ्यावी. |
| १६) | | लेखक, कवी मुलाखत | स्थानिक परिसरातील उपलब्ध लेखक/कवी/पत्रकार/संपादक यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्तम मुलाखत घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. |
| १७) | | व्याख्यान परिसंवाद | परिसरातील तसेच स्थानिक हिंदी साहित्यिक, लेखक, कवी यांचे व्याख्यान आयोजित करावे. |
| १८) | ऑक्टोबर | वाचन प्रेरणा दिन | वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| १९) | | ग्रंथ प्रदर्शन | शाळेमध्ये उपलब्ध असलेली पुस्तके व पालकांकडे असलेली पुस्तके या सर्वांच्या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. |
| २०) | | वाचन कट्टा | विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी वाचन कट्टा ही संकल्पना राबवावी यामध्ये ठरावीक वेळेत विद्यार्थ्यांना पुस्तकांची उपलब्धता करून देण्यात यावी व विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनास प्रवृत्त करावे. समूहाने प्रत्येक विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील याची खात्री करावी. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| २१) | | पुस्तक जत्रा उपक्रम | केंद्र स्तरावर या उपक्रमाचे आयोजन करावे. केंद्रातील शिक्षकांनी एकत्र येऊन पुस्तकाचे प्रदर्शन भरवावे. शिक्षण परिषदांमध्ये याबाबतचे नियोजन करण्यात यावे. |
| २२) | नोव्हेंबर | घोषवाक्य व भित्तीपत्रक निर्मिती | शाळेत विविध विषयावर व हिंदी भाषा संदर्भात घोषवाक्य व भित्तिपत्रक निर्मिती स्पर्धेचे आयोजन करावे. |
| २३) | | कविता लेखन | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढविण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना कविता लेखनाची संधी द्यावी व उत्कृष्ट कविता वाचन कोपऱ्यामधील फलकावर प्रदर्शित करावी. |
| २४) | डिसेंबर | एकांकिका | विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता विद्यार्थ्यांना एकांकिका सादर करण्याची संधी देण्यात यावी. उत्कृष्ट एकांकिका सादर करण्याकरिता स्पर्धेचे अयोजन करण्यात यावे. |
| २५) | | मी समीक्षक | विद्यार्थ्यांमध्ये समीक्षणाची दृष्टी विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांना एक कादंबरी (उपन्यास), कथा देण्यात यावी त्याचे वाचन करण्याकरिता वेळ देण्यात यावा. विद्यार्थ्यांचे गट करावेत व सदर कादंबरी (उपन्यास), कथा याबाबत समीक्षणात्मक विचार मांडण्याची संधी देण्यात यावी. शाळेत उपलब्ध असलेली पुस्तके वाचून त्याचे समीक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे. |
| २६) | | कथालेखन | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढविण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांच्या कथा लेखनाची संधी द्यावी व उत्कृष्ट कथा लेखनास वाचन कोपरा यातील डिस्प्लेबोर्ड वर झळकण्याची संधी द्यावी. कथा लेखन कसे करावे याबाबत तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन करावे. |
| २७) | | शब्दकोडी | विविध शब्दकोडी देऊन कमी वेळेत शब्दकोडे सोडवणे या संदर्भात स्पर्धेचे आयोजन करावे तसेच मोठ्या गटासाठी शब्दकोडे निर्मिती अशा स्पर्धांचे आयोजन ही करता येईल. हिंदी शब्दसंपत्ती वाढवणे या करिता विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत व प्रत्येक गटाने दहा ते पंधरा हिंदी शब्द शोधून शब्दकोडी तयार करावी. तयार झालेला संच इतर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा. |
| २८) | जानेवारी | वक्तृत्व स्पर्धा | विद्यार्थ्यांमधील भाषण कौशल्य, सादरीकरण कौशल्य, विषय समज वाढविण्याकरिता विद्यार्थ्यांना विषयाचे वाटप करावे व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट ध्वनिमुद्रित भाषण ऐकवावे. |
| २९) | | ऑडिओ बुक विकसन | विद्यार्थ्यांना हिंदी विषयाकरिता तंत्रज्ञानाची संधी मिळावी या करिता ऑडिओ बुक विकसन करावे, विद्यार्थ्यांचे गट करावे. विद्यार्थी गटाने मिळून हिंदी कथा, कविता किंवा पाठ्यपुस्तकात समाविष्ट धडे ऑडिओ स्वरूपात सादर |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | करण्याची संधी देण्यात यावी. ऑडिओ रेकॉर्डिंगसाठी साधनांचा वापर करावा. संपादित ऑडिओबुक डिजिटल लायब्ररीत अपलोड करावे. |
| ३०) | | हस्तलिखि-तांचे प्रदर्शन | विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी लिहिलेल्या काही हस्तलिखितांचे शाळास्तरावर प्रदर्शन भरवावे. तसेच पुस्तक लेखन करण्यासाठी आवश्यक बाबींचे मार्गदर्शन करण्यात यावे. |
| ३१) | | हिंदी गाणी तयार करणे | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक कौशल्ये विकसित करण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना नवीन गाणे तयार करण्याची व सादरीकरणाची संधी द्यावी. |
| ३२) | फेब्रुवारी | आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन | (२१ फेब्रुवारी) आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या निमित्ताने विविध (परिपत्रकात नमूद) कार्यक्रमांचे आयोजन करावे. |
| ३३) | | चित्रकथा/ चित्र कविता तयार करणे | विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्ती आणि वर्णनात्मक कौशल्ये विकसित करण्याकरिता सदर उपक्रम राबविता येईल यामध्ये विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक चित्र दिले जाईल (उदा. चाचा की ऐनक) त्या चित्रावर आधारित कथा अथवा कविता तयार करून स्तरानुसार त्या-त्या इयत्तांना वाचून दाखवावी. |
| ३४) | | हिंदी भाषेत पॉडकास्ट | विद्यार्थ्यांना नामांकित साहित्यिकांची ओळख करून देण्याकरिता शिक्षकांनी नामांकित साहित्यिकांचे पॉडकास्ट सादर करावेत. |
| ३५) | | साहित्यिक सप्ताह | हिंदी भाषेतील प्रसिद्ध कवी, साहित्यिक यांच्या प्रसिद्ध साहित्याचे, कवितांचे दररोज ठराविक कक्षेपर्यंत वाचन करण्यात यावे. सदर उपक्रम एक आठवडा राबविण्यात यावा. |
| ३६) | मार्च | बातमी/ जाहिरात लेखन स्पर्धा | विद्यार्थ्यांना वयोगटानुरूप बातमी लेखनाचे/जाहिरातीचे कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना बातमीचा/जाहिरातीचा विषय देण्यात यावा व त्यावर आधारित बातमीचे/जाहिरातीचे लेखन करण्यास सांगावे. उत्कृष्ट बातमी लेखन/जाहिरात लेखनास बक्षीस देण्यात यावे. |
| ३७) | | साहित्य-संमेलन | विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण होण्याकरिता शालेय स्तरावर हिंदी विषयाकरिता स्थानिक कवी, लेखक, साहित्यिक, समीक्षक यांच्या सहभागाने साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थी व शाळेतील शिक्षक यांच्या साहित्य कृतीकरिता व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. |
| ३८) | | प्रश्नमंजुषा | विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषे संदर्भातील सामान्य ज्ञान विकसित करण्यासाठी प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये लेखक व त्याच्या साहित्य |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | कलाकृतीची नावे, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कलाकृतीची माहिती, लेखक व त्याची टोपण नावे, म्हणी व त्याचे अर्थ अशा आशयावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात यावी. |
| ३९) | | संवादलेखन स्पर्धा | हिंदी भाषेतील संभाषण कौशल्य, कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी संवाद लेखनाकरिता विषय देण्यात यावा व त्यावर आधारित संवाद लेखन करून घ्यावे. उत्कृष्ट संवादलेखनाच्या नमुन्यास वाचन कोपरा यामध्ये स्थान देण्यात यावे. |
| ४०) | | कविता लेखन व सादरीकरण | सर्जनशील लेखन आणि सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी समूहामार्फत उत्कृष्ट कवितेच्या नमुन्याचे सादरीकरण करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे गट करून एका विशिष्ट विषयावर (उदा. 'निसर्ग वर्णन, सण, उत्सव') विद्यार्थ्यांना कवितेचे लेखन करण्यास सांगावे व तयार केलेली कविता परिपाठाच्या वेळी सादर करण्याची गटाला संधी द्यावी. |
| ४१) | | विज्ञान नाटिका तयार करणे. | विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अभिव्यक्ती विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटामध्ये विज्ञान नाटिकाकरिता विषय द्यावा. दिलेल्या विषयावर नाटिका तयार करून सादर करण्यास सांगावे. |
| ४२) | | मार्गदर्शन वर्ग | विद्यार्थ्यांसाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुद्ध लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा पाहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सूत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, हिंदी विषयाच्या अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन वर्ग घ्यावेत. |

## विद्यार्थी सूचना :

१) समूहातील प्रत्येक सदस्यांनी हिंदी भाषेच्या अनुषंगाने आलेल्या उपक्रमामध्ये सक्रियतेने सहभाग घ्यावा.

२) समूहातील प्रत्येक सदस्यांनी वाचन कोपरा व भित्तिपत्रकावर आपल्या लेखन कृती याची भर घालावी.

३) समूहातील प्रत्येक सदस्यांनी अनेक साप्ताहिक कार्यक्रमात गटाने सहकार्याने मिळून कामकाज करावे.

४) समूहातील प्रत्येक सदस्यांनी हिंदी भाषेच्या अस्मितेचे जतन व संवर्धन करावे.

## शिक्षकांसाठी सूचना :

१) शिक्षकांची भूमिका ही मार्गदर्शकाची असावी.

२) शिक्षकांनी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होतील यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा द्यावी.

३) शिक्षकांनी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

४) शिक्षकांनी मुलांच्या लेखन कलाकृतीला अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याकरिता समूहाच्या मदतीने भित्तिपत्रकाची निर्मिती करावी.

५) शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातील कृतीकरिता सादरीकरणाची समान संधी उपलब्ध करून द्यावी.

६) विद्यार्थ्यांना हिंदी भाषेच्या अनुषंगाने अधिकाधिक भाषिक वातावरण देण्याचा प्रयत्न करावा.

७) मुलांच्या साहित्यकृतींना वाव देण्याकरिता मजकूर समृद्ध वातावरण देण्याबाबतचे नियोजन करावे.

**अंतर्गत उपक्रम आयोजन करण्याकरिता सूचना :**

१) शाळेमध्ये हिंदी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात यावा.

२) हिंदी दिनाच्या निमित्ताने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात यावे.

३) विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत.

४) हिंदी समूह कार्यक्षम राहावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

५) सहभागी झालेले विद्यार्थी तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक याबाबतचा माहिती अहवाल संकलित करावा.

६) प्रत्येक उपक्रमाचे काही निवडक फोटो संग्रही ठेवावे.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

हिंदी भाषा समूहाने शाळेतील इतर समूहाशी समन्वय साधावा. शाळेतील इतर समूहाशी संपर्कात राहून उपक्रमाच्या वेळा व दिनांक याबाबत समन्वय राखावा. काही उपक्रम इतर समूहासोबत एकत्रितरीत्या घेता येऊ शकतात, त्यानुसार त्याचे नियोजन करावे. समूह प्रमुखाने व गटातील सदस्यांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**हिंदी भाषा समूहाचे फायदे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेची आवड निर्माण होईल.

२) विद्यार्थ्यांमध्ये सहजपणे व आनंददायी पद्धतीने अध्ययन निष्पत्तीच्या विकासास मदत होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये साहित्याविषयी आवड निर्माण होईल.

४) विद्यार्थ्यांमध्ये निम्न बोधात्मक क्षमतेपासून उच्च बोधात्मक क्षमतांचा विकास होईल.

५) विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कवी, लेखक, समीक्षण होणेकरिता प्रोत्साहन मिळेल .

६) विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची सवय विकसित होईल.

**हिंदी भाषा समूहास विभागाकडून देण्यात येणारी शैक्षणिक मदत :**

१) नामांकित कवी लेखक यांचे तंत्रज्ञानाच्या मदतीने व्याख्यानांचे आयोजन.

२) नामांकित कवींच्या कविता वाचनाचे कथा, वयानुरूप कादंबरी याच्या अभिवाचनाच्या कार्यक्रमाचे तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रक्षेपण.

३) जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुध्द लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा पहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सूत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, हिंदी विषयाच्या अभ्यासानंतर अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन वर्ग.

## भाषे संदर्भाने असणारे दिनविशेष व कार्यक्रम :

| अ.क्र. | दिनविशेष | दिनांक |
|---|---|---|
| १) | आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन | २१ फेब्रुवारी |
| २) | हिंदी दिन | १४ सप्टेंबर |
| ३) | वाचन प्रेरणा दिन | १५ ऑक्टोबर |

## अहवाल लेखन प्रपत्र :

- जिल्ह्याचे नाव :
- तालुक्याचे नाव :
- केंद्राचे नाव :
- शाळेचे नाव :
- मुख्याध्यापकाचे नाव :
- यु-डायस क्रमांक :
- मराठी भाषा समूहाचे नाव :
- मराठी भाषा समूहाचे प्रमुख (शिक्षकाचे नाव) :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची संख्या :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची नावे :
- समूहातंर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक :

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | उपक्रम राबविलेला दिनांक/सप्ताह | उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा तपशील | उपक्रमातून निर्मित उत्कृष्ट साहित्य/ चित्रफिती/ध्वनिफिती व फोटोची लिंक |
|---|---|---|---|---|
| १) | | | | |
| २) | | | | |

**टीप :** उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा तपशीलात शैक्षणिक वर्षात राबविलेल्या प्रत्येक उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाहीच्या अनुषंगाने विविध मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणेही सोबत जोडावीत.

❑❑❑

# ४. उर्दू विषय समूह

**प्रस्तावना :**

उर्दू भाषा भारतीय उपखंडातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण भाषा आहे. तिचे सांस्कृतिक आणि साहित्यिक महत्त्व प्रचंड आहे. उर्दू शायरी, कविता आणि साहित्याने भारतीय साहित्य विश्वात आपले खास स्थान निर्माण केले आहे. ग़ालिब, मीर, इकबाल यांसारख्या कवींनी उर्दू साहित्याला जगभरात ओळख मिळवून दिली आहे. उर्दू भाषा संवादाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. उर्दूचा उपयोग समाजाच्या विविध पैलूंवर, संस्कृतीवर, आणि कला क्षेत्रावर परिणाम करतो. यामुळे उर्दू भाषेचे महत्त्व लक्षात घेता शालेय स्तरापासूनच उर्दू भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**उर्दू भाषा समूह संकल्पना :**

उर्दूने भारतीय समाजात संवादाचे एक सशक्त साधन म्हणून काम केले आहे. भिन्न धार्मिक आणि सांस्कृतिक समुदायांना एकत्र आणण्याची तिची क्षमता विशेष महत्त्वाची आहे. आजच्या डिजिटल युगात, सोशल मीडिया आणि ऑनलाइन साहित्यामुळे उर्दूचा प्रसार वाढत आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये तिचा अभ्यास वाढतो आहे आणि अनेक विद्यार्थी उर्दू साहित्यात गुंतलेले आहेत. उर्दू भाषा साहित्यामध्ये गझल, कविता, कथा, आणि निबंध यांसारख्या विविध साहित्यिक शैलींचा समावेश आहे. यामुळे उर्दू भाषेला अधिकाधिक समृद्ध व संपन्न करणे महत्त्वाचे आहे. उर्दू भाषा शिक्षणाची, त्यात साहित्यनिर्मिती करण्याची, त्याचा आस्वाद घेण्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये तशी दृष्टी व तशा संधी मुलांना उपलब्ध करून देण्यासाठी शालेय स्तरावर विकसित करण्यात आलेला स्वप्रेरणेने व उस्फूर्तपणे कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक गट म्हणजे उर्दू भाषा समूह होय.

**शालेय उर्दू भाषा समूह उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यामध्ये उर्दू भाषेबाबत आवड निर्माण करणे.

२) सदर समूहाद्वारे राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये उर्दू भाषेसंदर्भाने नमूद अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास करणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेच्या साहित्याबाबत जाणीव निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेच्या साहित्याबाबत समीक्षणात्मक दृष्टिकोनाची निर्मिती करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेबाबत संशोधनात्मक वृत्ती निर्माण करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेच्या शास्त्रशुद्ध साहित्य लेखनाबाबत जाणीव जागृती करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेच्या अनुषंगाने सर्जनशील विचार क्षमता निर्माण करणे.

९) उर्दू भाषेचे जतन, संवर्धन करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे.

१०) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेतील अर्थार्जनाच्या संधीची जाणीव निर्माण करणे.

११) सदस्यांची त्याच्या विषयातील क्षेत्रानुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

१२) सर्व सदस्यांना समूहातील विविध कामकाजाच्या पद्धतीचा अनुभव मिळण्याची खात्री करणे.

१३) उर्दू भाषा समूहाकरिता आवश्यक समूहांतर्गत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे.

१४) समूहाच्या कामकाजात समन्वय राखण्यासाठी दर दोन ते तीन आठवड्यांनी बैठका घेणे तसेच उपक्रम राबविण्यासाठी नियोजन करणे.

१५) उर्दू भाषा समूहाने घेतलेल्या समूहाच्या कामकाजाचा इतिवृत्तांत ठेवणे.

१६) उर्दू भाषा समूहाने घेतलेल्या कार्यक्रमास प्रसिद्धी देणे.

१७) उर्दू भाषा समूहाने राबविलेल्या कामाच्या खर्चाचे हिशेब ठेवणे.

१८) समूहाच्या कामकाजात सहभागी असलेले तज्ज्ञ व पालक यांच्याशी समन्वय ठेवणे.

**शालेय उर्दू भाषा समूहाची रचना :**

शालेय स्तरांनुसार उर्दू भाषा समूह रचना असावी.

| अ.क्र. | रचना | पद |
|---|---|---|
| १) | उर्दू भाषा विषय शिक्षक | मार्गदर्शक/समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर उर्दू भाषा शिक्षक. | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थी/विद्यार्थिनी (संख्या स्तरनिहाय, प्रत्येक इयत्तानिहाय व तुकडीनिहाय विद्यार्थी अशी संख्या. उर्दू भाषेत विशेष प्रावीण्य असलेले तसेच स्वेच्छेने समूहात कार्य करण्यास इच्छुक असलेले विद्यार्थी) | सदस्य |
| ४) | उर्दू भाषा समूहाच्या विषयाशी संबंधित कार्य करण्यासाठी समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती. | सदस्य |

**उर्दू भाषा समूहाची जबाबदारी व कार्य :**

१) मुख्याध्यापकांनी व उर्दू विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने उर्दू समूह स्थापन करणे.

२) उर्दू भाषेच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमांची निश्चिती करणे.

३) उर्दू भाषेच्या अनुषंगाने निश्चित केलेल्या उपक्रमांचे आयोजन करणे.

४) समूहाच्या वतीने स्थानिक कवी, लेखक, समीक्षक यांच्या व्याख्यानाचे किंवा परिसंवादाचे आयोजन करणे.

५) समूहाद्वारे राज्याने निश्चित केलेले उपक्रम राबविणे. (उदा. उर्दू दिन (यौमे उर्दू), उर्दू भाषा पंधरवडा, वाचन प्रेरणा दिवस ,वाचन चळवळी इत्यादी )

६) समूहाद्वारे शाळेमध्ये उर्दू भाषेतील स्तराधारित पुस्तके तसेच इतर वितरीत केलेले वाचन साहित्याच्या साहाय्याने वाचन संस्कृतीचा विकास करणे.

७) समूहाद्वारे राज्याने आयोजित केलेल्या नामांकित साहित्यिकांची विविध व्याख्याने किंवा परिसंवादाचा लाभ शाळेतील सर्व विद्यार्थी घेत आहेत याबाबतची खात्री करणे.

८) समूहाद्वारे वाचन कोपऱ्याची निर्मिती करणे व त्याद्वारे शाळेतील वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या साहित्यिक सर्जनशीलतेचा अविष्कार करणे.

९) समूहाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शब्दलेखन नियमांची जाणीव करून देणे, हस्ताक्षर योग्य तऱ्हेने काढणे, निवेदन कौशल्य व अभिवाचन कौशल्य वृद्धी, शब्दकोश पाहणी यासाठी विशेष प्रयत्न करणे.

१०) समूहाद्वारे विद्यार्थ्यांच्या भाषिक सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळावे याकरिता वार्षिक अंकाची निर्मिती करणे व त्याद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या भाषिक कलाकृतींना वाव देणे.

११) उर्दू भाषेच्या विकासाकरिता स्थापन झालेल्या विविध राज्यस्तरीय व इतर संस्थाच्या कार्याची माहिती देणे.

१२) समूहाने उर्दू समूहाद्वारे व शाळेमार्फत आयोजित केलेल्या उपक्रमाचा अहवाल तयार करणे.

### उर्दू भाषा समूहातर्फे खालील उपक्रम राबवता येतील :

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | जून | गीत गायन (नगमा गोई) | शालेय स्तरावर बडबड गीते, पारंपरिक गीते, नगमा यांच्या गायन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| २) | | सुंदर हस्ताक्षर स्पर्धा (खुशखती का मुकाबला) | हस्ताक्षर वळणदार असण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करावे. सुंदर हस्ताक्षराचे नमुने भित्तिपत्रकात लावावेत. |
| ३) | | शब्दभेंड्या स्पर्धा (लफ्जी जंजीर) | विद्यार्थ्यांसाठी शब्दभेंड्या स्पर्धेचे आयोजन करावे. याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत व शब्द द्यावा. शब्दाच्या शेवटच्या शब्दावरून पुढील गटास शब्द सांगण्यास सांगावे व याप्रमाणे गटांची स्पर्धा घेतली जावी. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ४) | | अभिवाचन (तक़रीर की अदायगी) | उत्कृष्ट अभिवाचनाचे उत्तम सादरीकरण विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी उर्दू भाषा समूहातील सदस्यांना विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार एखाद्या कथेमधील काही भागाचे अभिवाचन करून दाखविण्यात यावे. शक्य झाल्यास स्थानिक कलाकारांच्या माध्यमातून देखील अभिवाचनाचे उत्तम नमुने सादर करता येतील. अधिकाधिक विद्यार्थ्यांना अभिवाचनाची संधी द्यावी.विद्यार्थ्यांना या बाबीचे अध्ययन अनुभव मिळण्यासाठी अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| ५) | जुलै | वाचन उपक्रम(पढाई कि सरगरमी) | विद्यार्थ्यामध्ये वाचन संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी दिवस निश्चित करून शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकांचे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात यावे व त्याचे वाचन करण्याकरिता विद्यार्थ्यांना वेळ देण्यात यावा व वाचलेल्या पुस्तकावर अभिप्राय देण्यास सांगावे. |
| ६) | | कथाकथन स्पर्धा (कहानी गोई का मुक़ाबला) | शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वातील विविध कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. कथाकथनाच्या माध्यमातून उर्दू भाषेतील शब्द, आवाजातील चढ–उतार, पात्रनिहाय संवाद फेक या बाबी समजून देण्याकरिता समूहाने कथाकथन स्पर्धेचे आयोजन करावे. उत्कृष्ट कथाकथन करणाऱ्या विद्यार्थ्यास गौरविण्यात यावे. |
| ७) | | बैत बाजी | बैत बाजीमध्ये प्रत्येक सहभागी (विद्यार्थी) शेर किंवा'' बैत–सादर करतो. पहिल्या सहभागीचा शेर संपतो त्या शेवटच्या अक्षरावरून दुसरा सहभागी आपला शेर सुरू करतो. ही साखळी पुढे चालू राहते जोपर्यंत कोणी शेर सांगू शकत नाही, अशावेळी तो स्पर्धक बाद होतो. समूहाने असे कार्यक्रम आयोजित करावे. |
| ८) | | म्हणी सांगा (कहावते ) | विद्यार्थ्यांना उर्दू भाषेतील भाषिक सौंदर्य समजावून देण्यासाठी परिपाठामध्ये दररोज एका म्हणींचा समावेश करावा व त्या विद्यार्थ्यास म्हणींचा अर्थही स्पष्ट करून सांगण्यास सांगावे. त्याची हस्तपुस्तिका तयार करून त्याचे जतन करावे. |
| ९) | | शीघ्र नाटक | विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती आणि तात्काळ विचार करण्याची क्षमता विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांचे गट करून एखादी नाटकाची संकल्पना द्यावी (उदा. सुपर मार्केटची सफर, वेळेचे महत्त्व). विद्यार्थ्यांना ठराविक वेळ दिला जावा व त्यावर आधारित तातडीने नाटक तयार करून सादर करण्यास सांगावे. शालेय स्तरावरील नाटकाच्या संहिता लेखनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शनाचे आयोजन करावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १०) | ऑगस्ट | मी निवेदक (तजवीस करदा) | शिक्षकांनी समूहातील विद्यार्थ्यांना विविध बाबींचे निवेदन किंवा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन (निजामत) करण्याची संधी द्यावी व उत्तम निवेदनाचे तंत्र समजावून द्यावेत. |
| ११) | | वादविवाद स्पर्धा (मुबाहेसा ) | समूहाने मुलांच्या अनुभवविश्व व वयानुरूप संवेदनशील बाबी, विविध सामाजिक समस्या व इतर अनुषंगिक विषयावर वेगवेगळे विषय देऊन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करावे. |
| १२) | | नाट्यीकरण (ड्रामा) | विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय देण्यात यावेत तसेच त्यावर नाट्यीकरण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना प्रसंगी विषय देऊन अथवा जनजागृती पर विषय देऊन समूह नाट्याचे सादरीकरण करण्यास सांगावे. |
| १३) | | तमसीली मुशायरा | तमसीली मुशायरा उर्दू साहित्याच्या एक खास प्रकारचा कार्यक्रम आहे, ज्यामध्ये शायरी, गझल, आणि कविता वाचन आयोजित केले जाते. शाळेत असे कार्यक्रम आयोजित करावे. |
| १४) | | समूहगट चर्चा | विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्व व विद्यार्थ्यांच्या गरजानुसार गटातील चर्चेचे विषय असावेत. विद्यार्थ्यांचे आवश्यकतेनुसार गट पडावेत व समूह चर्चा घडवून आणावी. वाचन आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाच्या विषयावर आधारित कथेवर चर्चा आयोजित करावी. गटामध्ये विचारमंथन करून कथेतून मिळणारी शिकवण, मुख्य पात्रांची वैशिष्ट्ये यावर चर्चा करावी. |
| १५) | सप्टेंबर | बज्म-ए-अदब | बज्म-ए-अदब एक सांस्कृतिक आणि साहित्यमय मंच आहे. या मंचाद्वारे विचारांवर चर्चा, शायरी वाचन आणि काव्यलेखन करण्यास प्रवत्त करावे. |
| १६) | | ''यौम-ए मुताअला ''वाचन दिन | या दिवशी स्पर्धा, चर्चासत्रे, कवी संमेलन आणि वाचन कार्यशाळा यांसारखे सामुदायिक कार्यक्रम आयोजित करावेत. |
| १७) | | काव्यवाचन (नज्म खाणी) | शाळेतील मुलांनी लिहिलेल्या नज्म, शिक्षकांनी लिहिलेल्या नज्म तसेच पालकांच्या कविता अथवा प्रसिद्ध कवींच्या नज्म खाणीची स्पर्धा घ्यावी. |
| १८) | | लेखक, कवी मुलाखत(अदीप से मुलाकात) | स्थानिक परिसरातील उपलब्ध लेखक/कवी/पत्रकार/संपादक यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्तम मुलाखत घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १९) | | व्याख्यान परिसंवाद (मुजाकेरा) | परिसरातील तसेच स्थानिक उर्दू साहित्यिक, लेखक, कवी यांचे व्याख्यान आयोजित करावे. |
| २०) | ऑक्टोबर | वाचन प्रेरणा दिन | वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| २१) | | ग्रंथ प्रदर्शन (कुतुब नुमाईश) | शाळेमध्ये उपलब्ध असलेली पुस्तके व पालकांकडे असलेली पुस्तके या सर्वांच्या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. |
| २२) | | वाचनकट्टा (गोषये मुत्ताल्ला) | विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी वाचन कट्टा ही संकल्पना राबवावी. यामध्ये ठराविक वेळेत विद्यार्थ्यांना पुस्तकांची उपलब्धता करून देण्यात यावी व विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनास प्रवृत्त करावे. समूहाने प्रत्येक विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील याची खात्री करावी. |
| २३) | नोव्हेंबर | उर्दू दिन ''यौम-ए-उर्दू'' | उर्दू भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. लेखक, कवी, साहित्यिक अथवा नामवंत व्यक्तीच्या व्याख्यानाचे आयोजन करावे. |
| २४) | | उर्दू भाषा पंधरवडा | उर्दू भाषा संवर्धन पंधरवडा (१० ते २५ नोव्हेंबर) साजरा करण्यासाठी शाळेत विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावेत. |
| २५) | | पुस्तक जत्रा उपक्रम (किताबी मेला) | केंद्र स्तरावर या उपक्रमाचे आयोजन करावे. केंद्रातील शिक्षकांनी एकत्र येऊन पुस्तकाचे प्रदर्शन भरवावे. शिक्षण परिषदांमध्ये याबाबतचे नियोजन करण्यात यावे. |
| २६) | | घोषवाक्य (नारे) व भित्तिपत्रक निर्मिती | शाळेत विविध विषयावर व हिंदी भाषा संदर्भात घोषवाक्य व भित्तिपत्रक निर्मिती स्पर्धेचे आयोजन करावे. |
| २७) | | कविता लेखन/ नज्म | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढविण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना कविता/नज्म लेखनाची संधी द्यावी व उत्कृष्ट कविता/नज्म लेखनास वाचन कोपरा मधील फलकावर प्रदर्शित करावे. |
| २८) | डिसेंबर | एकांकिका (एक किर्दारी ड्रामा) | विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता विद्यार्थ्यांना एकांकिका सादर करण्याची संधी देण्यात यावी. उत्कृष्ट एकांकिका सादर करण्याकरिता स्पर्धेचे अयोजन करण्यात यावे. |
| २९) | | मी समीक्षक (मुब्सीर) | विद्यार्थ्यांमध्ये समीक्षणाची दृष्टी विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांना एक कादंबरी, कथा देण्यात यावी त्याचे वाचन करण्याकरिता वेळ देण्यात यावा. विद्यार्थ्यांचे गट करावेत व सदर कादंबरी, कथा |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | याबाबत समीक्षणात्मक विचार मांडण्याची संधी देण्यात यावी. शाळेत उपलब्ध असलेली पुस्तके वाचून त्याचे समीक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे. |
| ३०) | | कथालेखन (कहानी लिखना) | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढविण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांच्या कथा लेखनाची संधी द्यावी व उत्कृष्ट कथा लेखनास वाचन कोपरा यातील डिस्प्लेबोर्ड वर झळकण्याची संधी द्यावी. कथा लेखन कसे करावे याबाबत तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन करावे. |
| ३१) | | शब्दकोडी (उर्दू मोअम्मा) | विविध शब्दकोडी देऊन कमी वेळात शब्दकोडे सोडवणे या संदर्भात स्पर्धेचे आयोजन करावे तसेच मोठ्या गटासाठी शब्दकोडे निर्मिती अशा स्पर्धांचे आयोजन ही करता येईल. हिंदी शब्दसंपत्ती वाढवणे या करिता विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत व प्रत्येक गटाने दहा ते पंधरा उर्दू शब्द शोधून शब्दकोडी तयार करावी. तयार झालेला संच इतर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा. |
| ३२) | जानेवारी | वक्तृत्व स्पर्धा (तकरिरी मुकाबले) | विद्यार्थ्यांमधील भाषण कौशल्य, सादरीकरण कौशल्य, विषय समज वाढविण्याकरिता विद्यार्थ्यांना विषयाचे वाटप करावे व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वक्त्याच्या भाषणाच्या ध्वनिमुद्रित फिती ऐकवाव्यात. |
| ३३) | | ऑडिओ बुक विकसन | विद्यार्थ्यांना उर्दू विषयाकरिता तंत्रज्ञानाची संधी मिळावी याकरिता ऑडिओ बुक विकसन करावे, विद्यार्थ्यांचे गट करावे. विद्यार्थी गटाने मिळून उर्दू कथा, कविता किंवा पाठ्यपुस्तकात समाविष्ट धडे ऑडिओ स्वरूपात सादर करण्याची संधी देण्यात यावी. ऑडिओ रेकॉर्डिंगसाठी साधनांचा वापर करावा. संपादित ऑडिओ बुक डिजिटल लायब्ररीत अपलोड करावे. |
| ३४) | | हस्तलिखितांचे प्रदर्शन (तहरीरी वसायव की नुमायश) | विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी लिहिलेल्या काही हस्तलिखितांचे शाळास्तरावर प्रदर्शन भरवावे. तसेच पुस्तक लेखन करण्यासाठी आवश्यक बाबीचे मार्गदर्शन करण्यात यावे. |
| ३५) | | उर्दू गाणी/नगमा, गजल तयार करणे. | विद्यार्थ्यांमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक कौशल्ये विकसित करण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना नवीन गाणी/नगमा, गजल तयार करण्याची व सादरीकरणाची संधी द्यावी. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ३६) | फेब्रुवारी | आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन | (२१ फेब्रुवारी) आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या परिपत्रकात नमूद कार्यक्रमांचे आयोजन करावे. |
| ३७) | | चित्रकथा/ चित्रकविता तयार करणे (तस्वीरी कहाणी/ तस्वीरी नज्म तयार करना) | विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्ती आणि वर्णनात्मक कौशल्ये विकसित करण्याकरिता सदर उपक्रम राबविता येईल यामध्ये विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक चित्र दिले जाईल त्या चित्रावर आधारित कथा अथवा कविता तयार करून स्तरानुसार त्या–त्या इयत्तांना वाचून दाखवावी. |
| ३८) | | उर्दूभाषेत पॉडकास्ट | विद्यार्थ्यांना नामंकित साहित्यिकांची ओळख करून देण्याकरिता शिक्षकांनी उर्दू भाषेतील नामांकित साहित्यिकांचे पॉडकास्ट सादर करावेत. |
| ३९) | | साहित्यिक सप्ताह (अदबी हफ्ता ) | उर्दू भाषेतील प्रसिद्ध कवी यांच्या प्रसिद्ध साहित्याचे दररोज ठराविक कक्षेपर्यंत वाचन करण्यात यावे. सदर उपक्रम एक आठवडा राबविण्यात यावा. |
| ४०) | मार्च | बातमी/जाहिरात लेखन स्पर्धा (खबरे/ईश्तेहारात लिखने का मुकाबला) | विद्यार्थ्यांना वयोगटानुरूप बातमी लेखनाचे/जाहिरातीचे कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना बातमीचा/जाहिरातीचा विषय देण्यात यावा व त्यावर आधारित बातमीचे/जाहिरातीचे लेखन करण्यास सांगावे. उत्कृष्ट बातमी लेखन/जाहिरात लेखनास, नमुन्यास बक्षीस देण्यात यावे. |
| ४१) | | साहित्य संमेलन (अदबी इजलास) | विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण होण्याकरिता शालेय स्तरावर उर्दू विषयाकरिता स्थानिक कवी, लेखक, साहित्यिक, समीक्षक यांच्या सहभागाने साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात यावे व विद्यार्थी व शाळेतील शिक्षक यांच्या साहित्य कृतीकरिता व्यासपीठ उपलब्ध करून घ्यावे. |
| ४२) | | प्रश्नमंजुषा (Quiz) | विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेसंदर्भातील सामान्य ज्ञान विकसित करण्यासाठी प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये लेखक व त्याच्या साहित्य कलाकृतीची नावे, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कलाकृतीची माहिती, लेखक व त्याची टोपण नावे, म्हणी (कहावत) व त्याचे अर्थ अशा आशयावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात यावी. |
| ४३) | | संवाद लेखन स्पर्धा (मुकालेमा नवेसी का मुकाबला ) | उर्दू भाषेतील संभाषण कौशल्य, कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी संवाद लेखनाकरिता विषय देण्यात यावा व त्यावर आधारित संवाद लेखन करून घ्यावे. उत्कृष्ट संवादलेखनाच्या नमुन्यास वाचन कोपरा यामध्ये स्थान देण्यात यावे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | कृतीचा तपशील |
|---|---|---|---|
| ४४) | एप्रिल | कविता लेखन व सादरीकरण (गजल, नज्म लिखना–पेशकश) | सर्जनशील लेखन आणि सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी समूहामार्फत उत्कृष्ट गजलच्या, कवितेच्या नमन्याचे सादरीकरण करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे गट करून एका विशिष्ट विषयावर (उदा. ''निसर्ग वर्णन, सण, उत्सव'') विद्यार्थ्यांना गजलचे, कवितेचे लेखन करण्यास सांगावे व तयार केलेली गजल, नज्म/कविता परिपाठाच्या वेळी सादर करण्याची गटाला संधी द्यावी. |
| ४५) | | विज्ञान नाटक तयार करणे (सायंसी ड्रामा तयार करना) | विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अभिव्यक्ती विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटामध्ये विज्ञान नाटकाकरिता विषय द्यावा. दिलेल्या विषयावर नाटक तयार करून सादर करण्यास सांगावे. |
| ४६) | | मार्गदर्शन वर्ग (रहनुमा–ए–क्लास) | विद्यार्थ्यांसाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुद्ध लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा पहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सूत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, उर्दू विषयाच्या अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन वर्ग घ्यावेत. |

## विद्यार्थी सूचना :

१) समूहातील प्रत्येक सदस्यांनी उर्दू भाषेच्या अनुषंगाने आलेल्या उपक्रमामध्ये सक्रियतेने सहभाग घ्यावा.

२) समूहातील प्रत्येक सदस्यांनी वाचन कोपरा व भित्तिपत्रकावर आपल्या लेखन कृतींची भर घालावी.

३) समूहातील प्रत्येक सदस्यांनी अनेक साप्ताहिक कार्यक्रमात गटाने सहकार्याने मिळून कामकाज करावे.

४) समूहातील प्रत्येक सदस्यांनी उर्दू भाषेच्या अस्मितेचे जतन व संवर्धन करावे.

## शिक्षकांसाठी सूचना :

१) शिक्षकांची भूमिका ही मार्गदर्शकांची असावी.

२) शिक्षकांनी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होतील यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा द्यावी.

३) शिक्षकांनी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

४) शिक्षकांनी मुलांच्या लेखन कलाकृतीला अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याकरिता समूहाच्या मदतीने भित्तिपत्रकाची निर्मिती करावी.

५) शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातील कृतीकरिता सादरीकरणाची समान संधी उपलब्ध करून द्यावी.

६) विद्यार्थ्यांना उर्दू भाषेच्या अनुषंगाने अधिकाधिक भाषिक वातावरण देण्याचा प्रयत्न करावा.

७) मुलांच्या साहित्य कृतींना वाव देण्याकरिता मजकूर समृद्ध वातावरण देण्याबाबतचे नियोजन करावे.

**अंतर्गत उपक्रम आयोजन करण्याकरिता सूचना :**

१) शाळेमध्ये उर्दू भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात यावा.

२) उर्दू भाषा दिनाच्या निमित्ताने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात यावे.

३) विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत.

४) उर्दू समूह कार्यक्षम राहावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

५) सहभागी झालेले विद्यार्थी तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक याबाबतचा माहिती अहवाल संकलित करावा.

६) प्रत्येक उपक्रमाचे काही निवडक फोटो संग्रही ठेवावे.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

उर्दू भाषा समूहाने शाळेतील इतर समूहाशी समन्वय साधावा. शाळेतील इतर समूहांशी संपर्कात राहून उपक्रमाच्या वेळा व दिनांक याबाबत समन्वय राखावा. काही उपक्रम इतर समूहासोबत एकत्रितरीत्या घेता येऊ शकतात, त्यानुसार त्याचे नियोजन करावे. समूह प्रमुखाने व गटातील सदस्यांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**उर्दू भाषा समूहाचे फायदे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये उर्दू भाषेची आवड निर्माण होईल.

२) विद्यार्थ्यांमध्ये सहजपणे व आनंददायी पद्धतीने अध्ययन निष्पतीच्या विकासास मदत होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये साहित्याविषयी आवड निर्माण होईल.

४) विद्यार्थ्यामध्ये निम्न बोधात्मक क्षमतेपासून उच्च बोधात्मक क्षमतांचा विकास होईल.

५) विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कवी, लेखक, समीक्षण होणेकरिता प्रोत्साहन मिळेल.

६) विद्यार्थ्यामध्ये लेखनाची सवय विकसित होईल.

**उर्दू भाषा समूहास विभागाकडून देण्यात येणारी शैक्षणिक मदत :**

१) नामांकित कवी लेखक यांचे तंत्रज्ञानाच्या मदतीने व्याख्यानांचे आयोजन.

२) नामांकित कवींच्या कविता वाचनाचे कथा, वयानुरूप कादंबरी याच्या अभिवाचनाच्या कार्यक्रमाचे तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रक्षेपण.

३) जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मदतीने विद्यार्थ्यासाठी उत्तम संहिता लेखन कसे करावे, कथेचे शास्त्रशुद्ध लेखन कसे करावे, अभिवाचन कसे करावे, शब्दकोश कसा पहावा, उत्तम निवेदन कसे करावे, सत्रसंचालन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, उर्दू विषयाच्या अर्थार्जनाच्या संधी या संदर्भाने विद्यार्थ्याकरिता मार्गदर्शन वर्ग.

**भाषे संदर्भाने असणारे दिनविशेष व कार्यक्रम :**

| अ.क्र. | दिनविशेष | दिनांक |
|---|---|---|
| १) | आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन | २१ फेब्रुवारी |
| २) | वाचन प्रेरणा दिन | १५ ऑक्टोबर |
| ३) | उर्दू दिन | ९ नोव्हेंबर |

**अहवाल लेखन प्रपत्र :**

- जिल्ह्याचे नाव :
- तालुक्याचे नाव :
- केंद्राचे नाव :
- शाळेचे नाव :
- मुख्याध्यापकाचे नाव :
- यु-डायस क्रमांक :
- मराठी भाषा समूहाचे नाव :
- मराठी भाषा समूहाचे प्रमुख (शिक्षकाचे नाव) :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची संख्या :
- मराठी भाषा समूहातील सदस्यांची नावे :
- समूहातंर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक :

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | उपक्रम राबविलेला दिनांक/सप्ताह | उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा तपशील | उपक्रमातून निर्मित उत्कृष्ट साहित्य/ चित्रफिती/ध्वनिफिती व फोटोची लिंक |
|---|---|---|---|---|
| १) | | | | |
| २) | | | | |

**टीप :** उपक्रमास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा तपशीलात शैक्षणिक वर्षात राबविलेल्या प्रत्येक उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाहीच्या अनुषंगाने विविध मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणेही सोबत जोडावीत.

❑❑❑

# ५. इतिहास विषय समूह

## प्रस्तावना :

इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिक कार्य, सर्वेक्षण आणि खगोलशास्त्र हे विषय मानवाच्या ज्ञानाच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. हे विषय मानवाच्या जिज्ञासेला चालना देत, भूतकाळाचा अभ्यास, वर्तमानातील समस्यांचे विश्लेषण आणि भविष्याचा वेध घेण्याचे साधन बनले आहेत. मानव समाजाचा विकास आणि जगातील विविध प्रक्रियांबाबतची सखोल समज इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिक कार्य, सर्वेक्षण आणि खगोलशास्त्र या विषयांच्या अभ्यासाने प्राप्त होते. या विषयांच्या गटाने मानवाचे भूतकाळातील जीवन, सांस्कृतिक वारसा, स्थानिक आणि जागतिक पातळीवरील बदल, वैश्विक दृष्टिकोन, एकात्मतेची भावना, तसेच समकालीन समाजातील आव्हाने समजून घेण्याचा मार्ग दाखवतो. या सर्व विषयांचा समूह विद्यार्थ्यांना समग्र दृष्टिकोन निर्माण करणे, जेणेकरून ते समाजातील सक्रिय आणि जबाबदार नागरिक होण्यास सक्षम ठरतील. वैयक्तिक तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व प्रगतीसाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी या विषयांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनास चालना देण्यासाठी व व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी समूह स्थापन करण्यासाठी सूचवलेले मुद्दे अत्यंत महत्त्वाचे व उपयुक्त आहेत.

## इतिहास समूह संकल्पना :

इतिहास विषय समूहाचा उद्देश विद्यार्थ्यांना भूतकाळातील महत्त्वाच्या घटनांचा आणि संस्कृतीचा अभ्यास करून त्यांचा वर्तमानावर होणारा प्रभाव समजून देणे आहे. या समूहाद्वारे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटनांचा सुसंगत विश्लेषण करण्याची क्षमता प्राप्त होते. तसेच, ऐतिहासिक संदर्भ आणि विचारशक्ती वाढवून, ते समाजातील समकालीन समस्यांवर विचार करण्यास सक्षम होतात. इतिहासाचा अभ्यास विद्यार्थ्यांना मानवतेच्या विकासाच्या विविध टप्प्यांची समज देते आणि त्यांना भविष्याच्या दिशेने योग्य मार्गदर्शन करते.

## उद्दिष्टे :

१) भूतकाळातील महत्त्वपूर्ण घटना, व्यक्ती आणि परंपरांचा अभ्यास करून सांस्कृतिक वारसा जतन करणे.

२) समाजाच्या भूतकाळातील घटना, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास करून त्यांचा वर्तमान व भविष्यकालीन परिणाम समजून घेणे.

३) स्थानिक आणि राष्ट्रीय ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन प्रत्यक्ष अनुभव आणि शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

**उपक्रम :**

१) प्रकल्प कार्य : ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करून त्यावरील अहवाल तयार करणे.

२) ऐतिहासिक स्थळांना भेटी : भारतातील प्राचीन व आधुनिक स्थळांची भेट.

३) स्थानिक ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन जाणकार लोकांकडून माहिती घेण्यात यावी. उदा. जुने मंदिर, किल्ले इ.

४) पोवाडे आणि लोककला : ऐतिहासिक घटना पोवाड्यातून सादर करणे.

५) चित्रपट प्रदर्शन : ऐतिहासिक चित्रपट दाखवून त्यावर आधारित चर्चा सत्रे.

६) ऐतिहासिक भूमिकांचे सादरीकरण : ऐतिहासिक व्यक्तिमत्वांची भूमिका करणे. उदा. छत्रपती शिवाजी महाराज

७) प्रश्नमंजुषा : इतिहासातील महत्त्वाच्या घटना यावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करणे.

८) ऐतिहासिक कादंबऱ्याचे वाचन : ऐतिहासिक कादंबऱ्याचे वाचन करून त्यावर चर्चा आयोजित करणे.

९) चित्रकला व पोस्टर तयार करणे : ऐतिहासिक घटना, व्यक्तिमत्त्वे आणि वास्तूंची चित्रे व पोस्टर तयार करणे.

१०) इतिहास प्रदर्शन : ऐतिहासिक नाणी, शस्त्रे आणि पोशाख या सारख्या वस्तूंचे प्रदर्शन भरविणे.

११) किल्ले तयार करणे स्पर्धा आयोजित करणे.

१२) ऐतिहासिक शब्दकोश तयार करणे. उदा. बखर

१३) ऐतिहासिक पुस्तकांची ओळख करून देण्यात यावी.

१४) युद्धातील हत्यारांची ओळख करून देणे.

१५) स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय नेत्यांची ओळख करून देणे.

१६) टपाल टिकीटांचा संग्रह करणे.

१७) ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन करणे.

१८) पुरातत्त्व शास्त्राच्या अधिकाऱ्यांचे व्याखान आयोजित करणे.

१९) स्वातंत्र्य सैनिकांची ओळख करून देणे.

२०) महाराष्ट्रातील ऐतिहासिक थोर पुरुषांची यादी तयार करणे.

२१) प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन ठिकाणांची ओळख.

२२) वस्तुसंग्रहालय भेटी करणे.

२३) ऐतिहासिक खेळ, पेंटिंग घेणे.

२४) आपल्या गावचा इतिहास

## इतिहास समुहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी इतिहास समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा इतिहास विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी इतिहास विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ. क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा इतिहास विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमूख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील इतिहास विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

## इतिहास समुहाची जबाबदारी व कार्ये :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या इतिहास समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकांच्या मदतीने इतिहास समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) इतिहास समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) इतिहास समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) इतिहास समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) इतिहास समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) इतिहास समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

## इतिहास समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती/अहवाल करण्यासाठी संकलित करावी.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत. शक्यतो शनिवारी उपक्रमाचे आयोजन करावे.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

## इतिहास समूहाच्या कामकाजासाठी प्रक्रिया/नियमावली :

इतिहास समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समुहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

### अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) इतिहासविषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रम दरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

### ब) शिक्षकांसाठी सूचना

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समूह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय इतिहास समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) वस्तुसंग्रह भरविणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**शालेय इतिहास समूह अंतर्गत उपक्रम करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | इतिहासाची ओळख | १) ऐतिहासिक कालखंडांची ओळख व त्यांचे वर्गीकरण.<br>२) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासाची परिचय.<br>३) इतिहास लिहिण्याचा पद्धती वर्णन (पुरावे, स्त्रोत, नोंदी).<br>४) विद्यार्थ्यांना ऐतिहासिक कथा – वाचन सत्र.<br>५) ''माझ्या गावाचा इतिहास – विद्यार्थ्यांकडून स्थानिक इतिहास संकलन. |
| २) | जुलै | प्राचीन संस्कृती | १) सिंधू संस्कृती : जीवनशैली आणि नोंदी.<br>२) वैदिक काळातील सामाजिक रचना.<br>३) भारतातील मौर्य आणि गुप्त साम्राज्यांचा अभ्यास.<br>४) ऐतिहासिक स्थळांना भेटी (उदा. अजिंठा एलोरा, सांची).<br>५) प्राचीन भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान यावरील प्रकल्प. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ३) | ऑगस्ट | स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास | १) १८५७ चा उठाव : कारणे आणि परिणाम.<br>२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना आणि भूमिका<br>३) महात्मा गांधीचा स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग.<br>४) 'भारत छोडो' चळवळ आणि १५ ऑगस्ट १९४७ चा महत्त्व.<br>५) स्वातंत्र्यसैनिकांची पत्रे → वाचन आणि चर्चा. |
| ४) | सप्टेंबर | सांस्कृतिक वारसा | १) भारतीय वास्तुकला : प्राचीन आणि मध्ययुगीन.<br>२) भारतातील प्रमुख धार्मिक परंपराचा अभ्यास.<br>३) नृत्य, संगीत, आणि साहित्य यांचा ऐतिहासिक प्रभाव.<br>४) विद्यार्थ्यांसाठी हस्तकला आणि कला प्रदर्शने.<br>५) आपल्या परंपरा → सांस्कृतिक वारशावर आधारित निबंध स्पर्धा. |
| ५) | ऑक्टोबर | मध्ययुगीन इतिहास | १) दिल्ली सल्तनत आणि मुघल साम्राज्याचा अभ्यास<br>२) मध्ययुगीन काळातील व्यापार आणि अर्थव्यवस्था.<br>३) मध्ययुगीन भारतीय महिलांची भूमिका.<br>४) स्थानिक किल्ले आणि त्यांचा ऐतिहासिक अभ्यास.<br>५) 'शस्त्रास्त्रांची प्रगती' → विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प. |
| ६) | नोव्हेंबर | जागतिक इतिहासाची परिचय | १) प्राचीन जगातील सभ्यता: इजिप्त,ग्रीस, रोम.<br>२) युरोपातील पुनर्जागरण आणि औद्योगिक क्रांती.<br>३) दुसरे महायुद्ध: कारणे आणि परिणाम.<br>४) संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना आणि भूमिका.<br>५) ''जागतिक इतिहासातील महान व्यक्ती – वाचन आणि चर्चा. |
| ७) | डिसेंबर | इतिहास शिका आणि सन्मान | १) स्वातंत्र्यानंतरचे भारत: आर्थिक आणि सामाजिक बदल.<br>२) भारतातील तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा इतिहास.<br>३) भारत–पाक संघर्ष आणि राजकीय इतिहास.<br>४) ''माझ्या शहराचा विकास → यावर विद्यार्थ्यांकडून सादरीकरण.<br>५) आधुनिक भारतातील समाज सुधारणा चळवळींचा अभ्यास. |
| ८) | जानेवारी | इतिहास शिका आणि सन्मान | १) ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे महत्त्व.<br>२) ''इतिहासाचा आपल्या भविष्यावर परिणाम → यावर चर्चा.<br>३) विद्यार्थ्यांसाठी इतिहासावर आधारित क्विझ स्पर्धा.<br>४) ''इतिहासकार बना → ऐतिहासिक घटना पुनर्रचना प्रकल्प<br>५) ऐतिहासिक वारसास्थळांना भेट देऊन त्यावर सादरीकरण. |

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनविशेष :

### इतिहास दिनविशेष यादी

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | ०३ जानेवारी | सावित्रीबाई फुले जयंती |
| २) | १२ जानेवारी | राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती |
| ३) | २३ जानेवारी | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती |
| ४) | २६ जानेवारी | प्रजासत्ताक दिन |
| ५) | १९ फेब्रुवारी | छत्रपती शिवाजी महाराज जन्मदिन |
| ६) | २३ फेब्रुवारी | संत गाडगेबाबा जयंती |
| ७) | २३ मार्च | क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव शहीद दिन |
| ८) | ११ एप्रिल | महात्मा फुले जयंती |
| ९) | १४ एप्रिल | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| १०) | ०१ मे | महाराष्ट्र दिन, आंतरराष्ट्रीय कामगार दिन |
| ११) | ०६ जून | शिवराज्याभिषेक दिन |
| १२) | २६ जून | राजर्षी शाहूमहाराज जयंती |
| १३) | ०९ ऑगस्ट | ऑगस्ट क्रांतिदिन |
| १४) | १५ ऑगस्ट | भारतीय स्वतंत्र दिन |
| १५) | १७ सप्टेंबर | मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन |
| १६) | ०२ ऑक्टोंबर | महात्मा गांधी जयंती |
| १७) | १४ नोव्हेंबर | बालदिन, पंडित नेहरू जयंती |
| १८) | ०६ डिसेंबर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्माण दिन |

## समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडणे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करणे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती देणे.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी SMC/SMDC बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

**शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :**

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/शाळा व्यवस्थापन विकास समिती (SMC/SMDC) सोबत बैठक घेतील. या समुहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक फॉर्मेटमध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

**सदर समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व SCERT कडून साहाय्य/प्रोत्साहन :**

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

६) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी याच्यासाठी स्पर्धेचे आयोजन करणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी साहाय्यभूत Online/Offline संसाधने/पुस्तके/साहित्य :**

१) ऑनलाईन : उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स ,उदा., इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओज, तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजन.

२) ऑफलाईन : संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

३) संदर्भ पुस्तके :
   १) इतिहासाची प्रयोगशाळा – एन.सी.ई.आर.टी.
   २) इतिहासाचे शैक्षणिक साहित्य – अनिल कदम
   ३) शाळेसाठी इतिहास प्रकल्प – अंजली देशमुख
   ४) इतिहास विषय शिकविण्याच्या पद्धती – माधव देशपांडे.
   ५) महाराष्ट्राचा इतिहास – आर.आर. दहे

६) शिवाजी द ग्रेट – जयसिंगराव पवार

७) डिस्कव्हरी ऑफ इंडिया – पंडित जवाहरलाल नेहरू

**शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :**

**उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे, २) सहभागींनी केलेले कार्य, ३) उपक्रमाचा परिणाम/यश,

**वार्षिक अहवाल :** १) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण, २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे, ३) पुढील वर्षासाठी शिफारसी.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी साहाय्यभूत ठरणारे मुद्दे :**

१) गटासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**समूहांमुळे शाळेस होणारे फायदे/नुकसान :**

**फायदे :**

१) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) शाळेचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावेल.

४) विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना मिळेल.

❑❑❑

# ६. भूगोल विषय समूह

## भूगोल समूह :

भूगोल विषयातील भौगोलिक घटकांचा अभ्यास करून स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक पर्यावरणीय समज वाढविण्यास मदत होते. पर्यावरणीय समस्या आणि त्यावरील उपायांची माहिती मिळेल. उदा. वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग इ. मुळे संवेदनशीलता निर्माण होईल. नकाशे, मॉडेल्स आणि प्रत्यक्ष निरीक्षण यामुळे विषय सोपा वाटेल. डेटा गोळा करणे, विश्लेषण करणे आणि अहवाल तयार करण्याची कौशल्ये विकसित होतील.

## उद्दिष्टे :

१) भौगोलिक घटना, नैसर्गिक संसाधने, पर्यावरणीय आव्हाने, हवामान बदल आणि बदलते मानवी जीवन याविषयी जागरूकता निर्माण करणे.

२) पर्यावरणीय समस्यांची ओळख करून देणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी उपाय सुचवणे.

३) स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक भौगोलिक घटनांमधील परस्पर संबंध समजून घेणे.

## उपक्रम :

१) नकाशा तयार करणे : स्थानिक भूगोलाचे विश्लेषण व नकाशा बनवणे.

२) क्षेत्रभेटी : धरण, नद्या, पर्वत आणि जंगलांची शैक्षणिक यात्रा.

३) प्रदर्शन : भौगोलिक मॉडेल्स तयार करून सादरीकरण.

४) गुगल अर्थ आणि GIS : डिजिटल साधनांचा वापर करून संशोधन.

५) हवामान निरीक्षण : दररोजच्या हवामानाचा डेटा गोळा व विश्लेषण.

६) जलस्त्रोतांचा अभ्यास : परिसरातील जलस्त्रोतांचा अभ्यास करणे. त्यांची स्वच्छता, वापर व संवर्धन याविषयी जाणीवजागृती.

७) नमुने संकलन आणि संग्रह : खडक, खनिजे, मातीचे नमुने संकलन आणि संग्रह करणे.

८) जीपीएस वापराचे प्रशिक्षण देणे.

९) प्रश्नमंजुषा स्पर्धा : भूगोलांशी संबंधित घटनावर आधारित स्पर्धेचे आयोजन.

१०) वादविवाद स्पर्धा : बदलते हवामान, प्रदूषण, वाढती लोकसंख्या इ. विषयावर आयोजन करणे.

११) स्थानिक, नजीकचे अभयारण्य यास भेट देणे.

१२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भूगोल तज्ज्ञांचा परिचय करून देणे.

१३) वृत्तपत्रातील चालू घडामोडीवर आधारित माहिती देणे.

१४) Encyclopedia ची ओळख करून देणे.

## भूगोल समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी भूगोल समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा भूगोल विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी भूगोल विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ.क्र. | पद | समिती |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा भूगोल/पर्यावरण विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील भूगोल विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूह समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

## भूगोल समूहाची जबाबदारी व कार्ये :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या भूगोल समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकांच्या मदतीने पर्यावरण भूगोल समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) भूगोल समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) भूगोल समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) भूगोल समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) भूगोल समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) भूगोल समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

**भूगोल समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :**

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती /अहवाल करण्यासाठी संकलित करावी.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत. शनिवारी उपक्रमाचे आयोजन करावे.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्‌वारे प्रसिद्‌धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

**भूगोल समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :**

भूगोल समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समुहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) भूगोलविषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रम दरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना**

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड जोपासण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होव नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समूह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय भूगोल समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) वस्तुसंग्रह भरविणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**भूगोल समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | पर्यावरण संवर्धन माझं कर्तव्य | १) वृक्षारोपण अभियान राबविणे.<br>२) परिसरातील पर्यावरण समस्या शोधणे व उपाययोजना सुचवणे.<br>३) प्लास्टिक मुक्त परिसर उपक्रम<br>४) जागतिक पर्यावरण दिन साजरा करणे. |
| २) | जुलै | पावसाचे चक्र आणि जीवन | १) पर्जन्यमान मोजण्यासाठी स्थानिक स्तरावर साधने तयार करणे.<br>२) जलचक्र मॉडेल तयार करणे.<br>३) पाण्याचा उपयोग व बचतीसाठी वादविवाद सत्र आयोजित करणे.<br>४) स्थानिक जलस्त्रोतांचे सर्वेक्षण करणे. |
| ३) | ऑगस्ट | भारतीय भूगोल आणि स्वातंत्र्यलढा | १) भारतीय नद्या, पर्वत व प्रदेशांचे ऐतिहासिक महत्त्व मांडणे.<br>२) भारताच्या भौगोलिक वैविध्याचे नकाशाद्वारे सादरीकरण करणे.<br>३) स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट) निसर्गाशी संबंधित शपथविधी |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ४) | सप्टेंबर | आपत्ती व्यवस्थान आव्हान व उपाय | १) भूकंप, पूर व चक्रिवादळांवर पोस्टर तयार करणे.<br>२) स्थानिक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा अभ्यास करणे.<br>३) आपत्ती दरम्यान सुरक्षा उपायांवर प्रात्यक्षिके घेणे.<br>४) 'आपत्ती : धोका की संधी?' या विषयावर चर्चासत्र आयोजित करणे. |
| ५) | ऑक्टोबर | जैवविविधता : निसर्गाचा खजिना | १) स्थानिक जैवविविधतेवर प्रकल्प तयार करणे.<br>२) राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह साजरा (दि.१ ते ७ ऑक्टोबर)<br>३) निसर्ग भ्रमंती आणि निरीक्षण डायरी तयार करणे.<br>४) स्थानिक प्रजातींच्या संवर्धनावर चर्चा. |
| ६) | नोव्हेंबर | हवामान बदल : आजचा विचार, उद्याची कृती | १) हवामान बदलांवरील सादरीकरण करणे.<br>२) जागतिक हवामानशास्त्र दिन साजरा करणे.<br>३) कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी विद्यार्थी गट तयार करणे.<br>४) उष्णतेचा वाढत्या लाटांचा अभ्यास करणे. |
| ७) | डिसेंबर | नकाशे : शोध आणि सुसंवाद | १) विद्यार्थ्यांना नकाशा वाचन शिकवणे.<br>२) माझा आवडता प्रवास निबंध स्पर्धा<br>३) स्थानिक गावांचा नकाशा तयार करणे.<br>४) ऐतिहासिक प्रवासावर आधारित चित्रपट सत्र आयोजित करणे. |
| ८) | जानेवारी | सूर्य : ऊर्जेचा अविनाशी स्रोत | १) सौर ऊर्जेचे मॉडेल तयार करणे.<br>२) टिकाऊ विकासासाठी स्थानिक कृतींचा अभ्यास करणे.<br>३) पुनर्नवीन ऊर्जा स्रोत विषयावर प्रकल्प सादरीकरण<br>४) प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) सौर उर्जेचा वापर करण्याची शपथ. |

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरर.ाष्ट्रीय दिनविशेष :

### भूगोल दिनविशेष यादी

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | १४ जानेवारी | भूगोल दिन |
| २) | ०३ मार्च | जागतिक वन्यजीव दिन |
| ३) | २१ मार्च | पृथ्वीवर दिवस रात्र समान, जागतिक वन दिन |
| ४) | २२ मार्च | जागतिक जल दिन |
| ५) | २३ मार्च | जागतिक हवामान दिन |
| ६) | ५ एप्रिल | राष्ट्रीय सागरी संपत्ती दिन |

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| ७) | २२ एप्रिल | जागतिक वसुंधरा दिन |
| ८) | ०५ जून | जागतिक पर्यावरण दिन |
| ९) | ०८ जून | जागतिक महासागर दिन |
| १०) | २१ जून | दक्षिणायण आरंभ |
| ११) | ११ जुलै | जागतिक लोकसंख्या दिन |
| १२) | २२ जुलै | राष्ट्रीय झेंड स्वीकृती दिन |
| १३) | २९ जुलै | जागतिक व्याघ्र दिन |
| १४) | ०३ ऑगस्ट | आंतरराष्ट्रीय मैत्री दिन |
| १५) | १६ सप्टेंबर | जागतिक ओझोन दिन |
| १६) | २३ सप्टेंबर | विषुदिन |
| १७) | २७ सप्टेंबर | पर्यटन दिन |
| १८) | २८ सप्टेंबर | जागतिक नदी दिन |
| १९) | १८ ऑक्टोंबर | जागतिक भूकंप सुरक्षितता दिन |
| २०) | १४ नोव्हेंबर | जागतिक भौगोलिक माहिती प्रणाली दिन (GIS DAY) |
| २१) | ०२ डिसेंबर | राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन |
| २२) | ११ डिसेंबर | आंतरराष्ट्रीय पर्वत दिन |
| २३) | २१ डिसेंबर | उत्तरायण आरंभ |

## समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडणे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करणे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती देणे.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी SMC/SMDC बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

## शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/शाळा व्यवस्थापन विकास समिती

(SMC/SMDC) सोबत बैठक घेतील. या समूहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक फॉर्मेटमध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

**समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व SCERT कडून साहाय्य/प्रोत्साहन :**

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत Online/Offline संसाधने/पुस्तके/साहित्य :**

१) ऑनलाईन : उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स,उदा. Diksha, ePathshala , इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओज.

२) ऑफलाईन : संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

३) संदर्भ साहित्य : १) भूगोलाचा प्रयोगशील अभ्यास – डॉ. सुधीर पाटील
२) भूगोलातील प्रकल्प व उपक्रम – एन.सी.ई.आर.टी.
३) शैक्षणिक भूगोलाचा आधार – अनिल जगताप
४) भूगोलातील नकाशे तयार करण्याची कला – व्ही. एस. जोशी
५) भूगोल शिकविण्याच्या नावीन्यपूर्ण पद्धती – प्रियांका वाघ
६) भारताचा भौगोलिक वारसा – गोपाळ सिंह

**शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :**

**उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे, २) सहभागींनी केलेले कार्य, ३) उपक्रमाचा परिणाम/यश,

**वार्षिक अहवाल :** १) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण, २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे, ३) पुढील वर्षासाठी शिफारसी.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी साहाय्यभूत ठरणारे मुद्दे :**

१) भूगोल कक्ष निर्माण करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

४) क्षेत्र भेटीचे नियोजन, सहलीचे आयोजन करणे.

**समूहांमुळे शाळेस होणारे फायदे/नुकसान :**

**फायदे :**

१) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) प्रभावी नकाशा वाचन कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.

४) सामाजिक व व्यावहारिक ज्ञान, कौशल्ये वाढण्यास उपयुक्त होईल.

५) स्थानिक क्षेत्राचे सखोल ज्ञानामुळे पर्यटन याविषयी माहिती होईल.

❑❑❑

# ७. नागरिकशास्त्र विषय समूह

**नागरिकशास्त्र समूह :**

नागरिकशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे. ज्यामध्ये समाजातील नागरिकांचे हक्क, कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि सरकारच्या संरचनेचे विश्लेषण केले जाते. हा विषय विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रिया, संविधानाची अंमलबजावणी, नागरिक अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव देतो. नागरिकशास्त्राचा अभ्यास समाजातील विविध संस्थांची कार्यप्रणाली, कायदे आणि सरकारच्या भूमिका समजून घेण्यासाठी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संविधानिक अधिकार, निवडणूक प्रक्रिया, सरकारी धोरणे आणि लोकशाहीत असलेल्या विविध तत्त्वांचे महत्त्व समजावून दिले जाते. तसेच, सामाजिक न्याय, समानता आणि लोकहित यांच्या संदर्भात विचार करण्याची क्षमता निर्माण केली जाते. या विषयामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक जागरूकतेत वाढ होते आणि ते एक सक्षम आणि जबाबदार नागरिक होण्यासाठी प्रेरित होतात.

**उद्दिष्टे :**

१) संविधान, मानवाधिकार आणि नागरिकांची भूमिका याबद्दल जागरूकता वाढवणे.
२) विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करून जबाबदार नागरिक होण्यासाठी प्रेरित करणे.
३) समाजातील समस्यांची ओळख करून त्यावर चर्चा व उपाययोजना शोधणे.

**उपक्रम :**

१) संविधान वाचन : संविधानातील महत्त्वाच्या कलमांवर चर्चा.
२) जनजागृती अभियान : मतदार नोंदणी व लोकशाही प्रक्रियेवरील कार्यक्रम.
३) निवडणूक प्रक्रिया : शाळेत अभिरूप निवडणुका आयोजित करणे.
४) रोल प्ले : संसद, न्यायालय आणि ग्रामसभा यांचा अभ्यास.
५) प्रकल्प कार्य : लोकशाही व्यवस्थेतील समस्यांचे सादरीकरण.
६) शासकीय कार्यालयांना भेटी आयोजित करणे.
७) विविध देशांतील शासकीय कारभाराच्या पद्धती व त्यांची माहिती घेणे.
८) प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेणे.
९) सर्व ग्रामसभांना भेटी देणे.
१०) विविध शासकीय योजनांची माहिती घेणे.
११) राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रतिकांची माहिती
१२) संविधान निर्मितीमधील महाराष्ट्रातील व भारतातील सदस्य/व्यक्तींचे योगदान

१३) प्रशासकीय सेवांची माहिती

१४) टपाल विभाग व पिनकोडची माहिती

## नागरिकशास्त्र विषय समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी नागरिकशास्त्र समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा नागरिकशास्त्र विषयाचा शिक्षक असावा. निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी इतिहास विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ. क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा नागरिकशास्त्र विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील नागरिकशास्त्र विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

## नागरिकशास्त्र विषय समूहाची जबाबदारी व कार्ये :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या नागरिकशास्त्र समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकांच्या मदतीने पर्यावरण नागरिकशास्त्र समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) नागरिकशास्त्र समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) नागरिकशास्त्र समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृत्तांत ठेवणे.

६) नागरिकशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) नागरिकशास्त्र समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) नागरिकशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

**नागरिकशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :**

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती/अहवाल करण्यासाठी संकलित करावी.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत. शक्यतो शनिवारी उपक्रमाचे आयोजन करावे.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्‌वारे प्रसिद्‌धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्वकामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

**नागरिकशास्त्र समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :**

नागरिकशास्त्र समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्‌ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समूहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) नागरिकशास्त्र विषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रमदरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रमदरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना**

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समूह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय नागरिकशास्त्रसमूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) वस्तुसंग्रह भरविणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**नागरिकशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ. क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | पर्यावरण संवर्धनात नागरिकांची भूमिका | १) स्वच्छता मोहीम राबविणे.<br>२) पर्यावरण संरक्षणासाठी कायद्यांची माहिती देणारे सत्र.<br>३) 'पर्यावरण संरक्षण' → या विषयावर पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा.<br>४) जागतिक पर्यावरण दिन साजरा (५ जून). |
| २) | जुलै | समानतेचा पाया : मजबूत लोकशाही | १) सामाजिक विषमता दूर करण्यासाठी चर्चासत्र.<br>२) 'लोकशाही आणि नागरी हक्क' → विषयावर निबंध स्पर्धा.<br>३) मुलांमध्ये समानतेची जनजागृती मोहीम. |

| अ. क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ३) | ऑगस्ट | स्वातंत्र्याचा अर्थ आणि जबाबदाऱ्या | १) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांवर पोस्टर तयार करणे.<br>२) 'माझे अधिकार आणि जबाबदाऱ्या' विषयावर वादविवाद सत्र.<br>३) स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट) विशेष कार्यक्रम.<br>४) विद्यार्थ्यांसाठी संविधान वाचन सत्र. |
| ४) | सप्टेंबर | राष्ट्रीय एकात्मता आणि समाजशास्त्रीय मूल्ये | १) विविध धर्मांच्या सहिष्णुतेवर आधारित नाटिका सादर करणे.<br>२) राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त कार्यक्रम (१७ सप्टेंबर).<br>३) 'समाजातील विविधता आणि एकजूट' → या विषयावर चर्चा.<br>४) सामाजिक प्रथा आणि परंपरांचे अध्ययन. |
| ५) | ऑक्टोबर | संविधान : न्याय, समानता आणि स्वातंत्र्याचा पाया | १) संविधानातील महत्त्वाच्या कलमांची माहिती देणारे सत्र.<br>२) स्थानिक न्यायालयाला भेट देणे.<br>३) 'भारतीय न्यायव्यवस्था' → या विषयावर प्रकल्प सादरीकरण.<br>४) संविधान दिन साजरा (२६ नोव्हेंबरची पूर्वतयारी) |
| ६) | नोव्हेंबर | सशक्त महिला, सशक्त समाज | १) महिला सशक्तीकरणावर आधारित चर्चासत्र.<br>२) स्थानिक महिला स्वयंसहाय्यता गटाला भेट देणे.<br>३) महिला नेत्यांवरील माहिती सत्र.<br>४) 'महिला आणि संविधान' → या विषयावर पोस्टर तयार करणे. |
| ७) | डिसेंबर | सामाजिक न्यायासाठी नागरिकांची भूमिका | १) अन्यायाविरुद्ध लढा' या विषयावर वादविवाद स्पर्धा.<br>२) विद्यार्थ्यांमधील सामाजिक विषयांवरील जनजागृती मोहीम.<br>३) राष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा (१० डिसेंबर).<br>४) सामाजिक न्यायाविषयी जनजागृती फेरी. |
| ८) | जानेवारी | संविधानाचा सन्मान, देशाचा विकास | १) प्रजासत्ताक दिन साजरा (२६ जानेवारी).<br>२) संविधान वाचन सत्र.<br>३) 'राष्ट्रीय एकात्मता' → यावर विद्यार्थ्यांची रांगोळी स्पर्धा.<br>४) विविध भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गटांच्या सहिष्णुतेवर चर्चा. |

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनविशेष :

### नागरिकशास्त्र दिनविशेष यादी

| अ. क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | २५ जानेवारी | राष्ट्रीय मतदार दिन |
| २) | १ मे | महाराष्ट्र दिन |
| ३) | २४ मे | राष्ट्रकुल दिन |
| ४) | ११ सप्टेंबर | जागतिक दहशदवाद विरोधी दिन |
| ५) | २६ नोव्हेंबर | संविधान दिवस |
| ६) | २९ नोव्हेंबर | राष्ट्रीय कायदा दिन |
| ७) | ०७ डिसेंबर | ध्वज दिन |
| ८) | १० डिसेंबर | मानवी हक्क दिन |

## समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडणे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करणे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती देणे.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी/SMC/SMDC बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

## शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/शाळा व्यवस्थापन विकास समिती (SMC/SMDC) सोबत बैठक घेतील. या समुहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक फॉर्मेटमध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

## समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व कडून साहाय्य/प्रोत्साहन :

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी साहाय्यभूत online/offline/संसाधने/पुस्तके/साहित्य :**

**१) ऑनलाईन :** उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स ,उदा. Diksha, ePathshala इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओज.

**२) ऑफलाईन :** संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

**३) संदर्भ पुस्तके :**

- महाराष्ट्राची राज्यव्यवस्था – जयसिंग पवार
- ग्रामपंचायत व तिची रचना – विवेक जाधव
- नागरिकशास्त्राच्या उपक्रमशील पद्धती – डॉ. संदीप देशमुख
- लोकशाही प्रकल्प व खेळ – एन.सी.ई.आर.टी.
- मानवी हक्काचे शिक्षण – वसंत पाटील

**शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :**

**उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे, २) सहभागींनी केलेले कार्य, ३) उपक्रमाचा परिणाम/यश,

**वार्षिक अहवाल :** १) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण, २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे ३) पुढील वर्षासाठी शिफारसी.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी सहाय्यभूत ठरणारे मुद्दे :**

१) गटासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**समूहांमुळे शाळेस होणारे फायदे :**

१) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) शाळेचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावेल.

❑❑❑

# ८. अर्थशास्त्र विषय समूह

## अर्थशास्त्र समूह :

अर्थशास्त्र हा एक सामाजिक शास्त्राचा भाग आहे, जो मानवी संसाधनांचा वापर, उत्पादन, वितरण आणि उपभोगाच्या प्रक्रिया अभ्यासतो. हा विषय विद्यार्थ्यांना संसाधनांचे अधिकतम वापर कसा करावा, विविध आर्थिक घटक कसे काम करतात आणि त्याचा समाजावर व अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो, हे समजून घेण्यास मदत करतो.

अर्थशास्त्राचा अभ्यास विद्यार्थ्यांना मागणी व पुरवठा, महागाई, बेरोजगारी, आंतरराष्ट्रीय व्यापार, आर्थिक धोरणे यांसारख्या विविध विषयावर विचार करण्याची क्षमता निर्माण करतो. या विषयाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये तर्कशुद्ध विचार करण्याची आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित होतात. तसेच, ते अर्थव्यवस्थेतील जटिलतेला समजून घेऊन एक जबाबदार नागरिक म्हणून काम करण्यास सक्षम होतात.

## उद्दिष्टे :

१) आर्थिक संकल्पना, संसाधन व्यवस्थापन आणि बजेटिंग शिकवणे.

२) बचत, गुतंवणूक, बँकिंग प्रणाली, वित्तीय साधने आणि कर्ज व्यवस्थापन याबाबत जागरूकता निर्माण करणे.

३) विद्यार्थ्यांना भारतीय अर्थव्यवस्था वित्तीय साधने आणि कर्ज व्यवस्थापन याबाबत जागरूकता निर्माण करणे.

## उपक्रम :

१) मार्केट सर्वेक्षण : स्थानिक बाजारपेठेचा अभ्यास व अहवाल तयार करणे.

२) नमुना/अभिरूप बाजार प्रक्रिया : आर्थिक व्यवहार शिकवण्यासाठी कृत्रिम बाजार तयार करणे.

३) बचत व गुंतवणूक : बचतीवर नाटिका किंवा चर्चासत्र.

४) वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.

५) बजेट तयार करणे : विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून शाळेचे वार्षिक बजेट तयार करणे.

६) आर्थिक साक्षरता.

७) वर्ल्ड बँक, युनो, आय.एम.फ., एस.बी.आय यांची स्थापना वर्ष, मुख्यालय, कार्य इ. बाबतची माहिती घेणे.

८) आंतरराष्ट्रीय स्टॉक एक्स्चेंज यांची माहिती देणे घेणे.

### अर्थशास्त्र समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी अर्थशास्त्र समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा अर्थशास्त्र/गणित/सांख्यिकी या विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी अर्थशास्त्र विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १. | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा अर्थशास्त्र/सांख्यिकी विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २. | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील अर्थशास्त्र/सांख्यिकी विषयाचा शिक्षक सदस्य | सदस्य |
| ३. | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

### अर्थशास्त्र समूहाची जबाबदारी व कार्ये :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या अर्थशास्त्र समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकांच्या मदतीने अर्थशास्त्र समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) अर्थशास्त्र समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकी दरम्यान उपक्रम सुचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) अर्थशास्त्र समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृत्तांत ठेवणे.

६) अर्थशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार,पूर्वतयारी करणे.

७) अर्थशास्त्र समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) अर्थशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

### अर्थशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ.ची सांख्यिकीय माहिती /अहवाल संकलित करावा.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत. शक्यतो शनिवारी उपक्रमाचे आयोजन करावे.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

### अर्थशास्त्र समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :

अर्थशास्त्र समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समुहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) अर्थशास्त्र विषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रम दरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रम दरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना**

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रमादरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबविण्यात येत आहेत, त्यांचे आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समुह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय अर्थशास्त्र समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणीसाठी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) वस्तुसंग्रह भरविणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**अर्थशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | आर्थिक सुरक्षिततेसाठी बचत आणि गुंतवणूक | १) 'पिगी बँक' संकल्पना समजून घेण्यासाठी कार्यशाळा.<br>२) विद्यार्थी बचत क्लबची स्थापना.<br>३) 'बचतीचे फायदे' या विषयावर निबंध स्पर्धा.<br>४) कुटुंबातील बचतीच्या पद्धतींबद्दल चर्चा. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| २) | जुलै | कामगार हा अर्थव्यवस्थेचा कणा | १) कामगार दिन साजरा करणे आणि त्यांच्या योगदानाची माहिती देणे.<br>२) स्थानिक उद्योगाला भेट देऊन कामगारांचे कार्य पाहणे.<br>३) 'श्रमाची प्रतिष्ठा' यावर पोस्टर स्पर्धा.<br>४) कामगार कायद्यावर माहितीपर सत्र. |
| ३) | ऑगस्ट | स्वावलंबनासाठी उद्योजकता | १) लघुउद्योग सुरू करण्याबाबत मार्गदर्शन.<br>२) विद्यार्थ्यांसाठी ''व्यवसाय योजना'' स्पर्धा.<br>३) यशस्वी उद्योजकांशी संवाद.<br>४) ''स्टार्टअप्स आणि आर्थिक विकास'' यावर सादरीकरण. |
| ४) | सप्टेंबर | उत्पादन व उपभोगातील समतोल | १) स्थानिक उत्पादने बनविणाऱ्या कारखान्याला भेट देणे.<br>२) 'सुजाण ग्राहक' यावर चर्चा सत्र.<br>३) 'स्थिर उपभोगाचे महत्त्व'' यावर नाटिका.<br>४) विद्यार्थ्यांकडून उत्पादन खर्चाचे उदाहरण घेऊन स्पष्टीकरण. |
| ५) | ऑक्टोबर | चलनाचा प्रभाव आणि आर्थिक स्थैर्य | १) भारतीय चलनाच्या इतिहासावर प्रकल्प.<br>२) 'चलनवाढ आणि त्याचे परिणाम' यावर वादविवाद.<br>३) विद्यार्थ्यांना चलनवाढीची गणिती उदाहरणे सोडवायला सांगणे.<br>४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून माहिती गोळा करणे. |
| ६) | नोव्हेंबर | मागणी- पुरवठ्याचा ताळमेळ | १) बाजारात भेट देऊन मागणी-पुरवठ्याचे निरीक्षण.<br>२) 'आर्थिक गरजांची प्राथमिकता' यावर प्रकल्प तयार करणे.<br>३) 'मागणी व पुरवठा वक्र' यावर प्रात्यक्षिक सत्र.<br>४) अभिरूप बाजाराचे आयोजन. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना | संकल्पना अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ७) | डिसेंबर | डिजिटल युग आणि अर्थशास्त्र | १) डिजिटल पेमेंट प्रणालींचा अभ्यास.<br>२) ''क्रिप्टोकरन्सी : भविष्याचा पैसा?'' यावर चर्चा.<br>३) ई–कॉमर्सचा प्रभाव यावर प्रकल्प सादरीकरण.<br>४) ''तंत्रज्ञान आणि रोजगार निर्मिती'' यावर कार्यशाळा. |
| ८) | जानेवारी | राष्ट्रीय विकासासाठी आर्थिक स्थैर्य | १) आर्थिक विकासाच्या प्रमुख घटकांवरील सादरीकरण.<br>२) ''विकसनशील भारत २०४७'' या विषयावर कल्पना मांडणे.<br>३) विद्यार्थ्यांसाठी आर्थिक धोरणांवर अभ्यास सत्र<br>४) प्रजासत्ताक दिनी आर्थिक योजनांचे महत्त्व सांगणारे सत्र. |

**उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय दिनविशेष :**

**अर्थशास्त्र दिनविशेष यादी**

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | १५ मार्च | आंतरराष्ट्रीय ग्राहक दिन |
| २) | ३१ ऑक्टोबर | जागतिक बचत दिन |
| ३) | २४ डिसेंबर | राष्ट्रीय उपभोक्ता दिन |

**समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :**

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडावे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करावे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती द्यावी.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी SMC/SMDC बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

**शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :**

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/ शाळा व्यवस्थापन विकास समिती (SMC/SMDC) सोबत बैठक घेतील. या समुहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक फॉर्मेटमध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

**सदर समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व SCERT कडून साहाय्य/ प्रोत्साहन :**

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत Online / Offline संसाधने/पुस्तके/साहित्य :**

१) ऑनलाईन : उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स, उदा. Diksha, epathshala, इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओ.

२) ऑफलाईन : संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

३) संदर्भ पुस्तके :

- द वेल्थ ऑफ नेशन्स : ॲडम स्मिथ
- डेव्हलपमेंट इकॉनॉमिक्स : अमर्त्य सेन
- Economic survey of India - Minstry of Finance, Government of India.
- भारतीय अर्थव्यवस्था : रमेश सिंग
- अर्थशास्त्र : एक अभ्यास : डॉ. अजित नवले

## शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :

**उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे, २) सहभागींनी केलेले कार्य, ३) उपक्रमाचा परिणाम/यश,

**वार्षिक अहवाल :** १)सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण, २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे, ३)पुढील वर्षासाठी शिफारसी.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी सहाय्यभूत ठरणारे मुद्दे :**

१) गटासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्याचे महत्त्व अधोरेखित करणे.

**समूहांमुळे शाळेस होणारे फायदे/नुकसान :**

फायदे : १) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) शाळेचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावेल.

❑❑❑

# ९. गणित विषय समूह

**प्रस्तावना :**

विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा व्यापक विस्तार आणि समाजातील वास्तविक जीवनाच्या समस्यांबद्दल माहिती देण्यासाठी गणित समूहाची स्थापना करणे आवश्यक आहे. गणित समूहाच्या सहभागातून विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी आवड निर्माण करून त्याला प्रोत्साहन दिले जाते. विविध दृष्टिकोनातून समस्या समजून घेणे, चर्चा, व्याख्यान, काही गणितीय कृती/उपक्रम आयोजित केले जातात. गणित समूहामार्फत गणित कौशल्याचा विकास करणे, तसेच रुचीपूर्ण/ आनंददायी पद्धतीने शिकण्याची संधी निर्माण होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अपेक्षित अभ्यासक्रम ध्येये, क्षमता पूर्ण करण्यासाठी पूरक होईल.

**गणित समूहाच्या निर्मितीचा उद्देश :**

१) गणित समूहाच्या माध्यमातून काही सादरीकरणातून गणितीय पाठ्यघटक सोप्या पद्धतीने सादर करणे.

२) गणित समूहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी गोडी/ आवड निर्माण करणे.

४) सर्जनशीलता आणि विचारशक्तीचा विकास करणे.

५) विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक पातळीवरील, सर्जनात्मक आणि आविष्कारशील क्षमता विकसित करण्याची संधी प्राप्त करून देणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययन आणि स्वतंत्र कार्य करण्याची सवय लावणे.

७) गणितीय विचारांचे मुक्त आदान-प्रदान करता येण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करून देणे.

८) विद्यार्थ्याला गणितीय विचारप्रक्रिया विकसित करण्याच्या उत्कृष्ट संधी प्रदान करणे.

९) विद्यार्थ्याला अनुमानात्मक समस्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून मदत करणे.

१०) विद्यार्थ्यांना गणिताचे सिद्धांत व्यवहारात आणि आपल्या दैनंदिन जीवनातील परिस्थितींमध्ये लागू करण्याची संधी प्रदान करणे.

११) विद्यार्थी -विद्यार्थ्यांत समूहात काम करतेवेळी सहकार्य, युक्तिवाद, स्पष्टीकरण आणि स्वत:चे मत व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच सामाजिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी मदत करणे.

१२) प्रत्यक्ष अनुभवावर तसेच कृती आधारित शिक्षण देणे.

१३) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

## गणित समूहाचे महत्त्व :

१) विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देता येते.

२) विद्यार्थ्याला स्वतंत्र चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते तसेच ते एकमेकांच्या विचारांना समजून घेता येते.

३) प्रतिभाशाली विद्यार्थ्यांना संधी मिळते.

४) गणित विषयाच्या अनुषंगाने अध्ययनपूरक माहिती गोळा करण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांना संधी देते.

५) आंतरशालेय गणितीय स्पर्धांमध्ये सहभाग घेता येतो.

६) गणितीय दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण स्थळांना भेटी देण्याची संधी उपलब्ध होते.

७) स्वतंत्र विचार करण्याची प्रेरणा मिळते यातूनच भविष्यासाठी गणिताची तयारी करण्यास मदत मिळते.

८) समूहामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पालक आणि समुदायाचा शाळेशी परिचित होण्याचा अनुभव प्रदान केला जातो.

९) विद्यार्थ्याला नेतृत्वाची संधी प्रदान करते.

१०) गणिताच्या अनुषंगाने शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शनात मदत करू शकते.

## शालेय गणित समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :

### १) शालेय गणित समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी शालेय गणित समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा गणित/भूमिती विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी गणित विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ.क्र | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील उच्च माध्यमिक स्तरावरील गाणित/भूमिती विषयाचे शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील गणित/भूमिती विषयाचे शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेमधील प्रत्येक तुकडीतून एक | सदस्य |

| अ.क्र | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| | विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी असावेत) | |
| ४) | समूह विषयाशी संबधित कार्य करण्यास समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५) | शालेय व्यवस्थापन समिती पालक | सदस्य |

वरीलप्रमाणे सदस्यांची निवड एका शैक्षणिक वर्षासाठी करावी. वर्षभराच्या कामकाजानंतर आढावा घेऊन समूहाच्या विषयाशी संबंधित कामकाजामध्ये विद्यार्थ्यांच्या रुचीनुसार समूह रचनेत आवश्यक बदल करण्याचा निर्णय घेण्याची मुभा राहील.

गणित समूहाच्या कार्यात शाळेतील सर्व समूहांना सहभागी करून घ्यावे. प्राथमिक व माध्यमिक स्तरातील विद्यार्थी यांनी इतर समूहांना सहकार्य करावे म्हणजे सर्व समूहामध्ये समन्वय साधला जाईल.

**२) गणित समूहाची जबाबदारी व कार्य : शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या गणित समूहाची जबाबदारी व कार्य पुढीलप्रमाणे :**

- मनोरंजक व ज्ञानपूर्ण गणितीय स्पर्धा, आंतरशालेय स्पर्धाचे आयोजन करणे.
- प्रसिद्ध गणित शिक्षक /गणितज्ज्ञ यांच्या व्याख्यानांचे आयोजन करणे.
- गणिताचा इतिहास जपणाऱ्या, गणिती तज्ज्ञांशी संबंधित दिवस आणि घटनांचे उत्सव साजरे करणे.
- गणित समूह अंतर्गत घ्यावयाच्या विविध उपक्रमांचे नियोजन करणे.
- पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवडयांनी बैठक घेणे व बैठकी दरम्यान उपक्रम सुचवण्यासाठी सर्व सदस्यांना प्रेरित करणे.
- गणित समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृत्तांत ठेवणे.
- गणित समूह अंतर्गत उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.
- गणित समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचा प्रचार व प्रसार करणे.
- गणितीय संकल्पनाचा वापर करून शाळेसाठी चार्ट, मॉडेल तयार करणे.
- गणित विषयक संकल्पना दर्शविणारे भित्तीपत्रक तयार करणे व अद्ययावत ठेवणे.
- गणित प्रदर्शन ,मेळावे ,जत्रा यांचे आयोजन करणे.
- गणिताशी संबंधित सेमिनार व व्यवसायामधील संधीबाबत मार्गदर्शन करणे.

- गणित विषयाशी संबधित मंडळे व विज्ञान प्रसार मंडळ (vipnet)
- गणित विषयाशी संबंधित पुस्तके, चित्रफिती, लघुपट, माहितीजालावरील माहिती विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना देणे.

**३) SCERT, पुणे यांचेकडून मार्गदर्शन/सहकार्य :**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेमार्फत विविध चित्रफिती, माहितीपट, तज्ज्ञ मार्गदर्शन ऑनलाईन कार्यशाळा, उपक्रम व पुस्तके PDF रूपात, अनुषंगिक संदर्भीय लिंक Website च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येतील. गणितासाठी कार्य करणाऱ्या नामांकित संस्थांची माहिती व संपर्क तपशील, संस्थाची ओळख, विविध कार्यशाळेत समूहाला आपले कार्य सादरीकरणाची राज्यस्तरावर संधी उपलब्ध करून देणे.

**४) गणित समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यीभूत ऑनलाईन व ऑफलाईन संसाधने :**

- इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतची गणित या विषयाची पाठ्यपुस्तके – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- जादुई गणित : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- गणितीय कोडी व समस्या : गणिती कोडी, सुडोकू यासाठी संदर्भ पुस्तकांची यादी :

**१) प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी (Primary Students - Grades 1 to 5)**

- 'The Moscow Puzzles' - Boris Kordemsky
- 'Math for Smarty Pants' - Marilyn Burns
- 'Math Curse' - Jon Scieszka and Lane Smith
- 'Can You Count in Greek?' - Judy Leimbach and Kathy Leimbach
- 'Sir Cumference and the First Round Table' - Cindy Neuschwander

**२) माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी (Secondary Students - Grades 6 to 10)**

- 'The Colossal Book of Mathematics' - Martin Gardner
- 'Mathematical Puzzles: A Connoisseur's Collection' - Peter Winkler
- The Man Who Counted: A Collection of Mathematical Adventures' - Malba Tahan
- 'Amusements in Mathematics' - Henry Ernest Dudeney
- 'Unlocking the Universe (Math Puzzles Section)' - Stephen Hawking & Lucy Hawking

### ३) दोन्ही स्तरांसाठी उपयुक्त पुस्तके

- 'Perplexing Puzzles and Tantalizing Teasers' - Martin Gardner
- 'Mathematical Recreations and Essays' - W.W. Rouse Ball
- 'What Is the Name of This Book?' - Raymond Smullyan
- 'The Art of Mathematics: Coffee Time in Memphis' - Bela Bollobas
- 'Brain Games for Clever Kids' - Gareth Moore

### ५) समूहाच्या कामकाजासाठी सहाय्यीभूत ठरणारे अन्य मुद्दे :

➢ समूहांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी, गणितातील प्रगत व आधुनिक संकल्पनाबाबत चर्चा करण्यासाठी तसेच एकंदरीत गणित गुणवत्ता वाढीसाठी केंद्र व तालुक्याच्या गणित शिक्षकांनी महिन्यातून अथवा तीन महिन्यातून एकदा एकत्र येऊन परिषदेचे आयोजन करणे व अधिकाधिक शिक्षकांना संधी व व्यासपीठ मिळेल यासाठी (Maths circle) प्रयत्न करणे.

➢ समाजापुढे आपली भूमिका सादर करून आवश्यक ती मदत मिळविणे. गणित या विषयासाठी कार्य करणारी विविध मंडळे/काही स्वंयसेवी संस्था/काही बँका अशा कामासाठी निधी प्रायोजक रूपाने देतात. औद्योगिक वसाहती मधील काही कंपन्या CSR च्या स्वरुपात यासाठी मदत करतात.

### ७) शाळेमध्ये गणित समूह अंतर्गत आयोजित करण्यासाठी सुचविलेल्या कृती/उपक्रम :

**गणित समूह वार्षिक योजना (जून ते मार्च)**

**इयत्ता १ ली ते ४ थी : मूलभूत गणित आणि सर्जनशीलता**

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| जून | संख्याविषयक खेळ (Number Fun) | गणन कौशल्य वाढविणे. | • संख्याज्ञान अनुषंगिक विविध खेळ (गणित पेटीतील साहित्य, कॅलेंडर | महिन्यातून १ वेळ | शिक्षक निरीक्षण व विद्यार्थी फीडबॅक |
| | | | • गणित गप्पा उदा:घरातील सदस्य संख्या, शाळेतील वर्गखोल्या, विद्यार्थी संख्या इ. | | |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | • स्पर्धा आयोजन<br>• दैनंदिन व्यवहारात आढणाऱ्या संख्येच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणणे.<br>उदा. गावातील अंदाजित लोकसंख्या, संग्रहालयास भेट देणाऱ्यांची संख्या इ. | | |
| जुलै | आकार आणि रंग (Shapes) | आकार व रंग ओळखणे | • आकार वर्गीकरण खेळ<br>• मातीकामातून विविध भौमितीक आकार तयार करणे व त्यांना रंग देणे. | महिन्यातून १ वेळ | शिक्षक दैनंदिन नोंदी व चित्रांचा संग्रह |
| ऑगस्ट | आकृतीबंध (Patterns) | आकृतिबंध समजून घेणे. | • आकृतिबंध तयार करणे व त्यावर प्रश्न निर्मिती करणे.<br>• आकृतिबंध ओळखण्याची स्पर्धा घेणे व उत्तराचे स्पष्टीकरण सांगणे.<br>उदा. १, ३, ५, ७.....<br>१११,२२२,<br>३३३, ४४४,... इ. | महिन्यातून १ वेळ | गट प्रकल्पांचे मूल्यांकन |
| सप्टेंबर | वस्तूंची तुलना (Comparison) | दिलेल्या वस्तूंचे वजन, उंची आणि लांबी यांचा अंदाज लावणे व तुलना करणे. | • दिलेल्या वस्तूंचे वजन, उंची आणि लांबी यांचा अंदाज लावण्याची (अप्रमाणित /प्रमाणित एककांचा वापर करून) कृती करणे. | महिन्यातून १ वेळ | गट सादरीकरण आणि शिक्षकांचा अहवाल |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | तुलनात्मक तक्ता तयार करणे. उदा. विद्यार्थ्यांकडे असलेल्या साहित्याची म्हणजेच वही, कंपास, पुस्तक इ. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची उंची इ. | | |
| ऑक्टोबर | साधी बेरीज व वजाबाकी | गणिती क्रिया कौशल्य वाढवणे. | • बेरीज, वजाबाकी या गणिती क्रियावर आधारित गोष्ट सांगणे.<br>• जलद गतीने उदाहरणे सोडविण्याची स्पर्धा घेणे. | महिन्यातून १ वेळ | निरीक्षणाद्वारे अहवाल लेखन |
| नोव्हेंबर | कालमापन आणि दिनदर्शिका | कालमापन व दिनदर्शिका समजणे. | • १२ ताशी व २४ ताशी घड्याळ तयार करणे.<br>• दिनक्रम तक्ता तयार करणे.<br>• शालेय वेळापत्रकावर चर्चा घडवून आणणे.<br>• दिनदर्शिकेचे निरीक्षण करणे व त्यावर चर्चा करणे. (वार, महिना, दिवस, लिप वर्ष, आठवडे) | महिन्यातून १ वेळ | विद्यार्थी नोंदीचे निरीक्षण |
| डिसेंबर | • निसर्गातील गणित<br>• राष्ट्रीय गणित दिवस साजरा करणे. | • निसर्गातील गणितीय आकृतिबंध निरीक्षण करणे व अभ्यासणे. | • विविध झाडांच्या पानांवरील रचनांचे निरीक्षण करणे व त्यातील आकृतिबंध शोधणे. | महिन्यातून १ वेळ | पानांचा संग्रह, छायाचित्रे व अहवाल लेखन |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | (२२ डिसेंबर) | • भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती-निमित्त गणिताचे महत्त्व अधोरेखित करणे. तसेच भारतीय गणितज्ज्ञ यांच्या गणित योगदाना-विषयी माहिती घेणे. | • निसर्गातील विविध आकारांमधील आकृतिबंधावर चर्चा करणे.<br>• रामानुजन व इतर भारतीय गणितज्ज्ञ यांचे कार्य सादरीकरण, प्रश्नमंजुषा. | | |
| जानेवारी | आकडेमोड, संगणकीय विचार | गणिताचे कौशल्य सर्जनशीलतेने विकसित करणे. | • रेखाचित्र व आकडेमोड खेळ<br>• रेखाचित्रगणिती क्रियांवर आधारित कोडी.<br>• एखादे काम छोट्या कामांमध्ये विभागून त्यासाठी साध्या सोप्या सूचना कशाप्रकारे लिहायच्या याबाबत चर्चा घडवून आणणे. | महिन्यातून १ वेळ | मुलांचे कृती फोल्डर |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| फेब्रुवारी | गोष्टींच्या माध्यमातून गणित | गणिती रंजक गोष्टी समजावणे. | • संख्यावर आधारित गोष्ट रचणे.<br>• गोष्टींचे नाट्यरूपांतर करणे. | महिन्यातून १ वेळ | गोष्टींच्या सादरीकरणाचे निरीक्षण नोंदी |
| मार्च | वार्षिक पुनरावलोकन | वर्षभर शिकलेल्या बाबींचे पुनरावलोकन व उपयुक्तता | • गटचर्चा<br>• प्रदर्शन व प्रकल्प सादरीकरण | १ वेळ | पालक शिक्षकांसमोर विविध बाबींचे प्रदर्शन |

## इयत्ता ५ वी ते ७ वी : तर्कसंगत विचार आणि गणिताचे उपयोजन :

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| जून | गणिती खेळ (Math Games) | गणित या विषयाविषयक गोडी निर्माण करणे. | • कोड्यामधून अचूक संख्या ओळख स्पर्धा<br>• गणिती सुडोकू आणि क्रॉसवर्ड | महिन्यातून १ वेळ | शिक्षक दैनंदिन निरीक्षण |
| जुलै | माहिती (Data) सादरीकरण | माहिती गोळा करणे व त्याचे सादरीकरण करणे. | • बार चार्ट पाय चार्ट तयार करणे.<br>• शाळेतील व परिसरातील माहिती संकलन करण्यास सांगणे. | | |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | उदा. गणित विषयाची आवड असणारे वीज युनिट वापर वाहनांचा वापर इ. | महिन्यातून १ वेळ | आलेख व सादरीकरणाचे मूल्यांकन |
| ऑगस्ट | निसर्गातील आकृतिबंध | निसर्ग व गणिताचे संबंध ओळखणे | • फुलांच्या व पानांच्या आकारांचा अभ्यास करणे.<br>• निसर्गातील आकार व त्यातील गणिती आकृतिबंध शोधणे. | महिन्यातून १ वेळ | सादरीकरणाचे व छायाचित्रांचे विश्लेषण |
| सप्टेंबर | समस्यांचे निराकरण | तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता वाढवणे. | • गणिती कोडी व प्रश्न सोडवणे. | महिन्यातून १ वेळ | शिक्षक व गटचर्चा |
| ऑक्टोबर | आकडे आणि सरासरी | आकडेवारी व सरासरी काढण्याचे कौशल्य वाढवणे. | • दैनंदिन जीवनातील आकडे-मोड व सरासरीशी संबंधित विविध उदाहरणांचे संकलन | महिन्यातून १ वेळ | अहवाल सादरीकरण |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर | भूमिती आणि आकृती | आकृती, परिमिती व क्षेत्रफळ यांचे ज्ञान | • वर्गाच्या नकाशाचे मोजमाप करणे.<br>• त्रिकोण व चौरसाकृती वस्तू व त्यांची परिमिती व क्षेत्रफळ संबंधित प्रकल्प | महिन्यातून १ वेळ | सादरीकरण, निरीक्षण नोंदी |
| डिसेंबर | विविध खेळांमधील गणित<br>राष्ट्रीय गणित दिन (२५ डिसेंबर) | • गणिताचा प्रत्यक्ष उपयोग सम जावून देणे.<br>• रामानुजन यांचे गणितातील योगदान | • विविध खेळ व गणित यांचा सहसंबंध दर्शविणारा प्रकल्प | महिन्यातून १ वेळ | अहवाल लेखन<br>विद्यार्थ्यांचे निरीक्षण |
| जानेवारी | गणित इतिहास | • ऐतिहासिक गणिती शोध व व्यक्ती–विषयक माहिती संकलित करण्यासाठी प्रेरित करणे. | • गणित–तज्ज्ञावर चर्चा<br>• ऐतिहासिक गाणिती समस्यांवर आव्हांनावर चर्चा<br>• पोस्टर निर्मिती | महिन्यातून १ वेळ | गट सादरीकरण |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| फेब्रुवारी | वार्षिक पुनरावलोकन | संपूर्ण वर्षातील उपक्रमांचे विश्लेषण | • वार्षिक प्रकल्प प्रदर्शन<br>• विचारमंथन व समीक्षण | महिन्यातून १ वेळ | • उपक्रमाचे विश्लेषण<br>• सादरीकरण |
| मार्च | आतंरराष्ट्रीय पायदिन –१४ मार्च जागतिक गणित दिवस (World Maths Day) १४ मार्च | गणितातील पाय ($\pi = 3.14$)या स्थिरांकाचे महत्त्व पटवून देणे.<br>• विद्यार्थ्यां–मध्ये गणिताची आवड निर्माण करणे व<br>• दैनंदिन जीवनामध्ये गणिताचे उपयोजन समजावून देणे. | • पाय प्रकल्प पायाशी संबंधित गमतीदार माहिती सादर करणे, पाय किंमत लक्षात ठेवण्याची स्पर्धा<br>• गणितीय खेळ, समस्या सोडवण्यास या कार्यशाळा, Hacka-thon स्पर्धेचे आयोजन सांस्कृतिक कार्यक्रम. | | |

**इयत्ता ८ वी ते १० वी : प्रगत गणित आणि तर्कशुद्ध विचार :**

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| जून | गणितीय कोडी (Puzzles) | तर्कशुद्ध विचार क्षमता वाढवणे. | • गणितीय कोडी सोडवणे.<br>• मेंदूला चालना देणारे तर्क–शास्त्रावर आधारित खेळ | महिन्यातून १ वेळ | • शिक्षक निरीक्षण व विद्यार्थ्यांचे प्रतिसाद |
| जुलै | माहिती सादरीकरण आणि विश्लेषण | माहिती गोळा करणे, सादरीकरण आणि विश्लेषणाचे कौशल्य | • माहिती गोळा करून चार्ट/ग्राफ तयार करणे.<br>• माहिती विश्लेषण | महिन्यातून १ वेळ | • प्रकल्प रिपोर्ट तयार करणे आणि सादरीकरण |
| ऑगस्ट | भूमिती आणि त्याचा वापर | भूमितीचे प्रगत ज्ञान आणि त्याचा दैनंदिन जीवनामध्ये वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे. | • क्षेत्रफळ, परिमिती आणि त्रिमितीय आकृतींचे प्रकल्प तयार करणे.<br>• वस्त्र किंवा बांधकाम क्षेत्रात गणिताचा उपयोग | महिन्यातून १ वेळ | • प्रकल्पांचे निरीक्षण व विद्यार्थ्यांचे गट सादरीकरण |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | • कलेमध्ये गणिताचा उपयोग-कागदाला घडी घालून विविध प्रकारचे कागदकाम | | |
| सप्टेंबर | प्रोग्रामिंग आणि गणित<br>• गणित साक्षरता सप्ताह<br>• ८ सप्टेंबर आंतर-राष्ट्रीय साक्षरता दिन) पासून | • गणित व तंत्रज्ञानाचा सहसंबध जाणून घेणे.<br>• राष्ट्रीय स्तरावर गणिताची उपयुक्तता व साक्षरता वाढविण्या-साठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे. | • गणितावर आधारित साधे प्रोग्राम तयार करणे (जसे की, पायथन (Python) वापरून सरासरी काढणे)<br>• संख्या शास्त्रावर आधारित ॲप डिझाइन<br>• पोस्टर निर्मिती, गणित कथा वाचन, प्रकल्प सादरीकरण | महिन्यातून १ वेळ | • विद्यार्थ्यांचे सादरीकरण आणि प्रोग्रामिंग परिणाम |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर | चल (Variables) आणि समीकरणे | • समीकरणे सोडवण्याचे कौशल्य विकसित करणे. | • दैनंदिन जीवनातील समस्यांवर आधारित समीकरणे तयार करणे व सोडवणे.<br>• चल आणि समी-करणाचा खेळ | महिन्यातून १ वेळ | • समस्यांचे निराकरण आणि सादरीकरण |
| नोव्हेंबर | सांख्यिकी आणि संभाव्यता | • संभाव्यता आणि सांख्यिकीचे प्रगत ज्ञान विकसित करणे. | • सांख्यिकी आकडेवारी काढणे व विश्लेषण करणे.<br>• क्रिकेट/क्रीडा-क्षेत्रातील संभाव्यतेचे गणन | महिन्यातून १ वेळ | • प्रकल्पांचे निरीक्षण व प्रत्याभरण |
| डिसेंबर | • आर्थिक गणित<br>• राष्ट्रीय गणित दिन | • वैयक्तिक वित्त व्यवस्था-पनाचे महत्त्व पटवून देणे. | • सरळव्याज आणि चक्रवाढ व्याज यावर कार्यशाळा आयोजन<br>• बजेट तयार करणे व | महिन्यातून १ वेळ | • बजेट सादरीकरण व चर्चासत्राचे विश्लेषण |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| | | राष्ट्रीय गणित दिन साजरा करणे. | आर्थिक नियोजनाचा सराव<br>• गणित स्पर्धा, रामानुजन यांचे कार्य या अनुषंगाने सादरीकरण, प्रश्नमंजूषा. | | |
| जानेवारी | • ऐतिहासिक गणितज्ज्ञ आणि शोध (आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त भास्क-राचार्य, पिंगला, वराहमिहिर इ.)<br>• गणित व इतर विषयातील महत्त्वपुर्ण योगदान | • गणितज्ज्ञ व गणिती संशोधन परिचय करून देणे.<br>• गणिताचे इतर विषयाचा सहसंबंध जाणून घेणे. | • गणित तज्ज्ञांवरील सादरीकरण व पोस्टर तयार करणे.<br>• गणितातील ऐतिहासिक शोधांची चर्चा<br>• गणित व इतर विषयाचा सहसंबंध जाणून घेणे. | महिन्यातून १ वेळ | • फीडबॅक |
| फेब्रुवारी | • संशोधन प्रकल्प | स्वंतत्र गणितीय संशोधन कौशल्य विकसित करणे. | • वास्तविक जीवनातील समस्यांवर आधारित गणितीय प्रकल्प<br>• गट प्रकल्प सादरीकरण | महिन्यातून १ वेळ | • प्रकल्पांचे मूल्यांकन व स्पर्धा आयोजित करणे. |

| महिना | थीम/विषय | उद्दिष्ट | उपक्रम | वारंवारता | मॉनिटरींग आणि अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | • वार्षिक पुनराव–लोकन आणि प्रदर्शन<br>• आंतर–राष्ट्रीय पाय दिन (Pi Day)–१४ मार्च | • वर्षभरातील बाबींचा आढावा आणि प्रदर्शन<br>• गणितातील पाय ($\pi$ = ३.१४) या स्थिरांकाचे महत्त्व पटवून देणे.<br>• विद्या–र्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करणे. | • सर्व प्रकल्पांचे प्रदर्शन<br>• यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार<br>• पाय प्रकल्प, पायशी संबंधित गमतीदार माहिती सादर करणे, पाय किंमत लक्षात ठेवण्याची स्पर्धा | महिन्यातून १ वेळ | • पालक आणि शिक्षकांसमोर प्रदर्शन. |
| | | दैनंदिन जीवनामध्ये गणिताचे उपयोजन समजावून देणे. | • गणितीय खेळ, समस्या सोडव–ण्याच्या कार्यशाळा, स्पर्धेचे आयोजन , सांस्कृतिक कार्यक्रम. | | |

## प्रपत्र अ : गणित दिनविशेष यादी

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय गणित दिन/पाय डे | १४ मार्च |
| २ | राष्ट्रीय गणित दिन | २२ डिसेंबर |
| ३ | जागतिक सांख्यिकी दिन | २९ जून |
| ४ | गोल्डन रेशिओ डे | १ जून |
| ५ | फिबोनाची डे (Fibonacci day) | २३ नोव्हेंबर |

## प्रपत्र ब : गणित समूह अंतर्गत वार्षिक उपक्रम अहवाल लेखन

## शैक्षणिक वर्ष

१) शाळेचे नाव

२) मुख्याध्यापक नाव

३) समूह प्रमुख व समूह सदस्य तपशील

४) समूह अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक

५) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राबवलेल्या उपक्रमांचा तपशील

| अ.क्र. | राबविलेल्या उपक्रमांचे नाव | राबविलेल्या उपक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |

६) उपक्रमनिहाय अहवाल : उपक्रमाचा स्वंतत्र अहवाल क्रमाने जोडावा. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाही, निवडक जिओटॅग असलेले फोटो इ.च्या अनुषंगाने मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणे सोबत जोडावीत.

❑❑❑

# १०. विज्ञान विषय समूह

**प्रस्तावना :**

विज्ञान समूह हे विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी व सर्जनशील होण्यासाठी उत्तम शालेय मंच आहे. या समूहाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना त्यांच्या जिज्ञासेला चालना देणे, विज्ञानाच्या नवीन संकल्पना सखोल समजून घेणे, सर्जनशील विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे आणि एकंदरीत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी महत्त्वपुर्ण ठरतात. यासाठी विज्ञान समूहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी वैविध्यपुर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शालेय स्तरावर विज्ञान समूह स्थापन करणे आणि त्या माध्यमातून वार्षिक नियोजनबद्ध उपक्रम राबविण्यासाठी या मार्गदर्शक सूचना उपयुक्त ठरतील.

**विज्ञान समूह संकल्पना :**

विज्ञान समूह म्हणजे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाशी संबंधित ज्ञान, कौशल्य, शास्त्रीय दृष्टिकोन, वैज्ञानिक मूल्ये आणि आवड व स्वभाववृत्ती विकसित करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या साहाय्याने विज्ञान समूह स्थापन करून त्या माध्यमातून विविध उपक्रम राबविणे.

**विज्ञान समूहाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन विकसित करणे.

२) शास्त्रीय शोध व निसर्गातील कुतूहल शोधून काढण्याची सवय विद्यार्थ्यांना लावणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय छंदाची आवड निर्माण करणे.

४) शास्त्रीय तत्त्वे व सभोवतालचा परिसर यांच्यातील साम्य/तुलना करण्यासाठी निरीक्षणाची संधी देणे.

५) विज्ञान विषयातील नियम, संकल्पना व तत्त्वे आणि त्यांचे महत्त्वाचे व्यवहारातील उपयोग जाणून घेणे व प्रत्यक्ष उपयोजन करण्यासाठी संधी देणे.

६) विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन घडामोडींचा व अद्ययावत ज्ञानाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

७) नैसर्गिक घटना आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करणे.

८) संघात काम करण्याची व नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी इ. गट कार्य कौशल्ये विकसित करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि तार्किक विचारशक्ती विकसित करणे.

१०) भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी त्यांना व्यासपीठ व संधी उपलब्ध करून देणे.

११) विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा देणे.

## विज्ञान समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :

### १) विज्ञान समूहाची रचना

विज्ञान समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान विषयाचा अध्यापन करणारा शिक्षक असावा. त्यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी विज्ञान स्पर्धामधील विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन व विज्ञान विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी. शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी शालेय विज्ञान समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील विज्ञान विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी / विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |
| ४) | समूह विषयाशी संबंधित कार्य करण्यास समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५) | शालेय व्यवस्थापन समिती व पालक | सदस्य |

वरीलप्रमाणे सदस्यांची निवड एका शैक्षणिक वर्षासाठी करावी. वर्षभराच्या कामकाजानंतर आढावा घेऊन समूहाच्या विषयाशी संबंधित कामकाजामध्ये विद्यार्थ्यांच्या रुचीनुसार समुहात फेरफार करण्याचा निर्णय घेण्याची मुभा राहील.

### २) विज्ञान समूहाची जबाबदारी व कार्ये

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या विज्ञान समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत विज्ञान शिक्षकाच्या मदतीने विज्ञान समूहाची स्थापना करावी.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाचे स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) विज्ञान समूह अंतर्गत वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्व नियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकी दरम्यान उपक्रम सुचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) विज्ञान समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृत्तांत ठेवणे.

६) विज्ञान समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) विज्ञान समूह अंतर्गत विज्ञान मंडळाने घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) विज्ञान समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

१०) समूहाच्या कामकाजासाठी सहभागी असलेले तज्ज्ञ आणि पालक यांचेशी समन्वय ठेवणे.

**३) शाळेमध्ये विज्ञान समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सुचविलेल्या कृती व वार्षिक नियोजन**

शालेय स्तरावर स्थापन केलेल्या विज्ञान समूहाच्या माध्यमातून दिलेल्या संकल्पना अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | जून | तज्ज्ञ मार्गदर्शक यांची व्याख्याने | **व्याख्यानासाठी विषय**<br>• दैनंदिन जीवनातील विज्ञान.<br>• आधुनिक तंत्रज्ञान.<br>• विज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक संधी.<br>• भारतीय संशोधकांचे योगदान.<br>• विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाज<br>• उर्जा बचत<br>• दैनंदिन जीवनातील विज्ञान<br>• जैवविविधता<br>• वन्यजीव संरक्षण कायदा व इतर कायद्याची माहितीपर व्याख्याने<br>• वैज्ञानिक संस्थांचा परिचय व कार्ये<br>• अंतराळ विज्ञानाचे नवे युग<br>• कृत्रिम बुद्धिमत्ता, कोडींग<br>• चालू घडामोडी इ. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| २) | जुलै | वैज्ञानिक चित्रपट, विविध शोध, माहितीपट, AR, VR व्हिडिओ दाखविणे. | • भारतीय अंतराळ मोहिमा व्हिडिओ<br>• भारतीय वैज्ञानिकांचा माहितीपट/ व्हिडिओ<br>• वैज्ञानिक शोधांचा प्रवास<br>• पृथ्वीचा जन्म कसा झाला?<br>• भौगोलिक ठिकाणानुसार जैवविविधता व्हिडिओ<br>•विज्ञानवीर-विद्यार्थी यशोगाथा<br>• Genetic engineering, क्लोनिंग<br>• आधुनिक काळातील वैद्यकीय प्रगती<br>• अंतराळातील दुनिया<br>• इतर ग्रह, सूर्यमाला, आकाशगंगा माहितीपर व्हिडिओ<br>• डायनासोरचा अंत AR, VR, व्हिडिओ<br>• अंतराळवीरांचा प्रवास इ. |
| ३) | ऑगस्ट | शाळा स्तरावर विविध स्पर्धा आयोजन | • विज्ञान प्रश्नमंजुषा.<br>• प्रकल्प स्पर्धा किंवा मॉडेल प्रदर्शन.<br>• निबंध स्पर्धा<br>• वक्तृत्व स्पर्धा.<br>• टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू निर्मिती स्पर्धा.<br>• विज्ञान थीम नुसार वर्ग सजावट स्पर्धा.<br>• वैज्ञानिक खेळणी निर्मिती स्पर्धा.<br>• वादविवाद स्पर्धा.<br>• वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा.<br>• चित्रकला स्पर्धा<br>• विज्ञान व्हिडिओ निर्मिती |

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| | | | • विज्ञान नाट्योत्सव<br>• विज्ञान पुस्तक जत्रा<br>• विज्ञान संमेलन<br>• पथनाट्य स्पर्धा<br>• पोस्टर मेकिंग व सादरीकरण<br>• रोबोटिक्स प्रकल्प कृती इ. |
| ४) | सप्टेंबर | वैज्ञानिक/ शैक्षणिक सहली/अभ्यास भेटी | • विज्ञान संग्रहालये.<br>• आकाश निरीक्षण व तारांगण.<br>• विज्ञान संशोधन केंद्रे.<br>• नैसर्गिक उद्याने व निसर्ग स्थळांना भेटी.<br>• नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्रांना भेटी.<br>• विज्ञान प्रयोगशाळा पाहणी<br>• रोबोटिक प्रयोगशाळा<br>• वैज्ञानिक संस्थाना भेटी<br>• अभयारण्ये,राष्ट्रीय उद्याने, पक्षी अभयारण्य, प्राणी संग्रहालय, Botanical gardens, Butterfly Garden इ. स्थळांना भेटी<br>• Science Museum/Science Park/Science city इ. स्थळांना भेटी |
| ५) | ऑक्टोबर | विज्ञानातील गमतीशीर प्रयोग दिग्दर्शन व वैज्ञानिक प्रतिकृती निर्मिती | शाळेत उपलब्ध असलेल्या प्रयोग साहित्याचा वापर करून<br>• साधी व सोपी वैज्ञानिक उपकरणे तयार करणे.<br>• वैज्ञानिक मॉडेल निर्मिती.<br>• साधे आणि मजेशीर प्रयोग दिग्दर्शन<br>• हसत खेळत विज्ञान |

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| | | | • वैज्ञानिक खेळणी तयार करणे.<br>• सेन्सर आधारित रोबोट तयार करणे, इ |
| ६) | नोव्हेंबर | शास्त्रज्ञांच्या कार्याचा जागर व संवाद सत्रे | • वैज्ञानिकांची जयंती/पुण्यतिथी/ विशेष दिन साजरे करणे.<br>• वैज्ञानिक किंवा विज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद सत्रे आयोजन (Science talk)<br>• वैज्ञानिकांच्या शोधांचे, माहितीचे तक्ते तयार करणे.<br>• परिपाठामध्ये शास्त्रज्ञांची माहिती देणे इ. |
| ७) | डिसेंबर | राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ | राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ यांचे कार्य याबाबत<br>• माहिती संकलन प्रकल्प<br>• पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ व त्यांचे शोध यावर पोस्टर निर्मिती<br>• पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ व त्यांचे शोध यावर व्हिडिओ माहितीपट निर्मिती<br>• पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ यांच्या शोधावर आधारित नाट्यसादरीकरण<br>• पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ यांच्या शोधावर आधारित सर्जनशील लेखन/हस्तलिखित तयार करणे.<br>• पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ यांच्या शोधावर आधारित मुलाखतीचे रेकॉर्ड केलेले व्हिडिओ दाखविणे इ. |
| ८) | जानेवारी | सर्जनशील वैज्ञानिक लेखन व सादरीकरण | • शालेय विज्ञान हस्तलिखित/वार्षिक अंक तयार करणे.<br>• विज्ञान सेमिनार आयोजन<br>• विज्ञान परिषद आयोजन तयार करणे. |

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| | | | • पथनाट्य सादरीकरण<br>• पोस्टर मेकिंग व सादरीकरण<br>• विज्ञान कोपरा.<br>• विज्ञान फलक व त्यावर वैज्ञानिक लेखन इ. |
| ९) | फेब्रुवारी | प्रदर्शन/जत्रा/मेळावा आयोजन | • विज्ञान जत्रा आयोजन<br>• विज्ञान प्रदर्शन आयोजन.<br>• वैज्ञानिक वस्तूसंग्रह करून प्रदर्शन भरविणे.<br>• वैज्ञानिक खेळणी प्रदर्शन<br>• विज्ञान पुस्तक प्रदर्शन/जत्रा<br>• विज्ञान नाट्य मेळावा इ. |

**४) विज्ञान समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक**

- आर्थिक तरतूद.
- उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.
- उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.
- मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.
- वस्तूसंग्रह भरविणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**५) विज्ञान समूहाच्या कामकाजासाठी प्रक्रिया/नियमावली**

विज्ञान समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी काही नियम आखणे गरजेचे आहे. विज्ञान समुहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

- प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
- विज्ञानविषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.
- प्रयोग करताना व संशोधन करताना सुरक्षिततेचे नियम पाळावेत.
- उपक्रम दरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.
- शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.
- प्रयोगशाळा व इतर साहित्य नीटनेटके ठेवावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना**

- उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.
- विद्यार्थ्यांना प्रयोग आणि विज्ञानविषयक चर्चा यासाठी योग्य मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- प्रयोग करताना सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.
- सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
- उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे यासाठी नियोजन करावे.
- आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.
- केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**क) सुरक्षितता विषयक सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना**

- प्रत्येक प्रयोगापूर्वी विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या सूचना द्याव्यात.
- शिक्षकांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली प्रयोग घेण्याचे नियोजन करावे.
- प्रथमोपचार पेटी तयार करावी.
- प्रयोगांसाठी योग्य सुरक्षा उपकरणांचा वापर करावा. (उदा. हातमोजे, चष्मे इ.)

## ६) शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व शालेय समूह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

## ७) विज्ञान समूहाचे फायदे

विद्यार्थ्यांना विज्ञान समूह अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन घडामोडींचे अद्ययावत ज्ञान देणे, शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करणे, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि तार्किक विचारशक्ती, शास्त्रीय शोध व निसर्गातील कुतुहूल शोधण्याची सवय, शास्त्रीय छंदाची आवड निर्माण करणे सक्रिय सहभाग इ. क्षमता व कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.

## ८) विज्ञान समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना

- दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.
- शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.
- सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती यांची सांख्यिकीय माहिती अहवाल करण्यासाठी संकलित करावी.
- वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत. शक्यतो शनिवारी उपक्रमाचे आयोजन करावे.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.
- वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.
- सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

**९) विज्ञान समूहास विभागाकडून देण्यात येणारे शैक्षणिक साहाय्य**

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत विज्ञान विषयक ऑनलाईन वार्तापत्र सर्व शाळांसाठी प्रकाशित करण्यात येईल ज्यामध्ये विज्ञान विषयक चालू घडामोडी, दिनविशेष, इतर शाळांनी राबविलेले उल्लेखनीय कामकाज/उपक्रम तसेच महत्त्वाच्या व्हिडिओ लिंक्स इ. विषयी माहिती असेल. याचा वापर सर्व शाळांतील समूहांनी करावा.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत जिल्ह्यातील विज्ञान क्षेत्रात व विज्ञान प्रदर्शन, विज्ञान प्रकल्प, प्रत्यक्ष कृती आधारित/प्रयोग दिग्दर्शन इ. क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शक यांची यादी देण्यात येईल ज्यांना व्याख्यान/प्रयोग दिग्दर्शन उपक्रम आयोजित करण्यासाठी निमंत्रित करता येईल.

**१०) विज्ञान समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी संदर्भ स्त्रोत**

- विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार यांचे India Science यु- ट्यूब चॅनल.
- Secrets of the sea Episode - www.youtube.com/@natgeoindia
- Exploring the underwater world episode -www.youtube.com/@bbcearth
- पृथ्वी का जन्म कैसे हुआ ? Episode- www.youtube.com/@CURIO
- A welcome warning,The real black panther Hindi episodewww.youtube.com/@natgeoindia
- Extraordinary nature scenes episode-www.youtube.com/@bbcearth
- The remarkable work of Jungle Amma, Tulsi Gowda episode- www.youtube.com/historytv18

## प्रपत्र अ
## विज्ञान समूह अंतर्गत विशेष महत्त्वपूर्ण दिन

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | जानेवारी | १ जानेवारी | शास्त्रज्ञ सत्येंद्र नाथ बोस जयंती |
| २) | फेब्रुवारी | २८ फेब्रुवारी | राष्ट्रीय विज्ञान दिन (National Science Day) |
| ३) | मार्च | ३ मार्च | जागतिक वन्यप्राणी दिन (World Wildlife Day) |
| | | २१ मार्च | जागतिक वन्य दिन (World Forest Day) |
| | | २३ मार्च | जागतिक हवामान दिन (World Meteorological Day) |
| ४) | एप्रिल | ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिवस (World Health Day) |
| | | २२ एप्रिल | जागतिक आरोग्य दिवस (World Heal) |
| | | ७ एप्रिल | जागतिक पृथ्वी दिवस (World Earth Day) |
| ५) | मे | ११ मे | राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस (National Technology Day) |
| | | २२ मे | जागतिक जैवविविधता दिवस (World Biodiversity Day) |
| ६) | जून | ३० जून | शास्त्रज्ञ सी.एन.आर.राव (चिंतामणी नागेश रामचंद्रराव) जयंती |
| ७) | जुलै | १० जुलै | शास्त्रज्ञ निकोला टेसला जयंती |
| ८) | ऑगस्ट | २३ ऑगस्ट | राष्ट्रीय अंतराळ दिवस |
| ९) | सप्टेंबर | ६ सप्टेंबर | शास्त्रज्ञ डॉ.एम.एस.स्वामिनाथन जयंती |
| | | ७ सप्टेंबर | आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस (International day of clean Air) |
| | | ७ सप्टेंबर | शास्त्रज्ञ फेड्रिक ऑगस्ट केकुले जयंती |
| | | १६ सप्टेंबर | आंतरराष्ट्रीय ओझोन थर संरक्षण दिवस |
| | | २२ सप्टेंबर | शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे जयंती |
| | | २९ सप्टेंबर | शास्त्रज्ञ एन्निको फर्मी जयंती |

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| १०) | ऑक्टोबर | ४ ऑक्टोबर | जागतिक प्राणी दिवस (World Fauna Day) |
| | | ७ ऑक्टोबर | शास्त्रज्ञ नील्स बोहर जयंती |
| | | १० ऑक्टोबर | शास्त्रज्ञ हेन्री कॅव्हेंडिश जयंती |
| | | १५ ऑक्टोबर | शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती |
| | | १६ ऑक्टोबर | जागतिक अन्न दिवस |
| | | १९ ऑक्टोबर | शास्त्रज्ञ डॉ.एस.चंद्रशेखर जयंती |
| | | २० ऑक्टोबर | शास्त्रज्ञ सर जेम्स चॅडविक जयंती |
| | | २४ ऑक्टोबर | जागतिक हवामान बदल दिवस (World Climate Change Day) |
| | | ३० ऑक्टोबर | शास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा जयंती |
| ११) | नोव्हेंबर | ७ नोव्हेंबर | शास्त्रज्ञ डॉ. सीव्ही. रमन जयंती |
| | | ७ नोव्हेंबर | शास्त्रज्ञ मॅडम मेरी क्युरी जयंती |
| | | १० नोव्हेंबर | जागतिक विज्ञान दिवस (World Science Day) |
| | | ३० नोव्हेंबर | शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस जयंती |
| १२) | डिसेंबर | २६ डिसेंबर | आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान दिवस (International Day of Science and Technology) |

## ब : वर्षभरात घेण्यात येणारे सप्ताह

| अ.क्र. | महिना | संकल्पना/विषय | विज्ञान समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | फेब्रुवारी व मार्च | २८ फेब्रुवारी ते ३ मार्च | विज्ञान सप्ताह |
| २) | ऑक्टोबर | २ ते ८ ऑक्टोबर | वन्यजीव सप्ताह |
| ३) | ऑक्टोबर | ४ ते १० ऑक्टोबर | जागतिक अवकाश सप्ताह |
| ४) | ऑक्टोबर | २३ ते ३० ऑक्टोबर | अवकाश निरीक्षण सप्ताह |
| ५) | नोव्हेंबर | ५ ते १२ नोव्हेंबर | पक्षी सप्ताह |

## प्रपत्र ब

## विज्ञान समूह अंतर्गत वार्षिक उपक्रम अहवाल लेखन

## शैक्षणिक वर्ष

१) शाळेचे नाव :

२) मुख्याध्यापक नाव :

३) समूह प्रमुख व समूह सदस्य तपशील :

४) समूह अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक :

५) शैक्षणिक वर्षाध्ये राबविलेल्या उपकमांचा तपशील :

| अ.क्र. | राबविलेल्या उपक्रमांचे नाव | राबविलेल्या उपक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |

६) उपक्रम निहाय अहवाल :

शैक्षणिक वर्षात राबविलेल्या प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अहवाल क्रमाने जोडावा. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संख्या,उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाही, निवडक जिओटॅग असलेले फोटो इ.च्या अनुषंगाने मुद्द्याचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणे सोबत जोडावीत.

❑❑❑

# ११. क्रीडा समूह

## क्रीडा समूहाची पार्श्वभूमी :

क्रीडा समूहाची संकल्पना शिक्षण प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते. त्याच अनुषंगाने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये क्रीडा समूहाची स्थापना केली जाते. प्राचीन काळापासून क्रीडा आणि व्यायाम हे शिक्षणाचा अविभाज्य भाग राहिले आहेत. ग्रीक संस्कृतीत ऑलिंपिक खेळांना महत्त्व दिले गेले, तर भारतात 'गुरुकुल' प्रणालीत धनुर्विद्या आणि व्यायाम यांचा समावेश होता. याच क्रीडामूल्यांच्या आधारे आधुनिक काळात विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी क्रीडा समूह संकल्पना राबवली जाते. औद्योगिक क्रांतीनंतर शिक्षणाच्या पद्धतीत बदल झाले आणि शारीरिक शिक्षणाला दुय्यम स्थान दिले गेले.

मात्र, २० व्या शतकात क्रीडा विषयक संशोधनामुळे क्रीडेला शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासासाठी अपरिहार्य मानले गेले.

क्रीडा समूह स्थापन करून विद्यार्थ्यांना संघभावना, नेतृत्व आणि शिस्त शिकवण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू झाले. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विविध खेळांचे गट तयार करून त्याद्वारे विद्यार्थ्यांना सरावाची संधी उपलब्ध करून देणे.

## क्रीडा समूह प्रस्तावना :

क्रीडा समूह हा शरीरसंपदा, शारीरिक तंदुरुस्ती आणि सामूहिक कार्यसंस्कृती वाढविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात येणार आहे. खेळ हा केवळ शारीरिक आरोग्यासाठीच नव्हे तर मानसिक शांती, आत्मविश्वास वाढविणे आणि स्पर्धात्मकता जोपासण्यासाठी महत्त्वाचा आहे.

विविध खेळांच्या माध्यमातून सर्वसामान्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे आणि खेळाडूंना त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देणे. गटातील ऐक्य, सहकार्य आणि एकमेकांच्या यशाचा आनंद घेणे हे आमचे उद्दिष्ट आहे. खेळांमधील सहभागामुळे केवळ वैयक्तिक प्रगतीच होत नाही तर सामूहिक यशाचाही आनंद मिळतो. 'स्वस्थ मन आणि तंदुरुस्त शरीरासाठी खेळ' या विचाराने प्रेरित होऊन आम्ही या क्रीडा समूहामध्ये उत्साहाने कार्यरत राहू.

सदस्यांना, नवीन खेळाडूंना, तसेच उत्साही व्यक्तींना या समूहाचा भाग होण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रित करतो. चला, खेळाच्या माध्यमातून एकत्र येऊन आरोग्यदायी आणि प्रेरणादायी जीवन जगुया!

## क्रीडा समूहाची संकल्पना :

क्रीडा समूहा ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकास घडविण्यासाठी तयार करण्यात येते. ही गटव्यवस्था विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये सहभाग घेण्यासाठी आणि त्याच्यांतील नेतृत्वगुण, सहकार्य आणि शिस्त विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देते.

## क्रीडा समूहाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी नियमित व्यायाम आणि खेळाची सवय लावणे.

२) टीमवर्क, सहकार्य आणि सकारात्मक वर्तन विकसित करणे.

३) खेळाच्या माध्यमातून आनंद व जीवनाचे धडे शिकवणे.

४) निरोगी स्पर्धा आणि विजय-पराजय स्वीकारण्याची वृत्ती विकसित करणे.

५) नेतृत्व क्षमता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांचा मानसिक आणि भावनिक समतोल राखत सर्वांगीण विकास घडवणे.

## क्रीडा समूहाचे घटक, गटाचे स्वरूप :

वय, लिंग आणि खेळाच्या आवडीवर आधारित गटांची निर्मिती केली जाते.

गटांना नाव व चिन्ह (Logo) दिले जाते (उदा. 'स्पार्टन्स', 'चॅम्पियन्स').

**सदस्य निवड :**

शारीरिक क्षमतांनुसार विद्यार्थ्यांची निवड.

प्रत्येक गटात नेतृत्व करणारा गटनेता निवडला जातो.

**खेळ प्रकार :**

- मैदानी खेळ : क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, कबड्डी, हॉकी.
- इनडोअर खेळ : बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस.
- ॲथलेटिक्स : धावणे, उडी मारणे, भाला फेकणे.
- सहकार्य आणि संवाद.

गटातील सदस्यांनी प्रशिक्षक व गटनेत्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणे.

गटसंपर्क बैठका आयोजित करणे.

**नियम व शिस्त :**

सर्व गट सदस्यांनी शिस्त व आदरपूर्वक वागणे आवश्यक आहे.

गटासाठी ठरवलेले सराव वेळापत्रक पाळणे बंधनकारक आहे.

### क्रीडा समूहाचे फायदे :

१) **आरोग्यदायक जीवनशैली :** खेळामुळे शारीरिक स्वास्थ्य व मानसिक ताजेपणा मिळतो.

२) **टीमवर्क आणि नेतृत्व :** गटात काम करण्याची सवय आणि नेतृत्व कौशल्ये विकसित होतात.

३) **स्पर्धात्मक भावना :** निरोगी स्पर्धा व संघर्षातून प्रगती करण्याची प्रेरणा मिळते.

४) **धैर्य व संयम :** पराभव स्वीकारण्याची वृत्ती आणि मानसिक स्थैर्य विकसित होते.

५) **शाळेचा गौरव :** गटातील विद्यार्थी शाळा व शाळेबाहेरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन प्रतिष्ठा वाढवतात.

### क्रीडा समूहाद्वारे आयोजित उपक्रम :

१) **आंतर गट क्रीडा स्पर्धा :** शाळेत गटांमध्ये खेळांच्या मैत्रीपूर्ण स्पर्धा आयोजित करणे.

२) **विशेष खेळ दिवस :** क्रीडा समूहासाठी खेळांचे विशेष कार्यक्रम.

३) **प्रशिक्षण शिबिरे :** तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून खेळातील तंत्र शिकविण्यासाठी शिबिरे.

४) **आरोग्य विषयक शिबिरे :** पोषण व आरोग्य याबद्दल जागरूकता कार्यक्रम.

५) **गट गौरव कार्यक्रम :** उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गटांचे सन्मान व प्रोत्साहन.

क्रीडा समूह ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी संकल्पना आहे. यामुळे विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या सक्षम होतात, मानसिक स्थैर्य प्राप्त करतात आणि त्यांच्यात सामाजिक कौशल्ये विकसित होतात. योग्य नियोजन आणि अंमलबजावणी केल्यास क्रीडा समूह शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरणात एक सकारात्मक बदल घडवू शकतो.

### क्रीडा समूह अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :

क्रीडा समूहाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी खालील सूचना पाळल्या जाव्यात:

**शालेय क्रीडा गटाची रचना**

| अ.क्र. | रचना | पद | जबाबदारी |
|---|---|---|---|
| १) | मुख्याध्यापक | अध्यक्ष (Leader/ Presedent) | १) गटाचा प्रमुख आणि सर्वसाधारण मार्गदर्शन करणारी व्यक्ती.<br>२) गटाच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करून कार्य व्यवस्थापन करणे.<br>३) बैठका आयोजित करणे आणि महत्त्वाचे निर्णय घेणे. |

| अ.क्र. | रचना | पद | जबाबदारी |
|---|---|---|---|
| २) | शारीरिक शिक्षण शिक्षक | उपाध्यक्ष (Vice Presedent) | १) अध्यक्षाला साहाय्य करणे.<br>२) गटातील उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका निभावणे.<br>३) अध्यक्ष अनुपस्थित असल्यास त्याची जबाबदारी पार पाडणे. |
| ३) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | सचिव (Secretary) | १) बैठकींचे लेखाजोखा ठेवणे.<br>२) कार्यक्रमांचे वेळापत्रक आणि सूचना तयार करणे.<br>३) गटाच्या माहितीचे व्यवस्थापन करणे. |
| ४) | स्तरनिहाय व इयत्तयानिहाय विद्यार्थी | कोषाध्यक्ष | (Treasurer) :<br>१) गटाच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन करणे.<br>२) निधी गोळा करणे आणि खर्चाचे विवरण ठेवणे.<br>३) आर्थिक अहवाल तयार करणे. |
| ५) | विशेष नियुक्त तज्ज्ञ | प्रशिक्षक/मार्गदर्शक (Coach/ Trainer) | १) खेळाडूंना तांत्रिक मार्गदर्शन देणे.<br>२) खेळातील कौशल्य वाढवण्यासाठी मदत करणे.<br>३) सरावाचे नियोजन आणि अंमलबजावणी. |
| ६) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | कार्यक्रम संयोजक (Event Coordinator) | १) सराव सत्रे, मैदानी खेळ आणि स्पर्धांचे आयोजन करणे.<br>२) खेळांसाठी आवश्यक साधन सामग्रीची तयारी. |
| ७) | विशेष नियुक्त तज्ज्ञ | आरोग्य व सुरक्षा अधिकारी (Health and safety officer) | १) खेळाडूंच्या शारीरिक आरोग्याची काळजी घेणे.<br>२) आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे. |
| ८) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | सदस्य (Players/ Team members) | |

### शालेय क्रीडा गटाची जबाबदारी व कार्य :

१) गटाचे उद्दिष्टे स्पष्टपणे ठरविणे जसे की शारीरिक तंदुरुस्ती, कौशल्य विकास किंवा सामाजिक ऐक्य वाढविणे. गटामध्ये सहभागी होणाऱ्या सदस्यांची नोंदणी करणे आणि त्यांची क्षमता लक्षात घेऊन जबाबदाऱ्या वाटून देणे.

२) **खेळ निवड आणि आयोजन :** गटासाठी खेळ निवडताना सहभागींच्या आवडीनुसार आणि साधनांच्या उपलब्धतेनुसार निर्णय घेणे. आठवड्यातून किंवा महिन्यातून किमान एक वेळा सराव सत्रे आयोजित करणे. स्पर्धा किंवा खेळांचे वेळापत्रक तयार करणे आणि सर्व सदस्यांना त्याची माहिती देणे.

३) **नियम आणि शिस्त :** गटाच्या कामकाजासाठी नियमावली तयार करणे, जसे की वेळेचे पालन, खेळातील नैतिकता आणि इतर सहकाऱ्यांशी आदरयुक्त वर्तन. खेळांदरम्यान सुरक्षेच्या नियमांचे पालन सुनिश्चित करणे.

४) **प्रशिक्षक आणि मार्गदर्शक :**

आवश्यकता असल्यास प्रशिक्षकांची नेमणूक करणे, जे खेळाडूंना योग्य तंत्रज्ञान व कौशल्य शिकवतील. अनुभवी खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी संधी देणे.

५) **साधनांची उपलब्धता :**

खेळासाठी लागणारे साहित्य आणि जागा उपलब्ध करून देणे. साहित्याची देखभाल व व्यवस्थापनासाठी जबाबदार व्यक्ती नेमणे.

६) **प्रोत्साहन व मूल्यांकन :**

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके, प्रमाणपत्रे किंवा सन्मानाचे आयोजन करणे. सदस्यांच्या कामगिरीचे नियमित मूल्यमापन करणे आणि त्यांना सुधारण्यासाठी सूचना देणे.

७) **समुदाय सहभाग :**

गटाच्या उपक्रमांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग वाढविणे. शाळा, महाविद्यालये किंवा संस्थांशी सहकार्य करून मोठ्या प्रमाणात खेळांची योजना करणे.

८) **आर्थिक व्यवस्थापन :**

गटाच्या उपक्रमांसाठी निधी उभारणीची योजना ठरविणे, जसे की सदस्यत्व शुल्क, देणगी किंवा स्थानिक प्रायोजक शोधणे. खर्चांचा तपशील स्पष्ट ठेवणे आणि वार्षिक अहवाल तयार करणे.

९) **आरोग्य आणि फिटनेस :**

खेळांदरम्यान आरोग्यविषयक काळजी घेणे, जसे की पहिली मदत आणि तज्ज्ञ सल्ला. तंदुरुस्तीबाबत नियमित कार्यशाळा आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करणे.

१०) **संवाद आणि समन्वय :**

गटातील सदस्यांमध्ये संवादासाठी व्हॉट्सॲप गट, ईमेल किंवा तांत्रिक साधनांचा वापर करणे. सर्व निर्णय गटाच्या चर्चेद्वारे घेण्याचा प्रयत्न करणे.

ही मार्गदर्शक तत्त्वे पालन केल्यास क्रीडा समूहाच्या अंमलबजावणीसाठी योग्य दिशा मिळेल आणि त्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

## क्रीडा समूहाची जबाबदारी व कर्तव्य :

क्रीडा समूह हे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे, ज्याद्वारे खेळांचे आयोजन, व्यवस्थापन आणि सहभाग सुनिश्चित केला जातो. या समूहाच्या सदस्यांवर विविध जबाबदाऱ्या व कर्तव्ये असतात, जी शिस्त, समन्वय आणि क्रीडा संस्कृती विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**१) नियोजन व व्यवस्थापन :**

विविध क्रीडा प्रकारांसाठी सराव सत्रांचे नियोजन व वेळापत्रक तयार करणे. क्रीडा स्पर्धा, शिबिरे आणि उपक्रमांचे आयोजन करणे. खेळांसाठी आवश्यक उपकरणे आणि साहित्य यांची व्यवस्था करणे.

**२) नेतृत्व आणि संघटन :**

विद्यार्थ्यांना क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे. गटांमधील सदस्यांमध्ये संघभावना आणि सहकार्य जोपासणे. गटातील नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारून इतर सदस्यांना प्रेरणा देणे.

**३) शिस्त आणि नियमपालन :**

क्रीडा सराव आणि स्पर्धांमध्ये नियमांचे पालन सुनिश्चित करणे. खेळादरम्यान खेळाडूंच्या शिस्तबद्ध वर्तनाची जबाबदारी घेतली पाहिजे. मैदानावरील किंवा सरावा दरम्यान झालेल्या कोणत्याही समस्या किंवा विवाद सोडवणे.

**४) खेळाडूंच्या कल्याणासाठी उपाययोजना :**

खेळाडूंच्या शारीरिक फिटनेससाठी योग, व्यायाम आणि आहार सल्ल्याची व्यवस्था करणे. दुखापत झाल्यास प्रथमोपचार व वैद्यकीय मदतीची त्वरित व्यवस्था करणे. मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी प्रेरणादायी सत्रांचे आयोजन.

**५) क्रीडा साहित्य व संसाधनांची देखरेख :**

शाळेच्या क्रीडा साहित्याचा योग्य वापर आणि देखभाल करणे. हरवलेले किंवा खराब झालेले साहित्य दुरुस्त किंवा पुनर्स्थापित करणे. खेळांसाठी मैदान व इतर सुविधांची स्वच्छता व देखरेख करणे.

**६) सहभागी आणि स्पर्धात्मकता :**

शाळेतील आणि शाळेबाहेरील क्रीडा स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची निवड करणे. विद्यार्थ्यांना स्पर्धांसाठी शारीरिक व मानसिक तयारीसाठी मार्गदर्शन करणे. क्रीडा स्पर्धांमध्ये शाळेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रेरणा वाढवणे.

**७) विद्यार्थी आणि पालकांशी संवाद :**

खेळांशी संबंधित माहिती पालकांना आणि विद्यार्थ्यांना पोहोचवणे. पालकांसाठी खेळांच्या महत्त्वाविषयी चर्चा सत्रांचे आयोजन करणे. विद्यार्थ्यांकडून मिळालेला अभिप्राय गटासाठी सुधारणा करण्यासाठी वापरणे.

**८) सामाजिक जबाबदारी :**

क्रीडा उपक्रमांद्वारे सामाजिक संदेश पसरवणे (उदा.आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण) शाळेतील इतर सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये क्रीडा गटाचा सहभाग वाढवणे. क्रीडा क्षेत्रातील नैतिक मूल्यांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणे.

**९) प्रगतीचे मोजमाप व अहवाल तयार करणे :**

खेळाडूंच्या कामगिरीवर आधारित अहवाल तयार करणे. गटाच्या यशस्वीतेचा आढावा घेऊन भविष्याचे नियोजन करणे. स्पर्धा आणि उपक्रमांनंतर तक्रारी किंवा सूचना विचारात घेऊन सुधारणा सुचवणे. क्रीडा समूहाची जबाबदारी केवळ स्पर्धा आयोजित करणे किंवा व्यवस्थापन करणे इतकीच मर्यादित नाही. त्यांच्या कर्तव्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. शिस्तबद्ध नेतृत्व, संघटन आणि सकारात्मक वातावरण निर्माण करून क्रीडा समूह शाळेतील क्रीडा संस्कृतीला उंचावतो.

## समूह अंतर्गत आयोजित करण्यासाठी सुचविलेल्या कृती :

समूहाच्या उद्दिष्टांची अंमलबजावणी आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी खालील कृती सुचविल्या आहेत:

**१) ठराविक उद्दिष्टे आणि ध्येय ठरवणे :**

प्रत्येक सदस्याच्या योगदानाचे मूल्यांकन आणि गटाच्या उद्दिष्टांचे योग्य नियोजन करणे. गटासाठी दीर्घकालीन व शॉर्ट-टर्म उद्दिष्टे निश्चित करणे. प्रत्येक कार्यक्रमाचे ठराविक ध्येय असावे, जसे की क्रीडा स्पर्धेचे आयोजन किंवा सहकार्य वाढवणे.

**२) कार्यांची जबाबदारी ठरवणे :**

प्रत्येक सदस्याची भूमिका स्पष्ट करणे. आवश्यकतेनुसार गटातील कार्यांची विभागणी करणे. कार्य करण्याचे ठराविक वेळापत्रक तयार करणे आणि त्याचे पालन करणे.

**३) नियमित बैठकांचे आयोजन :**

गटाची प्रगती, आव्हाने आणि त्यावरील उपायांवर चर्चा करण्यासाठी नियमित बैठकांचे आयोजन करणे सर्व सदस्यांची सक्रिय उपस्थिती सुनिश्चित करणे. बैठकीत चर्चा केलेल्या मुद्द्यांचे लेखाजोखा ठेवणे आणि संबंधित व्यक्तींना पाठवणे.

**४) टीम बिल्डिंग उपक्रम :**

गटात एकजुटी आणि सहकार्य वाढवण्यासाठी विविध टीम बिल्डिंग कार्यशाळा आयोजित करणे. खेळांमध्ये समर्पण, विश्वास आणि सहकार्यावर आधारित सराव करणे. मजेदार आणि सामूहिक उपक्रम गटामध्ये सामंजस्य वाढवू शकतात.

**५) संसाधनांचा योग्य वापर :**

क्रीडा साहित्य आणि आर्थिक संसाधनांचा योग्य वापर सुनिश्चित करणे. योग्य साधनसामग्री आणि सुविधांची व्यवस्था करणे. सदस्यांच्या पातळीवर लागणाऱ्या संसाधनांची आवश्यकता ओळखून त्यांचा वेळोवेळी पुरवठा करणे.

**६) प्रशिक्षण आणि कार्यशाळा :**

गटातील प्रत्येक सदस्याची क्षमता वाढवण्यासाठी तंत्रज्ञान, नेतृत्व आणि इतर आवश्यक कौशल्यांवर प्रशिक्षण आयोजित करणे. क्रीडा क्षेत्रातील नवनवीन ज्ञानावर कार्यशाळा आयोजित करणे. सदस्यांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी सल्ला आणि मार्गदर्शन देणे.

**७) प्रोत्साहन आणि मान्यता :**

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सदस्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांची मान्यता करणे. सर्व सदस्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, परंतु जे सदस्य विशेष प्रगती साधतात त्यांना पुरस्कार देणे. यशाच्या बाबतीत गटात सामूहिक उत्साह आणि प्रेरणा निर्माण करणे.

**८) सर्वसमावेशक कार्यक्रम :**

गटाच्या सर्व सदस्यांना सहभागी होण्याची संधी देण्यासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम आयोजित करणे. विविध वयोगट, कौशल्य आणि आवडीच्या सदस्यांना भाग घेण्याची संधी देणे. महिलांसाठी विशेष क्रीडा उपक्रम, वयोवृद्धांसाठी उपक्रम आणि शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींसाठी कार्यक्रम आयोजित करणे.

**९) सकारात्मक संवाद आणि सहकार्य :**

गटातील सर्व सदस्यांमध्ये खुल्या आणि सकारात्मक संवादाची संस्कृती निर्माण करणे. चर्चा आणि समस्या सोडवण्यासाठी एकमेकांशी सहकार्य वाढवणे. गटाच्या सदस्यांमध्ये सामाजिक, भावनिक आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे.

**१०) प्रदर्शन आणि सामूहिक कामगिरी :**

गटाच्या कामगिरीचे प्रदर्शन आयोजित करणे, जसे की क्रीडा स्पर्धा, प्रात्यक्षिके किंवा कार्यशाळा प्रत्येक सदस्याची क्षमता आणि योगदान प्रदर्शित करण्यासाठी एकत्रित काम करणे. या कार्यक्रमातून गटाची प्रगती आणि उद्दिष्टे साध्य केली जाऊ शकतात.

**क्रीडा समूहासाठी काही महत्त्वाच्या सूचना :**

**१) स्पष्ट उद्दिष्टे ठरवा :**

प्रत्येक सदस्य आणि गटासाठी लक्ष्य निश्चित करा. खेळाची कौशल्ये सुधारणे, स्पर्धेत भाग घेणे

किंवा शारीरिक क्षमता वाढवणे. या लक्ष्यांचा समावेश असू शकतो. गटाच्या कार्यांची दिशा स्पष्ट करा आणि सर्व सदस्य त्यामध्ये सक्रियपणे भाग घ्यावेत.

**२) नियमित बैठकांचे आयोजन करा :**

गटाच्या प्रगतीसाठी साप्ताहिक किंवा मासिक बैठकांचे आयोजन करा. यामध्ये प्रशिक्षणाची चर्चा, सदस्यांच्या समस्या आणि गटाच्या आगामी कार्याची योजना ठरवता येईल. आपसात संवाद साधण्यासाठी विविध साधनांचा वापर करा, जसे की व्हाट्सॲप ग्रुप, इमेल किंवा कोणतेही इतर डिजिटल प्लॅटफॉर्म.

**३) प्रशिक्षण व वेळापत्रक तयार करा :**

गटाच्या उद्दिष्टानुसार प्रशिक्षणाचे ठराविक वेळापत्रक तयार करा. प्रत्येक सदस्याच्या कुवतीनुसार प्रशिक्षण कसे करावे हे ठरवा. व्यायाम, तंत्रज्ञान आणि विश्रांतीचे संतुलन साधा.

**४) जबाबदाऱ्या वाटा :**

गटामध्ये प्रत्येक सदस्याला जबाबदाऱ्या दिल्या जातात जसे की कार्यक्रमांचे आयोजन, आर्थिक व्यवस्थापन किंवा प्रशिक्षण सत्रांचे नेतृत्त्व. प्रत्येक सदस्याला गटाच्या यशामध्ये सक्रियपणे भाग घ्यायला प्रेरित करा.

**५) टीम बिल्डिंग आणि सहकार्य वाढवा :**

टीम बिल्डिंग उपक्रम आयोजित करा जेणेकरून सदस्यांमध्ये विश्वास आणि एकता वाढू शकेल. हे कार्यशाळा, गट खेळ किंवा सामूहिक उपक्रम असू शकतात.

**६) प्रोत्साहन व मान्यता द्या :**

गटात प्रगती साधलेल्या सदस्यांना प्रोत्साहन द्या आणि त्यांचे कौतुक करा. यामुळे सदस्यांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण होईल.

**७) प्रगतीवर लक्ष ठेवा :**

गटाच्या कार्यप्रदर्शनाचे नियमितपणे मूल्यमापन करा. प्रत्येक सदस्याची प्रगती तपासा आणि योग्य त्या सुधारणा करा. विविध प्रशिक्षण व कार्यशाळांच्या माध्यमातून प्रत्येक सदस्याची क्षमता वाढवण्यावर भर द्या.

**८) सकारात्मक वातावरण तयार करा :**

सकारात्मक आणि सहकार्यात्मक वातावरण निर्माण करा. प्रत्येक सदस्याला आपले विचार मांडण्याची आणि इतरांकडून सल्ला घेण्याची संधी द्या. या काही सूचनांनी आपल्या क्रीडा समूहाची कार्यक्षमता वाढवता येईल आणि त्याचा विकास साधता येईल.

## उपक्रम आयोजनासाठी काही महत्त्वाच्या सूचना :

**१) उद्दिष्टे ठरवा :**

प्रत्येक उपक्रमाचे स्पष्ट उद्दिष्ट ठरवा. उदा. शालेय क्रीडा दिवस, सामाजिक कार्यक्रम किंवा सांस्कृतिक कार्यकमासाठी. उद्दिष्टे ठरवल्याने आयोजन अधिक सुकर होईल.

**२) प्रवृत्त व वेळापत्रक :**

योग्य वेळेचे नियोजन करा आणि उपक्रमाच्या विविध घटकांची तयारी करणारे एक समयपत्रक तयार करा. सहभागी, स्टाफ आणि संसाधनांचे योग्य वितरण करा.

**३) प्रसंसाधनांची व्यवस्था :**

प्रत्येक उपक्रमासाठी आवश्यक असलेली संपत्ती (जसे खेळ साहित्या, ठिकाण, तांत्रिक उपकरणे) पूर्तता करा. तसेच, इच्छित कार्यक्रमाच्या नुसार सर्व आवश्यक गोष्टींची यादी तयार करा.

**४) समूहाचे नेतृत्त्व करा :**

एक उत्तम नेतृत्व सुनिश्चित करा. आयोजनासाठी एक मुख्य संयोजक आणि उपसंयोजकांची नियुक्ती करा. त्यांच्याद्वारे कार्यांची योग्य विभागणी करा.

**५) समर्थन मिळवा :**

उपक्रमासाठी स्थानिक शाळा, समाज संस्था किंवा स्वयंसेवी संस्थांकडून समर्थन मिळवून त्यांचा सक्रिय सहभाग करा. यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी होईल.

**६) संवाद साधा :**

उपक्रमाच्या सर्व बाबींच्या संदर्भात समूहाशी आणि सहभागींसोबत नियमित संवाद साधा. समाज माध्यम (सोशल मीडियाचा) वापर करून लोकांमध्ये जागरूकता निर्माण करा.

**७) सुरक्षा उपाय :**

उपक्रमामध्ये सहभागी व्यक्तींच्या सुरक्षेची काळजी घ्या. खेळ किंवा शारीरिक उपक्रमांमध्ये आवश्यक सुरक्षा साधने आणि पहिल्या मदतीचे प्रशिक्षण असलेल्या व्यक्तींची व्यवस्था करा.

**८) फीडबॅक आणि मूल्यमापन :**

उपक्रमाच्या पूर्णतेनंतर अभिप्राय (फीडबॅक) संकलित करा आणि कार्यशाळेच्या किंवा कार्यक्रमाच्या यशस्वीतेवर एक मूल्यमापन करा. यामुळे भविष्यातील आयोजकांसाठी सुधारणा शक्य होईल.

**९) समारोप आणि आभार प्रदर्शन :**

उपक्रम संपल्यानंतर, सर्व सहभागींचे आभार प्रदर्शन करा आणि त्यांना प्रमाणपत्रे किंवा छोटे पुरस्कार देऊन त्यांचे प्रोत्साहन करा.

या सूचनांचा वापर करून तुम्ही उपक्रमाच्या आयोजनाची प्रभावी तयारी करू शकता.

## काही महत्त्वपूर्ण सूचना

१) मुले व मुली यांचे दोन संघ बनविण्यावर लक्ष द्यावे.

२) किमान दोन वयोगटनिहाय पथके तयार करण्यात यावीत. त्यांचेमार्फत सर्व वयोगट स्पर्धा तयारी घेणेत यावे.

३) मुलांची काळजी घेऊन खेळांची तयारी व व्यवस्था शिक्षकांनी करावी.

४) खेळाशी संबंधित साहित्य शासकीय निधीतून उपलब्ध करून घेता येईल.

५) वार्षिक क्रीडा दिन आयोजित करून खेळाविषयी जागृती करण्यात यावी. वर्तमानपत्रातून माहिती देऊन मुलांचे पाठीवर कौतुकाची थाप मिळेल याचाही विचार करावा.

६) खेळाडू, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

७) आपल्या परिसरातील उत्कृष्ट खेळाडूंची ओळख मुलांना करून देऊन त्यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात यावे.

८) विविध खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या परिसरातील संस्थांची ओळख करून देण्यात यावी.

९) उत्कृष्ट खेळाडूंची ओळख करून देऊन त्यांचा योग्य सन्मान करून मुलांना भविष्यातील खेळाडू होण्यास मदत मिळेल अशी कृती असावी.

१०) खेळाचे प्रशिक्षण देणेसाठी प्रशिक्षकाला बोलावून मार्गदर्शन घ्यावे.

## क्रीडा प्रकार समूह अंतर्गत वार्षिक उपक्रमांचे नियोजन :

क्रीडा प्रकारांच्या विविध गटांसाठी नियोजित उपक्रमांचे वार्षिक नियोजन पुढीलप्रमाणे तयार केले जाऊ शकते :

| अ. क्र. | महिना | संकल्पना | कृतींचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | जून ते जुलै | प्राथमिक तयारी व गट स्थापना | **१) गट स्थापन करणे :**<br>विविध क्रीडा प्रकारांप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट तयार करणे.<br>सदस्यांची निवड व नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे.<br>**२) प्रशिक्षकांची नियुक्ती :**<br>प्रत्येक गटासाठी तज्ज्ञ प्रशिक्षक नियुक्त करणे.<br>**३) उपकरणे व संसाधने :**<br>खेळासाठी आवश्यक साहित्याची यादी व खरेदी. |

| अ. क्र. | महिना | संकल्पना | कृतींचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | **४) प्रेरणादायी कार्यक्रम :**<br>यशस्वी क्रीडापटूंच्या भेटी व मार्गदर्शन सत्रे आयोजित करणे. |
| २) | ऑगस्ट ते ऑक्टोबर | नियमित सराव सत्रे व शाळा पातळीवरील स्पर्धा | १) प्रत्येक गटासाठी आठवड्यातून किमान दोन सराव सत्रे निश्चित करणे.<br>२) खेळांमध्ये कौशल्यविकासावर लक्ष केंद्रित करणे. (फुटबॉल, कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, इत्यादी)<br>३) विद्यार्थ्यांच्या शारीरिक फिटनेससाठी व्यायाम शाळा व योगसत्रांचे आयोजन.<br>४) आंतरगट मैत्रीपूर्ण सामने.<br>५) 'क्रीडा सप्ताह' चे आयोजन.<br>६) विद्यार्थ्यांसाठी मैदानी खेळ आणि इनडोअर खेळ (बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस) यांचे आयोजन.<br>७) पुरस्कार वितरण :<br>विजेत्यांना सन्मानपत्रे व बक्षिसे. |
| ३) | नोव्हेंबर ते डिसेंबर | शाळेबाहेरील स्पर्धांमध्ये सहभाग वार्षिक क्रीडा व महोत्सव | जिल्हा, विभागीय, व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची निवड.<br>निवडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे.<br>**१) महत्त्वाचे खेळ :**<br>ॲथलेटिक्स, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व क्रिकेट यामध्ये सहभाग.<br>**२) प्रेरणा :**<br>सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या क्रीडा निधीतून प्रवास व इतर सुविधा पुरवणे. एक आठवडाभर चालणारा वार्षिक क्रीडा महोत्सव. |

| अ. क्र. | महिना | संकल्पना | कृतींचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | **४) निम्नलिखित खेळांचे आयोजन:**<br>धावपट्टी स्पर्धा (१००, २००, रिले).<br>मैदानावरचे खेळ (लांब उडी, गोळाफेक, भालाफेक.)<br>सांघिक खेळ (फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी).<br>**५) पालक सहभाग :**<br>पालकांसाठी मनोरंजक खेळ<br>(उदा. रस्सीखेच, संगीत खुर्ची)<br>**६) पुरस्कार वितरण समारंभ :**<br>स्पर्धेतील विजेत्यांना सन्मान.<br>'आदर्श क्रीडापटू' व 'सर्वाकृष्ट गट' : पुरस्कार प्रदान |
| ४) | जानेवारी | वार्षिक पुनरावलोकन व नियोजन | वर्षभरातील उपक्रमांचे पुनरावलोकन.<br>भविष्यातील सुधारणा व पुढील वर्षाचे नियोजन.<br>**१) विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया :**<br>विद्यार्थ्यांकडून उपक्रमांबद्दल अभिप्राय गोळा करणे. विशेष उपक्रम (वर्षभर): |
| ५) | फेब्रुवारी ते एप्रिल | आरोग्य शिबिरे | क्रीडापटूंसाठी वैद्यकीय तपासणी व पोषण मार्गदर्शन.<br>**१) क्रीडा चित्रपट दर्शन :**<br>प्रेरणादायी क्रीडा चित्रपटांचे प्रदर्शन.<br>**२) सामाजिक उपक्रम :**<br>क्रीडा गटामार्फत सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम (उदा. झाडे लावा, प्लॅस्टिक मुक्त परिसर) हे नियोजन शाळेच्या क्रीडा उपक्रमांना शिस्तबद्ध आणि कार्यक्षम बनवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देईल. |

## समूहासाठी विभागाकडून देण्यात येणारी मदत :

१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्फत क्रीडा विषयक ऑनलाइन पाक्षिक वार्तापत्र सर्व शाळांसाठी प्रकाशित करण्यात येईल यामध्ये क्रीडा विषय चालू घडामोडी दिनविशेष इतर राबवलेले उल्लेखनीय उपक्रम तसेच महत्त्वाचे व्हिडिओ लिंक्स इत्यादीविषयी माहिती असेल.

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक यांची यादी देण्यात येईल.

३) जिल्हा परिषदेच्या वतीने वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल.

४) शालेय व आंतरशालीय स्पर्धांचे आयोजन शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात येईल.

५) विविध खेळ मार्गदर्शन करणाऱ्या फेडरेशनची माहिती व होणाऱ्या नियोजित स्पर्धांचे वेळापत्रक ऑनलाइन जाहीर केले जाईल.

## क्रीडा समूहासाठी उपयुक्त साहित्याची यादी खाली दिली आहे :

### क्रीडा साहित्य यादी (Sports Equipment List)

**१) मैदानी खेळांसाठी साहित्य (Sports Equipment List)**

- क्रिकेटबॅट, बॉल, स्टम्प्स, गाड्र्स
- फुटबॉल, जाळी (Goalpost), शूज
- हॉकीस्टिक, बॉल, पॅड्स
- व्हॉलीबॉल, नेट
- बास्केटबॉल, रिंग
- कबड्डीमॅट
- खो-खोपट्टा
- अथलेटिक्स - स्टॉपवॉच, जंपिंगमॅट, भाला (Goalpost), गोळाफेक (Shot Put), डिस्कस (Discus)

**२) इनडोअर खेळांसाठी साहित्य (Indoor Sports Equipment)**

- बॅडमिंटन रॅकेट, शटल
- टेबल टेनिस बॅट, बॉल, टेबल
- कॅरमबोर्ड, स्ट्रीक, गोटी

- बुद्धिबळपट, प्यादी
- कुस्तीमॅट
- तायक्वांदो, कराटे, जूडोगार्ड्स

३) **जलतरण (Swimming) साहित्य**

- स्विमिंग कॅप, गॉगल्स
- लाइफ जॅकेट
- फ्लोटिंग ट्यूब

४) **फिटनेस आणि जिम साहित्य**

- डम्बेल्स, बार्बेल्स
- ट्रेडमिल
- योगामॅट
- स्ट्रेचिंगबँड
- स्किपिंगरोप (उड्या मारण्याची दोरी)

५) **सुरक्षा साहित्य (Protective Gear)**

- हेल्मेट (क्रिकेट, सायकलिंग, हॉकीसाठी)
- गार्ड्स (पॅड, एल्बोगार्ड, शिनगार्ड)
- ग्लोव्हज (क्रिकेट, बॉक्सिंग, हॉकी)

**क्रीडा उपकरणे :**

१) बॅट्स, बॉल्स (क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस, फुटबॉल)

२) गोल्फक्लब्स

३) बास्केटबॉल

४) व्हॉलीबॉल

५) कुस्तीगोंगळ, रेषे

६) धावपट्टीच्या चेंडूची यादी

**क्रीडा परिधान :**

१) स्पोर्ट्स शूज

२) जिम पोशाख

३) टॉप, शॉर्ट्स, पँट्स (टी–शर्ट, हाफ पँट्स)

४) सॉक्स

५) स्पोर्ट्स अनुषंगिक इतर कपडे.

६) स्वेटबँड्स, बँडेज

**सुरक्षात्मक साहित्य :**

१) हेल्मेट (हॉकी, क्रिकेट, फुटबॉल)

२) पॅड्स (कुस्ती, बास्केटबॉल, क्रिकेट)

३) गार्ड्स (फुटबॉल, हॉकी, बास्केटबॉल)

४) पिव्होट पॅड्स

५) चेसपंढी

**वॉर्म–अप आणि पुनर्वसन साहित्य :**

१) स्ट्रेचिंग बॅन्ड्स

२) योगामॅट्स

३) लहान डम्बल्स

४) फोमरोलर्स

५) इन्सुलेटेड बॉटल्स

**ट्रॅकिंग आणि डेटाचे साहित्य :**

१) फिटनेसट्रॅकर्स

२) स्मार्ट वॉचेस

३) हार्टरेट मॉनिटर्स

४) ड्युरेबल कॅमेरे (खास क्रीडा कार्यक्रमाकरिता)

**सामान्य देखरेख आणि स्टोरेज :**

१) क्रीडा साहित्य संचयन बॅग्स

२) टोकन, बॉक्सेस आणि डिब्बे

३) शॉवर चटया

**संपूर्ण खेळासाठी इतर साहित्य :**

१) क्रीडा किट (पाण्याची बाटली, इन्श्युरन्स कागदपत्रे)

२) टॅम्पो

३) शीतलता किट (आइसपॅक, कूलिंग टॉवेल्स)

या सर्व साहित्याची निवड क्रीडा प्रकारावर आणि क्रीडा समूहाच्या आवश्यकतांवर अवलंबून असते.

**क्रीडा समूह प्रकारासाठी संदर्भ साहित्य :**

क्रीडा समूह प्रकारासाठी संदर्भ साहित्य शोधताना, खालील प्रमुख घटक आणि संदर्भांचा विचार करणे उपयुक्त ठरू शकतो :

- **क्रीडा गट प्रकार :** क्रीडा विषयक गटांचे विविध प्रकार, त्यात सामील असलेली संघटनात्मक संरचना, कार्यप्रणाली आणि त्यांचे विविध गटात्मक वैशिष्ट्ये.
- **क्रीडा गटांचे वर्गीकरण :** क्रीडा गटांचे विविध श्रेण्या, जसे की, सामूहिक खेळ, वैयक्तिक खेळ, प्रतिस्पर्धात्मक आणि सानुकूल क्रीडागट, यांचे वर्गीकरण.
- **क्रीडा मानसशास्त्र :** क्रीडा गटातील सदस्यांची मानसिकता, गटातील सदस्यांची भूमिका, नेतृत्व आणि समन्वय कसे कार्य करतात यावर साहित्य.
- **क्रीडा कार्यप्रणाली :** क्रीडा गटातील सामूहिक कार्य, योजना, आणि उद्दिष्टे कशी निश्चित केली जातात याविषयीचे साहित्य.

खेळापूर्वी वॉर्मअप (Warm Up) करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण ते शरीराला खेळासाठी तयार करण्यास मदत करते. यामुळे स्नायूंना लवचीकता मिळते, शरीर सक्रिय होते आणि दुखापतीची शक्यता कमी होते.

**वॉर्मअपचे महत्त्व :**

१) **स्नायूंना सक्रिय करणे :** वॉर्मअपमुळे स्नायू, सांधे आणि हाडे खेळासाठी तयार होतात.

२) **रक्ताभिसरण वाढवणे :** हृदयाची गती वाढते आणि स्नायूंमध्ये रक्तप्रवाह सुधारतो.

३) **शरीराची लवचीकता वाढवणे :** लवचीक स्नायूंमुळे खेळात हालचाल सोपी होते आणि जखम होण्याचा धोका कमी होतो.

४) **श्वसन प्रणाली सुधारते :** फुप्फुसांची क्षमता वाढते आणि अधिक ऑक्सिजन मिळतो.

५) **चोट टाळणे :** अचानक खेळ सुरू केल्यास स्नायूंवर ताण येऊ शकतो, वॉर्मअपमुळे ही समस्या टाळता येते.

६) **मानसिक तयारी :** वॉर्मअप केल्याने खेळाडू मानसिकदृष्ट्या सज्ज होतो आणि खेळावर चांगले लक्ष केंद्रित करू शकतो.

### वॉर्मअप मध्ये कोणते प्रकार असतात ?

१) **हलके धावणे (Jogging) :** शरीराला गती देण्यासाठी मदत करते.

२) **स्ट्रेचिंग (Stretching) :** स्नायू आणि सांध्यांची लवचिकता वाढवते.

३) **जम्पिंगजॅक्स (Jumping) :** उर्जा वाढवतो आणि शरीर हलके करतो.

४) **डायनॅमिक एक्सरसाइज (Dynamic Exercises) :** उदा. गुडघे उचलून धावणे, हात फिरवणे.

५) **श्वासोच्छवास नियंत्रण (Breathing Exercises) :** ऑक्सिजनचा योग्य पुरवठा होतो.

### निष्कर्ष :

कोणताही खेळ खेळण्यापूर्वी वॉर्मअप करणे आवश्यक आहे. कारण यामुळे शरीर आणि मन खेळासाठी तयार होतात आणि खेळ अधिक प्रभावी होतो. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने वॉर्मअपला प्राधान्य द्यावे.

### खेळानंतर रिलॅक्सेशन (Relaxation) का करावे ?

खेळ झाल्यानंतर रिलॅक्सेशन (Cool-down) करणे तितकेच महत्त्वाचे आहे. जितके वॉर्मअप करणे आवश्यक आहे. खेळामुळे शरीरावर ताण येतो, हृदयाची गती वाढते आणि स्नायूंवर दडपण येते. त्यामुळे खेळानंतर योग्य प्रकारे शरीर शांत करणे आवश्यक असते.

**रिलॅक्सेशनचे महत्त्व :**

१) **हृदयाची गती सामान्य करणे :** खेळामुळे हृदय जलद गतीने कार्य करते. रिलॅक्सेशन केल्याने हृदय हळूहळू सामान्य स्थितीत येते.

२) **स्नायूंवरील ताण कमी करणे :** खेळामुळे स्नायूंमध्ये तणाव निर्माण होतो. रिलॅक्सेशन केल्याने तो हळूहळू कमी होतो.

३) **थकवा आणि दुखापती कमी करणे :** स्नायूंमध्ये लॅक्टिक ॲसिड तयार होते, ज्यामुळे थकवा आणि वेदना होऊ शकतात. रिलॅक्सेशन केल्याने ते निघून जाते.

४) **लवचीकता वाढवणे :** खेळानंतर स्ट्रेचिंग आणि रिलॅक्सेशन केल्याने शरीर अधिक लवचीक होते.

५) **मानसिक शांतता :** रिलॅक्सेशनमुळे मन शांत होते आणि खेळात झालेल्या हालचालींवर विचार करण्याची संधी मिळते.

६) **रक्ताभिसरण सुधारतो :** शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये रक्ताचा योग्य प्रवाह राहतो.

### खेळानंतर करावयाच्या रिलॅक्सेशन क्रिया :

१) **हलके स्ट्रेचिंग (Stretching) :** स्नायूंना विश्रांती देण्यासाठी हलक्या स्ट्रेचिंगचा उपयोग.

२) **दीर्घ श्वासोच्छवास (Deep Breathing) :** दीर्घ श्वास घेतल्याने शरीर आणि मन शांत राहते.

**३) हलकी चाल (Slow Walking) :** खेळानंतर लगेच बसण्याऐवजी काही वेळ हलके चालावे.

**४) मसाज किंवा स्नायूंना मोकळे करणे :** स्नायूंमधील ताण कमी करण्यासाठी हलका मसाज उपयुक्त ठरतो.

**५) ध्यान व योग (Yoga Meditation) :** खेळानंतर थोडेसे ध्यान केल्यास मन शांत होते आणि मानसिक थकवा दूर होतो.

**६) पाणी पिणे (Hydration) :** शरीरातील पाणी कमी झालेले भरून काढण्यासाठी भरपूर पाणी प्यावे

**निष्कर्ष :**

खेळानंतर रिलॅक्सेशन केल्याने शरीर आणि मन परत सामान्य स्थितीत येते, दुखापतीचा धोका कमी होतो आणि पुढच्या खेळासाठी शरीर तयार होते. त्यामुळे खेळानंतर योग्यप्रकारे आराम करणे आवश्यक आहे.

**उपक्रम सूची :**

१) योग आणि तंदुरुस्ती उपक्रम : सूर्यनमस्कार, साधी आसने.

२) ॲथलेटिक्स स्पर्धा : धावणे, लांब उडी, गोळाफेक.

३) टीम वर्क गेम्स : बॉल पासिंग, टीम बिल्डिंग ॲक्टिव्हिटी.

४) कबड्डी आणि खो-खो स्पर्धा : मुला-मुलींसाठी स्वतंत्र गट.

५) सहज खेळ : झेंडूची फुले, लंगडी.

६) मूलभूत कौशल्य विकास खेळ : बेसिक फुटबॉल किंवा बास्केटबॉल.

७) क्रिकेट स्पर्धा : वर्गनिहाय किंवा वयोगटानुसार.

८) टेबल टेनिस व बुद्धिबळ शिबिर.

९) योग व ध्यान : ताणतणाव कमी करण्यासाठी ध्यान सत्र.

१०) मनोरंजनात्मक खेळ : चमचा-गोळी शर्यत, बटाटा शर्यत.

११) थाळीफेक आणि भालाफेक सराव.

१२) इनडोअर खेळ : कॅरम, सापशिडी.

१३) सायकलिंग मोहिम (शाळेच्या आवारात).

१४) झुंबाडान्स सत्र : फिटनेससाठी.

१५) पाण्यात खेळ (जर उपलब्ध असेल तर) : जलतरण शिकवणे.

१६) योगदिन उपक्रम (२१ जून) : संपूर्ण शाळेसाठी योगसत्र.

१७) रिले रेस : संघ भावना वाढवणारे खेळ.

१८) गटखेळ : बॉलथ्रो, डॉजबॉल.

१९) पावसाळी खेळ : कुस्ती, मैदानी मातीतील खेळ.

२०) मिनी हॉकी प्रशिक्षण.

२१) निसर्गभ्रमंती (शाळे जवळील ठिकाणी).

२२) राष्ट्रीय क्रीडा दिन (२९ ऑगस्ट) : खेळांची थीम असलेला विशेष कार्यक्रम.

२३) संघटित खेळ : व्हॉलीबॉल.

२४) ॲथलेटिक्स स्पर्धा : ५०, १०० धावणे, लांब उडी.
स्केटिंग (जर सुविधा उपलब्ध असेल तर).

२५) टीम बिल्डिंग खेळ : ट्रेझरहंट मानवीमनोरे

२६) साहसी क्रीडा उपक्रम : सायकल रेस, मिनीट्रेक.

२७) क्रिकेट प्रशिक्षण शिबिर.

२८) इनडोअर खेळ : बुद्धिबळ, डार्ट.

२९) स्पर्धात्मक खेळ : कबड्डी, खो-खो स्पर्धा.

३०) मालिका स्पर्धा : विविध क्रीडा प्रकार.

३१) तंदुरुस्ती उपक्रम : व्यायाम व शरीर तंदुरुस्ती कार्यक्रम.

३२) वार्षिक क्रीडा महोत्सव : सर्व प्रकारच्या खेळांचा समावेश असलेला कार्यक्रम.

३३) प्रेरणादायी उपक्रम : खेळाडूंबरोबर संवाद सत्र.

३४) क्रीडा कौशल्य चाचण्या : विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी.

### जानेवारी

**१) योग आणि तंदुरुस्ती उपक्रम :** सूर्यनमस्कार, साधी आसने.

**२) ॲथलेटिक्स स्पर्धा :** धावणे, लांब उडी, गोळा फेक.

**३) टीम वर्क गेम्स :** बॉल पासिंग, टीम बिल्डिंग ॲक्टिव्हिटी.

### फेब्रुवारी

**१) कबड्डी आणि खो-खो स्पर्धा :** मुला-मुलींसाठी स्वंतत्र गट.

**२) सहज खेळ :** झेंडूची फुले, लंगडी.

**३) मूलभूत कौशल्य विकास खेळ :** बेसिक फुटबॉल किंवा बास्केटबॉल.

### मार्च

१) क्रिकेट स्पर्धा : वर्गनिहाय किंवा वयोगटानुसार.

२) टेबल टेनिस व बुद्धिबळ शिबिर.

३) योग व ध्यान : ताण तणाव कमी करण्यासाठी ध्यान सत्र.

### एप्रिल

१) मनोरंजनात्मक खेळ : चमचा-गोळी शर्यत, बटाटा शर्यत.

२) थाळी फेक आणि भालाफेक सराव.

३) इनडोअर खेळ : कॅरम, सापशिडी.

### मे

१) सायकलिंग मोहिम (शाळेच्या आवारात).

२) झुंबाडान्स सत्र : फिटनेससाठी.

३) पाण्यातील खेळ (जर उपलब्ध असेल तर) : जलतरण शिकवणे.

### जून

१) योग दिन उपक्रम (२१ जून) : संपूर्ण शाळेसाठी योग सत्र.

२) रिले रेस : संघ भावना वाढवणारे खेळ.

३) गट खेळ : बॉलथ्रो, डॉजबॉल.

### जुलै

१) पावसाळी खेळ : कुस्ती, मैदानी मातीतील खेळ.

२) मिनी हॉकी प्रशिक्षण.

३) निसर्गभ्रमंती (शाळे जवळील ठिकाणी).

### ऑगस्ट

१) राष्ट्रीय क्रीडा दिन (२९ ऑगस्ट) : खेळांची थीम असलेला विशेष कार्यक्रम.

२) फुटबॉल स्पर्धा.

३) संघटित खेळ : व्हॉलीबॉल.

### सप्टेंबर

१) ॲथलेटिक्स स्पर्धा : ५० मी, १०० मी धावणे, लांब उडी.

२) स्केटिंग (जर सुविधा उपलब्ध असेल तर).

३) टीम बिल्डिंग खेळ : ट्रेझर हंट.

### ऑक्टोबर

१) साहसी क्रीडा उपक्रम : सायकल रेस, मिनीट्रेक.

२) क्रिकेट प्रशिक्षण शिबिर.

३) इनडोअर खेळ : बुद्धिबळ, डार्ट.

### नोव्हेंबर

१) स्पर्धात्मक खेळ : कबड्डी, खो-खो स्पर्धा.

२) मालिका स्पर्धा : विविध क्रीडा प्रकार.

३) तंदुरुस्ती उपक्रम : व्यायाम व शरीर तंदुरुस्ती कार्यक्रम.

### डिसेंबर

१) वार्षिक क्रीडा महोत्सव : सर्व प्रकारच्या खेळांचा समावेश असलेला कार्यक्रम.

२) प्रेरणादायी उपक्रम : खेळाडूंबरोबर संवाद सत्र.

३) क्रीडा कौशल्य चाचण्या : विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी.

## क्रीडा विषयक महत्त्वाचे दिनविशेष :

| अ.क्र. | महिना | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | जानेवारी | • ८ जानेवारी : आंतरराष्ट्रीय कबड्डी दिन<br>• १६जानेवारी : भारतीय हॉकी या संघाचा पहिला आंतरराष्ट्रीय सामना (१९२८) |
| २) | फेब्रुवारी | • २ फेब्रुवारी : विश्व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस दिन<br>• २५ फेब्रुवारी : भारताच्या पहिल्या क्रिकेट कसोटी विजयाचा दिन (१९५२) |
| ३) | मार्च | • १५ मार्च : आंतरराष्ट्रीय कुस्ती दिन<br>• ३१ मार्च : वर्ल्ड बॅडमिंटन फेडरेशन स्थापना दिन (१९३४) |
| ४) | एप्रिल | • ६ एप्रिल : आंतरराष्ट्रीय क्रीडा विकास दिन (International Day of Sport for Development and Peace)<br>• २४ एप्रिल : सचिन तेंडुलकरचा जन्मदिवस |
| ५) | मे | • १७ मे : टेनिसचा पहिला ग्रँडस्लॅम (French Open सुरुवात, १८९१)<br>• ३० मे : आंतरराष्ट्रीय क्रिकेट दिन |
| ६) | जून | • ३ जून : रोलँडगॅरोस (फ्रेंच ओपनचा पहिला अंतिम सामना (१८९१)<br>• २१ जून : जागतिक योग दिन<br>• २३ जून : आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिन |

| अ.क्र. | महिना | दिनविशेष |
|---|---|---|
| ७) | जुलै | • २ जुलै : आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स दिन<br>• २९जुलै : हॉकीचा आंतरराष्ट्रीय दिन |
| ८) | ऑगस्ट | • २९ ऑगस्ट : राष्ट्रीय क्रीडा दिन (ध्यानचंद यांची जयंती)<br>• ११ ऑगस्ट : खेळाडूंचा हक्क दिवस |
| ९) | सप्टेंबर | • ८ सप्टेंबर : भारतीय क्रिकेट संघाचा पहिला कसोटी सामना (१९३२)<br>• २७ सप्टेंबर : भारतीय टेनिसपटू महेश भूपतीचा जन्मदिवस |
| १०) | ऑक्टोबर | • १० ऑक्टोबर : महिला क्रिकेट दिन<br>• १६ ऑक्टोबर: २० क्रिकेटचा पहिला सामना (२००५) |
| ११) | नोव्हेंबर | • ३ नोव्हेंबर: भारतीय कबड्डी संघाचा पहिला आंतरराष्ट्रीय विजय<br>• १६ नोव्हेंबर: सचिन तेंडुलकरचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना (२०१३) |
| १२) | डिसेंबर | • १० डिसेंबर : फिफा वर्ल्डकपचा पहिला अंतिम सामना (१९३०)<br>• २० डिसेंबर : भारताचा पहिला हॉकी ऑलिंपिक सुवर्ण पदक विजय (१९२८) |

• दिनविशेष विद्यार्थ्यांना क्रीडा इतिहास आणि त्याच्या महत्त्वाची माहिती देण्यास मदत करतील.

❑❑❑

# १२. छंद व सहशालेय उपक्रम समूह

**पार्श्वभूमी :**

संगीताचे शिक्षण त्यांच्या सांस्कृतिक जाणिवेला चालना देण्याबरोबरच एकाग्रता, स्मरणशक्ती आणि शिस्त वाढवण्यास मदत करते. चित्रकला, हस्तकला, शिल्पकला विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देतात. या छंदाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊ शकतात. उदाहरणार्थ, नाणी जमविण्याचा छंद.

हा छंद विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल आणि संस्कृतीबद्दल माहिती देतो. या छंदामुळे विद्यार्थी शाळेच्या बाहेरील जीवनात अधिक सक्रिय होतात. म्हणून शालेय विद्यार्थ्यांमध्ये छंदनिहाय उपक्रमातून अनेक समस्यांचे निराकरण करता येते. यासाठी छंद आणि सहशालेय उपक्रमात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना :**

बालवयापासूनच विद्यार्थ्यांना छंद आणि सहशालेय उपक्रमनिहाय शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी छंद आणि सहशालेय उपक्रमनिहाय समूह स्थापन करणे आवश्यक आहे.

**छंद आणि सहशालेय उपक्रमसमूह संकल्पना :**

छंद म्हणजे विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्रात त्याांना प्रोत्साहन देणे. नृत्य, नाट्य, गायन, वादन, चित्र, शिल्प, हस्तकला, नाणी, जुन्या वस्तूंचा संग्रह करणे, वैशिष्ट्यपूर्ण लेखन अशा अनेक गोष्टींचा समावेश यात होतो. शिक्षण फक्त पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय शिक्षणात छंद व सहशालेय उपक्रमांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, कल्पकतेचा, शारीरिक व मानसिक क्षमतेचा विकास साधतात. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनिवडींना चालना देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतात. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आवडी व कलागुण विकसित करण्यावर केंद्रित असतात. तसेच शिक्षण प्रक्रियेला अधिक आनंददायक बनवतात आणि विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांमध्ये पारंगत होण्याची संधी देतात. उपक्रम शालेय शिक्षणाच्या मुख्य अभ्यासक्रमाशी निगडीत असलेले असतात व विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी जोडलेले असतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, शारीरिक क्षमता, आणि सामाजिक जबाबदारी विकसित होते.

इयत्तानिहाय विद्यार्थ्यांना छंद विचारावे. त्यानुसार गट करावेत. यासाठी वर्गशिक्षकांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. उच्च प्रतीचे आचार विचार जपणाऱ्या छंदांची नोंद घेण्यात यावी. जसे की योग आणि ध्यान, सेवा आणि समाजकार्य, कला आणि सर्जनशीलता इत्यादी.

**छंद आणि सहशालेय उपक्रम समूहाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांना छंद आणि सहशालेय उपक्रमाबाबत माहिती देणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये नृत्य-नाट्य, गायन, वादन अशा संगीत कलेबाबत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून जाणीव जागृती विकसित करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये शिल्प, चित्र, कलाकुसर इ. कलांबाबत आवश्यक कौशल्य विकसित करणे.

४) विद्यार्थ्यांना नाणी, नोटांचा इतिहास अभ्यासण्यास प्रवृत्त करणे.

५) विद्यार्थ्यांचे सुप्त गुण शोधून व्यासपीठ प्रदान करणे.

६) अभ्यासाबरोबरच आनंददायी शिक्षणाचा अनुभव मिळवून देणे.

७) विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कल्पनाशक्ती व आत्मभान विकसित करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये संघात काम करण्याची क्षमता व नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी इ. कौशल्य विकसित करणे.

९) विद्यार्थ्यांचा सर्व विषयांच्या अध्ययन-अध्यापनात कला व संगीताची जोड देऊन विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढवणे.

१०) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे.

११) विद्यार्थ्यांना सर्जनशील व स्वावलंबी बनण्यासाठी प्रेरणा देणे.

१२) विद्यार्थ्यांमध्ये विविध कलेद्वारे आनंद, समाधान व आत्मविश्वास विकसित करणे.

१३) विद्यार्थ्यांना कला, संगीत याद्वारे व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.

१४) डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून कला, संगीत क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी प्रेरणा देणे.

**छंद व सहशालेय गटाची रचना :**

| अ. क्र. | रचना | पद |
|---|---|---|
| १) | कलाशिक्षक | अध्यक्ष (Leader/President) : |
| २) | शाळेतील कला व इतर विषयात आवड असलेले शिक्षक | उपाध्यक्ष (Vice President) : |
| ३) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | सचिव (Secretary) : |

| अ. क्र. | रचना | पद |
|---|---|---|
| ४) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | कोषाध्यक्ष |
| ५) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | कार्यक्रम संयोजक (Event Coordinator) : |
| ६) | स्तरनिहाय व इयत्तानिहाय विद्यार्थी | सदस्य (Players/Team Members) : |

**छंद आणि सहशालेय उपक्रम समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

संगीत, कला, नाणी, आणि बँड पथकासाठी महिन्यानुसार विविध विषय, कल्पना लिहिताना त्यामध्ये विविध महत्त्वाचे दिवस, सण आणि प्रसंगांचा समावेश करणे आवश्यक आहे. येथे प्रत्येक महिन्याच्या उपक्रमासाठी विविध कल्पना दिल्या आहेत.

**छंद आणि सहशालेय उपक्रम समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ. क्र. | महिना | छंद | छंद अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जानेवारी | गोष्ट वाचन | विद्यार्थ्यांनी वाचलेल्या गोष्टीवर चित्रनिर्मिती करणे, कथावाचन व पुस्तक परीक्षण |
| | | हस्तकला | पेपर क्राफ्ट व ओरिगामी वस्तू बनवणे. |
| | | बागकाम | शाळेच्या परिसरात रोपं लावणे व त्यांची निगा राखणे. |
| | | नाणी आणि नोटा संकलन | वेगवेगळ्या देशांच्या किंवा जुन्या भारतीय नोटा व नाणी गोळा करणे व त्याबद्दल माहिती देणे. |
| | | बँड पथक | राष्ट्रीय एकता परेड |
| २) | फेब्रुवारी | स्वयंपाककला | गॅसशिवाय तयार होणाऱ्या पदार्थांची कार्यशाळा |
| | | कथालेखन | विद्यार्थ्यांनी स्वतः लघुकथा तयार करणे व वाचन |
| | | जादू शिकणे | सोपे जादूचे प्रयोग करून दाखवणे. |
| | | प्रयोग प्रदर्शन | वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवणे, प्रयोग प्रदर्शन भरविणे. |
| ३) | मार्च | निसर्गनिरीक्षण | पक्षी, झाडे, फुलं यांचे निरीक्षण व नोंदी करणे. |
| | | जलसंवर्धन | जलसंवर्धनावर प्रकल्प कार्यशाळा, जलसाक्षरता मोहीम राबविणे. |
| | | फोटोग्राफी | शालेय जीवनातील छायाचित्रण व प्रदर्शन |
| | | नकाशावाचन | भारत व जगाचा नकाशा समजावून घेणे. |
| ४) | एप्रिल | समाजसेवा | वृद्धाश्रम किंवा अनाथाश्रम भेट व मदत |
| | | योगावध्यान | विद्यार्थ्यांना ध्यान व श्वसनतंत्र शिकवणे. |
| | | शिल्प बनविणे. | प्लास्टिसिन मातीपासून विविध शिल्प बनविणे. |
| | | हस्तलिखिते तयार करणे. | विद्यार्थ्यांनी स्वतःचे हस्तलिखित तयार करणे. |

| अ. क्र. | महिना | छंद | छंद अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ५) | मे | कथाकथन | विद्यार्थ्यांनी स्वतः कथा तयार करून ती रंगतदार पद्धतीने सांगणे. |
| | | आकाशनिरीक्षण | चंद्र, तारे व ग्रह यांचे निरीक्षण व माहिती संकलन |
| | | कोलाज | वर्तमानपत्रातील रंगीत कागदाच्या तुकड्यापासून कोलाज चित्र बनविणे. |
| | | कुटुंबइतिहास | कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींशी संवाद साधून त्यांच्या आठवणी व अनुभव लिहून ठेवणे. |
| ६) | जून | तंत्रज्ञान व गॅझेट्स | नवीन तंत्रज्ञान व गॅझेट्सवरील चर्चासत्र |
| | | गायन-वादन, नृत्य | गायन-वादन, नृत्य यांचे प्रकार समजावणे. |
| | | वृक्षारोपण | पर्यावरण जनजागृती मोहीम राबविणे आणि वृक्षारोपण करणे. |
| | | नक्षीकाम | कागदावर किंवा कापडावर नक्षीकाम करणे. |
| | | रंग-रेषांची ओळख | मूळ रंग, दुय्यम रंग, विरोधी रंग, विविध रेषांचे प्रकार यांची ओळख करून देणे. |
| ७) | जुलै | स्वच्छता व पुनर्वापर | कचऱ्याचा पुनर्वापर करून वस्तू तयार करणे. |
| | | वक्तृत्व | एखाद्या सामाजिक विषयावर भाषण देणे. |
| | | जनरल लेखन | दररोजच्या घटनांची नोंद करणे. |
| | | वाद्य परिचय | वाद्य ओळख करून देणे. |
| ८) | ऑगस्ट | अभिनय | नाटकाचे सादरीकरण |
| | | विज्ञान कादंबऱ्या वाचन | विज्ञानावर आधारित कथा वाचून चर्चा करणे. |
| | | कल्पनाचित्र | समुद्राखालील जीवन, स्वच्छ भारत अभियान |
| | | परदेशी भाषा ओळख | मराठी आणि इंग्रजीशिवाय इतर भाषांचे शब्द व संवाद शिकणे. |
| ९) | सप्टेंबर | पारंपरिक खेळ | गोट्या, भोवरा, लगोरी असे पारंपरिक खेळ खेळणे. |
| | | माती | शिल्प मातीपासून विविध आकाराच्या वस्तू बनविणे. |
| | | इतिहास संशोधन | आपल्या गावातील किंवा कुटुंबातील इतिहासावर माहिती संकलन करणे. |
| | | पक्षीनिरीक्षण | पक्ष्यांची नावे, आवाज व त्यांची वैशिष्ट्ये ओळखणे. |
| १०) | ऑक्टोबर | प्रवासवर्णन | एखाद्या ठिकाणाचे प्रवासवर्णन लिहिणे व सादर करणे. |
| | | हस्ताक्षर सुधारणा | सुलेखन स्पर्धा |
| | | नृत्य ओळख | विविध नृत्य प्रकारांची ओळख करून देणे. |
| | | कविता लेखन | विद्यार्थ्यांनी स्वतः कविता तयार करून सादर करणे. |

| अ. क्र. | महिना | छंद | छंद अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ११) | नोव्हेंबर | नवनिर्मिती | घरच्या घरी नवीन उपयोगी वस्तू बनवणे. |
| | | व्यक्तिमत्त्व विकास | आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध उपक्रम |
| | | हस्तकला | कागदापासून आकाश कंदील बनविणे. |
| | | रेडिओ जॉकी अनुभव | विद्यार्थ्यांना एक रेडिओ शो प्रमाणे कार्यक्रम सादर करण्यास सांगणे. |
| १२) | डिसेंबर | थंडीतील आरोग्य | थंडीमध्ये घ्यावयाची काळजी व घरगुती उपाय |
| | | भौमितिक आकार | भौमितिक आकाराच्या वापरातून मोर, रोबोट बनवणे. |
| | | कोडी व कोड्यांचा खेळ | गणित व बुद्धीला चालना देणाऱ्या कोड्यांचा उपक्रम |
| | | हस्तनिर्मित गिफ्ट तयार करणे. | मित्र किंवा कुटुंबासाठी छोट्या हस्तनिर्मित भेटवस्तू तयार करणे. |

## १० छंद उदाहरणादाखल :

१) चित्रकला व रेखाचित्रण : विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा छंद.

२) पुस्तक वाचन : ज्ञानात भर घालणारा आणि विचारसंपन्न करणारा छंद.

३) लेखन (कविता, कथा, निबंध) : साहित्यिक अभिव्यक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त.

४) संगीत (गायन व वाद्यवादन) : मनःशांती आणि कलात्मकता वाढवणारा छंद.

५) नृत्य (शास्त्रीय व पाश्चात्त्य) : शारीरिक आरोग्य आणि लवचिकता सुधारण्यासाठी.

६) खेळ व क्रीडा (फुटबॉल, क्रिकेट, बुद्धिबळ इ.) : शारीरिक तंदुरुस्ती आणि संघभावना वाढवणारा.

७) हस्तकला व क्राफ्ट : कलात्मक कौशल्य विकसित करणारा छंद.

८) फोटोग्राफी व व्हिडिओ एडिटिंग : दृश्यात्मक सर्जनशीलता वाढवणारा छंद.

९) निसर्ग अभ्यास व रोप संगोपन (गार्डनिंग) : पर्यावरण जागरूकता आणि शांतता देणारा छंद.

१०) नवीन भाषा शिकणे (संस्कृत, फ्रेंच, जर्मन इ.) : संधी व ज्ञान वाढवण्यासाठी उपयुक्त.

## विषयनिहाय छंद आणि सहशालेय उपक्रम :

### १) कला शिक्षण (Visual and Performing Arts) :

**छंदनिहाय उपक्रम :**

- चित्रकला, रेखाचित्र व रंगकाम
- मूर्तिकला व हस्तकला
- कॅलिग्राफी (सुंदर हस्ताक्षर)

- फोटोग्राफी
- डिजिटल कला व ग्राफिक डिझाईन
- म्युरल पेंटिंग व भित्तिचित्र

**सहशालेय उपक्रम :**

- नाट्यस्पर्धा व अभिनय कार्यशाळा
- संगीत व वाद्यवृंद (इंस्ट्रमेंटल व व्होकल)
- लोककला व पारंपरिक नृत्य
- फिल्म मेकिंग व शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल
- कला प्रदर्शन व कार्यशाळा

## २) कार्यानुभव (Work Education and Vocational Skills) :

**छंदनिहाय उपक्रम :**

- बागकाम व वृक्षारोपण
- शिवणकाम, भरतकाम व क्रोशे
- स्वयंपाक व पाककला कौशल्य
- इलेक्ट्रॉनिक्स व मॉडेल मेकिंग
- लघुउद्योग प्रशिक्षण (मेणबत्ती, साबण बनवणे इ.)
- रोबोटिक्स व कोडींग

**सहशालेय उपक्रम :**

- विद्यार्थ्यांनी स्वतः उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन
- स्टार्टअप व लघुउद्योग स्पर्धा
- शालेय मेळावे व विक्री केंद्र
- स्वयंसेवा गट व सामाजिक उपक्रम

## ३) शारीरिक शिक्षण (Physical Education and Sports) :

**छंदनिहाय उपक्रम :**

- योग व ध्यानधारणा
- कराटे, तायक्वांदो, कुस्ती इत्यादी मार्शल आर्ट्स
- जलतरण व जलक्रीडा

## संगीतविषयक छंद :

१) **गायन (शास्त्रीय/सुगम/लोकगीत) :** हिंदुस्थानी, कर्नाटकी, सुगम संगीत किंवा लोकगीत गाण्याचा छंद.

२) **वाद्यवादन (तबला, हार्मोनियम, सतार, व्हायोलिन इ.) :** विविध वाद्य शिकण्याचा छंद.

३) **पाश्चात्त्य संगीत गायन (वेस्टर्न म्युझिक, ओपेरा, जॅझ) :** वेगवेगळ्या शैलीत गायनाचा छंद.

४) **गिटार वादन :** एकल वादन किंवा बँडसाठी गिटार शिकणे.

५) **ड्रम्स वादन :** तालाची जाण निर्माण करणारा छंद.

६) **डीजे आणि म्युझिक मिक्सिंग :** डिजिटल म्युझिक आणि साउंड मिक्सिंगचा छंद.

७) **भक्तिगीते व अभंग गायन :** धार्मिक आणि आध्यात्मिक संगीताचा छंद.

८) **फ्लूट (बासरी) वादन :** निसर्गसंगती असलेला शांत आणि सुंदर छंद.

९) **स्वतःची गाणी आणि संगीत तयार करणे (साँग कम्पोझिंग) :** नवीन गीते आणि संगीत रचना करणे

## शिक्षकांसाठी सूचना :

१) शिक्षकांची भूमिका ही मार्गदर्शकांची असावी.

२) शिक्षकांनी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होतील यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा द्यावी.

३) शिक्षकांनी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

४) शिक्षकांनी मुलांच्या छंद व सहशालेय उपक्रम अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याकरिता समूहाच्या मदतीने भित्तीपत्रकाची निर्मिती करावी.

५) शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातील कृतीकरिता सादरीकरणाची समान संधी उपलब्ध करून द्यावी.

६) विद्यार्थ्यांना छंद व सहशालेय उपक्रम या अनुषंगाने अधिकाधिक पोषक वातावरण देण्याचा प्रयत्न करावा.

७) मुलांना अधिकाधिक छंद व उपक्रम जोपासण्यासाठी वाव देण्याकरिता अधिकाधिक समृद्ध वातावरण देण्याबाबतचे नियोजन करावे.

## छंद व सहशालेय उपक्रमाचे समूहास वरिष्ठ संस्थांकडून देण्यात येणारी शैक्षणिक मदत :

१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांचे मार्फत ऑनलाईन पाक्षिक वार्तापत्र सर्व शाळांसाठी प्रकाशित करण्यात येईल. ज्यामध्ये विविध विषयांवर चालू घडामोडी, दिनविशेष,

इतर शाळांनी राबविलेले उल्लेखनीय कामकाज/उपक्रम तसेच महत्त्वाच्या व्हिडिओ लिंक्स इ. विषयी माहिती असेल. याचा वापर सर्व शाळांतील समूहांनी करावा.

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थामार्फत जिल्ह्यातील छंद व सहशालेय उपक्रम क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शक यांची यादी देण्यात येईल ज्यांना व्याख्यान आयोजित करण्यासाठी निमंत्रित करता येईल.

**छंद आणि सहशालेय उपक्रम समुहासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य :**

१) स्व-विकास व कला रसास्वाद इयत्ता दहावी पाठ्यपुस्तक

२) खेळू, करू, शिकू

राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती पुणे.

३) आनंददायी शनिवार

राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

४) संगीत विकिपीडिया

संगीत व नाट्य शास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

५) कला संचनालय, महाराष्ट्र शासन

६) डिजिटल मीडिया

## प्रपत्र अ

## छंद आणि सहशालेय उपक्रम समूह साठी महत्त्वाचे दिनविशेष यादी

| अ. क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष | राबविण्याचे उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | १४ जानेवारी | मकर संक्रांत | पतंग उडवणे. |
| २) | २३जानेवारी | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | नेताजींच्या स्मरणार्थ बँड संचलन |
| ३) | २६ जानेवारी | प्रजासत्ताक दिन | राष्ट्रध्वजाला सलामी देणे |
| ४) | ४ फेब्रुवारी | पंडित भीमसेन जोशी जयंती | भीमसेन जोशींच्या संगीताचे सादरीकरण |
| ५) | ६ फेब्रुवारी | लता मंगेशकर पुण्यतिथी | लता मंगेशकर यांच्या गाण्यांचे सादरीकरण |
| ६) | २२ फेब्रुवारी | वार्षिक क्रीडा दिवस | क्रीडा दिवसासाठी विशेष संचलन |

| अ. क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष | राबविण्याचे उपक्रम |
|---|---|---|---|
| ७) | २६ मार्च | के. के. हेब्बर जन्मदिन | भारतीय चित्रकार के. के. हेब्बर यांच्या चित्रकृतींचे प्रदर्शन |
| ८) | २९ एप्रिल | राजा रविवर्मा जयंती | विद्यार्थ्यांकडून चित्रकला सादरीकरण व प्रदर्शनी |
| ९) | १५ एप्रिल | भारतातील पहिल्या नाण्याचा दिनविशेष | भारतीय प्राचीन नाणी प्रदर्शन |
| १०) | ७ मे | रवींद्रनाथ टागोर जयंती | रवींद्र संगीत सादरीकरण |
| ११) | २६ जून | बालगंधर्व जयंती | मराठी नाट्यसंगीत कार्यक्रम |
| १२) | १ जुलै | हरिप्रसाद चौरसिया जयंती | बासरीवादन कार्यशाळा |
| १३) | २५ जुलै | प्राचीन नाणी अभ्यास दिन | नाण्यांच्या अभ्यासावर विशेष सत्र |
| १४) | १५ ऑगस्ट | स्वातंत्र्य दिन | राष्ट्रभक्तीपर संचलन |
| १५) | १७ सप्टेंबर | म. फ. हुसेन जयंती | श्री. हुसेन यांच्या शैलीतील चित्रकलेचे प्रदर्शन |
| १६) | २० सप्टेंबर | ऐतिहासिक नाणी प्रदर्शन | दुर्मीळ नाण्यांचे प्रदर्शन |
| १७) | ५ सप्टेंबर | शिक्षक दिन | शिक्षकांच्या सन्मानार्थ बँड संचलन |
| १८) | २५ ऑक्टोबर | पाब्लो पिकासो जयंती | पिकासो यांच्या शैलीतील चित्रकलेचे सादरीकरण |
| १९) | २ ऑक्टोबर | महात्मा गांधी जयंती | गांधीजींवर आधारित नाणी प्रदर्शन |
| २०) | १४ नोव्हेंबर | बालदिन | चित्रकला स्पर्धा |
| २१) | ३ डिसेंबर | जागतिक नाणी संग्रह दिन | नाणी संग्रह कार्यशाळा |

❑❑❑

# १३. विद्यार्थी संघटना समूह

## पार्श्वभूमी :

शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये अनेक क्षमतांचा विकास होणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात अनेक घटनांना सामोरे जावे लागते त्यावेळी व्यक्तीमध्ये नेतृत्व क्षमता असणे आवश्यक असते.या क्षमतेमध्ये अनेक कौशल्यांचा समावेश होतो. नियोजन, समूह निर्मिती (team building), दूरदृष्टी, संवाद, भावनिक गुणवत्ता, निर्णय कौशल्य, योग्य मुल्यांचा वापर करणे इत्यादी ही कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणातून तयार करता आली तर नक्कीच प्रत्येक विद्यार्थी समाज घडवणारा, समाजास साहाय्यकारी ठरणारा घटक म्हणून तयार होईल.

## प्रस्तावना :

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, मध्ये आपल्या समाजाचे रूपांतर अधिक न्याय, समतावादी, मानवतावादी, समृध्द, शाश्वत आणि भारतीय संकृतीचा अभिमान असलेल्या समाजात करणे हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असे मार्गदर्शित केले आहे. यासाठी आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, संशोधन आणि ज्ञानाची निर्मिती, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती, पर्यावरणीय शाश्वतता व सांस्कृतिक जतन आणि चैतन्य याबाबतीत जागतिक स्तरावर भारताची कमान उंचावणारे सक्षम नेतृत्व तयार केले पाहिजे अशी अपेक्षा या धोरणातून व्यक्त करण्यात आलेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य विकसनासाठी संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

## संकल्पना :

समाजातील जबाबदार घटक म्हणून तयार होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य विकसनाची आवश्यकता आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजातील विविध घटनाकडे पाहण्याचा व त्याला सकारात्मक प्रतिसाद देण्याचा योग्य दृष्टीकोन विकसित करता येईल. यासाठी शाळेमध्ये विद्यार्थी संघटना स्थापन करणे हा उपक्रम महत्त्वाचा ठरू शकेल. यामुळे विद्यार्थ्यांना नेतृत्व कौशल्य विकसनाची संधी उपलब्ध करून देता येईल.

## उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य विकसन करणे.
- विविध घटनांना योग्य प्रतिसाद देण्याचे कौशल्य विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य विकसित करणे.

- विद्यार्थ्यांमध्ये निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित करणे.
- समूहात सांघिकरित्या कार्य करण्याचे कौशल्य विकसित करणे

**समिती/समूह रचना :**

- अध्यक्ष – कोण असणार? निवड कशी होणार?
- सदस्य सचिव – कोण असणार? निवड कशी होणार?
- शालेय निवडणुकीत निवडून आलेले विविध समूहाचे विद्यार्थी प्रतिनिधी–प्रमुख सदस्य
- प्रत्येक इयत्तेतील वर्ग प्रमुख सदस्य

**समूहाच्या उपक्रमाची व्याप्ती :**

१) सदर समूह शालेय स्तरावरील सर्व उपक्रमासाठी स्वयंसेवक म्हणून कार्य करतील.

२) वर्ग स्तरावरील/विद्यार्थी स्तरावरील समस्या मुख्याध्यापक/शिक्षक/यांचेकडे सादर करतील.

३) शालेय स्तरावरील सर्व उपक्रम/योजना यात विद्यार्थ्यांना आवश्यक बाबी शिक्षक/मुख्याध्यापक/ यांच्या समोर सादर करतील/पाठपुरावा करतील.

**समूहाचे कामकाज करण्यासाठी सविस्तर सूचना :**

१) वर्ग प्रमुख विद्यार्थ्यांशी चर्चा करून समस्या, आवश्यक बाबी यांची यादी दुसऱ्या शनिवारपर्यंत गोळा करतील.

२) प्रत्येक महिन्यातील तिसऱ्या शनिवारी वर्ग प्रमुख, शाळा प्रमुख यांची मुख्याधापक व शारीरिक शिक्षक बैठक घेतील व समस्या अथवा काही आवश्यक बाबी असतील तर जाणून घेतील.

३) चौथ्या शनिवारी समोर केलेल्या परीपूर्ततेचा अहवाल सादर केला जाईल.

**वार्षिक दिनदर्शिकेत कोणत्या उपक्रमाचा समावेश असावा?**

**विद्यार्थी वयोगटानुसार खालील उपक्रमांचा समावेश करता येईल.**

१) वार्षिक स्नेहसंमेलन आयोजनासाठी स्वयंसेवक म्हणून सेवा.

२) वृक्षारोपण कार्यात शिस्तीसाठी स्वयंसेवक म्हणून कार्य.

३) श्रमदान परिसरातील आवश्यक उपक्रमात स्वयंसेवक म्हणून कार्य. उदा. रक्तदान शिबीर, वैद्यकीय शिबीर

४) शालेय नियोजनानुसार परिसर स्वच्छता करताना स्वयंसेवक म्हणून कार्य.

५) समाजसेवा उदा–वृद्धाश्रम, अनाथाश्रम इ. ठिकाणी भेट देण्यासाठी स्वयंसेवक म्हणून कार्य.

६) अभिरूप संसद यात विद्यार्थी कार्यरत पक्ष यांच्या योजना व विरोधी पक्ष यांचे मत याबाबत भूमिका करतील.

७) लोकन्यायालय यात विद्यार्थी आपल्या समस्या प्रत्यक्षात किंवा चिठ्ठीद्‌वारे कळवतील. समाविष्ट पालक व शिक्षक याची नोंद घेऊन समस्या दूर करण्यासाठी कार्य योजना आखतील व विद्यार्थ्यांना सांगतील.

८) योग्य नेतृत्वासाठी आवश्यक गुणधर्म निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा.

९) माझा आवडता नेता वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा.

१०) भारताचे स्वातंत्र्यातील विविध संघटनांचे योगदान : वक्तृत्व स्पर्धा.

११) एखादी संघटना योग्य रितीने कार्यरत राहण्यासाठी आवश्यक बाबी. विद्यार्थी ग्रुप डिस्कशन

१२) विद्यार्थी संघटना आपल्या सेवेत यासाठी शालेय दर्शनी भागात एक ठेवण्यात येऊन विद्यार्थ्यांनी त्यांना आवश्यक सहाय्य, समस्या याबाबत आपला अभिप्राय लिहून त्यात टाकावा. संघटना प्रमुखांनी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या सहाय्याने समस्या सोडवावी, सहाय्य उपलब्ध करून द्यावे.

१३) शालेय विकसनासाठी विद्यार्थी संघटनेचे योगदान : माझी अपेक्षा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा

१४) सरपंचांची भेट सदर उपक्रमातून विद्यार्थी सरपंच निवड, त्याचे कार्य व जबाबदाऱ्या याबाबत माहिती घेतील.

१५) विविध सभापती किंवा अध्यक्ष यांची मुलाखत यात विद्यार्थी पंचायत समिती, जिल्हा परिषद येथील समित्या त्यांचे सदस्य, सभापती, अध्यक्ष निवड त्यांचे कामकाज याबाबत माहिती घेतील.

१६) यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा : मेळाव्याचे आयोजन करून आपल्या आवडीच्या व्यवसायात जाण्यासाठी अभ्यास कसा केला, कोणती परीक्षा दिली, त्याची तयारी कशी केली, त्यासाठी करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, किती उत्पन्न मिळते याबाबत माहिती घेणे.

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन विशेष

| अ. क्र. | दिवस | विवरण | उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | २६ नोव्हेंबर | राष्ट्रीय संविधान दिन | संविधान निर्मिती व त्याबाबत सविस्तर माहिती देणे |
| २) | २३ जानेवारी | सुभाषचंद्र बोस जयंती | सुभाषचंद्र बोस यांच्या कार्यावर  तयार करणे |
| ३) | २२ फेब्रुवारी | अब्राहम लिंकन जयंती | अब्राहम लिंकन यांच्या कार्याबद्दल माहिती देणे. |
| ४) | ३ मार्च | जमशेदजी टाटा जयंती | जमशेदजी यांच्या भारत विकसनातील योगदानाबाबत तयार करणे. |
| ५) | १४ एप्रिल | डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबाबत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. |
| ६) | ३१ मे | सरदार वल्लभभाई पटेल | सरदार वल्लभभाई पटेल यांचे एकसंघ भारत निर्मिती याबाबत व्याख्यानाचे आयोजन |

| अ. क्र. | दिवस | विवरण | उपक्रम |
|---|---|---|---|
| ७) | ११ जून | जयप्रकाश नारायण जयंती | जयप्रकाश नारायण यांच्या चळवळी बाबत व्याख्यान आयोजित करणे. |
| ८) | २३ जुलै | बाळ गंगाधर टिळक जयंती | बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वातंत्र्यातील योगदानाबाबत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. |
| ९) | ४ ऑगस्ट | दादाभाई नौरोजी जयंती | स्वातंत्र्याचा इतिहास व राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य याबाबत संवाद घेणे |
| १०) | २ सप्टेंबर | लाल बहादूर शास्त्री जयंती | लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्याबद्दल documentary तयार करणे |
| ११) | १५ ऑक्टोबर | अब्दुल कलाम जयंती | अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिनाचे आयोजन करणे व त्याचे महत्त्व सांगणे |
| १२) | १४ नोव्हेंबर | पंडित नेहरू जयंती | बालदिनाचे आयोजन करणे व नेहरूंच्या कार्याबद्दल माहिती देणे. |
| १३) | ५ डिसेंबर | बाबू जगजीवनराम जयंती | बाबू जगजीवनराम यांच्या कार्याबाबत माहिती देणे. |

**सदर समितीसाठी नियमावली :**

१) कोणत्याही विद्यार्थ्याची समस्या शालेय प्रतिनिधी शाळा/यांच्या मार्गदर्शनातून सोडवली जावी.

२) विद्यार्थ्यांच्या समस्या शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याकडे नेताना कोणत्याही विद्यार्थ्याचा वैयक्तिक उल्लेख टाळावा.

३) समस्या मांडताना योग्य संवाद कौशल्याचा वापर करावा.

४) समस्या निवारण्यासाठी पाठ पुरावा करावा

**शाळेतील सर्व समूहाची समन्वय प्रक्रिया :**

- वर्ग प्रतिनिधी वर्गातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून समस्या, आवश्यकता याची यादी तयार करतील.
- वर्ग प्रतिनिधी शालेय प्रतिनिधीना समस्या/आवश्यकता कळवतील.
- शालेय निवडणुकीतून निवडलेले प्रतिनिधी सभेतून मुख्याध्यापक व शिक्षकांसमोर समस्या, आवश्यकता मांडतील.

**समूह सक्षमीकरणासाठी शिक्षण विभाग/कडून सहकार्य :**

विद्यार्थ्यांना आवश्यक असेल किंवा शिक्षकांना आवश्यक असेल तर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे मार्गदर्शन घ्यावे आवश्यक असेल तेथे प्रशिक्षण उपलब्ध करून शिक्षकांचे सक्षमीकरण केले जाईल.

**समूहाच्या प्रभावी उपक्रमासाठी सहाय्यभूत संसाधने/पुस्तके :**

१) विंग्स ऑफ फायर : अब्दुल कलाम

२) माझे सत्याचे प्रयोग : महात्मा गांधीजी

३) The Seven habits of highly effective people स्टीफन कोवे

४) Atomic Habits जेम्स क्लिअर

**वार्षिक अहवाल सादरीकरणाचा format :**

| अ. क्र. | महिना | इयत्ता | किती विद्या–र्थ्यांचा समावेश होता | किती पालकांचा समावेश होता | किती शिक्षकांचा समावेश होता | कोणती समस्या सोडविली/आवश्यकता पूर्ण केली | समस्या सोडविण्या–साठी कोणी साहाय्य केले/आवश्यकता परिपूर्तते–साठी कोणी सहाय्य केले | समस्या कशी सोडविली/आवश्यकता परीपूर्तते–साठी काय केले | समस्या सोडविण्या–साठी/आवश्यकता परीपूर्ततेसाठी किती कालावधी लागला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी अन्य साहाय्यभूत घटक :**

शिक्षक, मुख्याध्यापक, SMC सदस्य

**समूहामुळे शाळेस होणारे फायदे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित होईल.

२) विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक संवाद, संघटन कौशल्ये निर्माण होतील.

३) विद्यार्थ्यांमध्ये एकता कौशल्य निर्माण होईल.

४) शालेय वातावरण समृद्ध होईल.

५) विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण होईल.

❑❑❑

# १४. चालू घडामोडी समूह

**पार्श्वभूमी :**

हा समूह इयत्ता १ ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी असून स्थानिक, राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींचे महत्त्व समजावून देतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, संवाद कौशल्ये, आणि कार्यसंघ भावना विकसित होतात. हा समूह विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांपलीकडे जाऊन ज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करतो आणि त्यांना समकालीन विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रेरित करतो.

**प्रस्तावना :**

हा समूह शिक्षण व चालू घडामोडींच्या व्यावहारिक ज्ञानामध्ये पूल म्हणून कार्य करतो. विद्यार्थ्यांना निर्णय घेणे, समस्या सोडवणे आणि विश्लेषणात्मक विचार करणे यांसारखी जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी या क्लबद्वारे विविध संवादात्मक उपक्रम आयोजित केले जातात. हे उपक्रम विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आपली मते मांडण्याची संधी देतात.

**संकल्पना :**

क्लबची रचना विद्यार्थ्यांच्या वयानुसार चार गटांमध्ये विभागली आहे. वयोगटासाठी उपयुक्त कृती निश्चित केल्या जातात.

- गट १ (इयत्ता १–२) : गोष्टी सांगणे व सोप्या चर्चासत्रांचे आयोजन.
- गट २ (इयत्ता ३–५) : चालू विषयांवरील कला व हस्तकला उपक्रम आणि प्राथमिक चर्चासत्रे.
- गट ३ (इयत्ता ६–८) : वादविवाद, गट चर्चा, आणि प्रश्नमंजूषा.
- गट ४ (इयत्ता ९–१०) : मॉडेल संसद सत्र आणि विश्लेषणात्मक चर्चा.

या संकल्पनेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या समज आणि विश्लेषणात्मक कौशल्यांना हळूहळू विकसित करणे आहे.

**उद्दिष्टे :**

- **ज्ञानवर्धन :** स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील चालू घडामोडींबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- **कौशल्य विकास :** संवाद कौशल्य, विश्लेषणात्मक विचार आणि कार्यसंघ भावना वाढवणे.
- **जागरूकता निर्माण करणे :** पर्यावरणीय, सामाजिक आणि राजकीय विषयांबद्दल माहिती देणे.
- **सर्जनशील अभिव्यक्ती :** वादविवाद, चर्चासत्रे आणि सादरीकरणाद्वारे विचार मांडण्यास प्रवृत्त करणे.

- **जागतिक नागरिकत्व :** जबाबदारीची भावना आणि समाजाच्या विकासासाठी सक्रिय सहभाग प्रोत्साहित करणे.

## १) समूहाचा प्रमुख :

समूहाचे प्रमुख म्हणून शिक्षक असावा, कारण शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळीची, मनोवृत्तीची, तसेच कार्यशक्तीची चांगली समज असते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, विद्यार्थ्यांच्या कामकाजाला अधिक दिशा आणि सुसंगतता मिळते. प्रमुखाची निवड शाळेच्या मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली केली जाऊ शकते, ज्यामध्ये शिक्षकांचे अनुभव, चालू घडामोडींची माहिती आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता विचारात घेतली जाऊ शकते.

## २) सदस्य :

समूहाचा सदस्य इयत्ता १ ते १० च्या विद्यार्थ्यांमधून निवडावेत. प्रत्येक वर्ग किंवा तुकड्यातून एक विद्यार्थी निवडावा, जेणेकरून सर्व वयोगटांना सहभागी होण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी निबंध लेखन, प्रश्नमंजुषा किंवा ऐनवेळेच्या विषयावर भाषण यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करता येईल.

## ३) समूहांच्या उपक्रमांची व्याप्ती काय असावी ?

समूहाच्या उपक्रमांची व्याप्ती स्थानिक, राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींवर आधारित असावी. या उपक्रमांमध्ये परिसंवाद, वादविवाद, चित्रकला स्पर्धा, हस्तकला कार्यशाळा आणि संशोधन कार्य यांचा समावेश असावा. विद्यार्थ्यांमध्ये विविध वैश्विक विषयांवर सखोल विचार, विश्लेषण आणि संवाद कौशल्ये विकसित करावीत.

## ४) समूहाचे कामकाज सुरू करण्यासाठी सविस्तर सूचना :

- प्रत्येक गटासाठी योग्य विषयांची निवड करा.
- गट सदस्यांची जबाबदारी निश्चित करा.
- शिक्षक किंवा सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाची तयारी करा.
- नियमित चर्चासत्रे आणि इतर संवादात्मक कृतिकार्यक्रम आयोजित करा.
- विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करा.

## ५) वार्षिक दिनदर्शिकेमध्ये उपक्रम/बाबी :

**उपक्रम**

**अ) परिसंवाद पाहणे आणि विश्लेषण करणे :**

विद्यार्थ्यांना चालू घडामोडींवरील परिसंवाद पाहण्यास आणि त्याचे विश्लेषण करण्यास प्रवृत्त करा.

- **उद्दिष्टे**
  - ऐकण्याचे कौशल्य, विचारशक्ती, आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोन विकसित करणे.
  - चालू घडामोडींवरील सखोल समज निर्माण करणे.
- **उपाय योजना :**
  - SCERT किंवा शिक्षक सल्लागारांकडून परिसंवाद निवडण्यासाठी मदत घ्या.
  - परिसंवादांचे दुवे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्या.
- **YouTube परिसंवाद दुवे :**
  - परिसंवाद – मुलांचे हक्क
  - पर्यावरण दिन परिसंवाद
  - शिक्षणातील नावीन्य – परिसंवाद
- **अंमलबजावणी :**
  - विद्यार्थ्यांनी परिसंवाद ऐकल्यानंतर आपले विचार व निरीक्षणे गटामध्ये मांडावीत.
  - शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विश्लेषणात्मक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चर्चासत्रे आयोजित करावीत.

**ब) विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद आयोजित करणे :**

शाळेच्या पातळीवर परिसंवाद आयोजित करा, जिथे विद्यार्थ्यांना चालू घडामोडींवर विश्लेषण करावे लागेल.

- **उद्दिष्टे**
  - सार्वजनिक बोलण्याचे कौशल्य आणि विचार मांडण्याची संधी देणे.
  - गट चर्चा व सहकार्याने काम करण्याची क्षमता वाढवणे.
- **उपाययोजना :**
  - परिसंवादासाठी चालू घडामोडींवरील विषय निवडा, जसे की 'पर्यावरणाचे महत्त्व' 'शिक्षणातील नावीन्य' किंवा 'भारताचे जागतिक योगदान.'
  - विद्यार्थ्यांना गटांमध्ये विभागून त्यांना विशिष्ट भूमिका किंवा विषय द्या.
- **अंमलबजावणी :**
  - परिसंवादानंतर, प्रत्येक गटाने निरीक्षणांवर आधारित सादरीकरण करावे.
  - सल्लागार शिक्षकांनी मार्गदर्शन करून सुधारणा सुचवाव्यात.

**क) इतर उपक्रम :**

- रोजच्या परिपाठामध्ये चालू घडामोडींवरील चर्चा किंवा बातमी वाचन.
- शालेय फलकावर दररोज बातमी लेखन
- विशिष्ट विषयांवर संशोधन व सादरीकरण.
- मुलाखती व प्रत्यक्ष भेटी (उदा. वर्तमानपत्र कार्यालय, आकाशवाणी).

## वार्षिक दिनदर्शिका :

| महिना | उपक्रम/विषय | गट १ (१-२) | गट २ (३-५) | गट ३ (६-८) | गट ४ (९-१०) |
|---|---|---|---|---|---|
| जून | पर्यावरण दिन (जागतिक पर्यावरण दिन - ५ जून) | गोष्टी सांगणे व चित्रकला स्पर्धा | हस्तकला उपक्रम (पर्यावरणाशी संबंधित पोस्टर) | पर्यावरणावरील प्रश्नमंजूषा आणि चर्चासत्र | परिसंवाद : 'पर्यावरणाचे महत्त्व' |
| जुलै | गाव व शहर स्वच्छता आणि स्वच्छ भारत अभियान | स्वच्छतेवरील गोष्टी सांगणे. | पोस्टर किंवा स्वच्छता बोधवाक्य तयार करणे. | वादविवाद : 'स्वच्छता म्हणजेच विकास' | शाळेतील स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन. |
| ऑगस्ट | स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट) | राष्ट्रभक्तीवर आधारित गोष्टी सांगणे. | स्वातंत्र्य लढ्यावरील नाटिका | वादविवाद : 'स्वतंत्र भारताचे भविष्य' | 'स्वातंत्र्याचा संघर्ष' या विषयावर सादरीकरण |
| सप्टेंबर | शिक्षक दिन (५ सप्टेंबर) | शिक्षकांविषयी चित्रकला व हस्तकला | शिक्षकांवर आधारित छोट्या गोष्टी तयार करणे. | प्रश्नमंजूषा : 'शिक्षणातील नावीन्य' | परिसंवाद : 'शिक्षण प्रणालीतील बदल' |
| ऑक्टोबर | महात्मा गांधी जयंती (२ ऑक्टोबर) | गांधीजींच्या गोष्टी सांगणे. | गांधीजींवरील पोस्टर तयार करणे. | चर्चा : 'गांधी विचारांचे आजच्या युगातील महत्त्व' | परिसंवाद : 'सत्य आणि अहिंसा' |

| महिना | उपक्रम/विषय | गट १ (१-२) | गट २ (३-५) | गट ३ (६-८) | गट ४ (९-१०) |
|---|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर | बाल दिन (१४ नोव्हेंबर) | बालकहाणी व नाटिका | मुलांचे हक्क यावरील हस्तकला | 'मुलांच्या हक्कांविषयी' प्रश्नमंजुषा | परिसंवाद : 'मानवाधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व' |
| डिसेंबर | जागतिक म ानवाधिकार दिन (१० डिसेंबर) | गोष्टी सांगणे (समानता आणि मानवाधिकार) | मानवी हक्कांवरील पोस्टर तयार करणे. | प्रश्नमंजुषा : 'मानवाधिकारांची भूमिका' | परिसंवाद : 'मानवाधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व' |
| जानेवारी | प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) | प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व गोष्टीरूपाने सांगणे. | चित्रकला: 'भारताचे राज्यघटनात्मक प्रतीक' | वादविवाद : 'भारतीय राज्यघटनेचे महत्त्व' | 'भारताचे जागतिक योगदान' या विषयावर सादरीकरण |
| फेब्रुवारी | संशोधन व विज्ञान दिवस (२८ फेब्रुवारी) | वैज्ञानिक गोष्टी सांगणे. | वैज्ञानिक उपक्रम ांवर हस्तकला | प्रश्नमंजुषा: 'भारताचे वैज्ञानिक संशोधन' | परिसंवाद : 'शास्त्रज्ञ आणि समाजातील त्यांचे योगदान' |
| मार्च | वार्षिक आढावा व पुरस्कार वितरण कार्यक्रम | चित्रकला आणि गोष्टीरूप सादरीकरण | वर्षभरातील उपक्रमांचे पोस्टर किंवा नाटिका | उपक्रमांवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा | वर्षभरातील चर्चांचे उपक्रमांवर आधारित सादरीकरण |

### ६) समूहासाठी प्रक्रिया/नियमावली :

- प्रत्येक विद्यार्थ्याने कार्यपद्धती आणि उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभाग घ्यावा.
- प्राधिकृत सल्लागार किंवा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.
- समयबद्धता, सहयोग आणि इतर विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधणे आवश्यक असावे.

### ७) शाळेतील समूहांमधील समन्वय प्रक्रिया :

शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयासाठी नियमित बैठकांचे आयोजन करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक, शिक्षक आणि सल्लागारांच्या मदतीने विद्यार्थ्यांना एकत्र आणून विचारविनिमय व सहकार्याचे वातावरण निर्माण करणे.

## ८) शिक्षण विभाग व SCERT कडून सहाय्य :

- **संसाधने :** डिजिटल प्लॅटफॉर्म, ई-न्यूजलेटर आणि मुद्रित सामग्री.
- **प्रशिक्षण :** शिक्षक-सल्लागारांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रे.
- **प्रोत्साहन :** उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या क्लबससाठी प्रमाणपत्रे व पुरस्कार.

## ९) Online/Offline संसाधने व साहित्य :

- वृत्तपत्रे, मासिके, आणि सामान्य ज्ञान पुस्तके.
- डिजिटल संसाधने आणि शालेय ग्रंथालयातील पुस्तके.

## १०) उपक्रमनिहाय व वार्षिक अहवालाचे प्रारूप :

१) **शीर्षक :** उपक्रमाचे नाव व तारीख.

२) **उद्दिष्ट :** उपक्रमाचा उद्देश.

३) **सदर गट/विभाग :** सहभागी वर्ग व गटांची माहिती.

४) **उपक्रमाची माहिती :**

- सहभागाची संख्या.
- उपक्रमाचे स्वरूप (सादरीकरण, पझल्स, चर्चा).

५) **परिणाम :** विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण.

६) **शिफारसी :** भविष्यातील सुधारणा/उपक्रमांचे प्रस्ताव.

## ११) अन्य साहाय्यभूत मुद्दे :

- विद्यार्थी आणि शिक्षकांचा सक्रिय सहभाग.
- कार्यपद्धतीत लवचिकता आणि सुसंगतता.
- दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि संवाद कौशल्ये.

## १२) शाळेस होणारे फायदे :

- विद्यार्थ्यांच्या ज्ञानवर्धनाला चालना मिळेल.
- संवाद कौशल्ये आणि समन्वय कार्य साध्य होईल.
- शालेय वातावरणात जागतिक दृष्टिकोन विकसित होईल.

❑❑❑

# १५. सामान्य ज्ञान समूह

**पार्श्वभूमी :**

सामान्य ज्ञान समूह या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञान आणि चालू घडामोडींबद्दल रुची निर्माण करण्यासाठी आकर्षक आणि शैक्षणिक समूह तयार करणे आहे. हा उपक्रम सर्वांगीण शिक्षणासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो, ज्यामुळे कुतूहल, विचारक्षमता आणि टीमवर्क वाढीस लागते.

**प्रस्तावना :**

हा उपक्रम सामाजिक शास्त्र, विज्ञान, भूगोल यांसारख्या विषयांना चालू घडामोडी आणि सामान्य ज्ञानाशी एकत्रित करून आंतरशाखीय शिक्षण वाढवण्यासाठी तयार केले आहेत. विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागा घेऊन हे समूह विश्लेषणात्मक आणि संवाद कौशल्य वाढवण्यासाठी मदत करतात.

**संकल्पना :**

**हे क्लब चार गटांमध्ये विभागले गेले आहेत :**

- **गट १ (इयत्ता १-२) :** मजेदार आणि परस्परसंवादी गोष्टी सांगणे व सामान्य ज्ञान विषयांवर लक्ष केंद्रित करणे.
- **गट २ (इयत्ता ३-५) :** प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वे किंवा घटना यांच्यावर आधारित कोडी, पझल्स आणि सर्जनशील सादरीकरण यांसारखे उपक्रम आयोजित करणे
- **गट ३ (इयत्ता ६-८) :** वादविवाद, संशोधन प्रकल्प आणि विज्ञान, इतिहास, भूगोल यावर आधारित सादरीकरण करणे.
- **गट ४ (इयत्ता ९-१०) :** विश्लेषणात्मक चर्चा, चालू घडामोडींवरील तपशीलवार वादविवाद/चर्चा आयोजित करणे.

**उद्दिष्टे :**

- **ज्ञानवृद्धी :** सामान्य ज्ञान आणि चालू घडामोडींमध्ये रस निर्माण करणे.
- **कौशल्य विकास :** संवाद, संघकार्य आणि संशोधन कौशल्ये विकसित करणे.
- **जागरूकता :** सामाजिक, राजकीय आणि वैज्ञानिक घडामोडींची समज वाढवणे.
- **प्रेरणा :** विद्यार्थ्यांना विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित करणे, चर्चा व प्रकल्पांमध्ये सक्रिय भूमिका घेण्यास प्रोत्साहित करणे.

## १) समूहाचा प्रमुख :

समूहाचा प्रमुख कोण असावा व त्याची निवड कशी करावी?

**समूहाचा प्रमुख :** समूहाचे प्रमुख म्हणून शिक्षकाची निवड करावी.

**निवड प्रक्रिया :** शिक्षकाचा अनुभव, कौशल्ये आणि रुची यावर आधारित त्यांची निवड केली जाऊ शकते.

**तज्ज्ञांचे मार्गदर्शन :** तज्ज्ञाला क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असावा, जे विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल.

## २) सदस्य :

समूहाचा प्रमुख कोण असावा व त्याची निवड प्रक्रिया कशी करावी?

- **सदस्यांची निवड :**
  - ➢ इयत्ता १ ते १० मध्ये सर्व विद्यार्थी सदस्य होऊ शकतात.
  - ➢ प्रत्येक वर्ग/तुकडीतून १ विद्यार्थी निवडला जाऊ शकतो.

## ३) निवड प्रक्रिया :

प्रश्नमंजूषा, स्पर्धा किंवा सामान्य ज्ञानाच्या बाबतीत विद्यार्थ्यांची आवड, रुची यावर आधारित निवड केली जाऊ शकते.

- **उपक्रमांची व्याप्ती :**
  - ➢ सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, वादविवाद, पझल्स, वाचन व सादरीकरण.
  - ➢ व्याप्ती विविध वयोगटांसाठी विविधतादर्शक असावी.
  - ➢ विशेष कार्यक्रम : जागतिक पर्यावरण दिन, आविष्कार व शोध, इत्यादी.

## ४) समूहाचे कामकाज सुरू करण्यासाठी सविस्तर सूचना :

- सर्व सदस्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करा.
- नियमित वेळापत्रक ठरवून सत्रे व उपक्रम आयोजित करा.
- प्रत्येक उपक्रमाच्या उद्देशाचे, माहितीचे आणि मूल्याचे स्पष्टीकरण करा.
- संवाद आणि सहभागासाठी प्रोत्साहन द्या.

## ५) वार्षिक दिनदर्शिकेमध्ये उपक्रम/बाबी :

**उपक्रम**

- चालू विषयांवरील साप्ताहिक चर्चा.

- मोठ्या गटांसाठी संशोधन आणि विश्लेषणात्मक चर्चा.
- दैनंदिन प्रश्नमंजूषा आणि सामान्य ज्ञान आव्हान.
- वादविवाद स्पर्धा.
- जागतिक वारसा यावर प्रदर्शने.
- इतर क्लबसोबत संयुक्त कार्यक्रम.
- लेखक किंवा वैज्ञानिकांसारख्या तज्ज्ञांचे अतिथी व्याख्यान.
- संग्रहालये, ग्रंथालये किंवा विज्ञान केंद्रांना भेटी.
- विशेष दिवस किंवा कार्यक्रमांशी संबंधित चर्चासत्रे (उदा. जागतिक पर्यावरण दिन).
- प्रश्नमंजूषा स्पर्धा.
- 'आविष्कार आणि शोध' यांसारख्या विषयांवरील प्रदर्शने किंवा सादरीकरण.
- शाळास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा.
- तज्ज्ञांशी संवादात्मक सत्रे आयोजित करणे.
- 'कार्ड गेम्स' : सामान्य ज्ञान किंवा चालू घडामोडींवर आधारित कार्ड गेम्स तयार करणे आणि खेळणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मजेदार पद्धतीने ज्ञान वाढेल. सामान्य ज्ञान किंवा चालू घडामोडींवर आधारित कार्ड गेम्स तयार करणे आणि खेळणे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येक कार्डावर एक प्रश्न दिला जाईल आणि ते योग्य उत्तर देण्यासाठी प्रतिसाद देणार असतील. प्रत्येक योग्य उत्तरासाठी विद्यार्थ्यांना गुण मिळतील.

## वार्षिक दिनदर्शिका

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| जून | मजेदार गोष्टी सांगणे, सोपीसामान्य ज्ञान स्पर्धा | प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांवर आधारित गोष्टी, पझल्स, कोडी | – | – |
| जुलै | सामान्य ज्ञान चाचणी | प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांचे विचार, वैज्ञानिक प्रयोग | – | – |
| ऑगस्ट | सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा | वैज्ञानिक प्रयोग | – | – |

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| सप्टेंबर | – | – | वादविवाद स्पर्धा (सामाजिक व राजकीय मुद्दे), संशोधन प्रकल्प | चालू घडामोडींवरील तपशीलवार वादविवाद |
| ऑक्टोबर | – | – | भूगोल विषयावर प्रोजेक्ट, वादविवाद, कायदेशीर मुद्दे | वादविवाद, नेतृत्व विकास, चालू घडामोडींची सादरीकरण |
| नोव्हेंबर | मजेदार वाचन, शालेय प्रश्नमंजूषा | प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांवर आधारित गोष्टी, पझल्स, कोडी | – | – |
| डिसेंबर | – | – | शालेय सादरीकरण, संशोधन प्रकल्प प्रदर्शने, वैज्ञानिक शोध | 'संपूर्ण जागतिक पर्यावरण दिन' सादरीकरण, वादविवाद स्पर्धा |
| जानेवारी | लहान विचारवंतांची गोष्टी सांगणे, सामान्य ज्ञान प्रश्न | प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांची चरित्रे, वैज्ञानिक शोध–वाचन | – | – |
| फेब्रुवारी | – | – | इतिहास व भूगोलावर आधारित प्रकल्प, वादविवाद स्पर्धा | चालू घडामोडींबद्दल तपशीलवार चर्चा, 'सामाजिक परिस्थितीतील बदल' सादरीकरण |
| मार्च | मजेदार गोष्टी सांगणे, साधे भौगोलिक प्रश्न | अभ्यास व सामान्य ज्ञान आव्हान, सामाजिक संकल्पना सादरीकरण | – | – |

६) समूहासाठी प्रक्रिया/नियमावली

- सदस्यांचा सहभाग, प्रकल्पांची सुसंगतता आणि सक्रियता यावर आधारित नियमावली तयार करा.

## ७) शाळेतील समूहांमधील समन्वय प्रक्रिया :

- सर्व समूहांची बैठक किंवा संवादात्मक सत्रे आयोजित करा.
- प्रत्येक समूहाच्या प्रमुखांद्वारे माहितीचा आदानप्रदान करा.

## ८) शिक्षण विभागाकडून साहाय्य :

**साहाय्य व प्रोत्साहन :**

- SCERT कडून शालेय शिक्षकांसाठी कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम.
- विद्यार्थी व शिक्षकांसाठी शैक्षणिक संसाधने, मार्गदर्शन, वाचनीय साहित्य आणि तज्ज्ञांचे व्याख्यान

**वर्षभर मार्गदर्शन :**

- नियमित बैठक व सत्रांचे आयोजन.
- उपक्रमांवर नियमित निरीक्षण व सूचना देणे.

## ९) Online/Offline संसाधने व साहित्य :

**ऑनलाइन संसाधने :**

- PIB किंवा NCERT डिजिटल सामग्रीसारखी सरकारी संकेतस्थळे.
- सामान्य ज्ञान व प्रश्नमंजूषांसाठी ब्लॉग्स व शैक्षणिक व्यासपीठे.

**ऑफलाइन संसाधने :**

- शालेय ग्रंथालयातील वृत्तपत्रे, मासिके आणि सामान्य ज्ञान पुस्तके.
- फ्लॅशकाड्‌र्स आणि सामान्य ज्ञान डेक्स.

## १०) उपक्रमनिहाय व वार्षिक अहवालाचा प्रारूप :

- **शीर्षक :** उपक्रमाचे नाव व तारीख.
- **उद्‌दिष्टे :** उपक्रमाचा उद्‌देश.
- **सदर गट/विभाग :** सहभागी वर्ग व गटांची माहिती.
- **उपक्रमाची माहिती :**
  - ➢ सहभागाची संख्या.
  - ➢ उपक्रमाचे स्वरूप (सादरीकरण, पझल्स, चर्चा)
- **परिणाम :** विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण.

- **शिफारसी :** भविष्यातील सुधारणा, उपक्रमांचे प्रस्ताव.

### ११) अन्य साहाय्यभूत मुद्दे :

- शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन.
- विद्यार्थी व शिक्षकांमध्ये सक्रिय संवाद.
- इतर शालेय आणि सामाजिक उपक्रमांशी सुसंगतता.
- विविध संदर्भांमध्ये प्रभावी योगदानाची निरंतर प्रक्रिया.

### १२) शाळेस होणारे फायदे :

- विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानाची वर्धन.
- शाळेतील सुसंवाद व समन्वय सुधारणा.
- व्यक्तिमत्त्व विकास व टीमवर्कची वृद्धी.

❑❑❑

# १६. स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूह

**प्रस्तावना :**

युनिसेफने ठरवून दिलेली स्वच्छतेची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. स्वच्छता म्हणजे सामान्यत: मानवी मूत्र आणि विष्ठेची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी सुविधा आणि सेवांच्या तरतुदीला संदर्भित केले जाते. स्वच्छता हा शब्द कचरा गोळा करणे आणि सांडपाणी विल्हेवाट यासारख्या सेवांद्वारे स्वच्छताविषयक परिस्थितीची देखभाल करणेदेखील सूचित करतो. तसेच स्वच्छतेच्या संकल्पनेचा विस्तार करुन त्यात वैयक्तिक स्वच्छता, घराची स्वच्छता, शुद्ध व स्वच्छ पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा, केरकचऱ्याची विल्हेवाट, मलमूत्राची आणि सांडपाण्याची योग्य विल्हेवाट इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे.

परिसर स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परिसर स्वच्छ ठेवणे ही गोष्ट वैयक्तिक व सामूहिक दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. कारण याच परिसराचा आपल्या आरोग्यावर परिणाम होत असतो. म्हणून परिसर स्वच्छतेमध्ये लोकांना योग्य व पुरेसा आहार, शुद्ध पाणी पुरवठा. आपल्या मुलांना योग्य वेळी लस टोचून घेतली असती तर असे फारसे आजार उद्‌भवलेच नसते. वैयक्तिक स्वच्छते इतकेच परिसर स्वच्छतेलाही तितकेच महत्त्व आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते ६०% आजार किंवा रोग हे सुरक्षित/शुद्‌ध पिण्याच्या पाण्याच्या व परिसर स्वच्छतेच्या अभावामुळेच होत असल्याचे आढळून आले आहे. विशेषतः कुपोषित बालकांवर अशुद्‌ध पाणी आणि प्रदूषित परिसराचा प्रतिकूल परिणाम होत असतो. परिसर स्वच्छ ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. परिसर स्वच्छता एकदाच करून भागणारी गोष्ट नाही तर ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शालेय स्तरावर स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूह स्थापन करणे आणि त्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवण्यासाठी या मार्गदर्शक सूचना उपयुक्त ठरतील.

**स्वच्छता, आरोग्य, आणि परिसर सुरक्षा समूहाचे संकल्पना :**

१) ओला व सुका कचरा वेगळा करणे, पुनर्वापरास (recycling) प्रोत्साहन देणे, प्लास्टिकचा कमी वापर. हात धुण्याच्या सवयी, स्वच्छ वस्त्र परिधान करणे आणि दररोज शारीरिक स्वच्छता राखणे. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, स्वच्छतागृहे वापरणे आणि स्वच्छता मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे.

२) संतुलित आहाराचे महत्त्व व कुपोषण कमी करण्यासाठी उपाययोजना करणे. स्वच्छ पाणी, मलेरिया आणि डेंग्यूसारख्या रोगांच्या प्रतिबंधासाठी उपाय. ताणतणावाचे व्यवस्थापन, मानसिक स्वास्थ्य जागरूकता करणे. आरोग्य तपासणी शिबिरे आणि लसीकरण मोहिमेचे आयोजन, आरोग्य शिक्षणावर भर.

३) सुरक्षित, हरित आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी योगदान. वृक्षारोपण, जैवविविधतेचे संरक्षण आणि हरित क्षेत्रांचा विस्तार. हवा, पाणी आणि माती प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय, प्लास्टिक बॅग्स व इतर उत्पादनांवर निर्बंध, नैसर्गिक संसाधनांचा काळजीपूर्वक वापर.

४) समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये, आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय. कार्यक्रम, रॅली आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वच्छता आणि आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांना प्रकल्प आणि मोहीमांमध्ये सामावून घेणे.

५) यशस्वी आणि शाश्वत परिणामांसाठी दीर्घकालीन योजनामध्ये नियमित स्वच्छता मोहिमा तयार करणे, मूल्यमापन करणे, तंत्रज्ञानाचा उपयोग करणे.

## स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूहाची उद्दिष्टे :

### १) स्वच्छतेसाठी उद्दिष्टे :

- सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी स्वच्छता राखणे.
- कचरा व्यवस्थापनासाठी ओला आणि सुका कचरा वर्गीकरण करणे.
- प्लास्टिकचा वापर कमी करणे व पुनर्वापरास प्रोत्साहन देणे.
- नागरिक, विशेषतः तरुण वर्ग आणि विद्यार्थ्यांचा स्वच्छता व आरोग्य मोहिमांमध्ये सहभाग वाढवणे.

### २) आरोग्यासाठी उद्दिदटे :

- नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे.
- रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी योग्य आहार व स्वच्छतेच्या सवयीचे महत्त्व पटवून देणे.
- नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे.

### ३) आरोग्यासाठी उद्दिष्टे :

- परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी स्थानिक स्तरावर उपाययोजना करणे.
- वृक्षारोपण व हरित परिसर टिकवण्यासाठी जनतेला सक्रिय करणे.
- पाणी, हवा आणि मातीची गुणवत्ता सुधारण्यासाठी काम करणे.
- शाश्वत विकासाचे महत्त्व सांगण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम राबवणे.

## स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :

### १) स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान/भूगोल विषयाचा शिक्षक असावा कारण यामध्ये स्वच्छता आणि आरोग्य हे घटक विज्ञान विषयातील आहे तर परिसर हा घटक विज्ञान आणि भूगोल विषयामध्ये येतो. मार्गदर्शक तथा समूह प्रमुख यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा विषयक राबविलेलल्या उपक्रमाच्या आधारावर करावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील विज्ञान विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |
| ४) | समूह विषयाशी संबंधित कार्य करण्यास समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५) | शालेय व्यवस्थापन समिती व पालक | सदस्य |

## २) स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूहाची जबाबदारी व कार्ये :

शाळेतील स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूह हा गट विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी, परिसर स्वच्छतेसाठी आणि सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी काम करतो. या गटाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शाळेतील स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षा कायम ठेवणे आणि त्याबद्दल जनजागृती करणे.

### अ) स्वच्छतेसंबंधी जबाबदाऱ्या व कार्ये :

- कचऱ्याचे वर्गीकरण (ओला व सुका कचरा) आणि योग्य व्यवस्थापन करणे.
- शाळेच्या वर्गखोल्या, ग्रंथालय, क्रीडांगण आणि स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता तपासणे. डस्टबिन्सची योग्य ठिकाणी स्थापना व नियमित साफसफाई करणे.
- साप्ताहिक स्वच्छता मोहिम राबवून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे व हात धुण्याचे महत्त्व पटवून देणे.
- स्वच्छतागृहाचा योग्य वापर व वैयक्तिक स्वच्छता याबाबत जनजागृती करणे.
- स्वच्छता दूत आणि स्वच्छता निरीक्षणाची जबाबदारी विद्यार्थ्यांना सोपवणे.
- शाळेमध्ये प्लास्टिकमुक्त मोहीम राबविणे.
- शाळेच्या परिसरात हरित पट्टा (Green Zone) तयार करणे.
- प्रत्येक वर्गातून स्वच्छता व आरोग्य दूत निवडणे.
- स्वच्छता व आरोग्यावर आधारित निबंध, पोस्टर व वादविवाद स्पर्धांचे आयोजन करणे घरातही स्वच्छतेचे नियम पाळण्यासाठी पालकांना प्रोत्साहित करणे.
- सर्वात स्वच्छ वर्ग किंवा हरित शाळा पुरस्कार प्रथा सुरू करणे.

**ब) आरोग्यासंबंधी जबाबदाऱ्या व कार्ये :**

- विद्यार्थ्यांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे.
- प्राथमिक उपचार पेटीची उपलब्धता आणि पेटी वेळोवेळी अद्ययावत करणे.
- डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे.
- विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी सवयी (संतुलित आहार, नियमित व्यायाम) शिकवणे.
- आरोग्य जागरूकता दिन साजरा करून विद्यार्थ्यांना स्वच्छता आणि पोषण याचे महत्त्व समजावणे.
- पिण्याचे पाणी स्वच्छ व फिल्टर करून पुरवणे.
- वॉटर कूलर्सची वेळोवेळी देखभाल आणि स्वच्छता सुनिश्चित करणे.

**क) परिसर सुरक्षेसंबंधी जबाबदाऱ्या व कार्ये :**

- शाळेच्या परिसरातील वाहतुकीचे व्यवस्थापन व सुरक्षा सुनिश्चित करणे.
- आग, भूकंप किंवा आपत्तीच्या वेळी सराव मोहिमा (Mock Drills) आयोजित करणे.
- शाळेच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा कर्मचारी ठेवणे व बाह्य व्यक्तींच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवणे.
- शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करणे आणि त्यांचे संगोपन करणे.
- जलस्रोत जतन करणे व पाणी वाचवण्याचे उपाय राबवणे.
- पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे (जसे की कंपोस्टिंग, रिसायकलिंग).
- ध्वनी व वायू प्रदूषण टाळण्यासाठी शाळेत जनजागृती कार्यक्रम राबवणे.
- शाळेच्या आवारात वाहने चालवण्यावर निर्बंध ठेवणे.

## ३) शाळेतील स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूहाअंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सुचविलेल्या कृती व वार्षिक नियोजन :

शाळेच्या स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूहाचे वार्षिक नियोजन तयार करताना शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य, परिसराची स्वच्छता आणि सुरक्षा यांचा समतोल राखून उपक्रम आखले जातात. खाली दिलेल्या स्वरूपात वार्षिक नियोजनाचे उदाहरण सादर केले आहे.

**अ) महिनानुसार उपक्रमांचे नियोजन :**

| अ.क्र. | महिना | उपक्रम |
|---|---|---|
| १) | जून | • शाळा सुरू होताच हात धुण्याचा जागरूकता दिवस साजरा करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी पोषण आहाराबाबत मार्गदर्शन करणे.<br>• संपूर्ण शाळेची साफसफाई आणि सॅनिटायझेशन करून घेणे.<br>• जंक फूड टाळण्यासाठी शाळेत जनजागृती करणे.<br>• कचरा वर्गीकरण (ओला व सुका कचरा) योग्य प्रकारे करणे. |

| अ.क्र. | महिना | उपक्रम |
|---|---|---|
| २) | जुलै | • वृक्षारोपण मोहीम आणि परिसर हिरवागार ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांना देणे.<br>• पावसाळ्यात होणाऱ्या साथीच्या आजारांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन.<br>• पावसाच्या पाण्याचा योग्य उपयोग (रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प) याबाबत प्रशिक्षण.<br>• शालेय आरोग्य तपासणी शिबिर आयोजन (दंत व सामान्य आरोग्य तपासणी वर्षातून किमान दोन वेळा) |
| ३) | ऑगस्ट | • स्वातंत्र्य दिनानिमित्त परिसर स्वच्छता व सुरक्षा रॅली आयोजित करणे.<br>• कचरा वर्गीकरण आणि पुनर्वापर याविषयी प्रात्यक्षिक सत्र.<br>• विद्यार्थ्यांसाठी आरोग्य आणि स्वच्छता दूत निवड.<br>• स्वच्छता व आरोग्य उपक्रमांचा प्रगती अहवाल तयार करणे. |
| ४) | सप्टेंबर | • शिक्षक दिनानिमित्त स्वच्छता संदेश, निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजन.<br>• विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तणावमुक्ती कार्यशाळा<br>• विद्यार्थ्यांसाठी सकस आहाराबद्दल माहिती देणारी मार्गदर्शन सत्रे आयोजित करणे. |
| ५) | ऑक्टोबर | • स्वच्छ भारत अभियान दिनानिमित्त शाळा परिसर व आजूबाजूची स्वच्छता मोहीम.<br>• स्वच्छतेसाठी पर्यावरणपूरक उपाय (कंपोस्टिंग, पुनर्वापर) अंमलात आणणे.<br>• दिवाळीपूर्वी शाळेच्या वर्गखोल्या व इतर भागांची स्वच्छता.<br>• दिवाळीत वायू व ध्वनी प्रदूषणाबद्दल जागरूकता.<br>• नियमितपणे पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, आणि कचरा व्यवस्थापन तपासणे. |
| ६) | नोव्हेंबर | • बालदिनानिमित्त स्वच्छता व आरोग्य मेळावा आयोजन.<br>• विद्यार्थ्यांसाठी आरोग्यासंबंधी खेळ व गट कार्यशाळा.<br>• आग, भूकंप यांसारख्या आपत्तींसाठी सराव मोहीम (Mock Drills) राबवणे. |
| ७) | डिसेंबर | • आरोग्यासंबंधी जागरूकता उपक्रम (जसे की हात धुवा दिन, आरोग्य व्याख्याने)<br>• शाळेतील इमारतींची सुरक्षिततेसाठी तपासणी. |
| ८) | जानेवारी | • इंग्रजी नवीन वर्षाच्या सुरुवातीस स्वच्छता शपथ विधी आयोजित करणे.<br>• शाळेच्या परिसराची तपासणी व स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांची जबाबदारी ठरवणे.<br>• सर्दी–खोकल्याचे प्रमाण वाढत असल्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करणे. |
| ९) | फेब्रुवारी | • स्वच्छ परिसर आणि सुंदर वर्गखोली पोस्टर स्पर्धा.<br>• विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिक वापर टाळण्याबाबत जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करणे.<br>• परीक्षेच्या काळात ताण तणावाचे व्यवस्थापन सत्र आयोजित करणे. |

| अ.क्र. | महिना | उपक्रम |
|---|---|---|
| १०) | मार्च | • जलदिन साजरा करून विद्यार्थ्यांना पाणी वाचवण्याचे महत्त्व पटवून देणे.<br>• परीक्षेनंतर शाळेच्या परिसराची वार्षिक स्वच्छता मोहीम.<br>• शाळेच्या आवारात वृक्षारोपण करणे व त्यांच्या देखभालीसाठी गट नेमणे. |
| ११) | एप्रिल | • उन्हाळ्याच्या सुट्टीपूर्वी स्वच्छतेसाठी शाळेच्या सर्व इमारतींची तपासणी करणे.<br>• वॉटर फिल्टर व वॉटर कूलरची देखभाल व आवश्यक दुरुस्ती करणे.<br>• विद्यार्थ्यांना उन्हाळ्यातील आरोग्याविषयी मार्गदर्शन सत्र आयोजित करणे.<br>• शाळेच्या इमारतीची नियमित तपासणी करून संरचनात्मक सुरक्षा सुनिश्चित करणे.<br>• वर्षभरातील स्वच्छता व आरोग्य कामगिरीचे मूल्यमापन.<br>• उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गट व विद्यार्थ्यांना पुरस्कार वितरण.<br>• पुढील वर्षासाठी उपक्रमांचे नियोजन व सुधारणा यावर चर्चा करणे . |

## ४) स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :

- आर्थिक तरतूद.
- उपक्रम अंमलबजावणीसाठी महिन्यातील अपेक्षित वेळ.
- उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.
- मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.
- प्रदर्शन भरवणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

## ५) स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूहाच्या कामकाजासाठी प्रक्रिया/नियमावली :

### अ) सर्व साधारण नियम :

- समूहाने स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा यासाठी स्पष्ट उद्दिष्टे निश्चित करावीत.
- गटात सामील होणाऱ्या व्यक्तींनी या उद्दिष्टांसाठी योगदान देण्याची तयारी ठेवावी.
- गटासाठी ठराविक नियम तयार करावेत आणि त्याचे पालन सक्तीने सुनिश्चित करावे.
- प्रत्येक सदस्याने गटाच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा.
- सदस्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत.
- शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना कार्यक्रमात सामावून घ्यावे.
- महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करून परिसराच्या गरजा ओळखाव्यात.

### ब) स्वच्छतेसाठी नियम :

- गटातील प्रत्येक सदस्याने स्वच्छता राखण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करावी.

- गटाच्या सदस्यांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याची शपथ घ्यावी.
- ओला व सुका कचरा वेगळा करणे बंधनकारक करावे. कचरा पुनर्वापर आणि पुनर्विकासासाठी मोहिमा राबवाव्यात.
- नियमित स्वच्छता मोहिमा राबवून परिसर स्वच्छ ठेवावा.
- सदस्यांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घ्यावी.

**क) आरोग्यासाठी नियम :**

- शुद्ध पाणी, शुद्ध हवा यांची उपलब्धता सुनिश्चित करावी. आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत.
- संतुलित आहार, शारीरिक तंदुरुस्ती आणि स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटवून द्यावे. हात धुण्याच्या सवयीसारख्या छोट्या उपाययोजनांना प्रोत्साहन द्यावे.
- तंबाखू, दारू यांसारख्या व्यसनांपासून मुक्त होण्यासाठी मोहीम राबवावी.
- रोगजंतूंचा फैलाव टाळण्यासाठी कचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी उपाययोजना कराव्यात.

**ड) परिसर सुरक्षा :**

- वृक्षारोपण व त्याचे संरक्षण करण्याचे नियम ठरवावेत.
- प्लास्टिक कचरा टाळण्यासाठी सवयी विकसित कराव्यात.
- पाण्याचा अपव्यय थांबवून जलसंधारणावर लक्ष केंद्रित करावे.
- आपत्तीच्या वेळी सुरक्षिततेसाठी गटाने तयारी ठेवावी.
- प्रदूषण रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनासोबत सहकार्य करावे.

### ६) शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :

शाळेत असलेल्या इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून शाळेतील उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत करावयाच्या सर्व उपक्रमांचा विचार करून काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व समूह प्रमुख यांनी पूर्वनियोजन करून मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

### ७) शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :

स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा यावर आधारित समूहाचे अनेक फायदे आहेत. समूहाद्वारे विविध पातळीवर सामूहिक प्रयत्नांची प्रभावी अंमलबजावणी करता येते. त्याचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत :

- **स्वच्छतेचे फायदे :** स्वच्छ परिसरामुळे शाळेतील वातावरण सुंदर आणि निरोगी राहते. स्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो. स्वच्छ वर्गखोल्या आणि आवारांमुळे विद्यार्थ्यांना शिकायला आनंद होतो.
- **आरोग्याचे फायदे :** आरोग्य सवयी जसे की हात धुणे, नीटनेटके राहणे आणि योग्य आहार घेणे. आरोग्य तपासणी शिबिरांमुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे आरोग्य तपासता येते. व्यायाम, योगा, आणि खेळ यांद्वारे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारते.
- **परिसर सुरक्षेचे फायदे :** स्वच्छ आणि सुरक्षित परिसरामुळे विद्यार्थ्यांना शाळेत सुरक्षित वाटते. शाळेत तुटलेली उपकरणे किंवा कचरा वेळीच काढल्यामुळे अपघात टाळता येतात. स्वच्छतेमुळे डास, उंदीर आणि इतर हानिकारक प्राणी शाळेपासून दूर राहतात.

  स्वच्छता आणि सुरक्षा उपक्रमांमध्ये भाग घेऊन विद्यार्थी समाजसेवेचे महत्त्व शिकतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते. या उपक्रमांमधे काम केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची आणि एकतेची भावना वाढते.

### ८) स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :

- दर महिन्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.
- शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना उपक्रमात सहभागी करून घ्यावे.
- सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती/अहवाल तयार करण्यासाठी संकलित करावी.
- वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध प्रसिद्धी माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.
- वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.
- सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

### ९) स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूहास विभागाकडून देण्यात येणारे शैक्षणिक साहाय्य :

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत विज्ञान विषयक ऑनलाइन वार्तापत्र सर्व शाळांसाठी प्रकाशित करण्यात येईल ज्यामध्ये विज्ञान विषयक चालू घडामोडी,

दिनविशेष, इतर शाळांनी राबविलेले उल्लेखनीय कामकाज/उपक्रम तसेच महत्त्वाच्या व्हिडिओ लिंक्स इ. विषयी माहिती असेल. याचा वापर सर्व शाळांतील समूहांनी करावा.

- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत जिल्ह्यातील विज्ञान क्षेत्र, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान प्रकल्प, प्रत्यक्ष कृती आधारित/प्रयोग दिग्दर्शन इ. क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शक यांची यादी देण्यात येईल ज्यांना व्याख्यान/प्रयोग दिग्दर्शन उपक्रम आयोजित करण्यासाठी निमंत्रित करता येईल.

## १०) स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूहासाठी उपयक्त संदर्भ स्त्रोत व पुस्तकांची नावे :

- https://www.who.int/health-topics/water-sanitation-and-hygiene-wash#tab=tab_1
- https://www.hhs.gov/about/agencies/asa/foh/ehss/index.html
- https://www.who.int/health-topics/environmental-health#tab=tab_1
- https://www.cdc.gov/hygiene/about/index.html
- https://www.tandfonline.com/toc/uoeh20/current
- https://www.india.gov.in/all-india-institute-hygiene-and-public-health
- https://www.unicef.org/india/what-we-do/water-sanitation-hygiene
- https://moef.gov.in/environmental-healtheh
- https://iisdt.in/product/diploma-in-health-safety-environment/?srsltid=AfmBOorATyTfHwkcqOnc8haY15F3HFckPxhavLiiQqFvZJoT0Xze9skr
- https://www.tandfonline.com/journals/cije20
- https://www.pmindia.gov.in/en/major_initiatives/swachh-bharat-abhiyan/
- स्वच्छ भारत: विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक – भारत सरकार (Government of India Publication)
- Swachh Bharat Handbook for Students - Ministry of Human Resource Development (MHRD)
- Disaster Management Basics for Schools - National Disaster Management Authority (NDMA)

❑❑❑

## परिशिष्ट

### अ) स्वच्छता, आरोग्य व परिसर सुरक्षा समूह अंतर्गत विशेष महत्त्वपूर्ण दिन.

| दिनांक | विशेष दिन |
|---|---|
| ३ जून | जागतिक सायकल दिवस |
| ७ जून | जागतिक अन्न सुरक्षा दिवस |
| ८ जून | जागतिक ब्रेनट्यूमर दिवस (Word Brain Tumour Day) |
| २१ जून | सर्वात मोठा दिवस व जागतिक योग दिवस |
| २२ जून | Word Rainforest Day |
| २३ जून | आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिवस |
| २८ जून | जागतिक निसर्ग संवर्धन व हिपॅटायटीस दिवस |
| १२ जुलै | कागदी पिशवी दिवस |
| १७ जुलै | जागतिक अंतराळ दिवस |
| २९ जुलै | वृक्षारोपण दिवस |
| ६ ऑगस्ट | जागतिक हरित दिवस |
| १० ऑगस्ट | जागतिक जैव इंधन दिवस |
| २३ ऑगस्ट | राष्ट्रीय अंतराळ दिवस/इस्रो दिवस |
| १ सप्टेंबर | राष्ट्रीय पोषण सप्ताह |
| ७ सप्टेंबर | जागतिक वायू गुणवत्ता दिवस |
| १६ सप्टेंबर | ओझोन थर संरक्षण दिवस |
| २० सप्टेंबर | विश्व स्वच्छता दिवस |
| २६ सप्टेंबर | जागतिक पर्यावरण आरोग्य दिन |
| २९ सप्टेंबर | जागतिक हृदय दिन |
| २ ऑक्टोबर | स्वच्छ भारत दिवस |
| ३ ऑक्टोबर | राष्ट्रीय जीवजंतू दिवस (National Fauna Day) |
| ५ ऑक्टोबर | जागतिक विज्ञान आणि शिक्षण दिवस |
| ७ ऑक्टोबर | जागतिक अधिवास दिन (ऑक्टोबरचा पहिला सोमवार) |
| १५ ऑक्टोबर | जागतिक हात धुण्याचा दिवस (Global Hand Washing Day) |
| १६ ऑक्टोबर | जागतिक अन्न दिवस |

| दिनांक | विशेष दिन |
|---|---|
| २४ ऑक्टोबर | जागतिक वातावरण बदल दिवस |
| ५ नोव्हेंबर | जागतिक त्सुनामी जागरूकता दिवस |
| ७ नोव्हेंबर | राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिवस |
| १० नोव्हेंबर | जागतिक विज्ञान दिवस |
| १२ नोव्हेंबर | जागतिक न्यूमोनिया दिन |
| १४ नोव्हेंबर | जागतिक मधुमेह आणि राष्ट्रीय दूध दिवस |
| १ डिसेंबर | जागतिक एड्स दिन |
| ५ डिसेंबर | जागतिक माती/मृदा दिन |
| ६ डिसेंबर | नागरी संरक्षण दिन |
| १४ डिसेंबर | राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन |
| ६ जानेवारी | राष्ट्रीय बीन्स (डाळी) दिवस |
| ४ फेब्रुवारी | जागतिक कर्करोग दिन |
| १० फेब्रुवारी | जागतिक कडधान्य दिन |
| ३ मार्च | जागतिक वन्यजीव आणि जागतिक श्रवण दिन |
| १६ मार्च | राष्ट्रीय लसीकरण दिवस |
| २१ मार्च | जागतिक वन दिवस |
| २२ मार्च | जागतिक जल दिवस |
| २३ मार्च | जागतिक हवामान दिन |
| २४ मार्च | जागतिक क्षयरोग (टीबी) दिन |
| ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिवस |
| १७ एप्रिल | जागतिक हिमोफिलिया दिवस |
| २५ एप्रिल | जागतिक मलेरिया दिवस |
| २६ एप्रिल | आंतरराष्ट्रीय बियाणे दिवस (आंतरराष्ट्रीय बियाणे दिवस) |
| ८ मे | जागतिक थॅलेसेमिया दिन |
| १२ मे | राष्ट्रीय वनस्पती दिवस |
| १७ मे | जागतिक उच्च रक्तदाब दिन |
| १८ मे | जागतिक एड्स लस दिन |

## प्रपत्र ब

## स्वच्छता, आरोग्य आणि परिसर सुरक्षा समूह अंतर्गत वार्षिक उपक्रम अहवाल लेखन

## शैक्षणिक वर्ष

१) शाळेचे नाव

२) मुख्याध्यापक नाव

३) समूह प्रमुख व समूह सदस्य तपशील

४) समूह अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक

५) शैक्षणिक वर्ष २०.......– २...... मध्ये राबविलेल्या उपक्रमांचा तपशील

| अ.क्र. | राबविलेल्या उपक्रमाचे नाव | राबविलेल्या उपक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १) | ............................................................ | |
| २) | ............................................................ | |
| ३) | ............................................................ | |
| ४) | ............................................................ | |

**६) उपक्रम निहाय अहवाल** :

शैक्षणिक वर्षात राबवलेल्या प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अहवाल क्रमाने जोडावा. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाही, निवडक जिओटॅग असलेले फोटो इ.च्या अनुषंगाने मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रमनिहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणे सोबत जोडावीत.

❑❑❑

# १७. पर्यावरण संवर्धन समूह

**प्रस्तावना :**

पर्यावरणातील जैविक आणि अजैविक घटक यामध्ये परस्पर संबंध असून पृथ्वीवरील सजीवसृष्टीसाठी पर्यावरण संतुलन महत्त्वाचे आहे. पर्यावरण संतूलन हे पृथ्वीवरील सर्व सजीवांना आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. यासाठी पर्यावरणाची झालेली हानी विविध पर्यावरणपूरक कृतींच्या माध्यमातून कमी करून पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जागतिक स्तरावरून पर्यावरण संवर्धनासाठी विविध कृती, उपक्रम घेतले जातात. या पार्श्वभूमीवर दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो.

पर्यावरण संवर्धनासाठी स्थानिक स्तरापासून ते जागतिक स्तरापर्यंत प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी भावी नागरिक म्हणून भूमिका असलेल्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनासाठी त्यांच्यामध्ये आवश्यक कौशल्ये, जाणीवजागृती आणि त्यांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी शालेय स्तरापासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून जाणीवजागृती विकसित करून सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. यासाठी शालेय स्तरावर पर्यावरण संवर्धन समूह स्थापन करणे आवश्यक आहेत. या समूहाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवण्यासाठी मार्गदर्शक सूचना आवश्यक आहे. शालेय स्तरावर पर्यावरण संवर्धन समूह स्थापन करणे आणि त्या माध्यमातून वार्षिक नियोजनबद्ध उपक्रम राबवण्यासाठी या मार्गदर्शक सूचना उपयुक्त ठरतील.

**पर्यावरण संवर्धन समूह संकल्पना :**

पर्यावरण संवर्धन समूह म्हणजे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन संबंधित ज्ञान, जाणीवजागृती, कौशल्य, शास्त्रीय दृष्टिकोन, पर्यावरणीय मूल्ये आणि स्वभाववृत्ती विकसित करण्यासाठी शालेय शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाने पर्यावरण संवर्धन समूह स्थापन करून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवणे.

**पर्यावरण संवर्धन समूहाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांना पर्यावरणाबाबत शास्त्रीय व अद्यावत माहिती देणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून जाणीवजागृती विकसित करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून पर्यावरण समस्या निराकरणासाठी त्यांना सक्षम करणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत आवश्यक कौशल्ये विकसित करणे.

५) पर्यावरण संवर्धनाबाबत नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याची क्षमता विकसित करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, समूह भावना इ. कौशल्ये विकसित करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि तार्किक विचारशक्ती विकसित करणे.

९) पर्यावरण संवर्धन क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :**

**१) पर्यावरण संवर्धन समूहाची रचना :**

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी पर्यावरण संवर्धन समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान/भूगोल विषयाचा शिक्षक असावा. त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी पर्यावरण संवर्धन विषयक राबविलेले उपक्रम या आधारावर त्यांची निवड करण्यात यावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान/भूगोल विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील विज्ञान/भूगोल विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |
| ४) | समूह विषयाशी संबंधित कार्य करण्यास साजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५) | शालेय व्यवस्थापन समिती व पालक | सदस्य |

वरीलप्रमाणे सदस्यांची निवड एका शैक्षणिक वर्षासाठी करावी. वर्षभराच्या कामकाजानंतर आढावा घेऊन समूहाच्या विषयाशी संबंधित कामकाजामध्ये विद्यार्थ्यांच्या रुचीनुसार समूहात फेरबदल करण्याचा निर्णय घेण्याची मुभा राहील.

**२) पर्यावरण संवर्धन समूहाची जबाबदारी व कार्य :**

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या पर्यावरण संवर्धन समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकाच्या मदतीने पर्यावरण संवर्धन समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे. सर्व सदस्यांना समूहाच्या सर्व प्रकारच्या कामकाजाचा अनुभव मिळेल याची खात्री करावी.

३) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचवण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी सूक्ष्म नियोजन करणे, आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

१०) समूहाच्या कामकाजासाठी सहभागी असलेले तज्ज्ञ आणि पालक यांचेशी समन्वय ठेवणे.

**३) शाळेमध्ये पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत आयोजित करण्यासाठी सुचवलेल्या कृती :**

शाळेमध्ये पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी विद्यार्थ्यांचा स्तर विचारात घेऊन शाळांनी पुढील उपक्रम/कृती घ्याव्यात.

**अ) थीम : हरित व पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे.**

१) विद्यार्थ्यांसाठी परिसरातील स्थळांना/परिसंस्थाना निसर्ग फेरी आयोजित करणे.

२) स्थानिक परिस्थितीला अनुसरून वृक्ष लागवड करणे : शाळांनी वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करावे. शालेय परिसर, घर, सार्वजनिक ठिकाणे आणि मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे. शक्य झाल्यास जंगलतोड झालेल्या ठिकाणी ही विशेष मोहीम राबवण्यात यावी.

३) शालेय बाग तयार करणे.

४) पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे : विद्यार्थ्यांनी शाळेत किंवा आजुबाजुच्या परिसरात रोपांची लागवड करून स्वत:चे वाढदिवस साजरे करणे, प्लास्टिकच्या ऐवजी स्टीलची पाण्याची बाटली व जेवणाचा डबा वापरणे, घरी व शाळेत गरज नसताना विजेचे दिवे, फॅन

बंद करणे, कागदाचा योग्य वापर करणे इ. अशा पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करावे. यासाठी शाळेत पर्यावरणपूरक जीवनशैली दर्शविणारा तक्ता व विद्यार्थ्यांनी शाळेत पालन करावयाचे पर्यावरण संवर्धन संदर्भात सर्वसाधारण नियम प्रदर्शित करावेत.

५) पर्यावरणविषयक तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे व्याख्यान आयोजन करणे व विविध माहितीपट दाखवणे.

६) एक पेड माँ के नाम अभियान :

- **विद्यार्थी आणि त्यांच्या मातांचा सक्रिय सहभाग :** विद्यार्थी आणि त्यांच्या मातांचे गट करावेत आणि त्या गटामार्फत एकत्रित रोपे लावावीत. यामुळे विद्यार्थी, त्यांची माता आणि आजूबाजूचे पर्यावरण यामधील नाते मजबूत होईल.
- **नावांचे फलक लावणे :** विद्यार्थी आणि त्यांच्या मातांच्या नावांचा फलक त्यांनी लावलेल्या रोपाजवळ लावावा.
- **रोपाचे संगोपन करण्यासाठी जबाबदारी देणे :** विद्यार्थ्यांना त्यांनी लावलेल्या रोपांचे संगोपन करण्यासाठी पर्यावरण संवर्धन समूहाच्या शिक्षक/सदस्यांनी आवश्यक मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांमध्ये रोपाचे संगोपन करण्यासाठी आवश्यक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यासाठी त्यांनी लावलेल्या रोपांना पाणी, पोषण आणि प्रतिकूल हवामानापासून संरक्षण मिळेल याची खात्री करावी.

**ब) थीम : पर्यावरण विषयक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन साजरे करणे.**

विद्यार्थ्यांना पर्यावरण आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरे होणाऱ्या विविध विशेष दिनाबद्दल माहिती मिळावी यासाठी शाळेत हे विशेष दिन आयोजित करण्यात यावेत. या विशेष दिवसांची यादी 'प्रपत्र अ' मध्ये देण्यात आली आहे. या दिवशी या विशेष दिनाबद्दल शास्त्रीय माहिती देणे, तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजित करणे, माहितीपट दाखवणे किंवा विविध प्रकारच्या शालेय स्पर्धांचे आयोजन करणे इ. विविध माध्यमातून हा दिवस साजरा करावा. हा उपक्रम वर्षभर घ्यावयाचा असल्याने वार्षिक नियोजनात समावेश करून दर महिन्याला येणारे विशेष दिन साजरे करण्याबाबत बैठकीत नियोजन करण्यात यावे. या विशेष दिनाच्या थीमवर आधारित विविध स्पर्धांचे विषय देता येतील.

**क) थीम : ई –कचरा कमी करणे.**

१) ई–कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि त्यांचा पुनर्वापर करणे यासाठी ई–कचरा संकलित करणे हा उपक्रम राबविणे.

२) शाळेमध्ये ई –कचरा संकलन केंद्र तयार करून त्या ठिकाणी ई –कचरा उदा. जुनी इलेक्ट्रॉनिक उपकरणे इ. जमा करणे.

३) शाळांनी संकलित ई-कचऱ्याच्या संकलनाच्या नोंदी करणे आणि ई- कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणेसाठी अधिकृत संस्थेशी संपर्क करणे.

४) शाळांनी ई- कचऱ्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम याविषयी माहिती देण्यासाठी शैक्षणिक माहिती देणारे बूथ/केंद्र तयार करणे.

५) पर्यावरणविषयक तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे व्याख्यान आयोजन करणे व विविध माहितीपट दाखवणे.

**ड) थीम : कचरा कमी करणे.**

**१) स्वच्छता जनजागृती मोहीम आयोजन :** विद्यार्थी आणि समाज यांच्या साहाय्याने पर्यावरण विषयक जबाबदारीची जाणीव होण्यासाठी स्वच्छता जनजागृती मोहीम आयोजित करणे.

**२) कचऱ्याचे वर्गीकरण :** कचरा विघटन करिता कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास शिकवणे.

**३) दोन डस्टबिन प्रणाली उपक्रम :** सर्व वर्गामध्ये ओला आणि सुका कचरा यासाठी दोन डस्टबिन प्रणाली राबविणे. यामध्ये जर ओला कचरा जास्त प्रमाणात तयार होत नसेल तर ३-४ वर्गासाठी एक डस्टबिन वापरणे, स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन इ. साठी सॅनिटरी डस्टबिन ठेवणे इ.

**४) कंपोस्ट खड्डा :** शाळेमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी कंपोस्ट खड्डा तयार करणे आणि त्यातून तयार झालेल्या खताचा वापर परस बागेसाठी करण्यास प्रोत्साहन देणे.

**५) कचऱ्यापासून कलाकृती निर्मिती स्पर्धा आयोजन :** शाळेमध्ये 3 R (कचरा कमी करणे, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण) याला प्रोत्साहन देण्यासाठी कचऱ्यापासून कलाकृती निर्मिती स्पर्धा आयोजित करणे.

**६) Donate Camp आयोजन :** जुने कपडे, खेळणी आणि फर्निचर इ. चे दान करण्यासाठी Donate Camp आयोजित करणे. समाजातील गरजूंना या वस्तूंचे वाटप करणे किंवा अशासकीय संस्थांना संकलित केलेल्या वस्तू देणे.

**७) तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजन व विविध माहितीपट दाखवणे :** कचरा कोठे जातो आणि कचरा कसा वर्गीकरण केला जातो. या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता परिसरातील कचरा वेचणाऱ्या किंवा कचरा विकत घेणाऱ्या छोट्या व्यावसायिकांचे आंतरक्रियात्मक सेशन आयोजित करणे.

**इ) थीम : ऊर्जा बचत करणे.**

१) शालेय नियमावली : ऊर्जा बचत संदर्भात पर्यावरणपूरक कृती करण्यासाठी शालेय नियमावली तयार करणे.

२) ऊर्जा बचत पोस्टर मेकिंग/चित्रकला स्पर्धा आयोजन : विद्यार्थ्यांना ऊर्जा बचत करण्यासाठी प्रोत्साहन देणे जसे की ट्यूबलाईट व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरत नसताना बंद करणे या विषयावर विविध स्पर्धा आयोजित करणे.

३) ऊर्जा वापर सर्वेक्षण : शाळेत शालेय वेळेनंतर सर्व विद्युत उपकरणे बंद असल्याची खात्री करण्यासाठी पाहणी/तपासणी करणे.

४) अक्षय ऊर्जा स्त्रोतांवर व्याख्यानाचे आयोजन : अशासकीय संस्था, ऊर्जा विभाग यांच्या सहकार्याने अक्षय ऊर्जा स्रोतांवर मार्गदर्शन देणाऱ्या माहितीवजा सत्रांचे आयोजन करणे.

५) जाणीवजागृती फलक : ऊर्जा संवर्धन याबाबत जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी शाळेच्या सूचना फलकावर लावणे.

६) सौर ऊर्जा पॅनेलचा शाळेत प्रत्यक्ष वापर.

७) पर्यावरणविषयक तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे व्याख्यान आयोजन करणे व विविध माहितीपट दाखवणे.

**फ) थीम : पाण्याची बचत करणे.**

१) पाणी गळती पाहणी व सर्वेक्षण : शाळेतील पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे. या अंतर्गत शाळा आणि शाळेच्या परिसरातील फ्लश, नळ आणि पाण्याच्या पाईपलाईनमधील पाणी गळती शोधण्यासाठी सर्वेक्षण करणे.

२) पाण्याची शुद्धता तपासणे : विद्यार्थी आणि शिक्षकांनी परिसरातील पाण्याचे स्त्रोत किंवा पाणीसाठ्या मधून संकलित केलेल्या पाण्याची शाळेच्या प्रयोगशाळेत शद्धता तपासणे.

३) जाणीवजागृती रॅली आयोजन : जलसंवर्धनासाठी जाणीवजागृती रॅली आयोजित करणे.

४) जलसंधारण पद्धती संवाद सत्र आयोजन : विद्यार्थ्यांच्या आजीआजोबा आणि वयस्कर व्यक्तींना यांना शाळेत निमंत्रित करून त्यांनी भूतकाळात अवलंबिलेल्या जलसंधारण पद्धती आजच्या परिस्थितीमध्ये पाणी बचतीसाठी कोणत्या प्रकारे वापरता येतील या दृष्टीने संवाद सत्र आयोजित करणे.

५) जनजागृती सत्र आयोजन : पर्जन्य जलसंधारण आणि त्याचे फायदे याबाबत जनजागृती सत्र आयोजित करणे.

६) जलस्रोतांची स्वच्छता : परिसरातील जलस्रोतांजवळील कचरा, प्लास्टिकच्या वस्तू गोळा करणे इ. अशा प्रकारे आवश्यक ती काळजी घेऊन शिक्षकांच्या उपस्थितीत स्वच्छता करणे.

७) पर्यावरणविषयक तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे व्याख्यान आयोजन करणे व विविध माहितीपट दाखवणे.

ग) **थीम : प्लास्टिकचा वापर टाळणे.**

१) प्रतिज्ञा घेणे उपक्रम : प्लास्टिक न वापरण्याबाबत शिक्षक आणि विद्यार्थी यांनी प्रतिज्ञा घेणे.

२) प्लास्टिक ऑडीट उपक्रम : शाळेच्या परिसरामध्ये प्लास्टिक ऑडीट करणे. एकदाच वापर करता येणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंची यादी बनवणे आणि त्यांचा वापर करण्याऐवजी पर्यावरण पूरक पर्याय शोधणे उदा. प्लास्टिक कप, मग, पाण्याची बाटली वापरण्याऐवजी स्टीलच्या वस्तूंचा वापर करण्यास प्राधान्य देणे.

३) विविध स्पर्धांचे आयोजन : पृथ्वीवरील एकदाच वापर करता येणाऱ्या प्लास्टिकच्या वापरांमुळे होणाऱ्या घातक परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पोस्टर मेकिंग, वादविवाद आणि घोषवाक्ये लेखन, निबंध लेखन इ. चे आयोजन करणे.

४) शालेय सूचना फलक : शाळेच्या सूचना फलकावर निवडक आणि उत्कृष्ट पोस्टर प्रदर्शित करणे. शाळेच्या सूचना फलकावर एकदाच वापर करता येणाऱ्या प्लास्टिकच्या वापरांमुळे होणाऱ्या घातक परिणाम दर्शविणारे पोस्टर आणि इतर दृश्य स्वरूपात माहिती सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे.

५) प्लास्टिक ऐवजी कापडी बॅग वापरणे, एकदाच वापर करता येणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे आणि स्थानिक व पर्यावरणपूरक वस्तूंची खरेदी करणे इ. पर्यावरणपूरक सवयी अंगी बाणवणे.

६) जनजागृती मोहीम आयोजन : पर्यावरणपूरक सवयींचा समाजामार्फत अवलंब करण्यासाठी जनजागृती मोहीम आयोजित करणे.

ह) **थीम : पर्यावरण क्षेत्रातील करिअर.**

विद्यार्थ्यांना पर्यावरण आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधीची माहिती व्हावी आणि त्या दृष्टीने त्यांची या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे. यासाठी त्यांना याबाबत माहिती देणारे व्याख्यान आयोजित करावे. सद्यस्थितीत पर्यावरणाची हानी आणि त्यामुळे होणारे ते स्थानिक जागतिक स्तरावरील परिणाम यामुळे भविष्यातील महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पर्यावरणपूरक वस्तूंची निर्मिती करणे, व्यवसायातून पर्यावरणाची होणारी हानी कमी करण्यासाठी सर्वेक्षण व सल्ला देणे, संशोधन करणे, पर्यायी ऊर्जेच्या स्रोतांचा शोध घेणे इ. अशा विविध क्षेत्रात असलेल्या Environmental analyst, Environmental engineer, Environmental lawyer, Environmental health officer, Natural resource specialist, Marine biologist, Conservation officer, Solar photovoltaic installer इ. यासारख्या करिअर संधीची माहिती द्यावी. तसेच पोस्टर निर्मिती स्पर्धा घेऊन जाणीवजागृती करावी.

**ज) थीम : पर्यावरणविषयक चालू घडामोडी**

विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक चालू घडामोडींची माहिती व्हावी तसेच पर्यावरणातील घटक, त्यांच्यावर सुरू असलेले संशोधन, पर्यावरणविषयक नियम व कायद्यांमध्ये होणारी सुधारणा, पर्यावरण संदर्भात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर होणारी संमेलने, परिषद इ. बाबत अद्ययावत ज्ञान मिळावे यासाठी या थीम अंतर्गत परिपाठामध्ये माहिती देणे किंवा पर्यावरण सूचना फलकावर माहिती लेखन करावे. यासाठी इयत्तानिहाय नियोजन करून विषय ठरवून द्यावेत. तसेच या अनुषंगाने पर्यावरणविषयक तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे व्याख्यान आयोजन करणे व विविध माहितीपट दाखवणे.

**४) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :**

- दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.
- शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.
- सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती अहवाल करण्यासाठी संकलित करावी.
- वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.
- शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.
- वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.
- सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

**५) पर्यावरण संवर्धन समूहाच्या कामकाजासाठी प्रक्रिया/नियमावली :**

पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यासाठी काही नियम आखणे गरजेचे आहे. समूहाचे नियम पुढीलप्रमाणे असावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) पर्यावरणविषयक जिज्ञासा वाढवण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रमादरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रमादरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना**

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रमादरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबवण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेऊन देवाणघेवाण करावी.

**६) शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरूक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समूहअंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**७) पर्यावरण संवर्धन समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

- आर्थिक तरतूद.
- उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.
- उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.
- मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.
- वस्तूसंग्रह भरवणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

## ८) पर्यावरण संवर्धन समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | हरित व पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे. | • निसर्ग फेरी आयोजन.<br>• स्थानिक परिस्थितीला अनुसरून वृक्ष लागवड.<br>• शालेय बाग.<br>• एक पेड माँ के नाम अभियान इ. |
| २) | जुलै | पर्यावरण क्षेत्रातील करिअर | • पर्यावरण क्षेत्रातील विविध करिअरबद्दल माहिती देणारे व्याख्यान आयोजन करणे.<br>• पर्यावरण क्षेत्रातील करिअर संधी विषयावर पोस्टर निर्मिती स्पर्धा. |
| ३) | ऑगस्ट | घनकचरा व ई–कचरा कमी करणे. | • शाळेमध्ये ई–कचरा संकलन केंद्र तयार करणे.<br>• शाळांनी ई–कचऱ्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम याविषयी माहिती देण्यासाठी शैक्षणिक माहिती देणारे बूथ केंद्र तयार करणे.<br>• ई–कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे जतन करून ठेवण्यासाठी अधिकृत संस्थांशी संपर्क करणे<br>• स्वच्छता जनजागृती मोहीम आयोजित करणे.<br>• कचऱ्याचे वर्गीकरण दिग्दर्शन<br>• दोन डस्टबिन प्रणाली राबविणे.<br>• कंपोस्ट खड्डा उपक्रम.<br>• कचऱ्यापासून कलाकृती निर्मिती स्पर्धा आयोजन.<br>• Donate Camp आयोजन<br>• व्याख्यानाचे आयोजन<br>• शालेय कचरा व्यवस्थापन इ. |
| ४) | सप्टेंबर | क्षेत्रभेटी | • निसर्ग फेरी.<br>• स्थानिक जलस्रोत, पर्यावरणीय ठिकाणे<br>• आकाश निरीक्षण व तारांगण.<br>• पर्यावरण संदर्भात संशोधन केंद्रे.<br>• नैसर्गिक उद्याने व निसर्ग स्थळांना भेटी. |

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ५) | ऑक्टोबर | ऊर्जा बचत करणे. | • ऊर्जा बचत शालेय नियमावली<br>• ऊर्जा बचत पोस्टर मेकिंग/चित्रकला स्पर्धा आयोजन<br>• ऊर्जा वापर सर्वेक्षण<br>• अक्षय ऊर्जा स्रोतांवर व्याख्यानाचे आयोजन<br>• जाणीवजागृती फलक<br>• सौर ऊर्जा पॅनेलचा प्रत्यक्ष वापर. इ |
| ६) | नोव्हेंबर | पाण्याची बचत करणे. | • पाणी गळती पाहणी व सर्वेक्षण.<br>• पाण्याची शुद्धता तपासणे.<br>• जलसंवर्धनासाठी जाणीवजागृती रॅलीचे आयोजन<br>• जलसंधारण पद्धती संवाद व जनजागृती सत्र आयोजन.<br>• समाज प्रबोधनासाठी पथनाट्य आयोजन<br>• जलस्रोतांची स्वच्छता |
| ७) | डिसेंबर | प्लास्टिकचा वापर टाळणे. | • प्लास्टिक न वापरण्याबाबत प्रतिज्ञा घेणे.<br>• प्लास्टिक ऑडीट<br>• जाणीव जागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन<br>• जनजागृती मोहीम आयोजन |
| ८) | जानेवारी | पर्यावरणीय समस्या उदा. प्रदूषण, हवामान बदल, विशिष्ट प्रजाती नष्ट होणे, त्यांची संख्या कमी होणे इ. विषयक जाणीवजागृती उपक्रम | • पर्यावरणपूरक सण व उत्सव बाबत जाणीवजागृती (पर्यावरणपूरक रंगपंचमी, पर्यावरणपूरक दिवाळी )<br>• पर्यावरण जाणीवजागृतीसाठी प्रभात फेरी आयोजन,मानवी साखळी, पथनाट्य इ.<br>• पर्यावरण समस्या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने<br>• सेमिनार, वादविवाद, व्याख्यान आयोजन<br>• पर्यावरण कोपरा.<br>• पर्यावरण माहिती दिग्दर्शन फलक<br>• पर्यावरण हस्तलिखित तयार करणे.<br>• भारतीय सण व उत्सव आणि त्यामागील पर्यावरण संवर्धनाचा विचार. |

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ९) | जून ते फेब्रुवारी | पर्यावरण विशेष दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन | • पर्यावरण प्रश्नमंजुषा.<br>• पर्यावरण समस्यावर आधारित प्रकल्प स्पर्धा किंवा मॉडेल प्रदर्शन.<br>• निबंध स्पर्धा.<br>• वक्तृत्व स्पर्धा.<br>• टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू निर्मिती स्पर्धा.<br>• पर्यावरणपूरक वर्ग सजावट स्पर्धा.<br>• वादविवाद स्पर्धा.<br>• रांगोळी स्पर्धा.<br>• चित्रकला स्पर्धा<br>• पोस्टर मेकिंग व सादरीकरण<br>• सेमिनार, परिषद आयोजन<br>• पथनाट्य सादरीकरण<br>• उत्कृष्ट इकोवर्ग स्पर्धा<br>• वार्षिक पर्यावरण इको meet इ. |

**९) पर्यावरण संवर्धन समूहाचे फायदे :**

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून जाणीवजागृती, कौशल्ये, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि तार्किक विचारशक्ती, पर्यावरण पूरक सवयी, नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग इ. क्षमता व कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.

**१०) पर्यावरण संवर्धन समूह सक्षमीकरणासाठी विभागाकडून देण्यात येणारी शैक्षणिक साहाय्य :**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत पर्यावरण विषयक ऑनलाईन वार्तापत्र सर्व शाळांसाठी प्रकाशित करण्यात येईल ज्यामध्ये पर्यावरण विषयक चालू घडामोडी, दिनविशेष, इतर शाळांनी राबविलेले उल्लेखनीय कामकाज/उपक्रम तसेच महत्त्वाच्या व्हिडीओ लिंक्स इ. विषयी माहिती असेल. याचा वापर सर्व शाळांतील समूहांनी करावा.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत जिल्ह्यातील पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शक यांची यादी देण्यात येईल ज्यांना व्याख्यान आयोजित करण्यासाठी निमंत्रित करता येईल.

## ११) पर्यावरण संवर्धन समूहासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य :

- जलसुरक्षा इयत्ता दहावी पाठ्यपुस्तक–महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- डॉ. सलीम अली, विणा गवाणकर, राजहंस प्रकाशन
- पर्यावरण अभ्यास, संपादक प्रा.प्र.द. राउत पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
- Garbage to garden activity booklet by CEE, Ahmedabad.
- Energy matters book by CEE, Ahmedabad.
- The wild wisdom quiz book by WWF, India
- Birds in your backyard and beyond book by WWF, India.
- Fascinating friends in the wild book by WWF, India

### प्रपत्र अ

### पर्यावरण दिनविशेष यादी

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | राष्ट्रीय पक्षी दिवस | ५ जानेवारी |
| २) | आंतरराष्ट्रीय झेब्रा दिवस | ३१ जानेवारी |
| ३) | जागतिक पाणथळ दिवस | २ फेब्रुवारी |
| ४) | जागतिक हिप्पोपोटॅमस दिवस | १५ फेब्रुवारी |
| ५) | आंतरराष्ट्रीय ध्रुवीय अस्वल दिवस | २७ फेब्रुवारी |
| ६) | जागतिक वन्यजीव दिन | ३ मार्च |
| ७) | राष्ट्रीय पांडा दिवस | १६ मार्च |
| ८) | जागतिक पुनर्वापर दिन | १८ मार्च |
| ९) | जागतिक चिमणी दिन | २० मार्च |
| १०) | जागतिक बेडूक दिन | २० मार्च |
| ११) | आंतरराष्ट्रीय वन दिवस | २१ मार्च |
| १२) | जागतिक लाकूड दिवस | २१ मार्च |
| १४) | जागतिक जल दिन, आंतरराष्ट्रीय सील दिवस | २२ मार्च |
| १६) | जागतिक हवामान दिन | २३ मार्च |

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
| --- | --- | --- |
| १७) | आंतरराष्ट्रीय शून्य कचरा दिवस | ३० मार्च |
| १८) | जागतिक जलचर प्राणी दिवस | ३ एप्रिल |
| १९) | जागतिक आरोग्य दिन | ७ एप्रिल |
| २०) | पृथ्वी दिवस/जागतिक वसुंधरा दिन | २२ एप्रिल |
| २१) | आंतरराष्ट्रीय बिबट्या दिवस | ३ मे |
| २२) | जागतिक मधमाशी दिवस | २० मे |
| २३) | जागतिक जैवविविधता दिवस | २२ मे |
| २४) | जागतिक कासव दिन | २३ मे |
| २५) | जागतिक पोपट दिन | ३१ मे |
| २६) | जागतिक पर्यावरण दिन | ५ जून |
| २७) | जागतिक महासागर दिवस | ८ जून |
| २८) | जागतिक दुष्काळ व विरोधी दिवस | १७ जून |
| २९) | जागतिक जिराफ दिन | २१ जून |
| ३०) | जागतिक उंट दिन | २२ जून |
| ३१) | जागतिक लोकसंख्या दिवस | ११ जुलै |
| ३२) | जागतिक सर्प दिन | १६ जुलै |
| ३३) | खारफुटी संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय दिन | २६ जुलै |
| ३४) | जागतिक निसर्ग संवर्धन दिन | २८ जुलै |
| ३५) | आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन | २९ जुलै |
| ३६) | जागतिक सिंह दिन | १० ऑगस्ट |
| ३७) | जागतिक हत्ती दिन | १२ ऑगस्ट |
| ३८) | आंतरराष्ट्रीय लांडगा दिन | १३ ऑगस्ट |
| ३९) | राष्ट्रीय मधमाशी दिवस | १६ ऑगस्ट |
| ४०) | जागतिक डॉल्फिन दिवस | १२ सप्टेंबर |
| ४१) | आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस | १६ सप्टेंबर |
| ४२) | जागतिक गेंडा दिवस | २२ सप्टेंबर |

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| ४३) | जागतिक प्राणी संवर्धन दिवस | ४ ऑक्टोबर |
| ४४) | जागतिक ऑक्टोपस दिवस | ८ ऑक्टोबर |
| ४५) | आपत्ती निवारणासाठी आंतरराष्ट्रीय दिवस | १३ ऑक्टोबर |
| ४६) | आंतरराष्ट्रीय ई कचरा दिवस | १४ ऑक्टोबर |
| ४७) | राष्ट्रीय सरपटणारे प्राणी जागरूकता दिवस | २१ ऑक्टोबर |
| ४८) | आंतरराष्ट्रीय बर्फाळ चित्ता दिवस | २३ ऑक्टोबर |
| ४९) | जागतिक त्सुनामी जागरूकता दिवस | ५ नोव्हेंबर |
| ५०) | आंतरराष्ट्रीय चित्ता दिवस | ४ डिसेंबर |
| ५१) | जागतिक मृदा दिवस | ५ डिसेंबर |
| ५२) | आंतरराष्ट्रीय पर्वत दिवस | ११ डिसेंबर |

## प्रपत्र ब

## पर्यावरण समूह अंतर्गत वार्षिक उपक्रम अहवाल लेखन

**शैक्षणिक वर्ष :**

१) शाळेचे नाव :

२) मुख्याध्यापक नाव :

३) समूह प्रमुख व समूह सदस्य यांचा तपशील :

४) समूह अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक :

५) शैक्षणिक वर्षा मध्ये राबविलेल्या उपक्रमांचा तपशील :

| अ.क्र. | राबवलेल्या उपक्रमाचे नाव | राबविलेल्या उपक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |

६) उपक्रम निहाय अहवाल

शैक्षणिक वर्षात राबवलेल्या प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अहवाल क्रमाने जोडावा. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, उपक्रमाचे स्वरूप, झालेली कार्यवाही, निवडक जिओटॅग असलेले फोटो इ. च्या अनुषंगाने मुद्द्यांचा अहवाल लेखनात समावेश असावा. तसेच विद्यार्थी अभिप्राय, उपक्रम निहाय वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची कात्रणे सोबत जोडावी.

❑❑❑

# १८. आधुनिक तंत्रज्ञान समूह

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020), राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (NCF) आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम रूपरेषा (SCF Maharashtra) यांचा उद्देश विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील कौशल्यांनी सुसज्ज करणे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), रोबोटिक्स आणि माहिती तंत्रज्ञान (IT) यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानांची ओळख करून देण्यासाठी आणि त्यांना भविष्याच्या गरजांसाठी तयार करण्यासाठी 'आयटी, एआय आणि रोबोटिक्स क्लब' → अत्यंत उपयुक्त ठरेल.

NCF आणि SCF Maharashtra हे शिक्षण प्रणालीत प्रयोगशीलता, सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि तांत्रिक कौशल्यांचा समावेश करण्यावर भर देतात. NEP 2020 च्या मार्गदर्शकतत्त्वानुसार, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शालेय शिक्षणात नवकल्पना आणि तंत्रज्ञानाच्या उपयोगावर भर दिला जात आहे. 'आयटी, एआय आणि रोबोटिक्स क्लब' → हा विद्यार्थिकेंद्रित उपक्रम असून, तो संकल्पनात्मक शिक्षण hand-on learning आणि गटकार्य यांचा सुरेख मिलाफ घडवून आणतो.

हा क्लब विद्यार्थ्यांना computational thinking, coding, automation आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विषयांमध्ये सखोल समज निर्माण करण्यास मदत करेल. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्जनशील विचार वाढतील आणि ते भविष्यातील तंत्रज्ञान-संबंधित करिअरसाठी तयार होतील.

**समूह रचना :**

१) **समूह प्रमुख :** शाळेतील शिक्षक (तंत्रस्नेही शिक्षकास प्राधान्य दिले जाईल.)

२) **समूह सदस्य :**

- विद्यार्थ्यांची निवड करताना त्यांच्या इयत्तेचा निकष ठरवला जाईल.
- विविध विषयांत उत्कृष्टता प्राप्त करणारे आणि संगणक हाताळण्याचे चांगले कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.
- प्रत्येक इयत्तेतून प्राधान्य क्रमाने १ किंवा २ विद्यार्थी या क्लबचे सदस्य असतील.
- विशिष्ट उपक्रमांसाठी जास्त विद्यार्थ्यांची आवश्यकता भासल्यास, त्या उपक्रमांसाठी अतिरिक्त विद्यार्थी तात्पुरते सहभागी करता येतील.

## ३) क्लबचे उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांमध्ये Computational Thinking आणि Design Thinking विकसित करणे.
- प्रायोगिक शिक्षणावर भर देऊन कृत्रिम बुद्धिमत्ता व रोबोटिक्सच्या संकल्पना शिकवणे.
- विद्यार्थ्यांना समस्या सोडवण्याच्या क्षमतेसह स्वयंपूर्ण बनवणे.
- मल्टिडिसिप्लिनरी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
- कोडिंग, स्वयंचलित प्रणाली आणि रोबोटिक्स क्षेत्रातील मूलभूत संकल्पना शिकवणे.
- तंत्रज्ञानाच्या सामाजिक, नैतिक आणि पर्यावरणीय परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे.
- प्रयोगशील शिक्षणाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी सक्षम करणे.

## ४) क्लब अंतर्गत घेण्यात येणारे उपक्रम :

### अ) माहिती तंत्रज्ञान (IT) उपक्रम

- संगणक मूलतत्त्वे आणि प्रोग्रामिंग भाषा (Python, Scratch, C++, Java इ)
- वेब डिझाइन आणि ॲप डेव्हलपमेंट कार्यशाळा (HTML, CSS, JavaScript)
- डेटा संरचना आणि सायबरसुरक्षा तत्त्वे
- क्लाउड संगणन आणि त्याचा वापर (Google Cloud, AWS, Microsoft Azure)

### ब) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपक्रम

- मशीन लर्निंग आणि डीप लर्निंग कार्यशाळा
- AI आधारित स्वयंचलित प्रणाली तयार करणे.
- नैतिक AI आणि त्याचे सामाजिक प्रभाव यावर चर्चा आणि प्रकल्प

### क) रोबोटिक्स उपक्रम

- इलेक्ट्रॉनिक्स आणि सेन्सर्ससंबंधी मूलभूत माहिती
- रोबोटिक्स किट्सचा वापर करून छोटे प्रकल्प (Arduino, Raspberry Pi, LEGO Mindstorms)
- IoT (Internet of Things) आणि स्मार्ट डिव्हाइसेसचा वापर
- स्वायत्त रोबोट्स आणि ड्रोन टेक्नॉलॉजी

### ५) वार्षिक वेळापत्रक (NEP 2020 आणि NCF च्या शिफारशीनुसार)

| महिना | उपक्रम |
|---|---|
| जून | क्लब स्थापना, सदस्य नोंदणी व जबाबदारी वाटप |
| जुलै | Computational Thinking आणि Coding कार्यशाळा |
| ऑगस्ट | AI आणि डेटा ॲनालिटिक्स कार्यशाळा |
| सप्टेंबर | रोबोटिक्स प्रकल्पांची सुरुवात |
| ऑक्टोबर | मिनी–हॅकाथॉन व टिंकरिंग लॅब उपक्रम |
| नोव्हेंबर | स्मार्ट होम ऑटोमेशन प्रकल्प |
| डिसेंबर | AI आणि रोबोटिक्स प्रदर्शन |
| जानेवारी | सायबरसुरक्षा आणि एथिकल हॅकिंग कार्यशाळा |
| फेब्रुवारी | नवकल्पनांचा सादरीकरण स्पर्धा |
| मार्च | वार्षिक आढावा आणि प्रमाणपत्र वितरण |

### ६) संसाधने आणि आवश्यक साधने

- संगणक आणि इंटरनेट सुविधा–उच्च कार्यक्षमता असलेले संगणक आणि वेगवान इंटरनेट आवश्यक आहे.
- प्रोग्रामिंग आणि रोबोटिक्स किट्स Arduino, Raspberry Pi, LEGO Mindstorms, Micro : bit
- AI लॅब आणि सॉफ्टवेअर Tensor Flow, OpenCV, Google Colab
- डिजिटल लायब्ररी आणि ऑनलाइन कोर्सेसची उपलब्धता
- थ्री–डी प्रिंटिंग आणि हार्डवेअर प्रोटोटायपिंग टूल्स

### ७) समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी साहाय्यभूत संसाधने

**अ) ऑनलाईन व ऑफलाईन संसाधने, पुस्तके व साहित्य :**

- NCERT - CIET पोर्टल
- CIET NCERT यूट्यूब चॅनेल
- AI, रोबोटिक्स आणि प्रोग्रामिंगवरील संदर्भ पुस्तके व मार्गदर्शक साहित्य

- कोडिंग व रोबोटिक्स प्रशिक्षणासाठी ऑनलाइन कोर्सेस (Coursera, Udemy, NPTEL, IIT Bombay Spoken Tutorials)
- तंत्रज्ञानविषयक मासिके व वैज्ञानिक संशोधनपत्रे

## ८) समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभाग व एससीईआरटी (SCERT) महाराष्ट्राद्वारे खालील प्रकारचे साहाय्य व प्रोत्साहन दिले जाऊ शकते :

**अ) गटप्रमुख शिक्षकांसाठी प्रशिक्षण :**

- अद्ययावत तंत्रज्ञान आणि शिक्षण पद्धतींवरील विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जातील.
- कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, संगणकीय विचारसरणी या विषयांवरील विशेष प्रशिक्षण.
- डिजिटल साधनांचा प्रभावी उपयोग कसा करावा यावर मार्गदर्शन.

**ब) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व कृती-आधारित शिक्षण :**

- विद्यार्थ्यांसाठी नियोजित कृती आणि प्रयोगशील उपक्रम वेळोवेळी सामायिक करता येतील.
- ऑनलाइन वेबिनार, व्हिडिओ लेक्चर्स आणि डिजिटल संसाधने उपलब्ध करून दिली जातील.
- राज्यस्तरीय तांत्रिक उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन.

## ९) समूहाच्या उपक्रमनिहाय व वार्षिक अहवालाचा फॉरमॅट :

अ) वर्षभर पार पडलेल्या उपक्रमांच्या नोंदी गटप्रमुख शिक्षक ठेवतील.

ब) प्रत्यक्ष भेटीतील, सभेतील व व्हाट्सअप गटात या संबंधित शेअर केलेल्या माहितीचे दस्तऐवजीकरण करणे आवश्यक राहील.

क) शालेय स्तरावर उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे अनिवार्य असेल.

ड) अहवालामध्ये खालील मुद्द्यांचा समावेश असेल :

- क्लबचे उद्दिष्टे आणि त्याची अंमलबजावणी
- घेण्यात आलेल्या कार्यशाळा, प्रशिक्षण व स्पर्धांची माहिती
- विद्यार्थ्यांच्या सहभागाचे स्वरूप व त्यांची प्रगती
- यशोगाथा व उल्लेखनीय कामगिरी
- भविष्यातील सुधारणा व योजना

## १०) समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी साहाय्यक मुद्दे :

**अ) स्थानिक तज्ज्ञांचा सहभाग :**

- गावातील किंवा परिसरातील तंत्रज्ञान व रोबोटिक्स विषयातील तज्ज्ञ व्यक्ती, पालक, तसेच

शाळेचे माजी विद्यार्थी (जे या क्षेत्रात कार्यरत आहेत) यांचा क्लबमध्ये समावेश करता येईल.

- हे तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील तसेच कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात मदत करू शकतील.
- उद्योग व संशोधन संस्थांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांसाठी विशेष सत्रे आयोजित करता येतील.

**ब) स्पर्धात्मक सहभाग :**

- एक ठराविक तांत्रिक विषय निश्चित करून तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर स्पर्धांचे आयोजन करता येईल.
- या स्पर्धांमध्ये गटातील विद्यार्थी, पालक, प्रमुख शिक्षक आणि स्थानिक तज्ज्ञ सामूहिकरित्या भाग घेऊ शकतील.
- विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची संधी मिळेल तसेच त्यांना नवनवीन प्रयोग व संशोधन करण्यास प्रेरणा मिळेल.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉन, रोबोटिक्स स्पर्धा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता संमेलनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी मिळू शकते.

## सारांश

'आयटी, एआय आणि रोबोटिक्स क्लब' → हा २०२०, NEP 2020, NCF आणि SCF Maharashtra च्या उद्दिष्टांशी सुसंगत असून, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या जगात पुढे जाण्यास मदत करेल. नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि भविष्यातील तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासाठी हा क्लब एक आदर्श व्यासपीठ ठरेल. या क्लबच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थी आधुनिक जगातील तंत्रज्ञानाशी जोडले जातील व उद्याच्या भविष्याला सामोरे जाण्यास सज्ज होतील.

## श्रेय नामावली :

१) श्रीमती ज्योती शिंदे, उपसंचालक, आयटी व प्रसारमध्यम विभाग

२) डॉ. संदिप मुळे, अधिव्याख्याता, आयटी व प्रसारमध्यम विभाग

३) श्रीमती प्रतिभा बरडे, अधीक्षक, आयटी व प्रसारमध्यम विभाग

❑❑❑

# १९. शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह

**प्रस्तावना :**

एखादा शालेय जयंती उत्सव असो की वार्षिक स्नेहमेळावा, क्रीडा दिन असो की विज्ञान प्रदर्शन, भाषणाचा कार्यक्रम असो की एखादे प्रदर्शन वा कार्यशाळा विद्यार्थ्यांचा उत्साह अगदी ओसंडून वाहत असतो. या शालेय कार्यक्रमात आपलाही सहभाग असावा यासाठी ते प्रयत्न करत असतात. कोणी भाषण देते, कोणी संचलनासाठी पुढे येते, कोणी बैठक व्यवस्था बघते तर कोणी स्टेजचे सजावटीचे काम करते. ही एक प्रकारे कोणत्याही कार्यक्रमात कामे करणारी मंडळी त्या कार्यक्रम समितीचे सदस्यच असतात.

अशाच वेगवेगळ्या कार्यक्रमातून कामे करायची व नवे काहीतरी शिकण्यास इच्छुक विद्यार्थ्यांना सुयोग्य प्रकारे शालेय कार्यक्रम व्यवस्थापनाचे योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य आणि क्षमता विकसित करण्याची कल्पना समोर आली. ती म्हणजे शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह. या समूहातील सदस्यांना शालेय कार्यक्रमाच्या व्यवस्थापन संबंधीत वेगवेगळ्या प्रकारची सर्व माहिती देऊन त्यांना शालेय कार्यक्रमातून अनुभवजन्य प्रशिक्षण देऊन व्यवस्थापनाचे धडे देणे हा मुख्य उद्देश आहे. मुळातच कामाची व व्यवस्थापनात काम करायची इच्छा असेलेले विद्यार्थी यामुळे सुयोग्य प्रशिक्षण घेऊन शालेय कार्यक्रमाचा दर्जा वाढवतील.

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती बद्दल सविस्तर माहिती समजून घेऊ.**

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीचे ध्येय आणि उद्देश :**

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती ही शाळेतील विविध कार्यक्रमांचे यशस्वी व्यवस्थापन आयोजन करण्यासाठी तयार केली जाते. या समितीचे मुख्य ध्येय म्हणजे शाळेतील शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणात सकारात्मक योगदान देणे हे होय.

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहाचे विशिष्ट उद्देश :**

१) शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शारीरिक विकासासाठी विविध कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.

२) विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील संवाद वाढवून शालेय वातावरण सुधारणे.

३) शैक्षणिक प्रक्रियेत विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा सक्रिय सहभाग वाढवणे.

४) वर्षभर विविध उपक्रम साजरी करणारी शाळा म्हणून शाळेची प्रतिमा समाजात उंचावून शाळेचा दर्जा वाढवणे.

५) विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा आणि सुप्त गुण व प्रतिभा प्रदर्शनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीच समूहाचे उद्देश :**

१) विज्ञान प्रदर्शन, निबंध, प्रश्नमंजूषा, वादविवाद, भाषण स्पर्धा आदी शैक्षणिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणे.

२) संगीत, नृत्य, नाटक, स्नेह सम्मेलन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना प्रोत्साहन देणे.

३) विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांच्या शारीरिक भावनिक विकासासाठी प्रोत्साहन देणे.

४) स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य शिबीर इत्यादी सेवा कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना रुजवणे.

५) पालक-शिक्षक बैठका आयोजित करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत पालकांना माहिती देणे आणि त्यांचे सहकार्य मिळवणे.

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीचे अन्य उद्देश :**

१) शाळेच्या वार्षिक उत्सवाचे आयोजन करणे.

२) शाळेचा वर्धापनदिन, राष्ट्रपुरुषांच्या जयंती व उत्सव साजरे करणे.

३) गणतंत्र दिवस, स्वातंत्र्य दिवस, गांधी जयंती इत्यादी राष्ट्रीय सण व महाराष्ट्र दिन साजरा करणे.

४) विविध विषयांवरील व्याख्यानमालेचे आयोजन करणे.

५) शाळेच्या वातावरणात सकारात्मकता व सहभागीता निर्माण करणे.

**शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहाची कार्यात्मक उद्दिष्टे :**

१) वर्षभरातील सर्व प्रकारच्या शालेय कार्यक्रमांची यादी तयार करणे.

२) शालेय कार्यक्रम नियोजनाची माहिती समूह सदस्य विद्यार्थ्यांना समजावून देणे .

३) शालेय कार्यक्रम आयोजन संबंधित माहिती (आयोजन नियोजन) जाणून घेणे.

४) शालेय कार्यक्रम आयोजन नियोजनातील वेगवेगळी कामे व जबाबदारी यांची माहिती मिळवणे.

५) शालेय कार्यक्रम आयोजनात आपण कोणती कामे सहज करू शकतो व काय जबाबदारी घेऊ शकतो व पूर्ण करू शकतो याचे आकलन करणे.

६) कार्यक्रम आयोजन, नियोजन व व्यवस्थापनाचे विद्यार्थ्यांना तात्त्विक व अनुभवजन्य प्रशिक्षण देणे.

७) विद्यार्थ्यांकडून शालेय कार्यक्रम आयोजित करणे.

८) आयोजित, नियोजित कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे मूल्यांकन करून चुकांची दूरस्ती समजून घेणे.

९) असाच कार्यक्रम आयोजित करतांना पुढच्या वेळी काय नवीन करता येईल याची चर्चा करून नोंद घेणे.

१०) कोणी कोणी काय काय क्षमता कौशल्ये मिळवली किंवा काय अधिक तयारी वैयक्तिकरित्या करणे आवश्यक आहे याबाबत सकारात्मक चर्चा व मूल्यांकन करून त्यानुसार क्षमता व कौशल्य मिळवण्यासाठी वैयक्तिक अभ्यास, प्रशिक्षण व सराव करणे.

**शालेय कार्यक्रम आयोजन नियोजनाचे व्यवस्थापनाचे टप्पे :**

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती द्वारे शालेय कार्यक्रम आयोजित करणे म्हणजे केवळ एक कार्यक्रम घेणे नाही, तर त्यामागे एक संपूर्ण प्रक्रिया असते. ही प्रक्रिया योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाने सुव्यवस्थित केल्यास कार्यक्रम अधिक प्रभावी बनतो. त्यासाठी खालील आयोजन नियोजनाचे टप्पे समजून घेणे आवश्यक आहे.

**शालेय कार्यक्रम आयोजन नियोजनाचे टप्पे :**

**१) कार्यक्रमाचे उद्देश निश्चित करणे :** कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ठरवावा? (उदा. विद्यार्थ्यांची प्रतिमा प्रदर्शित करणे, निधी उभारणे, शाळेची प्रतिमा उंचावणे, माहितीपर) या उद्देशानुसार कार्यक्रमाचे स्वरूप निश्चित करणे. (उदा. सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, प्रदर्शन, भाषण, परिसंवाद, स्नेहसंमेलन, विज्ञान प्रदर्शन, व्याख्यान वैगेरे)

**२) कार्यक्रम समितीची रचना :** कार्यक्रम आयोजन व व्यवस्थापनाचे विविध कौशल्ये असलेल्या शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना समितीत समाविष्ट करावे. प्रत्येक सदस्याला स्पष्ट जबाबदारी सोपवावी. (उदा. आयोजन, आर्थिक व्यवस्थापन, मंच व्यवस्थापन वैगेरे)

**३) दिनांक आणि वेळ निश्चित करणे :** कार्यक्रमाला सर्वात अनुकूल व योग्य असा दिवस आणि वेळ निश्चित करावी. यासाठी शाळेच्या इतर कार्यक्रमांचा आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा व उपक्रमांचा विचार करावा.

**४) स्थळ निश्चित करणे :** कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार योग्य स्थळ निश्चित करावे. स्थळाची क्षमता, उपलब्ध सुविधा, वेळ आणि खर्च यांचा विचार करावा.

**५) खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे :** कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चांचा अंदाज लावून अंदाजपत्रक तयार करावे. निधी उभारण्याचे मार्ग शोधावे. (उदा. प्रायोजकत्व, टिकिट विक्री, वस्तू स्वरूपात दान, वर्गणी स्वरुपात जमा रक्कम)

**६) कार्यक्रमाची संकल्पना :** कार्यक्रमाची एक संकल्पना तयार करा. या संकल्पनेनुसार कार्यक्रमाचे विविध घटक ठरवावे. (उदा. थीम, रंग, स्टेज सजावट, प्रमुख पाहुणे, व्हिडिओ, संगीत – जिथे आवश्यक असेल तिथे.)

७) **कार्यक्रमाची रूपरेषा :** कार्यक्रमाची तपशीलवार कार्यक्रमपत्रिका तयार करावी. यात प्रत्येक कार्यक्रमाची वेळ, कालावधी आणि सहभागींची माहिती समाविष्ट करावी.

८) **प्रचार :** कार्यक्रमाचा प्रभावी प्रचार करावा. शाळेच्या वेबसाइट, सोशल मीडिया, पत्रिका, वृत्तपत्र आणि स्थानिक प्रसार माध्यमांचा वापर करता येईल.

९) **साहित्य आणि साधनसामग्री :** कार्यक्रमासाठी आवश्यक सर्व साहित्य आणि साधनसामग्रीची यादी तयार करावी. हे सर्व साहित्य वेळेवर उपलब्ध करून घ्यावे. त्याची योग्य प्रमाणात सर्वांना जबाबदारी द्यावी. कोणाला कोणतीही आर्थिक, शारीरिक क्षमता वा दळणवळणाची अडचण येणार नाही याचा विचार करावा.

१०) **स्वयंसेवक :** कार्यक्रमासाठी पुरेसे स्वयंसेवक उपलब्ध करून घ्यावेत. स्वयंसेवकांना त्यांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट कराव्यात.

११) **आकस्मिक परिस्थिती :** आकस्मिक परिस्थितीसाठी एक योजना तयार करावी. जसे लाईट जाणे, पाऊस येणे वैगेरे या योजनेनुसार आपत्ती व्यवस्थापन करावे.

१२) **मूल्यमापन :** कार्यक्रम झाल्यावर कार्यक्रमाच्या यशापयशाचे मूल्यमापन करावे. या मूल्यमापनाच्या आधारे भविष्यातील कार्यक्रमांसाठी आयोजन नियोजन मधे सुधारणा करावी.

### शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती रचना :

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीची खालील प्रकारे रचना करता येईल. त्या कमी जास्त हवे तेवढे सदस्य घेता येतील.

१) अध्यक्ष २) उपाध्यक्ष ३) सचिव ४) सहसचिव ५) कोषाध्यक्ष ६) सहकोषाध्यक्ष ७) समन्वयक ८) विद्यार्थी प्रतिनिधी मुलगा ९) विद्यार्थी प्रतिनिधी मुलगी १०) प्रसिद्धी प्रमुख ११) सदस्य (शिक्षक) १२) सदस्य (कर्मचारी) १३) सदस्य (पालक) १४) सदस्य (विद्यार्थी मुलगा) १५) सदस्य (विद्यार्थी मुलगी)

यासह खालील पद्धतीने विविध प्रतिनिधी घेण्याचा विचार समितीची रचना करताना करता येईल.

१) **मुख्याध्यापक :** समितीचे अध्यक्ष म्हणून, ते सर्वोच्च निर्णय घेतात आणि समितीला मार्गदर्शन करतात.

२) **उपमुख्याध्यापक किंवा पर्यवेक्षक किंवा वरिष्ठ शिक्षक :** उपाध्यक्ष म्हणून मुख्याध्यापकांच्या अनुपस्थितीत कामकाज बघतात.

३) **वरिष्ठ शिक्षक :** सचिव म्हणून कार्यक्रम व्यवस्थापन समिती संचलनाचे कामकाज करतात. तसेच आवश्यक त्या नोंदी ठेवतात.

४) **वरिष्ठ शिक्षक/लिपीक किंवा पालक :** कोषाध्यक्ष म्हणून कार्य करतात. समितीला मिळणारा पैसा व खर्च यांचा हिशेब ठेवतात.

५) **शिक्षक प्रतिनिधी :** विविध विषयांचे शिक्षक या समितीत असावेत. ते आपल्या विषयाच्या दृष्टिकोनातून प्रसंगी चांगल्या सूचना देऊ शकतात.

६) **विद्यार्थी प्रतिनिधी :** विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या पसंती आणि गरजा समितीपुढे मांडता येतात.

७) **पालक प्रतिनिधी :** पालक प्रतिनिधींचा समावेश करून पालकांचा सहभाग आणि सहकार्य मिळवता येते.

८) **अन्य कर्मचारी :** कार्यालयीन कर्मचारी, ग्रंथपाल, प्रयोगशाळा साहाय्यक, शिपाई इत्यादींचा समावेश करून त्यांचाही सहयोग मिळवता येतो.

९) **शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती कार्य वाटप/जबाबदारी विभागणी :** शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती ही शाळेतील विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्थापन केली जाते. या समितीची योग्य रचना आणि कार्यवाटप हे कार्यक्रमांच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

१०) **कार्यवाटप आणि जबाबदारी :** कार्यक्रमाच्या आकार आणि स्वरूपानुसार कार्यवाटप आणि जबाबदारी बदलू शकते. तथापि, काही सामान्य जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असू शकतात:

११) **सर्वसाधारण समन्वयक :** कार्यक्रमाचे एकूणच व्यवस्थापन, नियोजन आणि अंमलबजावणीची जबाबदारी.

१२) **वेळापत्रक समन्वयक :** कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करणे आणि त्याचे अनूपालन करणे.

१३) **स्थळ व्यवस्थापन समन्वयक :** कार्यक्रमाचे स्थळ निश्चित करणे आणि त्याची व्यवस्था करणे.

१४) **साहित्य व्यवस्थापन समन्वयक :** कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य गोळा करणे आणि व्यवस्थापित करणे.

१५) **प्रचार समन्वयक :** कार्यक्रमाचा प्रचार करणे आणि त्यासाठी आवश्यक असलेले पोस्टर, बॅनर, निमंत्रण पत्रिका इत्यादी तयार करणे.

१६) **अतिथी व्यवस्थापन समन्वयक :** कार्यक्रमात आमंत्रित केलेल्या अतिथींची व्यवस्था करणे.

१७) **विद्यार्थी सहभाग समन्वयक :** विद्यार्थ्यांची कार्यक्रमात सहभागिता सुनिश्चित करणे.

**कार्यवाटप करताना खालील गोष्टींचा विचार करावा लागेल :**

१) **सदस्यांच्या कौशल्यांचा विचार :** प्रत्येक सदस्याच्या कौशल्यांचा विचार करून त्यांना त्यांच्या योग्यतेनुसार काम देणे.

२) **कार्यक्रमाच्या गरजा :** कार्यक्रमाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन कार्यवाटप करणे.

३) **सदस्यांची संख्या :** सदस्यांची संख्या लक्षात घेऊन कार्यवाटप करणे.

४) **वेळ मर्यादा :** कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेला वेळ लक्षात घेऊन कार्यवाटप करणे.

५) **कार्यक्रम आढावा :** कार्यक्रम समितीच्या नियमित बैठका घेऊन कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

६) **जबाबदारी वाटप :** प्रत्येक सदस्याला स्पष्ट जबाबदारी देणे आवश्यक आहे.

७) **सहकार्य व सक्रीय सहभाग :** समितीचे सर्व सदस्यांनी एकमेकांना सहकार्य करावे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो.

**प्रशासन व व्यवस्थापन :**

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीची रचना झाल्यावर सदर समितीमध्ये कार्यक्रम आयोजन नियोजन करण्याची जबाबदारी घेण्याची व शिकण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेता येईल.

मा. मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन तथा समन्वयकांच्या नेतृत्वात सदर समितीचे कामकाज सुरू राहील.

सदर समितीचे व्यवस्थापन करतांना पुढील बाबींचा विचार करून वेळापत्रक तयार करावे.

१) शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीमधे विद्यार्थी सहभाग व नोंदणी प्रक्रिया राबवणे.

२) शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समितीची रचना करून (तयार करणे) उद्घाटन करणे व विद्यार्थ्यांना आयोजन व्यवस्थापनचे मूलभूत प्रशिक्षण देणे.

३) शाळेच्या वार्षिक कार्यक्रमांची यादी तयार करुन कोणत्या कार्यक्रमाचे नियोजन कोणी करायचे याची यादी करून जबाबदारीचे वाटप करणे.

४) सहभागी विद्यार्थ्यांना दिलेल्या जबाबदारीनुसार त्या त्या विभागाचे व ऐच्छिक विभागाचे प्रगत प्रशिक्षण देणे सराव करून घेणे.

५) कार्यक्रमाच्या पूर्वी नियोजन बैठका व जबाबदारीचे वाटप. (कार्यक्रमाच्या पूर्वी ४ ते ५ दिवस)

६) कार्यक्रमाच्या नंतर प्रत्येक विभागाच्या कामाचे मूल्यांकनाची बैठक–साधारण १ किंवा २ दिवसांचे आत मूल्यांकन करणे.

७) नवनवीन कल्पनांचा वापर करण्यासाठी सर्वांना संधी आणि प्रोत्साहन देण्यावर भर देऊन मासिक बैठक व कार्यक्रम नियोजन बैठकीतून चर्चा विनिमय करता येईल.

८) आवश्यक प्रशिक्षणांची व्यवस्था जसे मंच (स्टेज) तयारी, कलाकुसर, रांगोळी काढणे, मैदान आखणी, मैदान व परिसर सजावट, संचलन, आभार प्रदर्शन, प्रस्तावित करणे, भाषण, बातमी लेखन, फोटोग्राफी व व्हिडिओ बनवणे, साऊंड सिस्टीम उपयोग, निमंत्रण व कार्यक्रमपत्रिका सेंटीग करणे, फळा लेखन, बोर्ड पेन्टींग, अहवाल लेखन, चिकट वही बनवणे वैगेरे बाबींचे प्रशिक्षण देता येईल.

९) विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमता व कौशल्ये ओळखून ते अधिक विकसित करायला स्व मूल्यमापन तंत्राची माहिती व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देता येईल.

१०) शाळेत ऐन वेळेवर आयोजित करावयाच्या कार्यक्रमाच्या दृष्टीने व्यवस्थापकीय रचना तसेच साधन साहित्य तयारीची कमीतकमी वेळात कामी येणारी व्यवस्था तयार करून ठेवणे. जसे ऑडीटोरियम, माईक, साऊंड सिस्टीम, बैठक व्यवस्था, मिटींग व एव्ही हॉल वैगेरे.

११) परीसरातील कार्यक्रम व्यवस्थापन करणाऱ्या व्यवसायिक संस्थांच्या (इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी) यांच्या मालक वा, व्यवस्थापकीय संचालकांना बोलावून त्यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरे कार्यक्रमातून व्यवस्थापन व आयोजन नियोजनाचे बाबतीत विद्यार्थ्यांना प्रगत माहिती घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

१२) विविध शासकीय कार्यालय व खाजगी संस्था जसे बस स्टँड, रेल्वे स्टेशन, वाहतूक शाखा, गर्दीची ठिकाणे, सुरक्षारक्षक कंपनी, रुग्णालये, बॅक्वेट हॉल, मंगल कार्यालय, सभा संमेलने याठिकाणी भेटी देऊन तेथील कार्यक्रम व्यवस्थापन आयोजन समजून घेणे.

**मार्गदर्शन सूचना शिक्षकांसाठी :**

१) सर्व वर्गातील इच्छुक विद्यार्थ्यांना शालेय कार्यक्रम आयोजन समिती समूह गटातून काम करण्याची संधी आणि प्रशिक्षण मिळेल याची खात्री करा.

२) किमान खर्चावर मुलांना सदर प्रशिक्षण द्यावे. खर्चाचा भार मुलांवर पडणार नाही याचे योग्य प्रकारे नियोजन करणे गरजेचे आहे.

३) विद्यार्थ्यांची आवड निवड तसेच त्यांची क्षमता व कौशल्ये बघून त्याला योग्य ती व सहज पेलणारी जबाबदारी त्यांचाकडे द्यावी.

४) प्रत्येक छोटी–छोटी बाब व गोष्टींचे महत्त्व व ते काम करण्याची योग्य पद्धती समजावून सांगावी. सोपे कसे होईल ते सांगावे.

५) शालेय वेळेच्या आधी काहीवेळ किंवा शालेय वेळच्या नंतर काही वेळ वा सूट्टी व शनिवार रविवार च्या फावल्या वेळेत सदर प्रशिक्षणाची रचना करण्यात यावी.

६) शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून विद्यार्थी आपली आपली जबाबदारी पार पाडतील तेव्हा प्रत्येक टप्पा प्रत्येक पायरीवर त्यांच्या कार्यावर लक्ष ठेवावे. वेळीच दुरस्ती केल्याने तिथल्या तिथे विद्यार्थ्यांच्या चुका सुधारता येतात व कार्यक्रमाची यशस्विता वाढवता येते.

७) विद्यार्थ्यांना स्पष्ट व सकारात्मक शब्दात सूचना द्याव्या.

८) एकावेळी एकच जबाबदारी देऊन ती कशी योग्यरीतीने पार पाडावी यासाठी आवश्यक त्या सूचना द्या.

९) लहान किंवा नवीन मुलांना सोबतीने साहाय्यक किंवा गटातून जबाबदारी द्या.

१०) इलेक्ट्रिक तसेच इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करणारी मुले मुली अनुभवी व निपुण आहेत याची खात्री करा.

११) स्टेजवर तसेच समोर येऊन काम करणाऱ्या मुलांना योग्य वागणूक तसेच शिष्टाचारांची माहिती द्या.

१२) प्रत्येक यशस्वी कामाच्या व कार्यक्रमाच्या नंतर सहभागी विद्यार्थ्यांच्या अभिनंदनाचा कार्यक्रम घेऊन प्रोत्साहन देण्यात यावे व बक्षीस दिले जावे.

१३) हाच पार पडलेला कार्यक्रम शालेय अधिक कमी खर्चात व अधिक सुटसुटीत कसा करता आला असता या बाबत चर्चा घडवून आणावी .

१४) वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्याचा नेहमी प्रयत्न असावा.

**मार्गदर्शन सूचना विद्यार्थ्यांसाठी :**

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहातून कार्य करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना काही महत्त्वाच्या सूचना गटात सहभागी होतानाच देणे आवश्यक असते. त्यामुळे कार्यक्रम व्यवस्थापन समूहात दाखल होणारा विद्यार्थी व्यवस्थापनाची जबाबदारी घेऊन काम करण्यासाठी इच्छुक असणाराच समूहात येतो. ज्यांना कार्यक्रम व्यवस्थापनाचे संबंधीत काम करायची आवड तसेच तशा प्रकारच्या क्षमता व कौशल्ये विकसित करायची इच्छा असते तेच या समूहातून आणली नावे नोंदवतात. यामुळे काम करण्यास इच्छुकांना योग्य मार्गदर्शन करुन कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहात सहभागी करून घेता येते.

**विद्यार्थ्यांसाठी सूचना :**

१) कार्यक्रम आयोजनात वेगवेगळ्या भूमिका करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहात आपली नाव नोंदणी करावी.

२) ठराविक दिनांकापासून ठराविक दिनांक पर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या घरी विचारून व कार्यक्रम व्यवस्थापन समितीचे कामकाजाबाबत समजून घेऊन नाव नोंदवता येईल.

३) विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शालेय कार्यक्रमातून सहभागी होऊन वेगवेगळ्या जबाबदारी निभावण्याची संधी दिली जाईल.

४) शालेय कार्यक्रमात वेगवेगळ्या भूमिका करण्याचे निशूल्क प्रशिक्षण दिले जाईल.

५) कार्यक्रम समितीमध्ये काम करतांना वेगवेगळ्या नवनवीन गोष्टी शिकायला मिळतील.

६) विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन कौशल्य तसेच स्टेज डेअरिंग क्षमतेचा विकास घडून येईल.

७) कार्यक्रम समितीत वेगवेगळ्या विभागाच्या जबाबदारी सांभाळतांना आपल्या विभाग व गटाचे नेतृत्व करायची संधी मिळेल.

८) कार्यक्रम समितीमधे कार्यरत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासनाला मोठी चालना मिळेल.

**कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहात सहभागी विद्यार्थ्यांना खालील महत्त्वाच्या सूचना देणे हितावे ठरते :**

१) **सहभाग घ्या :** समूहात सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीत कार्यक्रमात आपल्या पूर्ण क्षमतेने सहभागी व्हा. प्रत्येक कार्यक्रम बैठक किंवा सभेला नियमितपणे बोलावलेल्या वेळेवर उपस्थित रहा.

२) **सक्रिय रहा :** प्रत्येक बैठकीत चाललेल्या चर्चेत सहभागी व्हा. आपले विचार व्यक्त करा. सभेच्या नोंदी ठेवा. आवश्यक ते काम स्वतः करायला पुढे या.

३) **जबाबदारी स्वीकारा :** आपल्याला जमत असलेल्या कामाची स्वतः जबाबदारी मागून घ्या. आपल्याला सोपवलेले काम वेळेत व योग्य प्रकारे पूर्ण करण्याची जबाबदारी घ्या.

४) **सांघिकतेने कार्य करा :** इतर सदस्यांसोबत मिळून मिसळून काम करा. इतरांच्या कामात मदत करा. तसेच इतरांकडून मदत घ्या. सर्वच काम आपले सर्वांचेच आहे अशी भावना ठेवा.

५) **सर्जनशील रहा :** नवीन कल्पनांचा विचार करा. त्यांची मांडणी करा. मित्र सहकारी व शिक्षकांकडे नवनवीन योजना मांडून त्यांना अंमलात आणायचे यशस्वी प्रयत्न करा.

६) **सकारात्मक रहा :** नेहमी सकारात्मक राहून मला हे जमेलच हे स्वतःला सतत सांगत रहा. उद्‌भवलेल्या अडचणी व समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. कोणतीही समस्या सोडवता येत नाही असे नाही हे समजुन घ्या.

७) **शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या :** गरज पडेल तेव्हा शिक्षकांना विचारा. त्यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यास संकोच करू नका. ते तुम्हाला मार्गदर्शन करायलाच तिथे आहेत याचा विश्वास ठेवा.

८) **काम करायला लाजू नका :** कोणतेही काम छोटे मोठे नसते. त्यामुळे कोणत्याही अगदी छोट्या कामाची लाज बाळगू नका. छोट्यात छोटे काम अतिशय उत्कृष्ट पद्‌धतीने करून दाखवण्यासाठी पूर्ण प्रयत्न करा.

९) **नवनवीन शिकत रहा :** आपल्याला येत नसलेले काम आपल्याला कसे येईल याचा विचार करा. नवनवीन काम शिकून घ्या. तुम्हांला येत असलेल्या कामांत अधिक कौशल्य व क्षमता विकासासाठी प्रयत्न करा.

१०) **मूल्यांकन करा :** शालेय कार्यक्रम समूहात सहभागी झाल्यावर आपल्या स्वतःमधे काय –काय बदल झाले त्याचे स्वयंमूल्यमापन करा. स्वतःमधील ज्या गोष्टी अधिक चांगल्या करायच्या असतील त्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या व प्रशिक्षण मिळवा.

११) **कृतिशील बना :** कोणतेही समूहातील काम कृतिशील कसे होईल याची काळजी विद्यार्थ्यांनी घ्यावी.

**शालेय उपक्रम व्यवस्थापन आयोजन नियोजन सूचना :**

महाराष्ट्र शासन व शालेय शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या वर्षभरातील ५३ जयंती व उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊ शकते. या सोबतच शाळेचे स्थापना दिवस, स्नेहसंमेलन, माजी विद्यार्थी स्नेहमिलन, विद्यार्थी निरोप समारंभ, शिक्षक व कर्मचारी निरोप व स्वागत समारंभ, शालेय क्रीडा स्पर्धा सप्ताह, विविध विषयांचे दिवस व उपक्रम यांचे आयोजन नियोजन करणे या समूहाकडे जबाबदारी म्हणून देता येईल.

**वार्षिक मासिक वेळापत्रक :**

१) **एप्रिल ते जून :** समूहात काम करू इच्छित विद्यार्थ्यांची नाव नोंदणी, समिती रचना व विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रशिक्षण देता येईल.

२) **जुलै ते सप्टेंबर :** शिक्षकांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन नियोजन व शिस्तबद्ध व्यवस्थापन करण्याची संधी दिली जाईल.

३) **ऑक्टोबर ते डिसेंबर :** निवडक विद्यार्थी यांना त्यांच्या क्षमता व आवड नुसार जबाबदारी देऊन कार्यक्रम आयोजनाची संधी दिली जाईल.

४) **जानेवारी ते मार्च :** वार्षिक मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन पूर्णपणे विद्यार्थ्यांना देऊन शिक्षकांकडून निरीक्षण व मार्गदर्शन होईल. सर्वांकडे जबाबदारी येईल या कडे लक्ष देण्यात यावे. शिक्षकांकडून दर महिन्यातील कार्यक्रमाचेनुसार बैठकीत आयोजनाची माहिती, साहाय्य, क्षमता व कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल. सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

**समूहातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे वेळापत्रक :**

शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह विद्यार्थी प्रशिक्षण खाली दिलेल्या १५ मुद्द्यांबद्दल सविस्तर समजावून देऊन विद्यार्थी वयाचा व स्तराचा विचार करून माहिती व प्रबोधनपर व प्रेरणादायक मार्गदर्शन केल्यास विद्यार्थी चांगले आकलन करून आपल्या क्षमता अधिक चांगल्या रितीने विकसित करून तसे उत्कृष्ट प्रदर्शन करू शकतील.

**प्रसंगी यात काही कमी जास्ती मुद्दे करता येतील :**

१) कार्यक्रम व्यवस्थापनाचे महत्त्व

२) कार्यक्रम व्यवस्थापनाचे तत्त्व

३) शालेय कार्यक्रम व्यवस्थापनाचे उद्देश

४) शालेय कार्यक्रम समिती समूहात काम करायचे फायदे (येणारे गुण, विकसित होणाऱ्या क्षमता व कौशल्यांची प्राप्ती)

५) शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहाचे कार्यात्मक उद्देश

६) शालेय कार्यक्रमाचे प्रकार

७) शालेय कार्यक्रम समितीचे कार्य विभाग व जबाबदारी

८) कार्यक्रम विभागांमधील समन्वय व सामंजस्य

९) कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांघिकतेचे महत्त्व

१०) कार्यक्रम विभाग निहाय प्रात्यक्षिक कार्य प्रशिक्षण

११) विभाग निहाय गटवार चर्चा व नवीन योजना आखणीचा दृष्टिकोन

१२) कार्यक्रमात इतर वेगवेगळ्या विभागाच्या प्रशिक्षणाची गरज व माहिती

१३) कार्यक्रम आयोजनात वेगवेगळ्या विभागातून सक्रिय सहभाग

१४) आयोजन व्यवस्थापनात झालेल्या चुका व त्रुटींची यादी व त्यावर उपायांचे बाबत चर्चा

१५) यशस्वी कार्यक्रम संचलनात संपूर्ण योग्य मदतीची गरज

### शासन/शिक्षण/क्रीडा विभाग कडून मदत :

शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या आयोजनात तज्ज्ञ मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकतात. इतकेच नव्हे तर महसूल विभाग, तालुका व जिल्हा प्रशासनाच्या व राज्य केंद्र सरकारच्या वेगवेगळ्या योजनांमधून अनेक उपक्रम राबवायला सहाय्य केले जाते. त्यांची मदत घेता येणे शक्य आहे. समन्वयाने घेतलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी थोड्या फार प्रमाणात आर्थिक मदत सरकारी कार्यालये व अधिकारी यांचेकडून होऊ शकते. त्याचप्रमाणे योग्य त्या नियमांत क्रीडा विभागाच्या विविध अनुदानाच्या योजनांचा लाभ घेऊन सुद्धा शाळा, विद्यार्थी व समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जाऊ शकतात. मात्र यासाठी त्या त्या विभागातील योग्य अधिकारी व व्यक्तींना वेळेत संपर्क व पाठपुरावा करणे आवश्यक असते.

आपल्या शाळेतील कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहातील विविध कौशल्ये व चांगल्या क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना समाजातून होत असलेल्या वेगवेगळ्या शासकीय वा खाजगी कार्यक्रमात आयोजन नियोजन सहाय्यासाठी स्वयंसेवक म्हणून जाता येईल. गावच्या यात्रा, जत्रा, गावातील मोठा धार्मिक कार्यक्रम, लग्न समारंभ, भागवत कथा, पंढरीची वारी, भंडारे, पाणपोई, बस स्टँड, रेल्वे स्टेशन, हॉस्पिटल, मॉल, पोलिस, वाहतूक शाखा आदी ठिकाणी व्यवस्थापनासाठी आपली सेवा देता येईल.

### समाजातील घटकांचे कडून मदत :

शालेय कार्यक्रमांसाठी समाजातील दानशूर व्यक्ती नेहमीच पुढे येतात एवढेच नव्हे तर शालेय कामकाजासाठी गोळा करावी. लागणारी मदत निधी वर्गणीसाठी साधारणपणे कोणी सामान्य व्यक्ती नकार देत नाही. आपल्या क्षमतेनुसार फूल ना फुलाची पाकळी आपले योगदान देण्याचा प्रयत्न करतात असे दिसते. योग्य वेळी योग्य त्या व्यक्तीकडे व वर्षातून किंवा दोन वर्षातून साधारण त्याला झेपेल अशी मदत मागितल्यास

त्यालाही मदत केल्याचा आनंद होतो. मात्र सदर मदतीचे हिशोब, नियमांनुसार सगळ्या परवानग्या व वस्तू, श्रम व निधी रूपात मिळालेले रकमेचा योग्य असा अंकेक्षणासह हिशोब ठेवणे आवश्यक असते. काही ठिकाणी माजी विद्यार्थी संघ किंवा पालक संघ स्वतःच आवश्यक ती आर्थिक तजवीज करून देतात. शाळेला फक्त सांगावेच की लगेचच लागणारे साहित्य, सोय, सुविधा, आवश्यक रक्कम लगेचच शाळेच्या सुपूर्द केली जाते. याच्या हिशेबाची जबाबदारी नसली तरीही शाळेला समाजाने दिलेल्या या वस्तू व श्रम स्वरूपातील देणग्यांचा सुद्धा योग्य तो सन्मान, नोंद आणि हिशेब ठेवणे गरजेचे असते. तरच मदतकर्ता पुन्हा मदतीला तयार होतो.

### विद्यार्थी व शिक्षकांची मदत :

समूहातील सहभागी विद्यार्थी व शिक्षक सोडून इतरांकडून सुद्धा वेगवेगळी मदत मिळवून कार्यक्रम व्यवस्थापन समितीचे कामकाज चांगले करता येऊ शकते. ज्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांत आवड गती क्षमता व कौशल्ये असतात त्याचा वापर कार्यक्रम व्यवस्थापन करतांना सहजतेने करता येऊ शकतो. हे विद्यार्थी जरी कार्यक्रम समुहात नसले तरीही सदर कार्यक्रम त्यांच्या आवडीच्या विषयाचा असेल तर नक्कीच त्याचे त्यासाठी चागंले योगदान देऊ शकतात. यासाठी फक्त योग्य कार्यक्रमासाठी योग्य काम करून देऊ शकणारा व योग्य क्षमता व कौशल्य असलेला आपला मित्र ओळख माहिती असलेला वर्गातील वा शाळेतील विद्यार्थी फक्त योग्य रितीने निवडायचा. असेच काही मदत करणारे माजी विद्यार्थी सुद्धा निवडता येतील. एवढेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांचे पालक (आई बाबा, काका काकी, मोठे दादा ताई, वहीनी, आजी आजोबा) सुद्धा आवडीने मदतीला येतात व आपले निशुल्क योगदान देऊ शकतात. गरज आहे फक्त त्यांना शोधून त्यांच्यापर्यंत पोहचण्याची व त्यांना विनंती करण्याची.

याच प्रमाणे ज्या विषयाचा कार्यक्रम आहे, त्या संदर्भित त्या विषयांचे शाळेतील शिक्षक तसेच काही माजी शिक्षक सुद्धा कार्यक्रमाच्या संकल्पना व नियोजन तयार करताना चांगली मदत करू शकतात. त्या त्या विषयाचे योग्य अद्ययावत ज्ञान त्यांना असल्याने तो कार्यक्रम चांगल्या गुणवत्तेचा होण्यासाठी आपल्या चांगल्या सूचना देऊ शकतात. त्यांच्या विषयाच्या ज्ञानाचा उपयोग करून घेऊन त्यांच्या अनुभवातून चांगले नियोजन केल्यास कार्यक्रम चांगला व यशस्वी होणे सहजच सोपे बनते. समूहातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारची मदत घेण्यास प्रोत्साहित करून स्वतःची क्षमता व कौशल्य वाढवायला संधी देणे आवश्यक आहे. ही बाब प्रशिक्षणादरम्यान तसेच कार्यक्रम नियोजन आयोजन बैठकीदरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगणे व त्यानुसार मदतीला येणारी नावे आठवण्याचा प्रयत्न करायला शिकवणे गरजेचे आहे. यातून इतरांना काय चांगले येते त्याची माहिती मिळते व त्याही पेक्षा सर्वांत महत्त्वाचे विद्यार्थ्यांकडून इतरांना त्यांचे प्राविण्य व कौशल्यासाठी मान्यता देणे शिकवणे सोपे होते.

**व्यवस्थापन कौशल्य शिकवणारी संस्था गावपातळीवरील :**

आपल्या गावात जवळपासच्या तालुका जिल्ह्यात वेगवेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन आयोजन आणि व्यवस्थापन करणाऱ्या संस्था असतात. त्यांना इव्हेंट मॅनेजमेंट संस्था म्हणतात. वाढदिवस, लग्न, मोठे भाषणाचे कार्यक्रम, मोठे क्रीडा सामने व स्पर्धा तसेच साहित्यिक कार्यक्रम योग्य पार पाडायला सुद्धा इव्हेंट मॅनेजमेंट संस्था मदत करतात. अशा संस्थामधील कार्यकारी अधिकरी, मालक किंवा व्यवस्थापक यांच्या मुलाखतीतून विद्यार्थ्यांना बरेच काही शिकायला मिळते.

आय.आय.एम सारखी भारतातील संस्था व्यवस्थापनाचे धडे देते. एन.आय.एस सारखी क्रीडा शिक्षण प्रशिक्षण संस्था क्रीडा व्यवस्थापनाचे विविध अभ्यासक्रम चालवते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विद्यापीठातून व्यवस्थापनाचे शिक्षण दिले जाते त्याबद्दल सुद्धा विद्यार्थ्यांना माहिती द्यायला हवी.

**संदर्भ ग्रंथ व साहित्य :**

१) सार्वजनिक ग्रंथालय २) ग्रंथालय ३) भिलार पुस्तकांचे गाव ४) वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्याने किमान ५ पुस्तके वाचून अभिप्राय सादर करणे ५) शिक्षण क्षेत्रातील शिक्षण तज्ज्ञ यांचे विचार वाचणे ६) शालेय व्यवस्थापन : डॉ. शैलेजा बांगळे (प्रशांत प्रकाशन)

**परिशिष्ट :**

**१) महिना व तारखे नुसार जयंती उत्सव यादी (जून ते मे) – शासन परिपत्रक नुसार आयोजन करणे**

**२) विषयानुसार महत्त्वाचे दिवस, उपक्रम व उत्सव कार्यक्रम यादी :**

- भाषा
- गणित
- विज्ञान
- इतिहास
- राज्यशास्त्र
- भूगोल
- अर्थशास्त्र
- कला
- कार्यानुभव
- शारीरिक शिक्षण
- पर्यावरण
- व्यवसाय मार्गदर्शन
- एनसीसी एमसीसी
- स्काऊट गाईड
- इतर तांत्रिक विषय
- व्यक्तिमत्त्व विकास

**३) कार्यक्रम आयोजन समूहाचे विविध विभाग**

**४) कार्यक्रम आयोजनासाठी लागणारे सामान्य साहित्य यादी**

५) **एखाद्या कार्यक्रमाची सामान्य रूपरेषा व कार्यक्रमपत्रिका**

- उद्घाटन कार्यक्रम
- समारोप कार्यक्रम
- बक्षीस वितरण कार्यक्रम
- भाषण/व्याख्यान/जयंती कार्यक्रम
- विशेष कार्यक्रम
- पाहुण्यांची निवड, ओळख व कार्य, स्वागत

६) **कार्यक्रम आयोजनासाठी लागणारे विविध पत्र, पत्रिका, अहवाल, बातम्या यांचे नमुने तयार करणे.**

- पाहुण्यांना विनंती पत्र
- उद्घाटन पत्रिका) कार्यक्रम पत्रिका) पाहुण्यांना धन्यवाद पत्र
- कार्यक्रमाचा अहवाल
- विविध परवानगी पत्र
- मागणी व साहित्यपुरवठा उपलब्ध करून देणे बाबत पत्र
- साहाय्यकांना आभार पत्र
- कार्यक्रमाचा हिशेब

७) **शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह विद्यार्थी प्रशिक्षण घटक संच व वेळापत्रक**

८) **शालेय कार्यक्रमाचे प्रकार व त्यातील उपक्रम यादी**

## परिशिष्ट १ :

अ) **महिना व तारखेनुसार जयंती उत्सव यादी–शासन परीपत्रक नुसार आयोजन करावे.**

- (शालेय शैक्षणिक वर्ष जून ते मे कॅलेंडर तयार करणे, शालेय पातळीवर मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय कार्यक्रम समिती यांनी मिळून नियोजन करणे.)

## परिशिष्ट २ : विषयानुसार महत्वाचे दिवस, उपक्रम व उत्सव कार्यक्रम यादी

अ) **विषय मराठी : साजरे केले जाणारे विविध दिवस व दिनविशेष**

- २७ फेब्रुवारी मराठी भाषा दिन साजरा करणे.
- प्र. के. अत्रे यांचा जन्म दिवस साजरा करणे.– ९ सप्टेंबर
- पु.ल. देशपांडे जन्मदिवस दि. १२ जून साजरा करणे.
- साने गुरुजी जन्मदिन दि. ११ सप्टेंबर साजरा करणे.
- ना.सी. फडके जन्मदिवस : दि. १२ ऑगस्ट साजरा करणे.
- विविध कवींचे जन्मदिन त्यांचे उपक्रम घेऊन साजरे करणे.
- वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस २१ सप्टेंबर साजरा करणे.

- विविध लेखकांचे जन्मदिन विशेष उपक्रम घेऊन राबवणे.
- अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिवस–१ ऑगस्ट साजरा करणे.
- साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
- लेखक व कवी यांच्या मुलाखती आयोजित करणे.
- पुस्तके, ग्रंथ, कवितासंग्रह नाटकांचे वाचन करणे.
- पुस्तक वाचून त्यावर अभिप्राय देणे.
- कथा, कविता, निबंध लेखन स्पर्धा आयोजन करणे.

**ब) विषय हिंदी : साजरे केले जाणारे विविध दिवस व दिनविशेष**

- १४ ऑक्टोबर–हिंदी दिवस साजरा करणे.
- विविध हिंदी कवींचे जन्मदिन साजरे करणे.
- विविध हिंदी लेखकांचे जन्मदिवस साजरे करणे.
- विविध हिंदी पुस्तके, काव्य संग्रह.

**क) विषय इंग्रजी : साजरे केले जाणारे विविध दिवस व उपक्रमांची यादी**

- २३ एप्रिल विश्व आंतरराष्ट्रीय भाषा दिन साजरे करणे.
- विविध भारतीय व परदेशी कवींचे जन्मदिन वाचन करणे.
- भारतीय व परदेशी इंग्रजी लेखकांचे जन्मदिन साजरे करणे.
- इंग्रजी कथा कविता नाटकांचे वाचन करणे.

**ड) विषय विज्ञान : साजरे केले जाणारे विविध उपक्रम व दिनविशेष**

- राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करणे. (२८ फेब्रुवारी)
- विज्ञान प्रदर्शन – शाळा तालुका, जिल्हा आयोजन करणे.
- विश्व जल दिन २२ मार्च
- विज्ञान प्रश्नमंजूषाचे आयोजन व स्पर्धा नियोजन करणे.
- विश्व आरोग्य दिन ७ एप्रिल
- प्रसिद्ध वैज्ञानिकांचे जन्मदिवस साजरे करणे.
- आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिवस २२ मे
- अविष्कार जन्मदिवस साजरे करणे.
- विज्ञान कोपऱ्याचे दैनिक नियोजन व संचलन करणे.

- विज्ञान प्रयोग सादरीकरणाची स्पर्धा आयोजन करणे.
- भारतीय वैज्ञानिकांची माहिती देणे.
- विज्ञानपट व विज्ञानावर आधारित पुस्तकांचे वाचन करणे.

**इ) विषय गणित : साजरे केले जाणारे विविध दिवस व उपक्रम व दिनविशेष**

- राष्ट्रीय गणित दिवस २२ डिसेंबर साजरा करणे.
- गणित सप्ताह आयोजित करणे.
- गणित मॉडेल प्रदर्शन आयोजित करणे.
- गणितीय प्रश्नमंजूषा स्पर्धा घेणे.
- गणितिय खेळ दिवसाचे संचलन करणे.
- गणितीय कोडे दिवस राबविणे.
- गणित प्रावीण्य परीक्षा आयोजित करणे.
- गणितीय प्रमेय मॉडेल प्रदर्शन भरवणे.
- विविध सूत्रांचे प्रदर्शन भरवणे.
- विविध आकृत्यांचे प्रदर्शन भरवणे.

**फ) विषय इतिहास : साजरे केले जाणारे विविध दिवस उपक्रम व दिनविशेष**

- राष्ट्रीय एकता दिवस ३१ ऑक्टबर साजरा करणे.
- शाळेचा, संस्थेचा स्थापना दिवस वर्धापन दिन साजरा करणे.
- युद्ध, तह, करार, बैठक दिवसांची माहिती व महत्त्व सांगणे.
- इतिहास प्रदर्शन भरवणे साहित्य, शस्त्र, नाणे, वस्त्रे, वस्तू.
- इतिहास विषयी सामान्य ज्ञान स्पर्धा घेणे.
- ऐतिहासक प्रश्न मंजूषाचे आयोजन करणे.
- ऐतिहासिक विषय वा घटनेवर आधारित व्याख्यान ठेवणे.
- किल्ले बांधणी स्पर्धा आयोजन करणे.

**ग) विषय भूगोल : साजरे केले जाणारे विविध दिवस व उपक्रमांची यादी व दिनविशेष**

- राष्ट्रीय भूगोल दिवस १४ जानेवारी साजरा करणे.
- भूगोल मॉडेल प्रदर्शन आयोजित करणे.
- विविध भौगोलिक दिन साजरे करणे.

- भूगोल सप्ताह साजरा करणे.
- भूगोल प्रश्नमंजूषाचे आयोजन स्पर्धा घेणे.
- नकाशा दर्शन व स्पर्धा आयोजन करणे.
- घरबसल्या शहर दर्शन ऑनलाईन ॲपद्वारे घडवणे.
- वर्ग खोलीत बसून विदेश संचार करणे. (ऑनलाईन भेट देणे.)
- ऑनलाइन अवकाश दर्शन आयोजित करणे.
- सूर्यमाला व ग्रहतारे दर्शन व प्रशिक्षण देणे.

**ह) विषय शारीरिक शिक्षण : साजरे केले जाणारे दिनविशेष व उपक्रम**

- शारीरिक शिक्षण दिन दि. २४ जानेवारी साजरा करणे.
- २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करणे.
- २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करणे.
- १२ ते १८ डिसेंबर राष्ट्रीय क्रीडा सप्ताह साजरा करणे.
- आंतरराष्ट्रीय सूर्यनमस्कार दिवस रथसप्तमी साजरी करणे.
- विविध खेळांचे दिवस साजरे करणे जसे सॉफ्टबॉल १३ जून.
- शालेय क्रीडा दिन साजरा करणे.
- शालेय क्रीडा सप्ताह साजरा करणे.
- विविध खेळांच्या खेळाडूंच्या मुलाखती आयोजित करणे.
- जीम, व्यायामशाळा, स्टेडीयम, स्पर्धा स्थळाला क्षेत्र भेट देणे.
- शालेय आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा आयोजन करणे.
- शालेय गटांची सायकलिंग स्पर्धा आयोजन करणे.
- शालेय स्तरावर मॅरेथॉन स्पर्धा आयोजन करणे.
- शालेय स्तरावर वॉकॅथॉन स्पर्धा आयोजित करणे.
- विविध क्रीडा प्रशिक्षण आयोजित करणे.
- लाठीकाठी व विविध शस्त्र प्रशिक्षण आयोजित करणे.
- स्वसंरक्षण प्रशिक्षण आयोजित करणे.
- शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करणे.
- शालेय मैदानावर आपले क्रीडा सादरीकरण करणे.

- योग शिबीराचे आयोजन करणे.
- उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणे.
- सकाळ सायंकाळ मैदानावर क्रीडा सराव आयोजित करणे.
- आरोग्य व आहार मार्गदर्शन शिबीर आयोजित करणे.
- वैयक्तिक काळजी व निगा मार्गदर्शन मेळावा घेणे.
- शारीरिक सुदृढता चाचणीचे आयोजन करणे.
- क्रीडा नैपुण्य चाचणीचे आयोजन करणे.

## परिशिष्ट ३ : शालेय कार्यक्रम व्यवस्थापन आयोजन समुहाचे विविध विभाग

- नियोजन विभाग
- आर्थिक विभाग
- अतिथी व पाहुणे निमंत्रण व स्वागत विभाग
- संचलन, आभार प्रदर्शन व उद्घोषणा विभाग
- स्टेज/मंचविभाग
- बैठक व बिछायत विभाग
- माईक व साऊंड विभाग
- प्रकाश योजना विभाग
- प्रोजेक्टर व संगणक सादरीकरण व हाताळणी विभाग
- विविधपत्र, पत्रिका व अहवाल विभाग
- स्वागतिका व नोंदणी विभाग
- समस्या व तक्रारनिवारण विभाग
- सुरक्षा विभाग
- स्वयंसेवक विभाग
- बक्षिसे, स्मृतिचिन्ह व पारितोषिक विभाग
- सहभाग व प्रावीण्य प्रमाणपत्र विभाग
- मार्ग, परीसर, बैठक व मंच स्वच्छता विभाग
- प्रसिद्धी विभाग
- फोटो व व्हिडिओ विभाग
- रांगोळी व सजावट विभाग

- पिण्याचे पाणी, उपाहार व चहापान विभाग
- शालेय साहित्य उपलब्धता, वितरण व पुरवठा विभाग
- पुष्पगुच्छ, हार व सजावट फुले विभाग
- निरीक्षण व पर्यवेक्षण विभाग
- आपत्कालीन तत्पर कृती विभाग
- शिस्त व नियंत्रण विभाग
- संगणकिय कार्य विभाग
- स्वच्छता व प्रसाधन गृहव्यवस्था

## परिशिष्ट ४ : कार्यक्रम आयोजनासाठी लागणारे सामान्य साहित्य यादी

- **स्टेज/मंच व्यवस्था :** मागचा पडदा, व्यासपीठ, कार्यक्रम बॅनर, समोरचा पडदा, जमिनीवर टाकायची सतरंजी मॅटीन, शामियाना, मंच, खुर्च्या, सोफे, पोडीयम (भाषणाचा टेबल), पाहुण्यांच्या समोर टेबल, चादर, माईक, माईक स्टँड, फोटो, कुंकू हळद अक्षदा उदबत्ती आगपेटी फुले, उदबत्ती स्टॅन्ड, पूजेचे ताट, फुले हार, समयी, तेल, वाती, मेणबत्ती, पुष्पगुच्छ, टेप, स्टॅपलर, सुईदोरा, खिळे हातोडी, तार, बारीक दोरी, तबक, ट्रे, पाण्याच्या बॉटल, पेले, कार्यक्रम पत्रिका होल्डर, कागदावर वजन, पेन पेन्सिल, उद्घाटन पत्रिका, शाल, नारळ, स्मृतिचिन्ह, फेटे, बिल्ले, सेफ्टिपीन, यूपीन, टाचणी, पृष्ठ ४ (एक्झाम पॅड), कोरे कागद पेन पेन्सिल इरेझर, शार्पनर, पाहुण्यांची बैठक व्यवस्था– साठी खुर्चीवर लावायला त्यांची नावे प पदे, ओवाळणीचे ताट, पंखा, कुलर, एसी.
- **बैठक व्यवस्था :** सफाई, पाणी मारणे, जमीन समपातळीत करणे, (झाडू, खराटा, कुदळ, फावडे, टोपले, टिकास, सुपडी, हातोडा,) सतरंजी, गाद्या, तढव, ताडपत्री, मॅट, मॅटीन, प्लास्टिक तढव, बसायला पट्ट्या, खुर्ची, सोफे, दोरी, आखणी साठी दोरी, चुना, टेप, खिळे, सुतळी, नारळाची दोरी, शामियाना, मंडप, कनाती, बाजुला पडदा, बैठक व्यवस्था बोर्ड, (मुले मुली पुरुष महिला पत्रकार पालक, मान्यवर निमंत्रित, शिक्षक कर्मचारी, संस्था पदाधिकारी व सदस्य वैगेरे) पंखा, कूलर, डेस्क बेंच, पाण्याची व्यवस्था (जागेवर–ट्रे, पेले, जग, मग, पाण्याचा पेला–भांडे)
- **संचलन/प्रास्ताविक/उद्घोषणा/आभार प्रदर्शन :** कार्यक्रमपत्रिका, उद्घाटन पत्रिका, आलेले पाहुणे यादी, वेळेवर येणारे पाहुणे नावे व माहिती, कार्यक्रम उद्देश, आयोजक व समितीची माहिती, कार्यक्रमाची संपूर्ण माहिती इतिहास व पुढची वाटचाल, स्वागत करणाऱ्या व्यक्तींची नावे, भाषण करणाऱ्या व्यक्तींची नावे, वेळेवर बोलायला नावे आलेल्या किंवा इच्छा असलेल्या व्यक्तींची नावे, कार्यक्रमाचा क्रम, कार्यक्रमात वापरले जाणारे संगीत, वाद्यवृंद, साऊंड, माईक मोबाइल गाणे संगीत यांची यादी व त्यांचा वेळ व पूर्व तयारी, पाहुण्यांच्या भाषणांचा क्रम, मान्यवर सत्काराचा क्रम व सत्कार कोण कोणाचा करणार त्याची यादी, कोणाला काय बक्षीस, स्मृतिचिन्ह देणार त्यांची यादी व

क्रम, वेगवेगळी गीते, नृत्य, नाट्य सादरीकरणाची यादी व त्यात सहभागी विद्यार्थ्यांची यादी व त्यांच्या सादरीकरणाचा विषय. समोरच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करतील अशी शेर शायरी व श्लोक व मान्यवरांची वचने व बोधकथा, प्रासंगिक माहिती, मान्यवरांच्या भाषणाचा सारांश, त्यांच्या आवाहनाची नोंद, प्रासंगिक उद्घोषणा व सूचनांची क्रमवार यादी व सुटसुटीत भाषा व सुयोग्य सकारात्मक शब्द रचना.

- **उद्घाटन कार्यक्रम :** लेस, फित, कात्री, ट्रे, खिळे, हातोडी, टाचणी, टेप, पूजेचे ताट, नारळ, उदबत्ती, माचिस, कापूर, मोठा दगड (नारळ फोडायला) हार फुले, बॅनर, पॅकिंग पेपर, समयी, तेल, वात, मेणबत्ती, बॅनर, चुना आखायला.
- **बक्षीस वितरण समारंभ :** बॅनर, बक्षिसे, मेडल्स, लेस, रीबीन, ट्रॉफी, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, रोख रक्कमसाठी लिफाफे, ट्रे, बक्षिसे सजवायला टेबल, चादर, पोडीयम, प्रथम द्वितीय, तृतीयसाठी विजयी मंच.
- **विज्ञान/गणित प्रदर्शन :** बॅनर, प्रयोग व उपक्रम संख्यानुसार टेबल डेक्स, चादरी, तक्ते, चार्ट, कोरे कागद, प्रयोग व उपक्रमांची नावांची स्टिकर किंवा कागद, सहभागी विद्यार्थ्यांना बसायला बेंच खुर्ची, इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी विज पुरवठा, स्विच, बटण, वायर, एक्स्टेंशन बॉक्स, माती, सुतळी, नारळाची दोरी, पिन टाचणी, युपी स्टॅपलर, पेन, पेन्सिल, शार्पनर, इरेझर, स्केच पेन, हायलायटर, सेंचुरी पेपर, पॉईंटर, प्रोजेक्टर, संगणकसाठी टेबल खुर्ची.
- **व्याख्यान/भाषण/मुलाखत :** बॅनर, खुर्ची, टेबल, चादर.
- **क्रीडा स्पर्धा :** बॅनर, मैदान स्वच्छतासाठी झाडू, खराटा, सुपडी, फावडे, कुदळ, सब्बल, टिकाव, रोलर, पाण्याचा पाईप, झारी, बादल्या, मग, आखण्यासाठी चुना पोते, दोरी, जाडा दोरा, तार, खिळे, हातोडी, छोट्या बादल्या, रंगीत माती, रांगोळी, भुसा, पाण्याचा रंग वेगवेगळ्या रंगांचा, फुगे वेगवेगळ्या रंगांचे हायड्रोजन भरलेले, पुजनासाठी ताट, कुंकू हळद अक्षदा, उदबत्ती, माचिस, तेल, वात, दिवा, नारळ, फुले, हार, मोठा गोटा, लेस, रीबीन कात्री, ट्रे, अंतिम रेषेसाठी रिबीन किंवा लेस, गुणफलक, कोरे कागद पेन पेन्सिल स्केच पेन, रायटिंग पॅड, एक्झाम पॅड, क्रीडा साहित्य खुर्च्या, टेबल, चादरी, डेक्स बेंच, चमुंचे नावाचे फलक, कोन, झेंडा, ध्वजस्तंभ, मशाल, स्पर्धा अग्नी स्थान, भाग्यपत्रक, गुणपत्रक, स्पर्धा सहभाग व गुणांकन नमुने, स्पर्धा सहभाग प्रमाणपत्र, स्पर्धा प्रावीण्य प्रमाणपत्र, स्पर्धा मेडल, पदके, ट्रॉफी, चषक, ढाल, स्मृतिचिन्ह, विजय पोडीयम, रोख बक्षीससाठी लिफाफे, टोप्या, टिशर्ट, बिल्ले, बॅचेस.
- **गाण्याचे कार्यक्रम :** बॅनर, माईक, स्पकर, साऊंड, वाद्यवृंद, वाद्य, टेबल खुर्ची, मिक्सर, वेगवेगळे प्रकारचे माईक, वाद्य व संगीत साहित्य, इलेक्ट्रॉनिक्स साहित्यासाठी विजेचा पुरवठा, आवश्यक

तितके प्लग, बटण, प्लास्टिक पन्नी झाकायला, गायकांना बसायला, सोफे, चादरी, पोडीयम, भारतीय बैठकीसाठी गाद्या, लोड.

- **सादरीकरण/परीसंवाद :** बॅनर, खुर्च्या, टेबल, माईक, संगणक, प्रोजेक्टर, नोट्स पॅड, पेन, पेन्सिल, इरेजर, बैठक व्यवस्था.
- **नाटक/नृत्य/नाटुकली/एकपात्री प्रयोग :** बॅनर, स्टेज, पडदा, माईक, वाद्य, वादकांची बैठक व्यवस्था, वाद्यासाठी माईक, निवेदक.
- **जयंती/पुण्यतिथी कार्यक्रम :** राष्ट्रपुरूष, महान नेते यांचे फोटो, हार, फुले, पुजेचे ताट, उदबत्ती, काडीपेटी.
- **राष्ट्रीय दिन उत्सव :** चुना, आखणी दोरी, ध्वज, ध्वजारोहण खांब, दोरी, फोटो, बक्षिसे, खाऊ, सादरीकरण साहित्य.
- **चित्रकला स्पर्धा :** बॅनर, मोकळी जागा, डेक्स बेंच, पाणी, स्पर्धक नोंदणी तक्ते, माईक, बक्षिसे.
- **चित्र/शिल्प/रांगोळी स्पर्धा व प्रदर्शनी :** आवश्यकतानुसार मोकळी जागा, चित्रे लटकवायला तार दोरी, चित्रे शिल्पं ठेवायला टेबल, उद्घाटनसाठी रिबीन कात्री लेस, ट्रे, नारळ, पूजा ताट, समई, तेल वात, तेल, मचीस, मेणबत्ती.
- **पुस्तक प्रदर्शन/नाणे व नोटा प्रदर्शन :** वरीलप्रमाणे.
- **भाषण/वादविवाद/बचाव स्पर्धा सादरीकरण परीसंवाद प्रमाणे.**
- **निबंध लेखन स्पर्धा/सामान्य ज्ञान स्पर्धा चित्रकला स्पर्धा प्रमाणे.**

## परिशिष्ट ५ : एखाद्या कार्यक्रमाची सामान्य रूपरेषा व कार्यक्रमपत्रिका

**अ) उद्‌घाटन कार्यक्रम** **ब) समारोप कार्यक्रम** **क) बक्षिस वितरण कार्यक्रम**

**ड) भाषण/व्याख्यान/जयंती कार्यक्रम** **इ) विशेष कार्यक्रम**

- पाहुण्यांचे आगमन (लेझीम व नृत्य)
- फोटो प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन
- पाहुण्यांचे स्वागत (स्वागत गीत)
- पाहुण्यांचा परिचय व कार्याचा आढावा.
- कार्यक्रमाचे प्रास्ताविक
- पाहुण्यांचे भाषण
- कार्यक्रमाचे उद्‌घाटन
- नृत्य, गायन, वादन, संगीत सादरीकरण.

- पाहुण्यांचे भाषण
- पंच, परिक्षक, कार्यकर्ते, विशेष योगदान देणारे, प्रायोजक, समर्थक यांना सन्मान
- बक्षीस वितरण कार्यक्रम
- पाहुण्यांना स्मृतिचिन्ह वाटप
- अध्यक्षीय भाषण
- आभार प्रदर्शन
- सामूहिक गोड स्मृती फोटो
- मान्यवरांचे चहापान
- विद्यार्थ्यांसाठी सुचना
- विद्यार्थ्यांना अल्पोपाहार किंवा खाऊ

## परिशिष्ट ६ : कार्यक्रम आयोजनासाठी लागणारे विविध पत्र, पत्रिका व अहवाल यांची यादी

- पाहुण्यांना कार्यक्रमास येण्यासाठी परवानगी देण्याचे विनंतीपत्र
- उद्घाटन पत्रिका/निमंत्रणपत्रिका
- निमंत्रण पत्रिकेसह पाहुण्यांना आमंत्रणपत्र
- कार्यक्रमपत्रिका
- संचलनासाठी साहाय्यक पाहुणे नावे यादी, पाहुण्यांचा परिचय, स्वागत करणार नावांची यादी, बक्षीस पात्र विद्यार्थी यादी, स्वागत सन्मान, सत्कार होणार (सत्कार मुर्ती) व हस्ते करणार यादी, कार्यक्रमातील सादरीकरण व करणार गट व विद्यार्थी यांची यादी,
- पाहुण्यांना धन्यवाद पत्र
- कार्यक्रमाचा अहवाल
- विविध परवानगी पत्र
- मागणी व साहित्य पुरवठा उपलब्ध करून देणेबाबत पत्र
- साहाय्यकांना आभार पत्र/धन्यवाद पत्र
- कार्यक्रमाचा हिशोब
- कार्यक्रम प्रसिद्धी बातमी वर्तमानपत्र कात्रणे व फोटा
- कार्यक्रमाचे बद्दल मान्यवर/पालक/शिक्षक/विद्यााथी/समिती सदस्य यांचा अभिप्राय

## परिशिष्ट ७ : शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूह विद्यार्थी प्रशिक्षण घटकसंच व वेळापत्रक

- व्यवस्थापनाचे महत्त्व (३ मिनीटे)
- व्यवस्थापनाचे तत्त्व (२ मिनीटे)
- व्यवस्थापनाचे उद्‌देश (३ मिनीटे)
- शालेय कार्यक्रम समिती समूहात काम करायचे फायदे (५ मिनीटे)
  (येणारे गुण, विकसित होणाऱ्या क्षमता व कौशल्यांची प्राप्ती)
- शालेय कार्यक्रम व्यवस्थापन समिती समूहाचे कार्यात्मक उद्‌देश (३ मिनीटे)
- शालेय कार्यक्रमाचे प्रकार (३ मिनीटे)
- शालेय कार्यक्रम समितीचे कार्य विभाग व जबाबदारी (११ मिनीटे)
- कार्यक्रम विभागांमधील समन्वय व सामंजस्य (५ मिनीटे)
- कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांघिकता (२ मिनीटे)
- विभागवार प्रात्यक्षिक कार्य प्रशिक्षण (६० मिनीटे)
- विभागनिहाय गटवार चर्चा व नवी योजना आखणी (१० मिनीटे)
- आवडीच्या गटाचे/विभागाचे प्रशिक्षण ( ३० मिनीटे)
- इतर विभागाचे/गटाचे प्रशिक्षण (३० मिनीटे)
- कार्यक्रम आयोजनात सक्रिय सहभाग जवाबदारीचे वाटप (५ मिनीटे)
- झालेल्या चुका व तृटींची यादी व त्यावर उपायांबाबत चर्चा (२० मिनीटे)
- यशस्वी कार्यक्रम संचलनात संपूर्ण योग्य मदत (२ मिनीटे)

## परिशिष्ट ८ : कार्यक्रम व्यवस्थापन समूहाद्‌वारे घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचे प्रकार

**अ) शालेय कार्यक्रमाचे खालील प्रमाणे सामन्यात : एकुण ५ प्रकार पडतील**

- व्यवस्थापनाचे महत्त्व (३ मिनीटे)
- शासन निर्णयानुसार सर्व जयंती व कार्यक्रम आयोजन (शासन परीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. जपुती–२०२२/प्र.क्र.१२०/कार्या–२९, दि.१८.०१.२०२३ चे परिशिष्ट, सन २०२३ मध्ये मंत्रालय, शासकीय/निमशासकीय कार्यालयात साजरे करावयाच्या जयंती/राष्ट्रीय दिन कार्यक्रमांची यादी)
- शालेय विषयनिहाय व छंद समूह आणि क्लब निहाय कार्यक्रम
- शाळेचे नित्य उपक्रम व वार्षिक उपक्रम
- राष्ट्रीय कार्यक्रम
- खाजगी संस्था संघटनाद्‌वारा शाळेच्या समन्वयाने आयोजित कार्यक्रम

❑❑❑

# २०. सामाजिक कार्य व सर्वेक्षण समूह

## सामाजिक कार्य व सर्वेक्षण समूह :

सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण हे शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे विषय असून समाजाच्या मूलभूत समस्या, गरजा आणि विकासाचे विविध पैलू यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी या विषयांचा उपयोग होतो. या समूहाचा उद्देश विद्यार्थ्यांना समाजाशी जोडून त्यांच्यातील सहानुभूती, विश्लेषणात्मक दृष्टिकोन आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचा विकास करणे आहे. सामाजिक कार्य हा समाजाच्या वंचित, दुर्बल आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणारे क्षेत्र आहे. तर, सर्वेक्षण या प्रक्रियेद्वारे समाजाच्या वेगवेगळ्या घटकांमधील माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण आणि सादरीकरण केले जाते.

## उद्दिष्टे :

१) समाजातील उपेक्षित घटकांसाठी कार्यशील दृष्टिकोन निर्माण करणे.

२) सामाजिक समस्यांची जाणीव निर्माण करणे.

३) सर्वेक्षण तंत्रज्ञानाचा वापर शिकवणे.

## उपक्रम :

१) सर्वेक्षण प्रकल्प : स्थानिक समस्यांवर सर्वेक्षण व उपाय सुचवणे.

२) स्वच्छता अभियान : शाळा व परिसर स्वच्छतेसाठी उपक्रम.

३) आरोग्य जनजागृती : तंबाखू, प्लास्टिक टाळण्यासाठी शिबिरे.

४) वृद्धाश्रम, अनाथाश्रम, सामाजिक संस्थांना भेट व मदत.

५) समाज प्रबोधन : समाजातील समकालीन आव्हानांवर चर्चा सत्रे.

६) निरूपयोगी वस्तू संकलन करणे व नंतर त्यांचे गरजूंना वितरण.

७) बालसुधारगृहास भेटी देणे.

८) लेखनिकाचे कार्य करणे.

९) वयोवृद्ध नागरिकांना मदत करणे.

१०) विविध शासकीय कामांमध्ये सहभाग देणे.

११) गरजू विद्यार्थी व गरजू कुटुंबांना साहाय्य करणे.

१२) स्काऊट गाईड संबंधी उपक्रम घेणे.

१३) आपत्ती व्यवस्थापनासाठी कामकाज करणे.

१४) पोलिस यंत्रणासाठी दुवा म्हणून काम करणे.

१५) विविध सामाजिक संस्थांच्या उपक्रमात सहभागी होणे.

१६) नोबेल, रेमन मॅगसेस, ज्ञानपीठ, अर्जुन पुरस्कार इ. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पुरस्कारची माहिती देणे.

१७) दिव्यागांच्या मदतीसाठी कामकाज करणे.

१८) हेल्पलाईन नंबरचा उपयोग याबाबतची माहिती.

**सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूहाची रचना :**

शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक स्तरासाठी सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी सामाजिक कार्य आणि सर्वे क्षण विषयक राबवलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा सामाजिक कार्य/ समाजशास्त्र/अर्थशास्त्र/मानवी विकास विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील सामाजिक कार्य/ समाजशास्त्र/अर्थशास्त्र/मानवी विकास विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

**सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूहाची जबाबदारी व कार्ये :**

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकाच्या मदतीने पर्यावरण सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचवण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

## सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती/अहवाल करण्यासाठी संकलित करावी.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे  जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध संपर्क माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

## सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :

सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समुहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

### अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना :

१) प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

२) इतिहासविषयक जिज्ञासा वाढवण्यासाठी प्रश्न विचारावेत.

३) उपक्रमादरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.

४) उपक्रमादरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.

५) शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना :**

१) उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

२) विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३) उपक्रमादरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.

४) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

५) उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे यासाठी नियोजन करावे.

६) आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

७) केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबवण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण घेवून देवाणघेवाण करावी.

## शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरूक्ती होवू नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समुह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

## शालेय सामाजिक कार्य आणि सर्वेक्षण समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) वस्तुसंग्रह भरवणे, व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनविशेष :

**सामाजिक कार्य व सर्वेक्षण**

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | ०३ जानेवारी | बालिका दिन/सावित्रीबाई फुले जयंती |
| २) | २० फेब्रुवारी | जागतिक सामाजिक न्याय दिन |
| ३) | ०८ मार्च | आंतरराष्ट्रीय महिला दिन |

| | | |
|---|---|---|
| ४) | १३ मे | राष्ट्रीय एकता दिन |
| ५) | १५ मे | जागतिक कुटुंब दिवस |
| ६) | ०८ सप्टेंबर | जागतिक साक्षरता दिन |

**समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :**

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडणे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करणे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती देणे.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी/बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

**शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :**

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/ शाळा व्यवस्थापन विकास समिती (SMC/SMDC) सोबत बैठक घेतील. या समूहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक प्रपत्रामध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

**समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व SCERT कडून साहाय्य :**

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत online/offline/संसाधने/पुस्तके/साहित्य :**

**१) ऑनलाइन :** उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स, उदा. इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओज.

**२) ऑफलाइन :** संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

३) **संदर्भ पुस्तके :**

- पब्लिक पॉलिसी अँड सोशलवेलफेअर–टी. आर. रघुनाथन
- सोशील वर्क प्रिन्सिपल अँड प्रॅक्टिसेस–एन. एस. देसाई
- सरकारी योजनाचे मार्गदर्शक पुस्तके.

**शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :**

**अ) उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे २) सहभागींनी केलेले कार्य ३) उपक्रमाचा परिणाम/यश

**ब) वार्षिक अहवाल :** १) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे ३) पुढील वर्षासाठी शिफारसी.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी साहाय्यभूत ठरणारे मुद्दे :**

१) गटासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**समूहांमुळे शाळेस होणारे फायदे :**

**फायदे :** १) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) शाळेचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावेल.

❑❑❑

# २१. वाचन समृद्धी समूह

## प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात वाचनाचा संस्कार होणे अतिशय लाभदायक आहे. अगदी पहिलीपासून विद्यार्थी चित्रकथा पाहून नवीन गोष्टी अवगत करतात. विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार होण्याकरिता व त्यांचे वाचन कौशल्य आणि शैक्षणिक क्षमता विकसित करणे हा वाचन समृद्धी समूहाचा मुख्य उद्देश आहे.

## वाचन समृद्धी समूहाचे ध्येय :

१) वाचन संस्कार करणे.

२) शैक्षणिक पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त अवांतर वाचन करण्यास प्रवृत्त करणे.

३) वाचनाने शब्द संपत्ती वाढवणे.

४) वाचन साहित्याचे आदान प्रदान करणे.

५) गतीवाचन करण्याचे कौशल्य विकसित करणे.

६) इतर शाळेतील शैक्षणिक वाचनालयांना भेटी देऊन शैक्षणिक वाचन साहित्याची माहिती करून घेणे.

७) पुस्तक वाचनाची आवड वाढवून विविध पुस्तकांचा स्वत:चा पुस्तक संग्रह वाढवणे. (इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी)

८) शालेय वाचनालयाव्यतिरिक्त सार्वजनिक वाचनालयांना भेट देऊन तेथील वाचन साहित्याची माहिती घेणे. (इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी)

९) विविध वाचन साहित्याच्या वाचनावर आपला स्वत:चा अनुभव लिहिण्यास प्रवृत्त करणे.

१०) राष्ट्रीय दिनानिमित्त सामूहिक वाचन कार्यक्रमाचे आयोजन करणे.

## वाचन समृद्धी समूहाचे उद्देश :

१) शालेय शैक्षणिक वर्षात विविध वाचन कार्यक्रम आयोजित करणे.

२) वाचन कार्यक्रमाद्वारे वाढलेली शैक्षणिक गुणवत्ता व कौशल्याबाबत निबंध स्पर्धा आयोजित करणे.

३) वर्तमान पत्रात प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तक परीक्षणांद्वारे स्वत:च्या आवडीच्या विषयांची कोणती पुस्तके प्रकाशित झाली याविषयी माहिती गोळा करणे.

४) वर्षभरात जो विद्यार्थी सर्वांत जास्त पुस्तके वाचेल त्याला सन्मानपत्र देणे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी स्वत:चे वाचन साहित्य (कविता, लघुकथा, निबंध) तयार केले असेल अशा साहित्याचे वार्षिक पुस्तक तयार करणे. (इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी.)

६) वाचन साहित्याचे थोडक्यात परिक्षण व विवेचन करणे. (इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी.)

७) एखाद्या विषयाच्या वाचलेल्या पुस्तकांवरील मुद्द्यांवर वादविवाद स्पर्धा आयोजत करणे. (इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी.)

८) वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांची सूची तयार करणे. उदा. पुस्तकाचे शीर्षक, लेखक, प्रकाशक, पुस्तकाचे मूल्य, पुस्तकाची आवृत्ती (इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी.)

**वाचन समृध्दी समूह उपक्रम :**

शालेय विद्यार्थ्यांच्या अध्यापनास व सर्वांगीण विकासात पूरक ठरतील असे विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला, कल्पकतेला, सर्जनशीलतेला, उर्जेला व चिकित्सक वृत्तीला आणि अनुकरणशीलतेला सकारात्मक वाव देण्यासाठी वाचन समृद्धी समूहाद्वारे खालील उपक्रमाचे समावेश करण्यात यावा. उद्दिष्टांच्या अनुषंगाने वाचन संस्कार रुजवण्याकरिता खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी.

**१) शालेय वाचन उपक्रम :** शालेय वाचन उपक्रमाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या लेखन वाचन पाठांतर वाढीसाठी होतो. एका मिनिटात किती शब्द, वाक्य, ओळी विद्यार्थी वाचतो यावर त्याचा वाचन वेग ठरवता येतो. विद्यार्थ्यांना याचा उपयोग परीक्षेसाठी अभ्यासासाठी कमी वेळेत जास्त माहिती कशी लक्षात ठेवावी व त्याचे उपयोजन कसे करावे यासाठी होतो.

**२) वाचन कोपरे भरवणे :** शैक्षणिक वर्षात साजरे करण्यात येणारे विविध उत्सव–सण, संत समाजसुधारक, क्रांतिकारक यांच्या जयंती साजरी करताना आपण त्यांच्यावरील पुस्तके त्या दिवशी त्यांच्याकडून गट तयार करून वाचून घेणे त्यामुळे विद्यार्थांना ते संत, समाजसुधारक क्रांतीकारक सखोल समजतात.

**३) पाठ्यपुस्तकातील लेखक कवी याचे इतर साहित्य वाचण्यास प्रोत्साहन देणे :** पाठ्यपुस्तकातील लेखक कवी याचे इतर लेखन लेखसंग्रह कवितासंग्रह साहित्य विद्यार्थ्यांना वाचावयास देणे. म्हणजे विद्यार्थ्यांना इतर साहित्याचे ज्ञान होईल.

**४) शब्दकोश व विश्वकोशाचे वाचन :** विद्यार्थ्यांना शब्दकोश व विश्वकोश कसा बघावा. शब्दकोश व विश्वकोशाविषयी माहिती देणे आणि तो हाताळण्यास व प्रात्यक्षिक करण्यास देणे.

**५) क्षेत्र भेट :** विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या ग्रंथालयाना भेट देण्यास घेऊन जाणे. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या ज्ञान कक्षा विस्तारण्यास होईल व त्यांच्या माहितीत अधिक भर पडते.

**६) लेखकांशी पत्रव्यवहार :** विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकाच्या लेखकाशी पत्राद्वारे पुस्तक कसे वाटले? पुस्तकातील वाचलेले काय आवडले हे लिहुन पाठवतात.

**७) वाचलेल्या पुस्तकाचे आदान प्रदान करणे**

मुलांना २० च्या गटात बसवुन त्यांच्या समुहात वाचलेल्या पुस्तकावर चर्चा करणे. वाचनाचे अनुभव सांगणे, इतरांना वाचनास प्रवृत्त करणे, वाचलेल्या पुस्तकाचे आदानप्रदान करणे.

८) **विषयनिहाय पुस्तके वाचनास उपलब्ध करून देणे :** शैक्षणिक वर्षात असणारे सण उत्सव इ. उदा. १५ ऑगस्ट–स्वातंत्र्य दिन, १४ नोव्हेंबर–बालदिन.

९) **लेखन कार्यशाळा घेणे :** उदा. दोन शब्दांवर कथा लिहीणे. उदा. खरे बोलणे.

१०) **नाट्यवाचन कविता वाचन करणे :**

११) **विविध सप्ताह साजरे करणे :** उदा. मराठी राजभाषा सप्ताह

१२) **वाचन प्रेरणा दिन साजरा करणे :** भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम याचे जन्मदिनानिमित्त त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची माहिती घेऊन पुस्तके वाचणे.

१३) **भाषानिहाय सप्ताह :** भाषानिहाय सप्ताह ठरवून त्या सप्ताहात त्या भाषेतील पुस्तके वाचणे. उदा मराठी, हिंदी, इंग्रजी

१४) **गोकुळ अष्टमीला पुस्तक हंडी आयोजित करणे :** पुस्तकांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकून विद्यार्थांकडे जी चिठ्ठी यईल त्याने ते पुस्तक वाचणे.

१५) **वर्तमान पत्रांचे वाचन करणे :** दैंनदिन सवयीमधे वर्तमानपत्र वाचण्याची सवय लागावी याकरिता हा उपक्रम घेतला जातो.

१६) **स्वनिर्मित साहित्याचे प्रदर्शन :** विद्यार्थ्यांच्या स्वनिर्मित साहित्याचे प्रदर्शन करणे. काच फलकात माहिती लावणे.

१७) **चिकटवही तयार करणे :** मुलांना विविध विषयांची माहिती गोळा करून चिकटवहीत चिटकवणे.

१८) **विनामोबाइल किती वेळ आपण राहू शकतो हा उपक्रम राबवणे :**

**प्रमुख मुद्दे :**

**समूह प्रमुख :** प्राधान्याने ग्रंथपाल असावा.

**समूह सदस्य :** १) शिक्षक २) विद्यार्थी ३) पालक

**समूहाच्या उपक्रमाची व्याप्ती :** सोबत जोडलेले १ ते १८ मुद्दे

**समूहाचे कामकाज सुरु करणेसाठी सूचना :**

१) सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर वाचनालय उपक्रमाबाबत माहिती देणे.

२) पालक सभेत वाचनालय समूहाची माहिती देणे.

३) शिक्षक सभेत वाचनालय समूह उपक्रमाची माहिती देणे.

**समूहाच्या वार्षिक दिनदर्शिकेमध्ये समाविष्ट बाबी :**

१) शालेय शैक्षणिक वर्षामधे विविध उत्सव–सण, संत, समाजसुधारक क्रांतिकारक यांच्या जयंती साजरी

करताना आपण त्यांच्यावरील पुस्तके त्या दिवशी विद्यार्थ्यांना वाचनालयातून उपलब्ध करून देऊन वचनास प्रवृत्त करणे.

२) विषयनिहाय त्या क्षेत्रातील थोर व्यक्तींची पुस्तके व माहिती विद्यार्थ्यांना देणे.

**समूहाच्या कामकाजाची नियमावली :**

१) वाचन समृद्धी समूह प्रमुख व सदस्यांनी वर्षभर कोणते उपक्रम राबवावे याचे नियोजन करणे नियोजनाची लेखी स्वरूपातील माहिती समूह सदस्यांना द्यावी.

२) वर्षभराच्या उपक्रमाच्या अनुषंगाने वर्षभर काय कार्यवाही करायची आहे. या बाबत वेळावेळी कळवणे.

**शाळेतील सर्व समूहामधील समन्वय प्रक्रिया कशी असावी?**

१) नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर १५ दिवसात सर्व समूह स्थापन करणे.

२) सर्व समूह प्रमुखांची मुख्याध्यापकांनी बैठक (जुलैच्या पहिल्या आठवड्यात) घेऊन वर्षभरात राबवण्याच्या उपक्रमाची दिनदर्शिका तयार करणेस सांगणे.

**शिक्षण विभागाकडून साहाय्यभूत होणारे मुद्दे :**

१) शाळा भेटीसाठी काही अधिकाऱ्यांची, समूहाची माहिती घेण्यासाठी नेमणुक करून समूहाच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर काय उपाय योजना करता येतील यावर मार्गदर्शन करणे.

२) ग्रंथालयासाठी पुस्तक खरेदीसाठी अनुदान वाढवणे.

**समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी साहाय्यभूत घटक :**

१) वाचनालय समुहाच्या शैक्षणिक वर्षातील उपक्रमाच्या अनुषंगाने ग्रंथालयात व प्रत्यक्षात असलेल्या पुस्तकांची यादी उपलब्ध करून देणे.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी अन्य सहाय्यभूत मुद्दे :**

१) मुख्याध्यापकांचे उपक्रमनिहाय मार्गदर्शन

२) इतर समूहाचे एकमेकाना मार्गदर्शन

३) उपक्रमनिहाय त्या त्या विषयाशी निगडित तज्ज्ञ मार्गदर्शक उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना साहाय्यभूत ठरेल.

**समूहामुळे शाळेस होणारे फायदे :**

१) वाचन समृद्धी समूहाने राबवलेल्या उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शालेय गुणवत्ता वाढ होण्यासाठी परिणामकारक उपयोग होईल.

२) वाचन संस्कार होऊन वाचनाची आवड निर्माण होईल व वाचन समृद्धी समूहाने राबवलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा विकास होईल व या बाबी त्यांचे अध्ययनास पूरक ठरतील.

३) वाचन समृद्धी समूहाने उर्वरीत ३४ विद्यार्थी समूहाच्या समन्वयाने विविध दिन विशेष व उपक्रम राबवावेत.

वाचनालय व्यवस्थापन समूह अहवाल सादरीकरणाचा नमुना.

| अ.क्र. | शालेय समूहाचे नाव | साजरे केलेले दिनविशेष | सहभागी विद्या-र्थी संख्या | वाचनालय व्यवस्थापन समूहाने राबविलेले उपक्रम |
|---|---|---|---|---|
| १) | विज्ञान विषय समूह | राष्ट्रीय विज्ञान दिन | सहावी ते आठवी नववी, दहावी | • वाचनालयातील शास्त्रज्ञांविषयाची पुस्तके विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून दिली.<br>• विज्ञान विषयाच्या अनेक शाखांची माहिती करून दिली. |

❑❑❑

# २२. समाज माध्यम व प्रसिद्धी समूह

**प्रस्तावना :**

समाज माध्यमे आजच्या युगात विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब, टेलीग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅप यांसारख्या प्लॅटफॉर्म विद्यार्थी वर्गामध्ये खूप लोकप्रिय आहेत. हे माध्यम केवळ करमणुकीपुरते मर्यादित न राहता शैक्षणिक मदत, करिअर मार्गदर्शन, आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरत आहेत. समाज माध्यम व प्रसिद्धी समूहाच्या माध्यमातून शाळास्तरावरील इतर समूहांच्या उपक्रमांची नोंद घेणे, समाज माध्यमांमार्फत इतर शाळा, विद्यार्थी यांच्यापर्यंत ते उपक्रम पोहचवणे अशा बाबी या समूहाद्वारे होतील.

**समाज माध्यम व प्रसिद्धी समूह उद्दिष्टे :**

१) **उपक्रमांची नोंद घेणे व प्रसिद्धी देणे :** शाळास्तरावरील इतर समूहाच्या उपक्रमांची नोंद घेणे, समाज माध्यमांमार्फत इतर शाळा विद्यार्थी यांच्यापर्यंत ते उपक्रम पोहचवणे.

२) **मनोरंजन आणि सर्जनशीलता :** प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे. मनोरंजनासोबतच शिक्षण, प्रेरणादायी कथा आणि वैयक्तिक विकासाला चालना देणे.

३) **संवाद आणि विचारमंथन :** विविध विषयावरील व्याख्याने आयोजित करणे, विद्यार्थ्यांना विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी मंच उपलब्ध करून देणे. विचारशक्ती आणि संवाद कौशल्ये विकसित करणे.

४) **सामाजिक जाणीव आणि जबाबदारी :** समाजात घडणाऱ्या घटनांबद्दल जागरूकता निर्माण करणे सकारात्मक विचार आणि सामाजिक उत्तरदायित्व वाढवणे.

५) **सुरक्षित आणि जबाबदारीने वापर :** समाज माध्यमांचा योग्य आणि जबाबदारीने वापर करण्याची सवय लावणे. खोट्या माहितीपासून सावध राहणे आणि सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करणे. समाज माध्यम व प्रसिद्धी समूहसाठी मार्गदर्शक सूचना.

**समूहाचा प्रमुख कोण असावा व त्याची निवड कशी करावी?**

विविध समाजमाध्यमे हाताळण्याचे कौशल्य असलेला शिक्षक, वर्तमान घडामोडी व सामान्य ज्ञानात रूची असलेला शिक्षक आणि एक विद्यार्थी

**निवड प्रक्रिया :**

- शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षकांशी चर्चा करून एका शिक्षकाची नेमणूक करावी.

- वर्तमान घडामोडींमध्ये रुची व लेखन कौशल्य विकसित असलेला वरच्या वर्गातील एक विद्यार्थी समन्वयक म्हणून निवडावा.

**समूहाचे सदस्य व त्यांची निवड प्रक्रिया :**

**समूह सदस्य (Club Members) :** प्रत्येक इयत्तेमधील एक विद्यार्थी वर्ग प्रतिनिधी सदर समूहाचा सदस्य असावा.

**निवड प्रक्रिया :** प्रत्येक वर्ग/विभागातून वर्तमान घडामोडींमध्ये रुची व लेखन कौशल्य विकसित असलेला वरच्या वर्गातील एक विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवडावा.

**समूहांच्या उपक्रमांची व्याप्ती :**

- शिक्षक समन्वयकाच्या मदतीने विविध क्लब मार्फत तसेच शाळेतील इतर उल्लेखनीय बाबी विविध समाजमाध्यमावर प्रसिद्ध करणे उदा. वृत्तपत्रे, मासिके, Facebook, Twitter, Instagram, Whats App
- विविध posts विविध भाषेत प्रसारित करणे.
- शिक्षक समन्वयकाने समूहातील सदस्यांना posts लिहिण्याबाबत, संपादन करण्याबाबत मार्गदर्शन करावे, आदर्श नमुने सादर करणे.
- वर्षभरातील विविध पोस्टचे संकलन करून जतन करावे.
- समाजमाध्यमांवरील प्रसिद्ध केलेल्या वरील कमेंट बघणे, वाचणे व आवश्यक चर्चा शाळेतील मुख्याध्यापकांशी करणे.

**समूहाचे कामकाज सुरू करण्यासाठी सूचना :**

- आठवड्याला एक बैठक आयोजित करणे, शाळेतील चालू घडामोडींवर चर्चा करणे.
- विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्याच्या सादरीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थी, वर्ग किंवा शाळास्तरावरील उपक्रमांची माहिती गोळा करून विविध समाज माध्यमावर प्रसिद्ध करणे.

**समूहाच्या वार्षिक दिनदर्शिका उपक्रम :**

| अ.क्र. | महिना | समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|
| १) | जून | समाज माध्यम व प्रसिद्धी समूह ओळख - शाळास्तरावरील विविध समूहाच्या समन्वयकांना समाज माध्यम व प्रसिद्धी समूह ओळख तसेच इतर समूहाबाबत समन्वयाने करावयाच्या कामकाजांबाबत चर्चा करणे. |

| अ.क्र. | महिना | समूह अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम |
|---|---|---|
| २) | जुलै–ऑगस्ट | तज्ज्ञ मार्गदर्शक यांची व्याख्याने :<br>**व्याख्यानासाठी विषय :**<br>• समाज माध्यमे : संधी की व्यसन?<br>• समाज माध्यमांचा सकारात्मक आणि नकारात्मक प्रभाव<br>• समाज माध्यमांवरील वेळेचे व्यवस्थापन<br>• मानसिक आरोग्य आणि सोशल मीडिया<br>• प्रभावी संवाद आणि समाज माध्यमांचा उपयोग |
| ३) | सप्टेंबर–ऑक्टोबर | शाळास्तरावरील विविध समूहाच्या समन्वयकांना पोस्टस लिहिण्याबाबत, संपादन करण्याबाबत, आदर्श नमुने सादर करण्याबाबत पत्रकार/संपादक यांची मार्गदर्शन सत्रे आयोजित करणे. |
| ४) | नोव्हेंबर–डिसेंबर | राष्ट्रीय प्रेस दिन–१६ नोव्हेंबर निमित्त प्रेस माहिती बाबत व्याख्यान आयोजित करणे. |
| ५) | जानेवारी–फेब्रुवारी | जागतिक रेडिओ दिन–१३ फेब्रुवारी निमित्त दूरभाष केंद्रास भेट देणे व क्षेत्र भेटीचा अहवाल तयार करणे. |
| ६) | मार्च–एप्रिल | वर्षभरातील विविध समूहाच्या पोस्टचे जतन करून प्रेरणादायी पोस्ट समाजमाध्यमावर प्रसिद्ध करणे. |

## प्रसार माध्यमांशी संबंधित काही महत्त्वाचे जागतिक आणि राष्ट्रीय दिवस :

**१) जागतिक दिवस :**

- जागतिक रेडिओ दिन : १३ फेब्रुवारी
- जागतिक पुस्तक दिन : २३ एप्रिल
- जागतिक प्रेस स्वातंत्र्य दिन : ३ मे
- जागतिक दूरसंचार व माहिती समाज दिन : १७ मे
- जागतिक टीव्ही दिवस : २१ नोव्हेंबर

**२) राष्ट्रीय दिवस (भारत) :**

- राष्ट्रीय प्रेस दिन : १६ नोव्हेंबर
- राष्ट्रीय प्रसारण दिवस : २३ जुलै

## समूहाच्या समाधानकारक कामकाजासाठी नियमावली :

- प्रत्येक आठवड्याला शिक्षक नेत्याच्या मार्गदर्शनाखाली सभा आयोजित करणे.
- सदस्यांनी समहकार्यातील उपस्थिती व सक्रिय सहभाग देणे.
- चर्चेसाठी वर्तमानपत्रे, व्हिडिओज व माहितीपटांचा वापर करावा.

- शिक्षक समन्वयकाने समाज माध्यमावर प्रसिद्ध होणाऱ्या माहितीचे सूक्ष्मपणे वाचन करावे.
- कोणतीही चुकीची माहिती तसेच जात, धर्म, पंथ, लिंग, वंश इ. संदर्भातील आक्षेपार्ह मजकूर समाज माध्यमावर जाणार नाही तसेच थोर राष्ट्रसंत, समाजसुधारक यांचा पोस्टमधील एकेरी उल्लेख होणार नाही, याबाबतची दक्षता शिक्षक समवयस्काने घ्यावी.

**शाळेतील सर्व समूहांबरोबर समन्वय :**

प्रत्येक क्लब समन्वयक सदस्य असलेली एक समिती स्थापन करणे.

**समिती कार्य :**

- प्रत्येक महिन्याला सभा आयोजित करून विविध क्लब उपक्रमाबाबत माहिती घेऊन अंतिम निर्णय सर्वांच्या संमतीने घेणे.
- विविध क्लब प्रतिनिधी व इतर सदस्य यांच्यातील वादविवाद टाळण्यासाठी वेळचे नियोजन, उपक्रमातील एकात्मता याबाबत समितीने उचित निर्णय घेणे.
- समूह समन्वयकांना आपल्या समूहामार्फत राबवण्याकरिता विविध उपक्रमाची माहिती सदर समूहाकडे देण्याचे नियोजन व कार्यपद्धती समजून देणे.
- समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत ऑनलाइन, ऑफलाइन संसाधने/पुस्तके/साहित्य यांची यादी.

**ऑनलाइन :**

- सरकारी संकेतस्थळे (PIB, India.gov.in).
- ई–वृत्तपत्रे
- SCERT/NCERT website

**ऑफलाइन :**

- शाळेच्या ग्रंथालयातील उपलब्ध वृत्तपत्रे, नियतकालिके, पाक्षिके आणि मासिके.

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी अन्य सहाय्यभूत ठरणारे मुद्दे**

- प्रसिद्धी संदर्भात स्थानिक संस्थांशी संपर्क करून शाळास्तरावरील उपक्रमांमधील संबंधित संस्थेच्या सहकार्यासाठी प्रयत्न करावा.

**समूहांमुळे शाळेत होणारे फायदे :**

- विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान व विश्लेषणात्मक कौशल्ये सुधारेल.
- संवाद व सहकार्य क्षमतांमध्ये वृद्धी होईल.
- सामाजिक व राजकीय विषयांबाबत जागरूकता वाढेल.

- विद्यार्थ्यांची वाचन क्षमता, सर्जनशील लेखन, नेतृत्व क्षमता, विविध विषयातील ज्ञानात वाढ होण्यास फायदेशीर ठरेल.
- छायाचित्रण कला विकसित होणे, विविध समूहाबरोबर समन्वय साधताना संभाषण कौशल्य, समन्वय कौशल्य विकसित होईल.
- नेतृत्व गुण व परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याची क्षमता विकसित होईल.

**वार्षिक उपक्रम अहवाल नमूना :**

**शैक्षणिक वर्ष :**

१) शाळेचे नाव

२) मुख्याध्यापक नाव

३) समूह प्रमुख व समूह सदस्य तपशील

४) समूह अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व उपस्थिती पत्रक

५) शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये राबवलेल्या उपक्रमांचा तपशील

| अ.क्र. | राबवलेल्या उपक्रमाचे नाव | राबवलेल्या उपक्रमाचा दिनांक | फोटो व व्हिडिओ लिंक |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |

उपरोक्त प्रमाणे अहवाल तयार करून परिषदेच्या jeevanshikshan@maa.ac.In या ई मेलवर पाठवण्यात यावेत.

❑❑❑

# २३. खगोलशास्त्र समूह

## खगोलशास्त्र समूह :

खगोलशास्त्र हा मानवाच्या जिज्ञासेला आणि अंतरिक्षाच्या विशालतेला समजून घेण्यासाठीचा विज्ञानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या विषयाचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांना पृथ्वीबाहेरील विश्वाचे गूढ, ग्रह तारे, उपग्रह, आकाशगंगा, काळे भोक (ब्लॅक होल) आणि ब्रह्मांडाच्या रचनेविषयी अधिक जाणून घेता येते. आजच्या वैज्ञानिक युगात खगोलशास्त्र हे केवळ अभ्यासाचा विषय नसून, ते संशोधन, तंत्रज्ञान, आणि मानवजातीच्या भविष्याशी जोडलेले क्षेत्र आहे. या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ आकाशाचा अभ्यास करीत नाहीत, तर त्यांच्यामध्ये विश्लेषणात्मक दृष्टिकोन, तांत्रिक कौशल्ये आणि सर्जनशीलता विकसित होते. खगोलशास्त्राचा अभ्यास विद्यार्थ्यांना खगोलशास्त्रीय साधनांचा (दुर्बिण, रेडिओ टेलिस्कोप) वापर, अंतराळ मोहिमा आणि उपग्रह प्रणालींशी परिचित करून देतो. तसेच, भूतकाळातील खगोलशास्त्रीय शोधांपासून ते आधुनिक संशोधनापर्यंतचा प्रवास समजून घेण्याची संधी देतो.

## उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे मूलभूत तत्त्वे आणि सिद्धांत शिकवणे.

२) आकाशातील घटकांचा (तारे, ग्रह, उपग्रह, आकाशगंगा) सखोल अभ्यास करणे.

३) खगोलशास्त्रीय साधने आणि तंत्रज्ञानाचा उपयोग समजावून घेणे.

४) खगोलशास्त्र आणि अंतराळ तंत्रज्ञानाशी संबंधित करिअरच्या संधींची माहिती देणे.

५) विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देऊन त्यांना संशोधनासाठी प्रवृत्त करणे.

## उपक्रम :

१) तारे व ग्रह निरीक्षण : नियमित खगोलीय निरीक्षणासाठी उपकरणांचा वापर.

२) खगोलीय प्रश्नमंजूषा : नक्षत्र व खगोलशास्त्रावर प्रश्नोत्तर स्पर्धा.

३) ग्रह मंडळाचे मॉडेल : सौर मंडळाचे मॉडेल तयार करणे.

४) ग्रहण निरीक्षण : सौर आणि चंद्र ग्रहणांचे शास्त्रीय निरीक्षण.

५) अंतराळ विषयक चर्चासत्र : उपग्रह व रॉकेट विज्ञानावर सादरीकरण.

६) विविध अंतराळ मोहीमा, भारतीय खगोलशास्त्राची माहिती

७) सायन्स सेंटर, तारामंडळ यांना भेटी देणे.

८) खगोल शास्त्रीय माहितीपट, चित्रपट दाखवणे.

९) सायन्स सेंटर, तारामंडळ यांना भेटी देणे.

१०) दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षण करणे.

११) नक्षत्र व ऋतू याबाबतची माहिती घेणे.

१२) नक्षत्र व Navigation यांचा संबंध

१३) खगोलशास्त्रीय घटनांचा अभ्यास

१४) विज्ञान कादंबऱ्यांची ओळख.

१५) खगोल शास्त्रीय दिनविशेष

**खगोलशास्त्र समूहाची रचना :**

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी खगोलशास्त्र समूहाची स्थापना पुढीलप्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा खगोलशास्त्र/भूगोल विषयाचा शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी खगोलशास्त्र विषयक राबवलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतो शाळेतील सर्वोच्च स्तराचा खगोलशास्त्र/भूगोल विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील खगोलशास्त्र/भूगोल विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |

**खगोलशास्त्र विषय समूहाची जबाबदारी व कार्ये :**

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या खगोलशास्त्र समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे :

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकाच्या मदतीने पर्यावरण खगोलशास्त्र/भूगोल समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्वनियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकीदरम्यान उपक्रम सुचवण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

८) खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करवून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

**खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :**

१) दर पंधरवड्यात एक किंवा एकापेक्षा जास्त कृतींचे शाळेत आयोजन करावे.

२) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.

३) सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील व्यक्ती इ. ची सांख्यिकीय माहिती/अहवाल करण्यासाठी संकलित करावी.

४) वर्षभर घ्यावयाचे उपक्रमांचे नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला दोन उपक्रम घेण्यात यावेत.

५) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांचे जिओ टॅगसह कमीत कमी २ निवडक फोटो काढून अहवाल तयार करावा.

६) शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रमांना विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.

७) वर्तमानपत्रात या अनुषंगाने आलेल्या बातम्यांची कात्रणे, फेसबुक पोस्ट इ. ची माहिती संकलित करावी.

८) सर्व कामे विद्यार्थ्यांनीच करावीत याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

**खगोलशास्त्र/भूगोल समूहाच्या कामकाजासाठी नियमावली :**

खगोलशास्त्र/भूगोल समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. समूहाचे नियम पुढीलप्रमाणे तयार करावेत.

**अ) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना :**

- प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
- खगोलशास्त्र विषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.
- उपक्रमादरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.
- उपक्रमादरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.
- शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब) शिक्षकांसाठी सूचना :**

- उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.
- विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना मांडण्यासाठी व त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- उपक्रमा दरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.
- सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
- उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे.
- आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.
- केंद्र/तालुका स्तरावरील इतर शाळांमध्ये जे उपक्रम राबवण्यात येत आहेत त्यांची आपसात व समूह सदस्यांमार्फत सादरीकरण करून देवाणघेवाण करावी.

**शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया :**

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूह प्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समुह अंतर्गत समूह प्रमुख यांनी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय इतिहास समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक :**

१) आर्थिक तरतूद.

२) उपक्रम अंमलबजावणी महिन्यातील वेळ.

३) उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.

४) मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याते.

५) व्याख्याने आयोजित करणे, उपकरणे तयार करणे व प्रदर्शनासाठी जागा.

**खगोलशास्त्र समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :**

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| १) | जून | अंतराळाचे शोध उपक्रम: | • खगोलशास्त्राच्या मूलभूत संकल्पनांचा परिचय<br>• आकाशातील तारे आणि ग्रहांची ओळख<br>• विविध खगोलशास्त्रीय यंत्रांचा अभ्यास<br>• आकाशगंगा आणि त्यातील तारे<br>• 'नाइट सायन्स'– रात्री आकाश निरीक्षण |

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| २) | जुलै | तारे आणि त्यांच्या जीवनशैली | • सूर्य आणि त्याच्या भागांचा अभ्यास<br>• ग्रह आणि त्यांची वैशिष्ट्ये<br>• आपल्या सौरमालेतील ग्रहांची यादी<br>• 'खगोलशास्त्र आणि पृथ्वी'–पृथ्वीवरील जीवनासाठी सूर्याचे महत्त्व<br>• ग्रहणांचे प्रकार आणि त्यांचा अभ्यास |
| ३) | ऑगस्ट | ग्रह आणि उपग्रह | • खगोलशास्त्रातील प्रमुख वैज्ञानिक संशोधन<br>• नासाचे अंतराळ मोहिमा<br>• खगोलशास्त्रातील नवीनतम तंत्रज्ञान<br>• रेडिओ टेलिस्कोप आणि त्यांच्या कार्याची माहिती<br>• 'तंत्रज्ञान आणि ब्रह्मांड'–अंतराळ संशोधनातील नवे तंत्रज्ञान |
| ४) | सप्टेंबर | आकाशगंगा आणि ब्रह्मांड | • मंगळ ग्रहावर मानवाचे अभियान<br>• नासाच्या अंतराळ मोहिमांचे समारंभ<br>• 'हबल' अंतराळ दुर्बीण आणि त्याचे शोध<br>• 'स्पेस एक्स– आणि इतर कंपन्यांच्या मोहिमा |
| ५) | ऑक्टोबर | ब्लॅक होल आणि गुरूत्वाकर्षण | • आकाशगंगा म्हणजे काय?<br>• विविध प्रकारच्या आकाशगंगा आणि त्यांचे वर्गीकरण<br>• 'ब्लॅक होल' आणि त्याचे गूढ<br>• ताऱ्यांचा जन्म आणि मृत्यू<br>• आकाशगंगेसंबंधी काही प्रसिद्ध संशोधन व मंथन |
| ६) | नोव्हेंबर | चंद्र आणि त्याचा अभ्यास | • पृथ्वीवरील हवामान आणि खगोलशास्त्र<br>• पृथ्वीच्या स्थितीचे खगोलशास्त्रीय महत्त्व<br>• विविध प्राकृत घटकांचा खगोलशास्त्राशी संबंध<br>• अंतराळातील घटक आणि पृथ्वीवरील जीवन<br>• खगोलशास्त्राच्या शिकवणीनुसार निसर्गाचा आदर |
| ७) | डिसेंबर | सूर्य आणि त्याचे कार्य | • भविष्यातील अंतराळ मोहिमा आणि मानवाचे लक्ष्य<br>• खगोलशास्त्राच्या माध्यमातून मानवाचे भविष्य<br>• आणखी चंद्र आणि मंगळ मोहिमा<br>• अंतराळातील जीवनाच्या शोधनासाठीची तयारी<br>• खगोलशास्त्राचे भविष्यातील तंत्रज्ञान आणि उपयोग |

| अ.क्र. | महिना | थीम | थीम अंतर्गत घ्यावयाची कृती |
|---|---|---|---|
| ८) | जानेवारी | खगोलशास्त्राचे भविष्य | • आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र दिवसाची माहिती<br>• खगोलशास्त्रातील प्रमुख व्यक्ती आणि त्यांचा योगदान<br>• खगोलशास्त्राच्या ऐतिहासिक घटनांचा अभ्यास<br>• खगोलशास्त्रातील प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञांचे जीवन<br>• आकाश निरीक्षणाच्या कार्यशाळा : ग्रह आणि तारे निरीक्षण |

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनविशेष :

**खगोलशास्त्र दिनविशेष यादी**

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १) | १४ जानेवारी | भूगोल दिन |
| २) | २१ मार्च | पृथ्वीवर दिवस रात्र समान, जागतिक वन दिन |
| ३) | २२ मार्च | जागतिक जल दिन |
| ४) | २३ मार्च | जागतिक हवामान दिन |
| ५) | ५ एप्रिल | राष्ट्रीय सागरी संपत्ती दिन |
| ६) | १६ सप्टेंबर | जागतिक ओझोन दिवस |

## समूहाच्या कामकाजासाठी कोणती प्रक्रिया :

१) गटप्रमुख व सदस्यांची हजेरी घेणे अनिवार्य असावे.

२) प्रत्येक सदस्याने कार्य प्रामाणिकपणे पार पाडणे.

३) वेळेचे काटेकोर पालन व उपक्रमाचे नियोजन करणे.

४) चर्चा व सादरीकरणासाठी स्पष्ट आणि मुद्देसूद माहिती देणे.

५) पालक व शिक्षकांचे सक्रिय योगदान घेण्यात यावे. यासाठी SMC/SMDC बैठकीत वेळीच सूचना देण्यात येणे अपेक्षित आहे.

## शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया :

१) सर्व गटांचे प्रमुख दर महिन्याला शाळा व्यवस्थापन समिती/शाळा व्यवस्थापन विकास समिती (SMC SMDC) सोबत बैठक घेतील. या समूहाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त व महत्त्वाचे आहेत या बाबत चर्चा करणे.

२) गटांमधील उपक्रमांची माहिती एका ठराविक प्रपत्रामध्ये संकलित करावी.

३) गटांमध्ये समानता राखण्यासाठी शिक्षकांचे सक्रिय मार्गदर्शन आवश्यक.

### समूहांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण विभागाकडून व SCERT कडून साहाय्य/प्रोत्साहन :

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

### समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत Online/Offline संसाधने/पुस्तके/साहित्य :

**१) ऑनलाईन :** उपक्रमांसाठी वेबसाइट्स, शैक्षणिक ॲप्स ,उदा. Diksha, ePathshala इ. व यूट्यूबवरील मार्गदर्शक व्हिडिओज.

**२) ऑफलाईन :** संदर्भ पुस्तके, पोस्टर्स, चार्ट्स, प्रकल्प साहित्य.

**३) संदर्भ पुस्तके :**

- खगोल विश्व : जयंत नारळीकर
- ताऱ्यांचे आकाश : अरविंद परांजपे
- आकाश दर्शन : नरेंद्र बोधके
- खगोलशास्त्राची ओळख : जयंत नारळीकर व मंदार कदम
- खगोलशास्त्र : भारतीय दृष्टिकोन : डॉ. के. रघुनाथन

### शाळेने उपक्रमनिहाय व वार्षिक अहवाल सादर करणे :

**उपक्रमनिहाय अहवाल :** १) गटाचे उद्दिष्टे २) सहभागींनी केलेले कार्य ३) उपक्रमाचा परिणाम/यश

**वार्षिक अहवाल :** १) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण २) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे ३) पुढील वर्षासाठी शिफारसी.

### समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी साहाय्यभूत ठरणारे मुद्दे :

१) गटासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) गटांदरम्यान स्पर्धात्मक भावना निर्माण करणे.

३) गटांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

### समूहांमुळे शाळेस होणारे फायदे :

**फायदे :**

१) विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना मिळेल.

२) कौशल्याधारित शिक्षण व सर्जनशीलता वाढीस लागेल.

३) शाळेचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावेल.

शिक्षण विभागातील अधिकारी, पालक, शिक्षक व शिक्षक संघटना यांना विश्वासात घेऊन ही प्रक्रिया प्रभावीपणे राबवल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल व शाळेचा गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दर्जाही उंचावण्यास निश्चित मदत होईल.

❑❑❑

# २४. माजी विद्यार्थी समूह

## प्रस्तावना :

माजी विद्यार्थी संघटना ही शाळेच्या भूतपूर्व विद्यार्थ्यांना एकत्र आणणारी एक चळवळ आहे. ती माजी विद्यार्थ्यांना शाळेशी पुन्हा जोडून त्यांचे अनुभव, ज्ञान आणि कौशल्य वापरून शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये मदत करू शकते. माजी विद्यार्थी समूहाची स्थापना शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. हे संघटन जुने संबंध जपण्यासोबतच शाळेच्या भविष्यासाठी आधारस्तंभ ठरते.

## उद्दिष्टे :

१) माजी विद्यार्थ्यांमध्ये एकजूट निर्माण करून त्यांच्यामध्ये एकात्मता व संवाद वाढवणे.

२) शाळेला आर्थिक मदत देणे व त्यातून शाळेच्या विकास प्रकल्पांसाठी निधी उभारणे.

३) विद्यमान विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर आणि जीवन मार्गदर्शन प्रदान करणे.

४) विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे समाजात सकारात्मक योगदान देणे.

५) माजी विद्यार्थ्यांची यादी तयार करणे व त्यांचा शाळेशी संपर्क टिकवून ठेवणे.

६) शाळेच्या इतिहासातील उज्ज्वल क्षण जपणे आणि त्याचा प्रसार करणे.

## महत्त्व :

- **शाळेच्या परंपरेचा अभिमान :** शाळेचा इतिहास आणि परंपरा जपून पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणे.
- **विकासासाठी सहकार्य :** माजी विद्यार्थी आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक पातळीवर शाळेच्या गरजांसाठी महत्त्वपूर्ण ठरतात.
- **प्रेरणा :** माजी विद्यार्थ्यांचे यश शाळेच्या विद्यमान विद्यार्थ्यांना प्रेरणा देते.
- **समाजासाठी योगदान :** शाळेच्या माध्यमातून सामाजिक कल्याणासाठी उपक्रम राबवता येतात.

## माजी विद्यार्थी समूहाचा दीर्घकालीन दृष्टिकोन :

१) सातत्य टिकवणे : शाळेतील विद्यार्थ्यांचे बॅच पूर्ण होत असताना त्यांना समूहात सामील होण्यासाठी प्रेरित करा.

२) समूह विस्तार : माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक संपर्कांचा वापर करून शाळेसाठी नवीन प्रकल्प सुरू करा.

शाळेने माजी विद्यार्थी समूहाची अंमलबजावणी व्यवस्थित केली, तर त्याचा लाभ केवळ शाळेलाच नव्हे, तर विद्यमान व माजी विद्यार्थ्यांनाही होतो. योजनाबद्ध दृष्टिकोन, सर्जनशील उपक्रम आणि सातत्यपूर्ण संवाद हे या उपक्रमाच्या यशाचे प्रमुख घटक आहेत.

### समूहाचा प्रमुख कोण असावा व त्याची निवड कशी करावी? :

माजी विद्यार्थी समूहाचा प्रमुख (अध्यक्ष) निवडताना खालील गोष्टी लक्षात घेणे उपयुक्त ठरणार आहे–

### प्रमुखासाठी अपेक्षित गुण :

- **नेतृत्व कौशल्य :** समूहातील सर्व सदस्यांना प्रेरित करण्याची क्षमता असावी.
- **संवाद कौशल्य :** प्रभावी संवाद साधून विचार मांडण्याची आणि इतरांचे विचार ऐकून घेण्याची तयारी असावी.
- **उत्साह व बांधिलकी :** समूहाच्या उद्दिष्टांसाठी तत्पर व समर्पित असणे आवश्यक.
- **व्यवस्थापन कौशल्य :** कार्यक्रम, सभा किंवा उपक्रमांचे व्यवस्थापन करण्याचा अनुभव हवा.
- **विश्वासार्हता :** समूहातील सर्व सदस्यांमध्ये विश्वासार्ह आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व असावे.

### निवड प्रक्रिया :

- **निवड समिती तयार करणे :** समूहातील वरिष्ठ आणि अनुभवी सदस्यांची निवड समिती बनवावी.
- **उमेदवारांची नावे सुचवणे :** इच्छुक सदस्य किंवा इतर सदस्यांनी संभाव्य उमेदवारांची नावे सूचवावी.
- **कार्यक्रमाचा आराखडा मांडणे :** प्रत्येक उमेदवाराने आपले उद्दिष्टे, योजना आणि नेतृत्व कौशल्ये मांडण्यासाठी संधी दिली पाहिजे.
- **बहुमत अथवा सहमतीचा पर्याय :** सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवाराला प्रमुख म्हणून निवडावे अथवा जर शक्य असेल, तर सर्व सदस्यांची सहमती मिळून एकत्रितपणे निर्णय घ्यावा.
- **निवडीनंतर :** प्रमुखाने समूहासाठी दृष्टिकोन आणि उद्दिष्टे ठरवून इतर सदस्यांना सहभागी करून घ्यावे. नियमित सभा घेतल्याने समूहाची एकजूट वाढेल आणि उद्दिष्टे साध्य करण्यात मदत होईल.

### माजी विद्यार्थी समूहाचे सदस्य कोण असावेत व त्यांची निवड प्रक्रिया कशी असावी? :

माजी विद्यार्थी संघटना किंवा समूहाची स्थापना करताना सदस्यांची निवड व्यवस्थित आणि समतोल पद्धतीने करणे महत्त्वाचे असते. खाली दिलेली माहिती माजी विद्यार्थी समूहासाठी सदस्य निवडीसाठी मार्गदर्शक ठरू शकते :

### माजी विद्यार्थी समूहाचे सदस्य कोण असावेत?

- शाळेतील/महाविद्यालयातील माजी विद्यार्थी : ज्या व्यक्तींनी संस्थेतून शिक्षण घेतले आहे, त्यांनाच या समूहाचे सदस्य बनवावे.
- प्रतिनिधी निवडताना विचार करावयाचे घटक : विविध वर्ग/तुकड्यांचे प्रतिनिधित्व होणे. संस्थेच्या विविध विभागांतील (अभ्यासक्रम/कार्यक्रम) माजी विद्यार्थी समाविष्ट करणे. नेतृत्व गुण, सामाजिक सहभाग आणि संस्थेच्या हितासाठी योगदान देण्याची तत्परता असलेल्या व्यक्तींचा विचार करावा.

- विशेष प्रतिनिधी : जे विद्यार्थी सामाजिक, शैक्षणिक किंवा व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत आहेत, त्यांनाही समूहाचा भाग बनवावे.

### निवड प्रक्रिया कशी असावी? :

- सर्वसामान्य अर्ज प्रक्रिया : सदस्यत्वासाठी अर्ज मागवणे (ऑनलाइन फॉर्म/लिखित अर्जाद्वारे). अर्जामध्ये शिक्षण, संस्थेशी संबंध आणि समूहासाठी योगदान देण्याची तयारी याबाबत माहिती विचारणे.
- प्रत्येक वर्ग/तुकडीतून प्रतिनिधी निवडणे : प्रत्येक वर्ग तुकडीतून एक प्रतिनिधी निवडावा. निवडीसाठी शिक्षक, प्राध्यापक किंवा विद्यमान समिती सदस्यांचा सल्ला घ्यावा.
- बहुमत अथवा सहमतीने संबंधित बॅचमधील विद्यार्थ्यांकडून मतदान घेऊन प्रतिनिधी निवडता येईल.
- समूहाचा समतोल राखणे : अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार अशा भूमिकांसाठी योग्यतेनुसार सदस्य निवडावेत. लिंग समानता, वयोगटांचा समतोल आणि विविध बॅचेसचे प्रतिनिधित्व याला प्राधान्य द्यावे.
- कार्यकाल निश्चित करणे : सदस्यांचा कार्यकाल (उदा. २ वर्षे) निश्चित करून त्यानंतर नवीन निवड प्रक्रिया सुरू करावी.

### समूहाच्या स्थापनेसाठी महत्त्वाचे मुद्दे :

- शाळेतील माजी विद्यार्थी समूहाच्या संवादासाठी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अथवा ज्येष्ठ शिक्षक यांनी जबाबदारी पार पाडावी.
- संपर्क : सर्व माजी विद्यार्थ्यांना समूहाचा उद्देश व उपक्रम याबद्दल माहिती द्या.
- नियमावली तयार करा : सदस्यत्वासाठी आवश्यक निकष, अधिकार आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे ठरवा.
- संवाद माध्यम : ग्रुप, ईमेल लिस्ट, किंवा संस्थेच्या वेबसाइटद्वारे संवाद कायम ठेवा.
- उपक्रम : माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी नियमित कार्यक्रम/बैठका आयोजित करा.

ही प्रक्रिया सर्वसमावेशक व पारदर्शक ठेवली तर समूह संस्थेच्या विकासासाठी अधिक प्रभावी ठरू शकेल.

### माजी विद्यार्थी समूहाची अंमलबजावणीसाठी उपक्रम/कृती कार्यक्रम :

शाळेने माजी विद्यार्थी समूहाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने पुढे जाणे आवश्यक आहे. खाली दिलेले टप्पे व उपक्रम या प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरू शकतात :

| अ.क्र. | महिना | उपक्रम | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १) | जून | प्रारंभिक योजना तयार करणे | समूह स्थापनेचा उद्देश ठरवणे : माजी विद्यार्थ्यांना कोणत्या उपक्रमांमध्ये सामील करायचे आहे हे ठरवणे. उदाहरणार्थ, निधी उभारणी, विद्यमान विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, शाळेची पायाभूत सुविधा सुधारणे. |
| २) | जून | संघटना समिती स्थापन करणे | मुख्याध्यापक, शिक्षक आणि उत्साही माजी विद्यार्थ्यांचा समावेश असलेली एक गट स्थापन करणे. |
| ३) | जुलै | डेटा संकलन आणि नेटवर्क तयार करणे | माजी विद्यार्थ्यांची यादी तयार करणे: माजी विद्यार्थ्यांची माहिती गोळा करण्यासाठी शाळेच्या जुने रेकॉर्ड, शिक्षक किंवा स्थानिक संपर्कांचा वापर करणे. माजी विद्यार्थ्यांच्या संपर्कासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म (जसे की, फेसबुक, व्हॉट्सअॅप, किंवा ईमेल) आणि फॉर्म्स वापरणे. |
| ४) | जुलै | ऑनलाइन उपस्थिती निर्माण करणे | शाळेच्या माजी विद्यार्थ्यांसाठी वेबसाइट किंवा सोशल मीडिया पेज तयार करा. ई-मेल सूची तयार करणे, ज्याद्वारे नियमित माहिती पाठवता येईल. |
| ५) | ऑगस्ट | नियमित मेळावे आयोजित करणे | वार्षिक स्नेहसंमेलन : माजी विद्यार्थ्यांना नियमितपणे भेटण्याची संधी देणे |
| ६) | ऑगस्ट | थीम आधारित सभा | विशिष्ट उद्देशांसाठी सभा आयोजित करणे (उदा. करिअर मार्गदर्शन, शाळेच्या विकासासाठी निधी उभारणी). सांस्कृतिक किंवा क्रीडा कार्यक्रमांचा समावेश करून माजी विद्यार्थ्यांना शाळेशी पुन्हा जोडले जाऊ शकते. |
| ७) | सप्टेंबर | निधी उभारणीसाठी योजना | सदस्यत्व शुल्क : माजी विद्यार्थ्यांकडून वार्षिक किंवा आजीवन सदस्यत्व शुल्क गोळा करणे. सदर रकमेतून संसाधनांची (उदा. ग्रंथालय उभारणी, ई-लर्निंग सुविधा) उपलब्धता करून घेणे. |
| ८) | सप्टेंबर | करिअर मार्गदर्शन सत्रे | विविध क्षेत्रांतील माजी विद्यार्थी विद्यमान विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन करू शकतात. |
| ९) | ऑक्टोबर | शिष्यवृत्ती कार्यक्रम | आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाऊ शकते. |
| १०) | ऑक्टोबर | संवाद सत्रे | माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी देणे. |
| ११) | नोव्हेंबर | शाळेच्या प्रकल्पांसाठी योगदान | पायाभूत सुविधा सुधारणे प्रयोगशाळा, ग्रंथालय किंवा खेळाचे मैदान यासाठी आर्थिक मदत किंवा साहित्य उपलब्ध करून देणे. |

| अ.क्र. | महिना | उपक्रम | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १२) | नोव्हेंबर | तंत्रज्ञानाचा वापर | डिजिटल शिक्षणासाठी संगणक, इंटरनेट सेवा यामध्ये मदत मिळवणे. त्याचप्रमाणे इतर सेवा (उदा. कॅम्प व्याख्यान आयोजित करणे.) |
| १३) | डिसेंबर | वार्षिक अहवाल | शाळेच्या प्रगती, उपक्रम आणि माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथांचा समावेश असलेले वार्षिक अहवाल प्रकाशित करणे. |
| १४) | डिसेंबर | ऑनलाइन बुलेटिन | उपक्रमांचे अपडेट्स आणि शाळेच्या गरजा याबद्दल माहिती देण्यासाठी ऑनलाइन बुलेटिन जारी करणे. |
| १५) | जानेवारी | गौरव पुरस्कार | माजी विद्यार्थ्यांना सन्मानित करून इतरांना प्रेरणा देणे. |
| १६) | फेब्रुवारी | सहभागाचा सन्मान | आर्थिक मदत, मार्गदर्शन, किंवा इतर उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करणे. |

माजी विद्यार्थी समूह (Alumni Association) शाळेसाठी अनेक बाबतीत फायदेशीर ठरू शकतात.

## निष्कर्ष :

माजी विद्यार्थी समूह हा शाळेसाठी मोठा आधार ठरू शकतो, परंतु व्यवस्थापनाने त्यांच्या सहभागाचा योग्य तो समतोल राखला पाहिजे, जेणेकरून शालेय गुणवत्ता सुधारण्यासाठी उपयोग होईल.

❑❑❑

# २५. प्रगतशील विद्यार्थी समूह

## प्रस्तावना :

संपूर्ण शिक्षणप्रक्रियेचा 'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हाच शिक्षणाचा मूळ उद्देश आहे. अध्ययन-अध्यापन ही एक बहुआयामी आणि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक मुलाची शिकण्याची गती वेगवेगळी असते. विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर त्यांची कौटुंबिक परिस्थिती, आवड, पूर्वानुभव, अध्ययन अध्यापन पद्धती इत्यादींचा परिणाम होत असतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार देशातील सन २०२६-२७ पर्यंत प्राथमिक स्तरावर पायाभूत साक्षरता व संख्यात्मक कौशल्ये प्राप्त करणे, हे शालेय शिक्षण व्यवस्थेसाठी सर्वोच्च ध्येय निश्चित केले आहे. यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्तीसाठी निपुण भारत हे अभियान सुरू करण्यात आले. जेणेकरून विद्यार्थ्यांचे औपचारिक शिकणे सोपे होईल.

## प्रगतशील विद्यार्थी समूह संकल्पना :

इयत्ता पहिलीपासूनच वर्षाअखेरीस त्या इयत्तेच्या नेमून दिलेल्या सर्व क्षमता प्रत्येक विद्यार्थ्यांला प्राप्त झाल्या तर इ.पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासपूर्वक पुढील इयत्तांमध्ये प्रवेश करता येईल. तसेच अध्ययन अध्यापन प्रक्रिया व सर्वांगीण विकासात सकारात्मक परिणाम होईल. त्यासाठी शैक्षणिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी 'प्रगतशील विद्यार्थी समूह' च्या माध्यमातून काम करणे योग्य ठरेल. म्हणून शाळा व वर्ग स्तरावर याची अंमलबजावणी केल्यास शैक्षणिकदृष्टया कमकुवत विद्यार्थ्यांची प्रगती होईल व हे विद्यार्थीही वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीने इयत्तानिहाय, अध्ययन निष्पत्तीनिहाय कौशल्ये आत्मसात करतील.

## प्रगतशील विद्यार्थी समूह उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सहज व आनंददायी करणे.
- प्रगत व विशेष प्रावीण्य असलेल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने इतर विद्यार्थ्यांना साहाध्यायी अध्ययनातून प्रगतीकडे वाटचाल करण्यास मदत करणे.
- अध्ययन अध्यापनाच्या प्रत्येक पातळीवर स्वयं अध्ययनासाठी प्रेरित करणे.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अध्ययन अनुभव देणे.
- भिन्न सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- अध्ययनाची आवड निर्माण करणे.
- अध्ययनात कमकुवत असणाऱ्या मुलांना शिकण्यासाठी सक्षम करणारे 'विद्यार्थी मित्र' तयार करणे.
- दिव्यांग म्हणजे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वांच्या सोबत अध्ययनासाठी प्रेरित करणे.

## प्रगतशील विद्यार्थी समूह रचना :

- समूह प्रमुख प्राधान्याने शिक्षक असावा.
- इयत्ता पहिली ते पाचवी चे वर्गशिक्षक तसेच इयत्ता सहावी ते दहावीपर्यंत शिकवणारे विषय शिक्षक.
- सर्व समूहांना मार्गदर्शन, सनियंत्रण व योग्य दिशा देण्यासाठी.
- विद्यार्थी समूहांच्या समस्यांवर मात करण्यासाठी उपयुक्त.
- समूहाचे सदस्य व त्यांची निवड प्रक्रिया (उदा : एकूण विद्यार्थी संख्या ३२ असेल तर) ३२ पैकी ८ विद्यार्थी प्रगत, ८ अप्रगत आणि १६ मध्यम स्तरातील विद्यार्थी असतील असे समजून गट करताना प्रत्येक गटात खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांचा समावेश असावा.
- प्रगत विद्यार्थी – १
- मध्यम विद्यार्थी – २
- अप्रगत विद्यार्थी –१
- एकूण ४ विद्यार्थ्यांचा समूह
- एकूण ८ गट तयार होतील.
- एका गटात कमीत कमी २ ते ५ विद्यार्थी असावेत.

## प्रगतशील विद्यार्थी समूह जबाबदारी व कार्य :

- उपक्रम वर्गानुसार/वयानुसार/गटानुसार/गरजेनुसार असावेत.
- वर्गातील विद्यार्थ्यांच्या पायाभूत चाचणीमधील कमकुवत विद्यार्थ्यांसाठी अध्ययन निष्पत्तीनुसार उपक्रमाची व्याप्ती वर्गशिक्षक/विषयशिक्षक यांनी ठरवावी.

  उदा : एखाद्या अध्ययन निष्पत्तीसाठी एक महिना काम करावे लागेल तर वाचन, आकलन यावर आधारित अध्ययन निष्पत्तीसाठी काही महिन्यांसाठी काम करावे लागेल.
- शिक्षकांनी पायाभूत चाचणी घेतल्यानंतर प्रगत व अप्रगत/कमकुवत विद्यार्थ्यांची वर्गनिहाय यादी करणे व त्या माध्यमातून 'प्रगतशील विद्यार्थी समूह' तयार करणे.
- शिक्षकांनी अप्रगत विद्यार्थी कोणत्या घटकात/अध्ययन निष्पत्तीत कमकुवत आहे ते घटक शोधून यादी करणे.
- अध्ययन निष्पत्तीमधील शैक्षणिक कामगिरीनुसार विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गट करावेत. ज्याला 'प्रगतशील विद्यार्थी समूह CLUB' संबोधावे.
- या समूहात वर्गातील सर्व विद्यार्थी सहभागी असतील.

- समूहाच्या गटकार्यासाठी लागणारे उपक्रम आणि वैयक्तिक सरावासाठीच्या कृतिपत्रिका SCERT च्या वेबसाईटवरून शिक्षकांना घेता येतील. वेबसाईट : www.maa.ac.in
- निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीमध्ये प्रगती होईपर्यंत समूहातील कमकुवत विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करत रहावे.
- याबाबत प्रत्येक शिक्षण परिषदेमध्ये नियोजन व चर्चा करावी. केंद्रप्रमुखांनी त्यांना मार्गदर्शन करावे, तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांनी विषयसाधन व्यक्तींमार्फत साहाय्य करावे.
- समूहातील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कामगिरीचे शिक्षकांनी निरीक्षण करून त्यानुसार विद्यार्थ्यांना वैयक्तिक मदत करावी.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांच्या सहभागासाठी काही उपक्रम शिक्षकांनी घरी करून घेण्यासाठी सुचवावेत, त्यासाठी पालकांना सुरुवातीला उपक्रमाबाबत बैठक घेऊन माहिती द्यावी.
- या सर्व प्रक्रियेत गटातील प्रगतशील विद्यार्थी प्रमुखाची भूमिका महत्त्वाची राहील.

**प्रगतशील विद्यार्थी समूह उपक्रम :**

- सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला संधी देणे. उदा. कथा, गायन, नृत्य, वादन, भाषण, लेखन, संभाषण इत्यादींच्या माध्यमातून लेखी, तोंडी अथवा प्रात्यक्षिक अभिव्यक्तीस संधी देणे.
- कला व क्रीडा.
- परिसराशी संबंधित क्षेत्रभेट.
- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी शैक्षणिक सहल.
- प्रकल्प (सर्व क्षमतांना विकसित करणे)
- स्वाध्याय.
- अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- वाचन कट्टा/वाचन कोपरा तयार करणे.
- हसत खेळत शिक्षण (सापशिडी, साहित्य पेट्या, भाषा/गणित/विज्ञान/इंग्रजी पेटी).
- करूया मैत्री आरोग्याशी (योग, कवायत, प्राणायाम).
- खेळ आधारित उपक्रम
- वाचनपूर्व तयारी (विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार)
- लेखनपूर्व तयारी (विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार)

- गणनपूर्व तयारी (विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार)
- गप्पागोष्टी करणे (मुलांच्या मौखिक भाषा विकासासाठी).
- भाषिक खेळ (शब्दभेंड्या, वन मिनिट शो वेगवेगळ्या संकल्पनेवर आधारित)
- अभ्यास सहल आयोजन करणे.
- स्व–भाषेत अभिव्यक्त होण्याची संधी देणे.
- करू या मैत्री विषयांशी (विविध विषयनिहाय गट तयार करून मुलांच्या आवडीच्या गटात सहभागी होणे).

## प्रगतशील विद्यार्थी समूह – विद्यार्थी सूचना

- समूहातील प्रत्येक सदस्यांनी प्रगतशील विद्यार्थी समूहाच्या अनुषंगाने उपक्रमामध्ये सक्रियतेने सहभाग घ्यावा.
- समूहातील प्रत्येक सदस्यांनी आपापले योगदान द्यावे.

## प्रगतशील विद्यार्थी समूहशिक्षक सूचना

- सर्व विद्यार्थ्यांना सहभागाची संधी मिळेल.
- प्रगत व अप्रगत विद्यार्थ्यांची वर्गनिहाय यादी करणे.
- वर्गातील विद्यार्थी संख्येनुसार समूह तयार करणे.
- कोणत्या घटकात विद्यार्थी अप्रगत आहे त्याची यादी करणे.
- समूहातील प्रमुख विद्यार्थ्याच्या आवडीनुसार विषय/घटकांची विभागणी करणे.
- प्रगतशील विद्यार्थ्यांच्या समूहाने त्या समूहातील अप्रगत विद्यार्थ्याला मार्गदर्शन/साहाय्य करणे.
- आठवड्यातून तीन वेळा सोयीनुसार अथवा शेवटच्या तासिकेत प्रगतशील विद्यार्थीसमूह (club) मार्गदर्शन/साहाय्य करेल.
- सदर घटकात प्रगत झालेला विद्यार्थी अप्रगत असलेल्या पुढील गटात प्रवेश करेल.
- शिक्षक महिना अखेरीस वर्गांत गट चाचणी घेऊन पडताळणी करतील.
- १००% वर्ग प्रगत होईपर्यंत गरजेनुसार, घटकनिहाय समूहाचे काम सुरू राहील. प्रत्येक वर्गातील समूहांमध्ये योग्य समन्वय ठेवण्याची जबाबदारी त्या–त्या इयत्तेतील समूहप्रमुख म्हणून त्या शिक्षकांची राहील.
- शाळेतील प्रत्येक इयत्तेतील प्रगतशील विद्यार्थ्यांचा समूह त्या–त्या समूहातील अप्रगत विद्यार्थ्याला मार्गदर्शन/साहाय्य करतील याची शाळेतील प्रत्येक इयत्तेचे शिक्षक दक्षता घेतील.

- आठवड्यातून तीन वेळा सोयीनुसार अथवा शेवटच्या तासिकेत प्रगतशील विद्यार्थीसमूह मार्गदर्शन/साहाय्य करतील याची शाळेतील प्रत्येक इयत्तेचे शिक्षक नोंद ठेवतील.
- सदर घटकात प्रगत झालेला विद्यार्थी अप्रगत असलेल्या पुढील गटात प्रवेश करतील याची काळजी प्रत्येक इयत्तेचे शिक्षक घेतील.
- १००% वर्ग प्रगत होईपर्यंत गरजेनुसार, घटकनिहाय समूहाचे काम सुरू राहील, याकडे शाळेतील प्रत्येक इयत्तेच्या शिक्षकांचे लक्ष असेल.
- शाळेतील सर्व समूहांमधील समन्वयाची प्रक्रिया सुरळीतपणे चालण्यासाठी मुख्याध्यापक सनियंत्रण व मार्गदर्शन करतील.

**प्रगतशील विद्यार्थी समूहपरिषदेची जबाबदारी :**

- केंद्र परिषदेच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे तसेच चर्चा घडवून आणणे.
- SCERT च्या माध्यमातून संदर्भसाहित्य उपलब्ध करून देणे. (पायाभूत भाषा साक्षरता, माझा अभ्यास, सेतू अभ्यास, विद्याप्रवेश, विविध विषयांच्या साहित्य पेट्या इत्यादी)
- Website च्या माध्यमातून सराव प्रश्नपत्रिका व प्रश्नपेढी उपलब्ध असल्याबाबत व त्यांच्या वापरासंदर्भात प्रोत्साहन देणे.
- VSK Portal वरील 'स्वाध्याय' चा वापर करून सक्षमीकरणास मदत होईल.
- SCERT च्या अधिकृत YOUTUBE CHANNEL वरून विविध तज्ज्ञांचे प्रोत्साहन व मार्गदर्शनावर आधारित VIDEO उपलब्ध असून वापराबाबत जागृती करणे.
- SCERT वेबसाईट ची लिंक : www.maa.ac.in
- SCERT you tube channel : scertmaharashtra.youtube
- VSK Portal वरील स्वाध्याय उपक्रम.
- SCERT मार्फत विविध मूल्यांवर आधारित व्हिडिओ.
- SCERT मार्फत पाठ्यक्रमातील विविध घटकांवर आधारित व्हिडिओ. (नियोजित)
- SCERT मार्फत घेतले जाणारे वैविध्यपूर्ण प्रशिक्षण व दिलेले संदर्भ साहित्य. केंद्रस्तरावरील परिषदांमध्ये सदर उपक्रमाबाबत आढावा घेण्यात यावा.
- तसेच पंचायत समिती स्तरावरील बैठकांमध्येही विचार विनिमय होऊन आढावा घेण्यात यावा.
- प्रगत/अप्रगत या शब्दांचा वापर शिक्षकांनी वर्गात करू नये. अशा प्रकारचा भेद निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

## समूहाचा उपक्रमनिहाय आराखडा

| इयत्ता – | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विषय | महिना | चाचणीतील गुणांच्या आधारे निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीची विधाने | अध्ययन निष्पत्ती विधानाशी संबंधित | समूहातील मुलांची नावे | सुचविलेले उपक्रम किंवा कृतिपत्रिका | मुलांच्या शैक्षणिक कामगिरीतील वर्णनात्मक नोंदी | पालकांच्या सहभागासाठी सुचविलेले उपक्रम |
| | | | | | | | |

## समूहाचा उपक्रमनिहाय भरलेला आराखडा

| इयत्ता – दुसरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विषय | महिना | चाचणीतील गुणांच्या आधारे निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीची विधाने | अध्ययन निष्पत्ती विधानाशी संबंधित | समूहातील मुलांची नावे | सुचविलेले उपक्रम किंवा कृतिपत्रिका | मुलांच्या शैक्षणिक कामगिरीतील वर्णनात्मक नोंदी | पालकांच्या सहभागासाठी सुचविलेले उपक्रम |
| मराठी | ऑगस्ट | लिखित/छापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात. | • अक्षर आणि ध्वनी यांचा संबंध स्पष्ट नाही. | राम, श्याम, सीता, राधा | उपक्रम : • वेगवेगळे आवाज ऐकवून त्यांतील ध्वनी ओळख–ण्यासाठीचे उपक्रम | • राम आणि राधाला ध्वनी व संबंधित अक्षर ओळखता येऊ लागले आहेत. | • ठरावीक अक्षरे आणि स्वरचिन्हे वापरून वर्तमान–पत्रातील येणारे शब्द शोधा. |
| | | | • अक्षरे व स्वर–चिन्हे | | • ध्वनी ऐकवून त्याच्याशी संबंधित अक्षर कार्ड | • श्याम आणि सीता यांना ध्वनी ऐकून अक्षरकार्ड, स्वरचिन्ह | |

| विषय | महिना | चाचणीतील गुणांच्या आधारे निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीची विधाने | अध्ययन निष्पत्ती विधानाशी संबंधित | समूहातील मुलांची नावे | सुचविलेले उपक्रम किंवा कृतिपत्रिका | मुलांच्या शैक्षणिक कामगिरीतील वर्णनात्मक नोंदी | पालकांच्या सहभागासाठी सुचविलेले उपक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | या पासून शब्द बनतात हे स्पष्ट नाही. | | आणि स्वरचिन्ह कार्ड निवडतात. उदा. काव काव | कार्ड वापरून शब्द बनवता येऊ लागले आहेत. | |

## वार्षिक अहवाल नमुना :

| महिना : | इयत्ता : | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांची नावे | वर्षाअखेरीस प्राप्त आणि अप्राप्त अध्ययन निष्पत्तीचा क्रमांक | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## वार्षिक अहवालाचा भरलेला नमुना :

| महिना : | इयत्ता : | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांची नावे | वर्षाअखेरीस प्राप्त आणि अप्राप्त अध्ययन निष्पत्तीचा क्रमांक | | | | | | |
| | 02.17.01 | 02.17.02 | 02.17.03 | 02.17.04 | 02.17.05 | 02.17.06 | 02.17.07 |
| राम | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | × | ✓ |
| श्याम | × | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ |
| राधा | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ |
| सीता | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | × | × |

❑❑❑

# २६. पाककला आणि परसबाग समूह

## पार्श्वभूमी :

पाककला आणि परसबाग हे केवळ उपक्रम नसून जीवनशैली सुधारण्यासाठी, निसर्गाशी नाळ जोडण्यासाठी आणि कौशल्य विकसित करण्यासाठी प्रभावी साधने आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे पारंपरिक अन्नपद्धती आणि सेंद्रिय शेतीचा विसर पडत चालला आहे. परिणामी आरोग्य समस्यांमध्ये वाढ, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर आणि पर्यावरणीय असंतुलन निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये स्वयंपाक, पोषणतत्त्वांची जाणीव आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व समजावून देण्यासाठी शालेय स्तरावर पाककला आणि परसबाग समूह स्थापन करणे आवश्यक ठरते. पाककला (कुकिंग) आणि परसबाग (किचन गार्डन) हे दोन उपक्रम आहेत, जे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये, आत्मनिर्भरता आणि निसर्गाशी नाळ जोडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. शालेय अभ्यासक्रमात या विषयांना समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिकतेची जाणीव, सर्जनशीलता आणि श्रमप्रतिष्ठा वाढवता येते.

## प्रस्तावना :

शालेय शिक्षणाचा उद्देश केवळ शैक्षणिक ज्ञान देणे नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हा आहे. पाककला आणि परसबाग या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरतेची सवय लागते. निसर्गाविषयी आस्था निर्माण होते आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीची शिकवण मिळते. पाककलेच्या माध्यमातून विद्यार्थी आरोग्यदायी अन्न तयार करायला शिकतात तर परसबागेतून त्यांना सेंद्रिय शेतीचे प्राथमिक ज्ञान मिळते. हे उपक्रम त्यांना कृतीयुक्त शिक्षणाचे आणि सर्जनशीलता वाढवण्याचे साधन ठरतात. त्यामुळे शाळांमध्ये पाककला आणि परसबाग समूह स्थापन करून जीवन कौशल्यांचा विकास करणे अत्यावश्यक आहे.

## पाककला आणि परसबाग समूह संकल्पना उद्दिष्टे :

- आरोग्यदायी आणि पोषणतत्त्वांनी समृद्ध पदार्थ तयार करायला शिकवणे.
- स्थानिक व पारंपारिक पदार्थांबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- वेळ व्यवस्थापन, श्रमप्रतिष्ठा, आणि सहकार्य यांचे महत्त्व पटवून देणे.
- सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीचे महत्त्व समजावून देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम आणि श्रमसंस्कृती विकसित करणे.
- सेंद्रिय खत वापराचे महत्त्व आणि जलसंधारण तंत्रांचा वापर शिकवणे.

## वार्षिक वेळापत्रक पाककला आणि परसबाग समूहासाठी नियोजन

**उद्‌दिष्ट :**

समूहाच्या उद्देशांना अनुसरून शाळेत विविध उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढेल. नवीन कौशल्यांचा विकास होईल आणि शाळेच्या परिसरात सृजनशील वातावरण तयार होईल.

## वार्षिक वेळापत्रक – उपक्रमांचे मासिक नियोजन

| महिना | उपक्रम | जबाबदारी/विशेष नोंद |
|---|---|---|
| जून | • समूहाची स्थापना व उद्‌घाटन.<br>• सदस्यांची निवड व जबाबदारीचे वाटप.<br>• परसबागेचे नियोजन, बियाणांची निवड व परसबाग माहिती देणे.<br>• आहाराविषयी कार्यशाळा | शिक्षक आणि गटनेते:<br>समूहाचे उद्‌दिष्टे स्पष्ट करणे.<br>कार्यशाळा नियोजन व नोंद |
| जुलै | • परसबागेतील लागवडीसाठी जमीन तयार करणे.<br>• सेंद्रिय खत तयार करण्यासाठी कंपोस्टिंग उपक्रम<br>• पाककृतीसाठी तज्ञांचे मार्गदर्शन | विद्यार्थ्यांनी सामूहिक सहभाग द्यावा.<br>नोंदी व उपक्रम माहिती<br>तज्ज्ञ मार्गदर्शन प्रश्नावली |
| ऑगस्ट | • स्वयंपाक गटासाठी ‘आरोग्यदायी नाश्ता’ कार्यशाळा.<br>• परसबागेतील पहिल्या टप्प्यातील लागवड पूर्ण करणे. | तज्ञ यांना मार्गदर्शनासाठी निमंत्रित करा. |
| सप्टेंबर | • शिक्षक दिनानिमित्त विशेष पाककृती उपक्रम.<br>• बागेतील झाडांची देखभाल व पुनरावलोकन.<br>• आनंद मेळाव्याचे आयोजन | विद्यार्थ्यांना बागेची नियमित देखभाल शिकवणे. आनंद मेळावा ठिकाण व कार्यक्रम नोंदी |
| ऑक्टोबर | • सेंद्रिय शेती कार्यशाळा (दिवाळीपूर्वी )<br>• पारंपरिक पाककृती स्पर्धा.<br>• वनभोजन आयोजन व परिसरास भेट | विद्यार्थ्यांमध्ये पारंपरिक कौशल्ये विकसित करणे.<br>स्पर्धा व परिसर भेट |
| नोव्हेंबर | • परसबागेतील दुसऱ्या टप्प्यातील लागवड.<br>• सेंद्रिय उत्पादने साठवणे व व्यवस्थापन.<br>• करियर मार्गदर्शन व हॉटेलला भेट–मुलाखत | शिक्षक व विद्यार्थ्यांचे सहकार्य आवश्यक.<br>मार्गदर्शन प्रश्नावली व मुलाखत |

| महिना | उपक्रम | जबाबदारी/विशेष नोंद |
|---|---|---|
| डिसेंबर | • हिवाळी भाज्यांचे विशेष उपक्रम व प्रकल्प.<br>• 'स्वयंपाकात विज्ञान' या विषयावर चर्चासत्र.<br>• विज्ञान क्लब अंतर्गत – ऋतूनुसार फळभाज्या व फलाहार याचे चर्चासत्र | चर्चासत्र नियोजन व कार्यवाही गटनेत्यांनी अहवाल तयार करावा. |
| जानेवारी | • प्रजासत्ताक दिनासाठी अन्न प्रदर्शन.<br>• बागेतील उत्पादनांची विक्री (शाळेच्या इतर विद्यार्थ्यांसाठी).<br>• चिमुकल्यांचा बाजार<br>• भोगी सणाचा आस्वाद स्नेहभोजन | विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र समजावून देणे. ऋतुमानानुसार आहारातील बदल सांगणे बाजारविषयी व्यवहार व नोंदी ठेवणे. |
| फेब्रुवारी | • बागकाम व स्वयंपाकातील आव्हाने यावर अनुभव सत्र.<br>• अंतिम उत्पादनांचे संकलन व नोंदवही तयार करणे.<br>• पोषण आहार व नियमित आहार तज्ज्ञ मार्गदर्शन व फळभाज्या व पालेभाज्यांची माहिती. | उत्पादन व प्रगतीचे विश्लेषण करणे. पालेभाज्या व तज्ज्ञ मार्गदर्शन नोंदी |
| मार्च | • वर्षभराचा आढावा व अनुभव सामायिक करणे.<br>• उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार व सन्मान सोहळा. | समारोप सत्र आणि पुढील वर्षाचे नियोजन. |
| एप्रिल | • उन्हाळी झाडे आणि त्यांची निगा राखण्यासाठी कार्यशाळा<br>• फळ व त्यापासून विविध उत्पादने याची कार्यशाळा | शाळेच्या सुट्टीपूर्व तयारीसाठी. |
| मे | • गटासाठी विश्रांतीचा कालावधी आणि पुढील वर्षाचे पूर्वनियोजन. | शिक्षकांनी नोंदी ठेवाव्यात. |

पाककला आणि परसबाग समूहाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शैक्षणिक विभागाकडून खालील प्रकारची मदत उपलब्ध करून दिली जाऊ शकते.

### १) शैक्षणिक साहित्य व संसाधने

- पाककला, पोषणतत्त्वे आणि परसबागेच्या तांत्रिक माहितीवर आधारित पुस्तके.

- कंपोस्टिंग, सेंद्रिय शेती आणि कीडनाशकांच्या नैसर्गिक पद्धतींवरील मार्गदर्शिका.
- पोस्टर्स, फलक आणि ॲक्टिविटी शीट्स विद्यार्थ्यांसाठी तयार केल्या जातील.
- विषयाशी संबंधित शैक्षणिक व्हिडिओ, तज्ज्ञांची व्याख्याने आणि ऑनलाइन कोर्सेसची उपलब्धता
- गट नेत्यांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन.
- शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान, कृषी पद्धती आणि आरोग्यपूर्ण स्वयंपाक यावर मार्गदर्शन.
- पाककलेतील नवकल्पना व परसबागेतील नैसर्गिक तंत्रे शिकवण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करणे.
- परसबागेतील लागवड, बी–बियाणे,खत आणि उपकरणांसाठी निधी प्रदान करणे.
- पाककलेसाठी आवश्यक साधने जसे की किचन गॅझेट्स, भांडी आणि सामग्रीसाठी आर्थिक मदत.
- शाळेत आयोजित होणाऱ्या पाककृती आणि परसबाग प्रदर्शनांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देणे.
- परसबागेसाठी शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय खत उत्पादन व झाडांची निगा राखण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेणे.
- पाककलेतून आरोग्यपूर्ण अन्न तयार करण्यासाठी व्यावसायिक सल्ला व करियर मार्गदर्शन करणे.
- समूहाच्या उपक्रमांचे वार्षिक मूल्यमापन करून त्यावर आधारित मार्गदर्शन.
- उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गट व विद्यार्थ्यांना शाळा व विभाग स्तरावर सन्मानित करणे.
- गटाने राबवलेल्या उपक्रमांचा विभागाच्या अहवालात समावेश करून इतर शाळांसाठी प्रेरणादायक उदाहरणे तयार करणे.
- आधुनिक शेती उपकरणे, सिंचन यंत्रणा आणि सेंद्रिय शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यांची उपलब्धता.
- आधुनिक स्वयंपाक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक आणि साहित्य पुरवणे.
- शालेय गटांसाठी विशेष प्रेरणा शिबिरे आयोजित करणे.
- शालेय स्तरावर पर्यावरण संवर्धन व पौष्टिक आहाराचे महत्त्व समजावून देणे.
- स्नेहभोजन व आनंद मेळाव्याचे आयोजन

### २. व्हिडिओ आणि मल्टीमीडिया साहित्य

आरोग्यदायी अन्नपदार्थ कसे तयार करायचे यावर व्हिडिओ

- वेगवेगळ्या प्रदेशीय व पारंपरिक पाककृतींची झलक.
- कंपोस्टिंग, रोपांची निगा आणि सेंद्रिय बागकाम यावर प्रात्यक्षिक व्हिडिओ.

- कमी संसाधनांत परसबाग विकसित करण्याच्या तंत्रांवर माहितीपट.
- पोषणमूल्यांचे चार्ट, अन्नपदार्थांच्या आरोग्यासाठी फायदेशीर गोष्टी आणि आहार नियोजनासाठी उपयुक्त पोस्टर.
- रोपांच्या लागवड तंत्राचे, बागेची काळजी घेण्याचे वेळापत्रक आणि घरच्या घरी खत तयार करण्याची प्रक्रिया.
- सामुदायिक स्वयंपाक शिबिरांसाठी प्रशिक्षण साहित्य.
- पोषणमूल्ये समजावून सांगणारी प्रात्यक्षिके.
- रोप लागवड, पाणी व्यवस्थापन आणि सेंद्रिय शेतीची साधने व प्रक्रिया समजावणारे किट.
- पर्यावरण संवर्धनासाठी कचऱ्याचे वर्गीकरण व कंपोस्टिंग शिबिरांचे साहित्य.
- अन्न वाया न घालवण्याचे महत्त्व व उपाय.
- स्थानिक पातळीवरील उत्पादने वापरण्याचे फायदे.
- सेंद्रिय उत्पादनांचे आरोग्यदायी फायदे.
- परसबागेमुळे पर्यावरण संवर्धनात होणारे योगदान.
- पदार्थ शिजवण्यासाठी ऊर्जा बचतीच्या पद्धती.
- सोलर कुकर व पर्यायी उपकरणांवरील माहिती.
- सांडपाण्याचा पुनर्वापर, ठिबक सिंचन (ड्रिप सिंचन) व सेंद्रिय खतांचे फायदे.

## पाककला व परसबाग यासाठी उपक्रमसूची

विद्यार्थ्यांसाठी परसबाग आणि पाककलेशी संबंधित उपक्रम राबवणे केवळ शैक्षणिक नाहीतर त्यांच्यात सर्जनशीलता, नैसर्गिकता आणि स्वावलंबन यांचे मूल्यही रुजवते.

## विद्यार्थ्यांसाठी परसबाग व पाककलेशी संबंधित काही उपक्रम

- पाककला आणि परसबाग यांचा समन्वय साधून ''शेती ते थाळी'' या संकल्पनेचा अनुभव देणे.
- परसबागेत पिकवलेल्या भाज्यांचा उपयोग करून पाककृती स्पर्धांचे आयोजन करणे.
- सलाड, सूप, सांडगी भाजी, पोळी, पराठा यासारख्या सरळ आणि पौष्टिक पदार्थांची तयारी शिकवणे.
- **थीम-आधारित स्वयंपाक स्पर्धा :** 'सात्विक आहार', स्थानिक पदार्थ', किंवा 'कचरा कमी करणारी पाककृती' यावर स्पर्धा आयोजित करणे.
- **पोषण कार्यशाळा :** आहारातील प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, जीवनसत्त्वे यांची ओळख करून देणे.
- **आंतरराष्ट्रीय पाककृतीचा परिचय :** विविध देशांतील साध्या पाककृती शिकवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व्यापकता देणे.

- **शाळेच्या आवारात बाग तयार करणे :** भाजीपाला, फळझाडे, औषधी वनस्पती लावून नियमित काळजी घेणे.
- **कचऱ्यापासून खत तयार करणे (कंपोस्टिंग) :** ओला कचरा वापरून सेंद्रिय खत तयार करायला शिकवणे.
- **हंगामी पिके लावणे :** हिवाळ्यातील भाजीपाला (गाजर, पालक) आणि उन्हाळ्यातील फळे (कलिंगड, खरबूज) लावून हंगामानुसार शेतीचे ज्ञान देणे.
- स्वतःची बाग असा घरी लहानसा परसबाग प्रकल्प राबवणे.
- **परसबाग तयार करण्याची कार्यशाळा :** परसबाग कशी तयार करायची, त्यासाठी लागणारी साधने, प्रक्रिया आणि झाडांच्या काळजीविषयी माहिती देणे.
- **एक बियाणे, एक झाड उपक्रम :** प्रत्येक विद्यार्थ्याने एखादे बियाणे लावून त्याचे झाड होईपर्यंत संगोपन करणे.
- **औषधी वनस्पतींची ओळख :** तुळस, गवती चहा, आले, हळद, कोरफड अशा औषधी वनस्पतींचे महत्त्व आणि उपयोग सांगणे.
- **सेंद्रिय खत तयार करणे (Composting) :** विद्यार्थ्यांनी घरातील सेंद्रिय कचऱ्याचा उपयोग करून खत तयार करणे.
- भाजीपाल्याच्या बियाणांची देवाण-घेवाण उपक्रम राबवून विविध झाडांची लागवड करणे.
- **परसबाग सजावट स्पर्धा :** परसबाग सजवून त्यांचे प्रदर्शन लावणे.
- **हायड्रोपोनिक्स प्रयोग :** मातीशिवाय पाणी आणि पोषकद्रव्यांचा वापर करून भाज्या उगवण्याचा प्रयोग शिकवणे.
- **सोपी रेसिपी स्पर्धा :** ताजी फळे, भाज्या आणि स्थानिक साहित्याचा वापर करून १०-१५ मिनिटांत तयार होणाऱ्या पदार्थांची स्पर्धा.
- **'स्वयंपाक शिकतोय' उपक्रम :** विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसोबत स्वयंपाक शिकण्यास प्रवृत्त करणे.
- मुलांनी केलेल्या पदार्थांचे वर्गात प्रदर्शन.
- **स्थानिक पदार्थ ओळखा :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या गावातील किंवा प्रदेशातील खास पदार्थांची ओळख करून देणे.
- **आरोग्यदायी पदार्थ तयार करणे :** सेंद्रिय साहित्याचा वापर करून पौष्टिक पदार्थ तयार करण्याची कार्यशाळा.उदा. फ्रूट ज्यूस, कढी, सत्त्वयुक्त चटण्या.

- **अन्नाचा अपव्यय टाळा प्रकल्प :** विद्यार्थ्यांना उरलेल्या अन्नाचा योग्य उपयोग करण्याचे महत्त्व समजावून सांगणे.
- फळे व भाज्यांचे चवदार पेय स्पर्धेचे आयोजन करणे.
- **'मी माझ्या बागेतून' उपक्रम :** परसबागेतून तोडलेल्या भाज्या आणि फळांचा उपयोग करून पदार्थ तयार करणे.
- परसबाग आणि पाककला यासाठी शाळेत 'बाग आणि स्वयंपाक महोत्सव' आयोजित करून प्रदर्शन व विक्री आयोजित करणे.
- गटांमध्ये परसबाग तयार करून तिथल्या उत्पादनांचा उपयोग पाककलेसाठी करणे.
- 'पर्यावरण आणि आरोग्य' अभियान राबवणे.
- **स्पर्धा व बक्षिसे :** 'सर्वोत्कृष्ट परसबाग', 'चविष्ट पदार्थ' किंवा 'नवीन कल्पना' यांसाठी स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- शाळेच्या आवारात भाजीपाला, फळे, औषधी वनस्पती लावणे.
- कचरामुक्त परसबाग स्पर्धा आयोजित करणे.
- सेंद्रिय कचऱ्याचा वापर करून कंपोस्ट खत निर्मिती कार्यशाळा आयोजन करणे.
- शाळेत वनस्पती प्रदर्शन भरवणे.
- घरगुती परसबाग स्पर्धा आयोजन करणे.
- सर्वोत्तम परसबाग स्पर्धा हा उपक्रम राबवणे.
- स्थानीय पदार्थ बनवण्याच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे.
- विविध भागातील पारंपरिक पदार्थ शिकवणे.
- सणांशी संबंधित पाककलेवर कार्यशाळा घेणे.
- आरोग्यदायी पदार्थ बनवण्याची स्पर्धा आयोजित करणे.
- सेंद्रिय फळभाज्या, कमी साखर, कमी तेल यांचा वापर करून पदार्थ तयार करणे.
- 'शून्य कचरा पाककला उपक्रम' राबवणे.
- स्वयंपाकात उरलेल्या साहित्याचा नवीन पदार्थ बनवण्यासाठी वापर.
- अन्नविज्ञानशास्त्र (Food Science) वर आधारित गटचर्चा किंवा प्रयोग.
- विद्यार्थी आणि पालकांसाठी पाककलेचा महोत्सव भरवणे.
- वनस्पतींच्या फायद्यांवर प्रकल्प सादरीकरण स्पर्धा आयोजन करणे.

- परसबाग प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे.
- बिया संग्रह उपक्रम (Seed Bank Initiative) राबवणे.
- छोट्या जागेत परसबाग (Urban Gardening) स्पर्धा आयोजित करणे.
- पुनर्वापराच्या माध्यमातून बाग तयार करणे.
- झाडांसाठी नैसर्गिक खत (किचन वेस्टपासून कंपोस्टिंग) तयार करणे
- बिया रोपण अभियान (Seed Planting Drive) राबवणे.
- सेंद्रिय परसबाग महोत्सव आयोजित करणे.
- विद्यार्थ्यांनी घरी बनवलेल्या पदार्थांचे प्रदर्शन भरवणे.
- घरातील उपलब्ध साहित्याचा वापर करून सोपे पदार्थ बनवण्याची स्पर्धा घेणे.
- अंकुरित कडधान्ये (Raw Food) पाककला स्पर्धा आयोजित करणे.
- कचरा टाळून स्वयंपाक स्पर्धा आयोजन करणे.
- फळभाज्यांपासून वेगवेगळे आकार तयार करण्याची कला (Food Art) स्पर्धा घेणे.
- शालेय परसबाग प्रकल्प – शाळेच्या आवारात किंवा घराच्या अंगणात लहानशा परसबागेची निर्मिती विद्यार्थी विविध भाजीपाला आणि औषधी वनस्पती लावतील आणि त्यांचे निरीक्षण करतील.
- रोप वाढवण्याचा प्रयोग – विविध बिया (टोमॅटो, मिरची, कोथिंबिरी इ.) कशा रुजतात याचा अभ्यास करणे.
- कचऱ्यापासून खतनिर्मिती (Composting) – घरातील ओला कचरा वापरून सेंद्रिय खत तयार करणे आणि परसबागेत वापरणे.
- परसबागेतील मित्र–शत्रू कीटकांचे निरीक्षण – कोणते कीटक झाडांसाठी उपयुक्त आहेत आणि कोणते हानिकारक आहेत हे शोधणे.
- ऋतूनुसार लागवडीचा अभ्यास – कोणत्या ऋतूमध्ये कोणती झाडे लावावीत याचा अभ्यास करून सेंद्रिय शेतीच्या तत्त्वांवर प्रयोग करणे.
- शाळेत 'स्वयंपाक व पोषण कार्यशाळा – मुलांना आरोग्यदायी आणि सोप्या पाककृती शिकवणे.
- निरोगी आहार' स्पर्धा – विद्यार्थी पोषणमूल्यांनी समृद्ध डिश तयार करून त्याचे फायदे सांगतील.
- सेंद्रिय अन्नाचे महत्त्व – परसबागेतून घेतलेल्या भाज्यांपासून पौष्टिक पदार्थ तयार करणे
- Food Science प्रयोग – दुधापासून पनीर किंवा दही बनवण्याचा प्रयोग, फळांचे ऑक्सिडेशन कसे होते याचा अभ्यास.

- भाज्या व मसाल्यांची ओळख – विद्यार्थ्यांना डोळे बंद करायला लावून त्यांना चव, गंध आणि स्पर्शाच्या आधारे पदार्थ ओळखण्यास सांगण्याचा खेळ.

हे सर्व उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणार नाहीत तर प्रत्यक्ष प्रयोग आणि अनुभवातून शिकण्यास मदत करतील. यामुळे त्यांच्यात सर्जनशीलता वाढेल आणि नैसर्गिक संसाधनांचा चांगला वापर कसा करता येईल याची जाणीव होईल.

## परसबाग आणि पाककलेशी (Kitchen Garden) संदर्भातील दिनविशेष यादी

### महत्त्वाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिवस

| अ. क्र. | दिनविशेष | दिनांक/कालावधी | उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | जागतिक दुग्ध दिवस (World Milk Day) | १ जून | विविध दूधजन्य पदार्थांची चव चाचणी व माहिती सत्र घ्या. |
| २) | जागतिक पर्यावरण दिन (World Environment Day) | ५ जून | वृक्षारोपण करा व पर्यावरण संवर्धनावर चित्रकला स्पर्धा घ्या. |
| ३) | फळ सृजन दिवस | जूनचा पहिला आठवडा | फळांपासून पेय व डेसर्ट बनवण्याची स्पर्धा. |
| ४) | जागतिक अन्न सुरक्षा दिवस (World Food Safety Day) | ७ जून | अन्न प्रक्रिया व स्वच्छता यावर प्रात्यक्षिक सादर करा. |
| ५) | वनमहोत्सव/वृक्षारोपण सप्ताह (Van Mahotsav) | १ ते ७ जुलै | शाळेच्या परिसरात वृक्षारोपण आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा घ्या. |
| ६) | जागतिक चॉकलेट दिवस (World Chocolate Day) | ७ जुलै | चॉकलेटपासून पदार्थ बनवण्याची कार्यशाळा घ्या. |
| ७) | परसबाग दिन | २० जुलै | विद्यार्थ्यांनी गटांमध्ये परसबाग तयार करणे. |
| ८) | सेंद्रिय बागकाम दिवस | २८ जुलै/दरवर्षी ऑगस्टमध्ये चौथ्या रविवारी | सेंद्रिय बागकामाची तंत्रे शिकवणे. |
| ९) | राष्ट्रीय पोषण सप्ताह (National Nutrition Week) | १ ते ७ सप्टेंबर | पोषण आहारावर आधारित पाककला स्पर्धा घ्या. |
| १०) | राष्ट्रीय स्वयंपाक दिन (National Cooking Day) | २५ सप्टेंबर | विद्यार्थी व पालक यांच्यासोबत एकत्र पाककृती सादरीकरण करा. |

| अ. क्र. | दिनविशेष | दिनांक/कालावधी | उपक्रम |
|---|---|---|---|
| ११) | जागतिक अन्न दिवस (World Food Day) | १६ ऑक्टोबर | स्थानिक अन्नधान्यांवर आधारित प्रदर्शन आयोजित करा. |
| १२) | आंतरराष्ट्रीय शेफ दिवस (International Chefs Day) | २० ऑक्टोबर | स्थानिक शेफना आमंत्रित करून प्रात्यक्षिक घ्या. |
| १३) | जागतिक माती दिवस (World Soil Day) | ५ डिसेंबर | माती परीक्षण कार्यशाळा व जमिनीचे महत्त्व यावर चर्चा घ्या. |
| १४) | राष्ट्रीय शाश्वत शेती दिन (Sustainable Agriculture Day) | २३ डिसेंबर | नैसर्गिक शेतीवरील शैक्षणिक सत्र व बागकाम प्रात्यक्षिक घ्या. |
| १५) | आंतरराष्ट्रीय पोळीसण दिवस (Pancake Day) | फेब्रुवारी महिन्याचा शेवटचा मंगळवार | पोळीच्या विविध प्रकारांवर आधारित लघु प्रात्यक्षिक सादर करा. |
| १६) | आंतरराष्ट्रीय ब्रेकफास्ट दिन (Breakfast Day) | मार्च महिन्याचा पहिला रविवार | संतुलित न्याहारी सादरीकरण व माहिती सत्र घ्या. |
| १७) | जागतिक पाणी दिन (World Water Day) | २२ मार्च | जलसंधारण उपक्रम व जल बचतीवर घोषवाक्य स्पर्धा घ्या. |
| १८) | जागतिक हवामान दिन (World Meteorological Day) | २३ मार्च | हवामान निरीक्षण व हवामान बदलावर चर्चासत्र घ्या. |
| १९) | जागतिक शून्य कचरा दिवस (Zero Waste Day) | ३० मार्च | पुनर्वापर व पुनर्चक्रण यावर कार्यशाळा घ्या. |
| २०) | आंतरराष्ट्रीय बेकिंग दिवस (World Baking Day) | १७ मे | बेकिंग स्पर्धा किंवा डेमो सत्र आयोजित करा. |
| २१) | आंतरराष्ट्रीय चहा दिवस | २१ मे | विविध प्रकारचे चहा व त्यांचे आरोग्य फायदे यावर चर्चा करा. |
| २२) | जागतिक जैवविविधता दिवस | २२ मे | शाळा परिसरातील जैवविविधता पाहणी व नोंद घेण्याचा उपक्रम घ्या. |

वरील दिनविशेष विद्यार्थी आणि शिक्षकांना उपक्रम यशस्वीपणे राबविण्यास नक्कीच मदत करतील.

## संदर्भ यादी


- आधुनिक शाकाहारी पाककला/ऋतुदास/शंभू प्रकाशन/२०१८
- भारतीय भाज्यांचे उत्पादन/डॉ. के. एन. श्रीवास्तव/भारतीय कृषी संशोधन संस्था/२०१६

- आधुनिक भारतीय पाककला/संजीव कपूर/फूड पब्लीशर्स/२०१५
- स्वयंपाक घरातील हिरव्या भाज्या/डॉ.शिवाजी शिंदे/पुणे विद्यापीठ प्रकाशन/२०१४
- भाजीपाला उत्पादन आणि पाककला/वैशाली देशमुख/मॅक्सवेल पब्लिकेशन/२०१८
- रुचिरा/कमलाबाई ओगले/मॅजेस्टिक प्रकाशन १९७०
- अन्न हे पूर्णब्रह्म/वि. स. खांडेकर/मॅजेस्टिक प्रकाशन/१९६०
- कृषी संस्कृती/शंकरराव खरात/मॅजेस्टिक प्रकाशन/१९८० चे दशक


❑❑❑

# २७. व्यावसायिक शिक्षण समूह

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ व राज्य अभ्यासक्रम आराखडा यांतर्गत व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. व्यावसायिक कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्यासाठी कृतीतून शिक्षण देणे अपेक्षित आहे. या कृतीमध्ये अंतरवासिता, शिकाऊ उमेदवारी, कार्यशाळा, क्षेत्रभेट, प्रदर्शनी, तज्ज्ञांचे व्याख्यान यासारख्या कृतींचा समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सद्यस्थितीत संबंधित बाबीच्या अंमलबजावणीसाठी संसाधने व मनुष्यबळ उपलब्ध नाही असे दिसून येते. शालेय स्तरावर शालेय परिसरातील तज्ज्ञ, विद्यार्थी, पालक, शिक्षकांचा समूह स्थापन करण्यात आला तर नक्कीच व्यावसायिक शिक्षणाची उद्दिष्टे सफल होण्यास साहाय्यकारी ठरू शकेल.

**संकल्पना :**

व्यावसायिक शिक्षण समूह म्हणजे शाळेमध्ये व्यवसाय शिक्षणाची कौशल्ये रुजविण्यासाठी साहाय्य करणारा समूह असेल. याअंतर्गत संसाधने लागणार आहे. त्याची उपलब्धता शालेय स्तरावर होण्यासाठी व व्यवसाय शिक्षण अंतर्गत विविध उपक्रम उदा. कार्यशाळा, प्रदर्शनी, क्षेत्रभेट इ. साठी नियोजन करण्यासाठी सदर समूह कार्यरत असणार आहे.

**उद्दिष्टे :**

- विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक क्षमता, कौशल्य, ज्ञान व व्यवसायासंबंधी मूल्ये विकसित करण्यास साहाय्य करणे.
- विद्यार्थ्यांना विविध व्यवसायाबाबत माहिती मिळण्यासाठी साहाय्य करणे.
- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून विविध व्यवसायांचा अनुभव देणे.
- व्यावसायिक शिक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासाठी संसाधने उपलब्ध करण्यास साहाय्य करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा रुजविण्यासाठी साहाय्य करणे.
- विद्यार्थ्यांना स्वत:ला आवडणाऱ्या व्यवसायाविषयी जाणीव निर्माण करणे.

**१) व्यवसाय शिक्षण समिती/समूह रचना :**

**२) शालेय स्तरावर समिती :**

- अध्यक्ष १
- सचिव १

- सदस्य : पूर्वतयारी स्तर १, पूर्वमाध्यमिक स्तर १, माध्यमिक स्तर १, विद्यार्थी प्रतिनिधी.
- विद्यार्थी प्रतिनिधी प्रत्येक इयत्तेतून १

### ३) समूहाच्या उपक्रमाची व्याप्ती :

- शालेय स्तरावरील समिती वर्ग स्तरावरील समूहाला विविध उपक्रमांचे वार्षिक नियोजन, विविध संसाधने उपलब्ध करून देणे, तज्ज्ञांशी संपर्क करणे याबाबत साहाय्य करेल.
- वर्ग स्तरावरील समूह व्यावसायिक शिक्षणातर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन करणे, साहित्याची यादी करणे, विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेण्यासाठी पालकांची परवानगी घेणेबाबत कार्य करेल.

### ४) समूहाचे कामकाज करण्यासाठी सविस्तर सूचना :

#### अ) शालेय स्तरावरची समिती :

- शाळा सुरू झाल्यावर पहिल्या सभेमध्ये या समितीच्या कार्याबाबत माहिती देण्याबाबत सदस्य निवडीची प्रक्रिया पार पाडून घ्यावी.
- सर्व वर्गातील शिक्षकांना व्यावसायिक शिक्षणाबाबत संसाधने कोणते सदस्य उपलब्ध करून देणार आहेत याबाबत माहिती द्यावी.
- व्यावसायिक शिक्षणाचे विविध उपक्रम क्षेत्रभेट, आंतरवासिता, शिकाऊ उमेदवारी या सारख्या उपक्रमांसाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी या बैठकीत कोणते पालक स्वयंसेवक म्हणून मदत करतील याबाबत यादी तयार करून घ्यावी व शिक्षकांना उपलब्ध करून द्यावी.
- प्रदर्शन, मेळा यासारख्या उपक्रमांसाठी कोणते पालक मदत करू शकतील याबाबत यादी तयार करून घ्यावी.
- समितीची मासिक सभा घेण्यात यावी.
- समितीतील सदस्यांना विद्यार्थ्यांमध्ये कोणती व्यावसायिक कौशल्ये कोणत्या इयत्तेतील विद्यार्थ्यांना अवगत होण्यासाठी कोणते उपक्रम सुरु आहेत याबाबत माहिती मासिक सभेतून देण्यात यावी.

#### ब) वर्ग स्तरावरील सूचना

- शाळा सुरु होण्यापूर्वी व्यावसायिक शिक्षण देण्यासाठीचे वार्षिक नियोजन तयार करावे.
- वार्षिक नियोजनात मासिक निहाय अध्ययन अनुभव, आवश्यक साहित्य, अध्ययन निष्पत्ती, मूल्यमापन कसे करणार याचे नियोजन करण्यात यावे.
- शालेय स्तरावरील समितीची आवश्यक साधनसाहित्य मिळविण्यासाठी मदत घ्यावी.
- व्यावसायिक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञांचे व्याख्यान, खेळ, प्रदर्शनी, क्षेत्रभेट यांसारख्या उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार, उपलब्ध संसाधनानुसार आयोजन करावे.

## ५) वार्षिक दिनदर्शिकेत कोणत्या उपक्रमाचा समावेश असावा

**अ) विद्यार्थी वयोगटानुसार खालील उपक्रमांचा समावेश करता येईल.**

- परिसरातील प्रगत शेतकऱ्यास भेट व संवाद या उपक्रमात विद्यार्थी संबंधित शेतकऱ्याने कोणते पीक घेतले, त्यासाठी कोणत्या अभिनव पद्धती वापरली, इतर शेतकऱ्यां पेक्षा कोणता नवीन विचार केला. या पीक पद्धतीमध्ये कोणत्या बाबीचा कोणत्या क्रमाने समावेश होतो याबाबत माहिती घेतील
- लाकूड काम करणाऱ्या कारागिराची कार्यशाळा व प्रदर्शनी आयोजन परिसरातील लाकूड काम करणाऱ्या कारागिराला आमंत्रित करून अनुभव देण्यासाठी प्रात्याक्षिक करून दाखवणे व संबंधित वस्तू विद्यार्थ्यां कडून करून घेणे उदा.–टोपली, फुलदाणी
- पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यास भेट – आपल्या परिसरात शेतकऱ्यांकडून कोणत्या पशुंचे पालन केले जाते, पशुपालन करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी लागते, पशुपालनातून कोण कोणती उत्पादने तयार होऊ शकतात याबाबत माहिती घेणे
- पेट शॉप मालकाची मुलाखत परिसरातील पेट शॉप विक्री केंद्रास भेट देऊन कोणते पाळी व प्राणी विकले जातात, विकण्यासाठी ते कोठून आणले जातात, त्यांची काळजी कशी घ्यायची, त्यांचे अन्न व इतर काळजी याबाबत ग्राहकांना कशी माहिती द्यायची याबाबत माहिती घेणे.
- एक दिवस रुग्णालयात – परिसरातील रुग्णालयात जाऊन एक दिवस तेथे साहाय्य उपलब्ध करून तेथील कामकाज समजून घेणे.
- पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करणे व प्रदर्शन – विविध साहित्या उदा. माती, कागद, करवंटी किंवा इतर साहित्या वापरून मूर्ती तयार करणे व प्रदर्शन भरवणे.
- पतंग महोत्सवाचे आयोजन करणे – विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे पतंग तयार करून विक्रीसाठी प्रदर्शन भरविणे, तेथे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खाद्य पदार्थ, इतर वस्तू विक्रीसाठी प्रदर्शनीत ठेवणे, जागा उपलब्ध असेल तर ग्राहकांना पतंग उडविण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.
- परिसरात उपलब्ध व्यवसायाबाबत माहिती घेणे व सादरीकरण करणे विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरात उपलब्ध सर्व व्यवसायाची माहिती घ्यावी व त्यांच्या कार्याबाबत व आवश्यकतेबाबत सादरीकरण करावे उदा. शेतकरी, स्वच्छता कर्मचारी, शिक्षक, डॉक्टर, अभियंता, वकील इ.
- विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरात उपलब्ध धान्यबाजारास भेट द्यावी. धान्याचा बाजार भाव कसा ठरवला जातो, धान्य उत्पादन, वाहतूक, मिळणारा भाव याबाबत माहिती घ्यावी
- अधिकाऱ्यांची मुलाखत मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राचार्य, शिक्षणाधिकारी, पोलीस अधिकारी यांची मुलाखत घेणे.

### ब) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनविशेष

| अ. क्र. | दिवस | विवरण | उपक्रम |
|---|---|---|---|
| १) | ५ सप्टेंबर | शिक्षक दिन | विविध पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक, उच्च महाविद्यालयीन स्तरावर शिक्षक बनण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी परीक्षेबाबत माहिती घेणे. |
| २) | १ जुलै | डॉक्टर दिन | यशस्वी डॉक्टरांच्या जीवनावर आधारित documentary तयार करणे. |
| ३) | १५ सप्टेंबर | अभियांत्रिकी दिन | मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या सिंचन, जलविद्युत उर्जा, सार्वजनिक आरोग्ययातील योगदानाबद्दल भाषण, निबंध स्पर्धा |
| ४) | २३ डिसेंबर | शेतकरी दिन | आपल्या क्षेत्रात होणाऱ्या पिकांविषयी खालील बाबींच्या संबंधित माहिती तयार करा. होणारे पीक, कोणत्या मातीत होते, आवश्यक सूक्ष्म व पोषक द्रव्य, वापरण्यात येणारी खते, केव्हा वापरली जातात, सिंचन पद्धती, पिकावर कोणते रोग कोणत्या महिन्यात येण्याची शक्यता असते, वापरण्यात येणारी pesticides, insecticides पीक काढण्याची पद्धत, कसे साठवले जाते, बाजारात काय भाव मिळतो, या प्रक्रियेला एकूण किती वेळ लागतो. |
| ५) | १२ मे | जागतिक परिचारिका दिन | फ्लोरेंस नाइटिंगेल यांच्या कार्याविषयी निबंध स्पर्धा |
| ६) | १ मे | आंतरराष्ट्रीय कामगार दिन | कामगारांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबाबत भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा |
| ७) | ३ डिसेंबर | वकील दिवस | वकील व न्यायाधीश बनण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता व त्यासाठी आवश्यक करिअर संधीबाबत माहिती गोळा करणे. |
| ८) | ४ मे | आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिवस | अग्निशामक दलात सामील होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता व परीक्षा याबाबत माहिती घेणे. |
| ९) | १४ जानेवारी | व्यवसाय मार्गदर्शन दिन | याबाबत शाळेत सप्ताह साजरा करून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील व्यवसायाची माहिती द्यावी. |
| १०) | १५ जानेवारी | भूदल दिन | माजी सैनिकाच्या मुलाखतीचे आयोजन करणे. |
| ११) | १३ फेब्रुवारी | जागतिक रेडिओ दिन | प्रसारण क्षेत्रातील व्यवसायांची माहिती देणे. |
| १२) | १५ मार्च | जागतिक ग्राहक हक्क दिन | ग्राहकांच्या हक्कांबाबत माहिती देणे. |
| १३) | ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन | परिसरातील डॉक्टरांच्या मुलाखतीचे आयोजन करणे व या व्यवसायातील संधीबाबत माहिती देणे. |

## ६) सदर समितीसाठी नियमावली

### अ) शालेय स्तर

- पहिली बैठक समितीची शाळा सुरू झाल्यावर पहिल्या आठवड्यात घ्यावी.
- मासिक सभा प्रत्येक महिन्यात घेऊन सर्व सदस्य उपस्थित असावेत.
- इच्छुक पालकांचा समावेश असल्यास त्यांनी प्रत्येक सभेत उपस्थित राहावे.
- प्रत्येक इयत्तेनुसार मागणी नुसार संसाधने, स्वयंसेवक उपलब्ध करून द्यावे.
- प्रत्येक इयत्तेसाठी शिक्षक व्यावसायिक शिक्षणासाठी शिक्षक कोणते उपक्रम घेत आहेत याचा मासिक आढावा घ्यावा.
- सर्व विद्यार्थ्यांना समावेशित केले जात आहे याचा आढावा घ्यावा.

## ७) शाळेतील सर्व समूहाचे समन्वय प्रक्रिया

- वर्षाच्या सुरुवातीला शालेय मुख्याध्यापक SMC च्या उपस्थितीत सर्व समूहाच्या प्रमुख शिक्षकांनी एकत्रित येऊन चर्चेतून नियोजन केले तर सर्व शिक्षक व विद्यार्थी एकत्रित रीतीने उपक्रमातून आवश्यक अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यास कार्य करू शकतील.
- सर्व शिक्षक/समूह प्रमुख एखाद्या उपक्रमातून एकत्रित कार्य करून आपल्या विषयासंबंधी आवश्यक अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी कार्य करू शकतील. उदा. ऐतिहासिक स्थळी क्षेत्र भेट

## ८) समूह सक्षमीकरणासाठी शिक्षण विभाग/SCERT कडून सहकार्य :

- शिक्षक/मुख्याध्यापक/SMC/SMDC यांना व्यवसाय शिक्षणाचे उद्दिष्ट, राष्ट्रीय शिक्षण धोरणातील अपेक्षा, NCF, SCF यातील समावेश याबाबत आवश्यक असल्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. आवश्यक असेल तर प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जावे.

## ९) समूहाच्या प्रभावी उपक्रमासाठी सहाय्यभूत संसाधने/पुस्तके

- कौशल बोध NCERT
- VOCATIONAL EDUCATION TARUN RASHTRIY
- THE VALUE OF VOCATIONAL EDUCATION DR KAREN AND MANAIG

## १०) वार्षिक अहवाल सादरीकरणाचा नमुना :

| अ. क्र. | महिना | इयत्ता | किती विद्यार्थ्यांचा समावेश होता | किती पालकांचा समावेश होता | किती शिक्षकांचा समावेश होता | कोणती समस्या सोडविली/ आवश्यकता पूर्ण केली | समस्या सोडविण्यासाठी कोणी साहाय्य केले/ आवश्यकता परीपूर्ततेसाठी कोणी साहाय्य केले | समस्या कशी सोडविली/ आवश्यकता परीपूर्ततेसाठी काय केले | समस्या सोडविण्यासाठी/ आवश्यकता परीपूर्ततेसाठी किती कालावधी लागला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## ११) समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी अन्य साहाय्यभूत घटक

१) व्यवसाय शिक्षणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिक्षकांनी प्रात्यक्षिकातून अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. मात्र ही प्रात्यक्षिके करण्यासाठी आवश्यक तेथे सुविधा मुख्याध्यापक, SMC यांनी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

२) व्यवसाय शिक्षणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सर्व विषय शिक्षकांनी एकत्रित कार्य करणे गरजेचे आहे.

३) मुख्याध्यापक/SMC म्हणजेच शाळेने सभोवतालचे व्यावसायिक कौशल्य, प्रयोगशाळा, उद्योग केंद्रे यांच्याशी संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

## १२) समूहामुळे शाळेस होणारे फायदे

१) व्यवसाय शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होईल.

२) विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक व्यवसाय कौशल्ये निर्माण होतील.

३) विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेबाबत आदर तयार होईल.

४) व्यवसाय शिक्षणासाठी आवश्यक संसाधने शाळांना उपलब्ध होतील.

५) शाळा व समाजात सलोख्याचे संबंध निर्माण होतील.

❑❑❑

# २८. तक्रार निवारण समूह

## प्रस्तावना :

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक ५ मे २०१७ रोजी एक परिपत्रक काढण्यात आले. या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक उच्च प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रारपेटी बसवण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे आदेशित करण्यात आले आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून राज्यातील शाळांमध्ये तक्रारपेटी बसवण्याची आवश्यकता निर्माण झाल्याचे या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे.

## तक्रार म्हणजे काय?

तक्रार प्रक्रिया म्हणजे विद्यार्थी, पालक यांना त्यांचा असंतोष व्यक्त करण्याचा एक औपचारिक मार्ग आहे.

## तक्रार निवारण म्हणजे काय?

तक्रार प्राप्त झाल्यावर उपस्थित केलेल्या कोणत्याही मुद्द्यावर प्रभावीपणे निराकरण करणे म्हणजे तक्रार निवारण होय.

## तक्रार निवारण समितीची उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांना शाळेमध्ये येण्यासाठी सुरक्षित वातावरण असणे.
- प्रत्येक सदस्याने गुप्तता राखावी.
- कोणत्याही तक्रारीबाबत पूर्वग्रह ठेवू नये.
- सर्व तक्रारींचा न्याय्य व निष्पक्ष निपटारा करावा.
- विद्यार्थीहित जपणे हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट असेल.
- विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य आणि निर्णयक्षमता वाढविणे.
- समस्या तत्काळ सोडविणे.
- विद्यार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण करणे.
- मुख्याध्यापक आणि शिक्षकांबद्दल भीती कमी होणे.
- शाळेत एक सकारात्मक वातावरण निर्माण करणे.

## रचना व कार्ये :

| अ. क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | वरिष्ठ विद्यार्थी | अध्यक्ष |
| २) | दुसऱ्या वर्गातून एक विद्यार्थी | उपाध्यक्ष |
| ३) | समितीच्या कामकाजाची नोंद ठेवणारा सचिव | सचिव |
| ४) | प्रत्येक इयत्तेतून २-३ प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | समितीचे मार्गदर्शन करणारे आणि समितीच्या काम काजावर देखरेख करणारे एक शिक्षक. | समन्वयक शिक्षक |

### १) तक्रार निवारण समितीने करावयाची कार्यवाही

- शाळेमध्ये शाळेच्या दर्शनी भागात किंवा प्रवेशद्वारानजीक संबंधितांच्या नजरेत येईल अशा रीतीने तक्रार पेटी लावण्यात यावी.
- तक्रारपेटी पुरेशा मापाची व सुरक्षित असावी.
- तक्रारपेटीवर तक्रारपेटी असा उल्लेख असावा.
- सदर तक्रारपेटी प्रत्येक आठवड्यात कामकाजाच्या शेवटच्या दिवशी शाळेचे मुख्याध्यापक व तक्रार निवारण समिती समोर उघडण्यात यावी.
- गंभीर व संवेदनशील स्वरूपात तक्रारींबाबत पोलिस यंत्रणेचे सहाय्य आवश्यक असल्यास घेण्यात यावे.
- तक्रार पेटीत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची नोंद घेऊन तक्रार निवारण समिती मार्फत आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना तात्काळ करण्यात यावी.
- ज्या तक्रारी तक्रार निवारण समितीमार्फत निकाली काढणे शक्य आहे त्याबाबत शाळा स्तरावर कार्यवाही करावी.
- संबंधित शाळेतील विद्यार्थिनी अथवा विद्यार्थी यांच्या लैंगिक तक्रारी महिला तक्रार निवारण समिती विशाखा समिती समोर ठेवण्यात याव्या.
- विद्यार्थी तक्रार निवारण समिती : (Student Grievance Redressal Committee) शाळेत विद्यार्थ्यांनीच चालवली तर ती अधिक प्रभावी, सुसंवादात्मक आणि लोकशाही पद्धतीने कार्यरत होऊ शकते. खाली दिलेली रूपरेषा अशी समिती तयार करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

### २) कार्यपद्धती

- **तक्रार नोंदणी :** तक्रारींसाठी विद्यार्थ्यांसाठी एक तक्रार पेटी ठेवावी. ऑनलाइन फॉर्मचा पर्याय द्यावा.

- **तक्रारींचे वर्गीकरण :** तक्रारींचा प्रकार पाहून त्यांची वर्गवारी करावी (उदा. वर्गातील समस्या, शिक्षकांशी संबंधित समस्या, मैदानी खेळ, वर्तन, वैयक्तिक समस्या).
- **बैठकीचे आयोजन :** आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा नियमित बैठक घेऊन तक्रारींचे परीक्षण करावे. गरजेनुसार तातडीच्या समस्या लगेच सोडवाव्यात.
- **तक्रार निवारण :** छोट्या तक्रारी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सोडवाव्यात. मोठ्या तक्रारी समन्वयक शिक्षकांमार्फत शाळेच्या मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचवाव्यात. वर्गाबाहेरील समस्यांचे देखील निराकरण करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा. निनावी तक्रारीच्या बाबतीत देखील गोपनीयता पाळून योग्य पद्धतीने निराकरण करण्यात यावे.

### ३) नियम व जबाबदाऱ्या :

प्रत्येक सदस्याने गुप्तता राखावी.

कोणत्याही तक्रारीबाबत पूर्वग्रह ठेवू नये.

सर्व तक्रारींचा न्याय्य व निष्पक्ष निपटारा करावा.

विद्यार्थी हित जपणे हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट असेल.

### उपक्रम :

| कालावधी | उपक्रम |
|---|---|
| जून ते ऑगस्ट | • शाळेनजीकच्या पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान.<br>• गावातील तंटामुक्ती समितीच्या बैठकांमध्ये उपस्थित राहून निरीक्षण.<br>• Team Building Games |
| सप्टेंबर ते डिसेंबर | • बालहक्क व संरक्षण विषयक /व्याख्यान.<br>• कायदा विषयक सल्लागारांचे व्याख्यान<br>• Team Building Games |
| जानेवारी ते मार्च | • तक्रार/सूचनापेटी सप्ताहाच्या निश्चित केलेल्या दिवशी उघडून आलेल्या तक्रार/सूचना यावर नियमानुसार कार्यवाही करून समस्या निराकरण करावे.<br>• शाळेच्या दर्शनी भागात तक्रार पेटीच्या वापरासंबंधी फलक लावणे.<br>• Team Building Games |

❑❑❑

# २९. मानसिक क्षमता व आव्हानात्मक प्रश्नपेढी समूह

## पार्श्वभूमी :

'मानसिक क्षमता व आव्हानात्मक प्रश्नांचा समूह' हा क्लब विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आला आहे. या क्लबची रचना Gilbert Ryle यांच्या विचारांवर आधारित आहे. Ryle हे ब्रिटिश तत्त्वज्ञ होते, ज्यांनी Cartesian dualism च्या संकल्पनेवर तीव्र टीका केली आणि वर्तनावर आधारित मानसिक क्षमतेचे मूल्यमापन करण्यावर भर दिला. त्यांच्या 'The Concept of Mind' (1949) या पुस्तकाने मानवी वर्तनाचे आणि मानसिक अवस्थांचे नवीन दृष्टिकोन स्पष्ट केले. Ryle यांच्या "Knowing How vs. Knowing That" या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन, क्लब विद्यार्थ्यांना 'जीवन कौशल्ये' विकसित करण्यास प्रोत्साहित करतो.

तसेच, या क्लबचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये खालील १० जीवन कौशल्ये विकसित करणे आहे :

१) आत्मजाणीव (Self-awareness)

२) सहानुभूती (Empathy)

३) समीक्षात्मक विचार (Critical thinking)

४) सर्जनशील विचार (Creative thinking)

५) निर्णय घेण्याची क्षमता (Decision-making)

६) समस्या सोडवण्याची क्षमता (Problem solving)

७) प्रभावी संवाद (Effective Communication)

८) आंतरव्यक्ती संबंध (Interpersonal relationship)

९) ताणतणावाचे व्यवस्थापन (Coping with stress)

१०) भावना व्यवस्थापन (Coping with emotions)

## प्रस्तावना :

हा क्लब विद्यार्थ्यांना मानसिक आणि भावनिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रोत्साहित करतो. संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि निर्णयक्षमता वाढवण्यासाठी विशेषतः गट कार्य, भूमिका अभिनय आणि समस्या सोडवण्याच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनातील तसेच वैयक्तिक जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम बनवता येते.

**संकल्पना :**

क्लब इयत्ता १ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विभागला जातो :

- **गट १ (इयत्ता १-२) :** मूलभूत संवाद कौशल्ये आणि भावनात्मक समज.
- **गट २ (इयत्ता ३-५) :** ताणतणाव व्यवस्थापन, लहान समस्या सोडवणे आणि आत्मजाणीव.
- **गट ३ (इयत्ता ६-८) :** भूमिका अभिनय, गट चर्चा आणि प्रेरणा.
- **गट ४ (इयत्ता ९-१०) :** मानसिक क्षमता, स्पर्धात्मक तयारी आणि भावनिक स्थिरता.

**उद्दिष्टे :**

- **आत्मजाणीव व भावनिक स्थिरता :** विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना व क्षमतांची जाणीव होणे.
- **जीवन कौशल्ये :** ताणतणाव व्यवस्थापन, निर्णय क्षमता आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करणे.
- **भावनिक बुद्धिमत्ता :** स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेणे व व्यवस्थापित करणे.
- **संवाद कौशल्ये :** प्रभावी संवाद साधण्याची क्षमता विकसित करणे.
- **सर्जनशीलता व प्रेरणा :** विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी आणि नवीन कल्पनांना वाव देण्यासाठी प्रेरणा देणे.

**१) समूहाचा प्रमुख :**

**अ) समूहाचा प्रमुख कोण असावा व त्याची निवड कशी करावी?**

- **प्रमुख :** समूहाचा प्रमुख हा शाळेतील गणित, विज्ञान किंवा मानसिक क्षमता या विषयांतील शिक्षक असावा. प्राधान्याने अशा शिक्षकांची निवड करावी ज्यांना समस्या सोडवणे, तर्कशक्ती आणि जीवन कौशल्ये शिकवण्याचा अनुभव आहे.
- **निवड प्रक्रिया :**
  - शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचा निर्णय.
  - इच्छुक शिक्षकांकडून प्रस्ताव मागवणे.
  - त्यांच्या अनुभव व पात्रतेच्या आधारे निर्णय घेणे.

**२) सदस्य :**

**ब) समूहाचे सदस्य कोण असावेत व त्यांची निवड प्रक्रिया कशी असावी?**

- **सदस्य :**
  - प्रत्येक वर्गातील प्रत्येक तुकडीतून एक प्रतिनिधी निवडला जाईल.

- ➢ विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या आवडी, कौशल्ये आणि मानसिक क्षमता चाचणीच्या आधारे करावी.
- ➢ समान संधी देण्यासाठी विविध पार्श्वभूमीचे विद्यार्थी निवडणे.

- **निवड प्रक्रिया :**
  - ➢ सुरुवातीला इच्छुक विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरून घेणे.
  - ➢ मुलाखती किंवा लहान तर्कशक्ती चाचणीद्वारे निवड करणे.
  - ➢ शिक्षकांचा अभिप्राय विचारात घेणे.

### ३) समूहांच्या उपक्रमांची व्याप्ती काय असावी?

- जीवन कौशल्यांचा सर्वांगीण विकास.
- विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार, समीक्षात्मक विचार आणि भावनिक स्थिरता विकसित करणे.
- मानसिक क्षमता व ताणतणाव व्यवस्थापनावर आधारित कार्यशाळा.
- स्पर्धात्मक परीक्षा आणि पझल्स/सुडोकू/रुब्रिक क्यूब स्पर्धांचे आयोजन.
- गट चर्चा, प्रेरणादायक सादरीकरण आणि भूमिका अभिनयाद्वारे सामाजिक परिस्थितींचे प्रशिक्षण.

### ४) समूहाचे कामकाज सुरू करण्यासाठी सविस्तर सूचना :

- **ओळख सत्र :** समूहातील सदस्य व सल्लागार यांची ओळख करून देणे.
- **प्रशिक्षण :** सुरुवातीला शिक्षकांकडून जीवन कौशल्ये व मानसिक क्षमता याविषयी मार्गदर्शन.
- **कार्यक्रम रचना :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात उपक्रमांची योजना करणे.
- **गट वाटप :** विद्यार्थ्यांना गटात विभागून त्यांना विशिष्ट जबाबदाऱ्या सोपवणे.
- **नियमावली :**
  - ➢ नियमित उपक्रमांमध्ये उपस्थित राहणे बंधनकारक.
  - ➢ सहकार्य व गटक्रियाकलापांमध्ये सक्रिय सहभाग.

### ५) वार्षिक दिनदर्शिकेमध्ये उपक्रम/बाबी :

#### अ) उपक्रम

- **मानसिक संवाद : आत्मविश्लेषण आणि स्व-आकलन :**

विद्यार्थ्यांना स्वतःच्या विचारांशी संवाद साधण्याची सवय लावणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये ध्यान, स्व-मूल्यमापन प्रश्नावली आणि आत्मचिंतनाच्या तंत्रांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, 'माझ्या आवडीनिवडी कोणत्या?' आणि 'माझ्या क्षमतांमध्ये सुधारणा

कशी करता येईल?' यांसारख्या प्रश्नांवर चर्चा केली जाते. यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि आत्मजाणीव विकसित करण्यास मदत होते.

- **जीवन कौशल्ये : ताणतणाव व्यवस्थापन व समस्या सोडवणे :**

  विद्यार्थ्यांना ताणतणाव व्यवस्थापनासाठी सुलभ तंत्रे शिकवली जातात, जसे की श्वसन तंत्र, वेळ व्यवस्थापन आणि ध्यान. तसेच, समस्या सोडवण्यासाठी तर्कशक्ती आणि सर्जनशीलतेचा उपयोग कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दिले जाते. उदाहरणार्थ, गट कार्याद्वारे एखाद्या समस्येवर उपाय शोधण्याची क्रिया आयोजित केली जाते.

- **भावना ओळखणे : स्वतःच्या व इतरांच्या भावना समजून घेणे :**

  भावनिक बुद्धिमत्ता वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावना ओळखण्याचे आणि त्या व्यवस्थापित करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये 'भावना कार्डस्' चा वापर करून विविध भावना ओळखण्याचा खेळ घेतला जातो. तसेच इतरांच्या भावनांची जाणीव ठेवून त्यांच्याशी संवाद साधण्याचे महत्त्व पटवून दिले जाते.

- **संभाषण कौशल्ये : प्रभावी संवाद साधणे व ऐकण्याची कला :**

  विद्यार्थ्यांना स्पष्ट, प्रभावी आणि आत्मविश्वासपूर्ण संवाद साधण्याचे तंत्र शिकवले जाते. यामध्ये 'रोल प्ले' तंत्राचा वापर करून गट चर्चांचे आयोजन केले जाते. याशिवाय, ऐकण्याची कला विकसित करण्यासाठी 'एक मिनिट ऐका' हा खेळ घेतला जातो, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना समोरच्या व्यक्तीच्या बोलण्यावर लक्ष केंद्रित करणे शिकवले जाते.

- **भूमिका अभिनय : जीवनातील विविध परिस्थितींवर आधारित अभिनय :**

  विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितींवर आधारित भूमिका साकारायला सांगितले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या मित्राला प्रोत्साहन देणे, तणावाखाली काम करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी शिष्टाचार पाळणे यावर आधारित अभिनयाचे सत्र घेतले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याच्या कौशल्यात सुधारणा होते आणि आत्मविश्वास वाढतो.

- **गटाद्वारे सर्जनशील सादरीकरण :**

  विद्यार्थ्यांना गटांमध्ये विभागून एखाद्या विशिष्ट विषयावर सादरीकरण तयार करायला सांगितले जाते. उदाहरणार्थ, 'पर्यावरण संरक्षण' किंवा 'सामाजिक सहकार्याचे महत्त्व' यांसारख्या विषयांवर सर्जनशील सादरीकरण केले जाते. यामध्ये पोस्टर तयार करणे, अभिनय किंवा लघुकथन यांचा समावेश असतो.

- **ताणतणाव व्यवस्थापन : ध्यान, श्वसन तंत्र आणि वेळ व्यवस्थापन**

  विद्यार्थ्यांना ताणतणाव कमी करण्यासाठी विविध तंत्रे शिकवली जातात. उदाहरणार्थ,

प्राणायाम, ध्यान आणि स्ट्रेस बॉलचा वापर याचा सराव केला जातो. वेळ व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी 'कार्य प्राधान्य' खेळ घेतला जातो, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन कामांचे नियोजन करायला शिकवले जाते.

- **प्रेरणा : प्रेरणादायक कथा व अनुभव शेअर करणे :**

  विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी यशस्वी व्यक्तींच्या कथा आणि अनुभव शेअर केले जातात. यामध्ये गट चर्चा आयोजित केली जाते, जिथे प्रत्येक विद्यार्थी त्याच्या आवडत्या प्रेरणादायक घटनेविषयी बोलतो. तसेच, यशस्वी विद्यार्थ्यांना मंचावर त्यांचे अनुभव शेअर करण्याची संधी दिली जाते.

## वार्षिक दिनदर्शिका

**जून ते मार्च दरम्यानचे नियोजन (इयत्ता पहिली ते दहावीसाठी)**

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| **जून** | ओळख सत्र : 'मी कोण आहे?' | ताणतणाव व्यवस्थापन : श्वसन तंत्र | गट चर्चा : 'माझे ध्येय काय आहे?' | आत्मविश्लेषण : SWOT विश्लेषण |
| **जुलै** | भावना ओळखणे : 'भावना कार्ड्स' | समस्या सोडवणे : तर्कशक्तीचे खेळ | भूमिका अभिनय : सामाजिक परिस्थिती | जीवन कौशल्ये : वेळ व्यवस्थापन कार्यशाळा |
| **ऑगस्ट** | संभाषण कौशल्ये : 'एक मिनिट ऐका' | गट क्रियाकलाप : समस्या सोडवण्याचे सराव | प्रेरणा : प्रेरणादायक कथा वाचन | थीम सादरीकरण : 'पर्यावरण संवर्धन' |
| **सप्टेंबर** | ध्यान आणि ताणतणाव व्यवस्थापन | गट सादरीकरण : 'माझा आदर्श' | सर्जनशील लेखन : 'भविष्यातील माझा दिवस' | भूमिका अभिनय : 'तणावाखाली काम करणे' |
| **ऑक्टोबर** | सर्जनशीलता : चित्रकला स्पर्धा | समस्या सोडवण्याचे तंत्र : पझल्स | गट चर्चा : 'सामाजिक सहकार्याचे महत्त्व' | मानसिक क्षमता : स्पर्धात्मक प्रश्न सोडवणे. |

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| **नोव्हेंबर** | प्रेरणा : 'माझी आवडती गोष्ट' | ध्यान आणि प्राणायाम तंत्र | भूमिका अभिनय : 'सकारात्मक संवाद' | गट सादरीकरण : 'नेतृत्व आणि जबाबदारी' |
| **डिसेंबर** | जीवन कौशल्ये : 'सामाजिक शिष्टाचार' | गट क्रियाकलाप : 'नवीन कल्पना सुचवा' | थीम सादरीकरण: 'शिक्षणाचे महत्त्व' | प्रेरणा : यशस्वी व्यक्तींच्या कथा |
| **जानेवारी** | सर्जनशीलता : हस्तकला कार्यशाळा | समस्या सोडवणे : 'सुडोकू स्पर्धा' | गट चर्चा : ''माझ्या आयुष्यातील आव्हाने'' | भूमिका अभिनय : 'स्पर्धात्मक तयारी' |
| **फेब्रुवारी** | ताणतणाव व्यवस्थापन : ध्यान सत्र | गट सादरीकरण : 'स्वच्छता अभियान'' | सर्जनशीलता : 'कल्पनाशक्तीच्या सीमा' | थीम सादरीकरण : 'युवकांचे योगदान' |
| **मार्च** | वार्षिक सादरीकरण : 'मी काय शिकलो?' | समस्या सोडवणे : 'गट कार्य स्पर्धा' | मानसिक क्षमता ऑलिंपियाड | पुरस्कार वितरण आणि सन्मान समारंभ |

## ६) समूहासाठी प्रक्रिया/नियमावली :

- साप्ताहिक सत्रांचे आयोजन.
- मासिक प्रगती अहवाल तयार करणे.
- सहभाग व कामगिरीचे मूल्यमापन (उदा. सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता).
- प्रत्येक सत्राच्या शेवटी फीडबॅक घेणे.

## ७) शाळेतील समूहांमधील समन्वय प्रक्रिया :

- मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठका आयोजित करणे.
- विविध समूहांतील उपक्रमांचे नियोजन आणि सादरीकरणाची देवाणघेवाण.
- शिक्षक व विद्यार्थ्यांच्या योगदानाची नोंद ठेवणे.

## ८) शिक्षण विभाग व SCERT कडून साहाय्य :

- **संसाधने :** जीवन कौशल्ये व मानसिक क्षमता विकासासाठी पुस्तके व डिजिटल साधने.

- **कार्यशाळा :** शिक्षकांसाठी जीवन कौशल्य व ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा.
- **प्रमाणपत्रे :** उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मान.

### ९) Online/Offline संसाधने व साहित्य :

- **पुस्तके :**
  - ➢ 'The Mind Gym' – डेविड लुईस.
  - ➢ तर्कशक्ती प्रश्नपत्रिका (प्रतिस्पर्धा परीक्षा).
- **डिजिटल साधने :**
  - ➢ YouTube चॅनेल्स (Problem Solving Skills, Critical Thinking Tips).
  - ➢ मोबाइल ॲप्स (Lumosity, Elevate).
- **खेळ व साधने :**
  - ➢ रुब्रिक क्यूब, तर्कशक्ती पझल्स, सुडोकू.

### १०) उपक्रमनिहाय व वार्षिक अहवालाचा प्रारूप :

- शीर्षक : उपक्रमाचे नाव व तारीख.
- उद्दिष्ट : उपक्रमाचा उद्देश.
- सदर गट/विभाग : सहभागी वर्ग व गटांची माहिती.
- उपक्रमाची माहिती :
- सहभागाची संख्या.
- क्रियाकलापांचे स्वरूप (सादरीकरण, पझल्स, चर्चा).
- परिणाम : विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण.
- शिफारसी : भविष्यातील सुधारणा/उपक्रमांचे प्रस्ताव.

### ११) अन्य सहाय्यभूत मुद्दे :

- नियमित सहभागासाठी प्रेरणा देण्यासाठी गुणांकन प्रणाली.
- पालकांचा सहभाग (उदा. सादरीकरणांच्या वेळेस).
- स्थानिक तज्ज्ञांशी संपर्क साधून विशेष सत्रांचे आयोजन.

### १२) शाळेस होणारे फायदे व संभाव्य नुकसान :

**अ) फायदे :**

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास (मानसिक व भावनिक स्थिरता).

- आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास.
- समस्या सोडवण्याची आणि समीक्षात्मक विचार करण्याची क्षमता सुधारेल.

**ब) नुकसान :**

- वेळेचे योग्य नियोजन न केल्यास इतर शैक्षणिक उपक्रमांवर परिणाम होऊ शकतो.
- कमकुवत सहभागामुळे उपक्रमांचा प्रभाव कमी होऊ शकतो.

❑❑❑

# 30. Foreign Language Club

**Introduction :**

In the 21st century, multilingual skills are essential for fostering global competence, critical thinking and cultural awareness. The Foreign Language Club aligns with the National Education Policy 2020, which emphasizes the holistic development of students and the integration of modern skills into education. By offering students a platform to explore new languages and cultures, the club enhances their communication abilities, creativity and adaptability, equipping them for the demands of a globalized world. This initiative supports NEP 2020's vision of nurturing well-rounded individuals who can contribute effectively to a diverse and interconnected society.

**Objectives of the Club :**

| Areas of the Development | Details |
|---|---|
| Linguistic Skills | To develop basic proficiency in foreign languages. |
| Cultural Awareness | To expose students to diverse cultures and traditions. |
| Communication | To enhance verbal and written communication abilities. |
| Creativity | To encourage creative thinking through language-related activities. |
| Career Readiness | To build foundational skills for future academic and professional growth. |

**Leadership Structure :**

| Position | Responsibility |
|---|---|
| Teacher Head | Acts as the primary mentor and facilitator. |
| Student Coordinator | A student from higher Grade will be selected as a coordinator of the club (among the grades provided by schools). He/she will manage the activities and communication in the club. |

**Role of Teachers :**

- Liaise with external organizations for language resources and experts.
- Supervise all club activities and ensure inclusivity.
- Design activity plans and oversee their execution.
- Mentor students in resource utilization.
- Liaise with external organization for language resources utilization.

## Membership Details

| Criterias | Details |
|---|---|
| Eligibility | According to the school's grade structure, two students from each grade will be selected as members of the club. |
| Selection | Based on interest and enthusiasm, with opportunities for all students to join. Teacher will suggest the names of the students to be selelcted as club members. |

## Scope of Activities :

| Scope | Details |
|---|---|
| 1) Language Skills | Focus on vocabulary, basic phrases and conversational skills. |
| 2) Cultural Events | Exposure to traditions, festivals and cuisines of other countries. |
| 3) Competitions | Quizzes, storytelling and debates in foreign languages. |
| 4) Creative Sessions | Role-playing, skits and games emphasizing language usage. |

## Month-Wise Activity Plan :

By referring to the provided resources, a teacher will guide foreign language club members to organize the activities given in Month wise Activity plan. A teacher will use other appropriate resources to make activity impactful.

While conducting every activity/program a teacher and a club coordinator who will be selected from higher grades will modify the suggested activity and use resources as per the grade levels like 1-2, 3-5, 6-8 & 9-10.

| Month | Activities |
|---|---|
| June | Orientation and club inauguration. Introduction to the chosen foreign languages (e.g., Japanese, French, German). Motivation for becoming a polyglot and explaining advantages of the same. |
| July | • Vocabulary-building sessions -learning aid making like flashcards and posters.<br>• The letters introduction with their sounds (Chosen language) |
| August | • Basic greetings and self-introductions.<br>• Development of a Dictionary (foreign language words)<br>• Language games –Mimicry Introduction to basic phrases used in daily communication. |
| September | • Animated story listening.<br>• Storytelling and poem recitation in the foreign language.<br>• Celebration of a cultural festival from the respective country. |
| October | • Planning a Virtual tour to foreign country<br>• Organize a workshop on basic writing skills (e.g., letters or numbers in the foreign script). |

| Month | Activities |
|---|---|
| November | • Reading Quiz<br>• Listening Quiz competition on vocabulary and simple sentences (CEFR-A1 Level). |
| December | • Role-playing activity This could involve practicing specific language functions (e.g., ordering food at a restaurant, asking for directions, job interviews)<br>• Screening of a movie or cartoon in the foreign language. |
| January | • Interactive peer-teaching.<br>• Organize Cultural event showcasing food, music, and attire from the foreign country. |
| February | • Simple and small sentence writing competition. |
| March | • End-of-year exhibition showcasing club achievements (e.g., models, charts or projects).<br>• Publishing (Flipbook) of student written things like Family information, Daily routine, Framed Questions' list. |

## Foreign language-related days to celebrate in schools :

### European Languages

1) European Day of Languages (September 26th) : Celebrate linguistic diversity and promote language learning.
2) French Language Day (March 20th) : Celebrate the French language and culture.
3) Spanish Language Day (April 23rd) : Celebrate the Spanish language and culture.
4) Italian Language Week (October 17-23) : Promote the Italian language and culture.
5) German Language Day (September 26th) : Celebrate the German language and culture.

### Asian Languages

1) Chinese Language Day (April 20th) : Celebrate the Chinese language and culture.
2) Japanese Language Day (November 1st) : Celebrate the Japanese language and culture.
3) Korean Language Day (October 9th) : Celebrate the Korean language and culture.

### Other Languages

1) Arabic Language Day (December 18th) : Celebrate the Arabic language and culture.
2) Portuguese Language Day (May 5th) : Celebrate the Portuguese language and culture.
3) Russian Language Day (June 6th) : Celebrate the Russian language and culture.

### Multilingual Celebrations

1) International Mother Language Day (February 21st) : Celebrate linguistic diversity and promote awareness about endangered languages.
2) World Language Day (February 21st) : Celebrate languages and cultures from around the world.

## Rules and Procedures :

- Meetings to be held bi-weekly, with mandatory attendance.
- Equal opportunities for all students, regardless of academic performance.
- Maintain a record of activities and outcomes.
- Conduct periodic revives to adapt and improve.

## Support and Guidance :

| Support Type | Details |
|---|---|
| Financial Support | Budget for resources like books and multimedia tools. |
| Training for Teachers | SCERT to organize workshops on language teaching techniques. |
| Resource Provision | Access to e-libraries, apps and printed materials. |
| Monitoring | Regular evaluations and guidance by SCERT and the education department. |

## Resources :

**Duolingo :** A gamified language-learning app suitable for vocabulary, grammar, and speaking practice.

**Website :** Duolingo App

**LingoDeer App :**

**German Fun App :** German Language

**Free ebooks :** learngermanonline.com

**Youtube channel :** Learn French with FrenchPod101

https://www.thefablecottage.com/free-stories/french (German, Spanish)

## Benefits and Challenges

| Aspect | Details |
|---|---|
| Benefits | Improved linguistic skills, cultural exposure, enhanced creativity and better cognitive development. |
| Challenges | Limited access to trained teachers, funding constraints and sustainability. |

## Annual Report :

**Blank Template will be provided including following points**

| Sr. No. | No. of Club Members (Grade wise) | Month wise Activities performed in the club | Achievements | Challenges | Innovation/ Addition in the club running | Links For Photos & Videos |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | | | | | |
| 2) | | | | | | |

## Conclusion

The Foreign Language Club is a valuable initiative that empowers students with essential linguistic and cultural skills, enabling them to thrive in a globalized world. By fostering curiosity, communication and creativity, the club not only enhances academic performance but also cultivates empathy and respect for diverse cultures. Through engaging activities and collaborative learning, it prepares students to navigate the complexities of the $21^{st}$ century with confidence and adaptability. With sustained support and active participation, the club can become a cornerstone of holistic and inclusive education, enriching the overall learning experience.

❑❑❑

# ३१. समता सहकार्य समूह

**पार्श्वभूमी :**

व्यक्तीच्या विकासात प्राथमिक शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे त्यामुळे भारत स्वतंत्र झाल्यावर देशातील सर्व मुला-मुलींपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी अनेक योजना व कार्यक्रम हाती घेण्यात आले शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची उद्दिष्टे ठराविक काळात व गुणवत्तापूर्ण शिक्षण शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने एकत्रितपणे समग्र शिक्षा हा कार्यक्रम हाती घेतला आहे. समता म्हणजे सर्व व्यक्तींना समान अधिकार आणि संधी मिळणे.

**समतेचे अनेक प्रकार आहेत, ज्यात खालील गोष्टींचा समावेश होतो :**

अ) **कायदेशीर समता :** कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात. त्यांना समान कायदे लागू होतात आणि त्यांना समान न्याय मिळतो.

ब) **राजकीय समता :** सर्व नागरिकांना राजकीय अधिकार असतात, जसे की मतदान करण्याचा अधिकार आणि निवडून येण्याचा अधिकार.

क) **सामाजिक समता :** सर्व व्यक्तींना समान सामाजिक अधिकार आणि संधी मिळतात, जसे की शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगार.

ड) **आर्थिक समता :** सर्व व्यक्तींना समान आर्थिक संधी मिळतात. त्यांना समान वेतन, समान कामाच्या परिस्थिती आणि समान संपत्तीचे अधिकार मिळतात. समता हे एक आदर्श आहे, जे पूर्णपणे साध्य करणे कठीण आहे. तथापि, समतेचे मूल्य ओळखणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. समतेमुळे समाज अधिक न्याय्य आणि समृद्ध बनतो.

**प्रस्तावना :**

शाळा पातळीवरील विविध शैक्षणिक कार्यक्रमाच्या नियोजन आणि कार्यामध्ये समाजाचा सहभाग हे समग्र शिक्षा कार्यक्रमाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील बालकाला शाळेच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे.

वंचित व दुर्बल मुले, दिव्यांग, वाडी वस्तीवरील मुले, शाळाबाह्य आणि वयानुरूप दाखल झालेली मुले सर्व बालकांमध्ये कोणताही भेद न करता शाळेत टिकवून ठेवण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकाची आहे.

वंचित व दुर्बल मुले, दिव्यांग, शाळाबाह्य, बालकांना शिक्षणाचे मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व टिकविण्यासाठी आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध करून देणे आहे. तसेच शिक्षणाच्या सावत्रिकरणाचे उद्दिष्ट साध्य करताना या घटकांचा समावेश व त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी अधिकचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना व सवलती या बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपयोगी ठरत आहेत.

मुलामुलींची पहिली संस्कार शाळा ही 'घर असते. पालक घरातूनच श्रेष्ठ/कनिष्ठतेचे विष मनात पेरत असतात. मग स्वाभाविकपणेच समाजात वावरताना त्याच विचारांचा पगडा मनावर असतो. पुरुषाला आपण केवळ पुरुष आहोत म्हणूनच 'बॉर्न ग्रेट आहोत असे वाटते. याउलट स्त्रीला स्वतःकडे विनाकारणच दुय्यम भूमिका घेण्याची वृत्ती असते. स्त्री-पुरुष दोघांनाही हेतू पुरस्सर या मानसिक जोखडातून स्वतःची सुटका करून घ्यावी लागेल. हे दोन्ही पक्ष कठीण आहे, परंतु प्रयत्न साध्य आहे. पुरुषाला काहीही न करता पांघरलेली 'श्रेष्ठत्वाची झूल उतरवावी लागेल व स्त्रीला प्रथम स्वीकारलेली दुय्यम भूमिका तसेच स्वतःचाच स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा लागेल.

**समता सहकार्य समूहाची संकल्पना :**

- समतामूलक शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या विभिन्न गरजा जाणणे व त्यांच्या क्षमता ओळखून त्यांना शिक्षण देणे व त्यावर उपाययोजनात्मक कृती करणे.
- शाळेत पोहोचण्यापर्यंत येणाऱ्या अडथळ्यामुळे जी बालके शिक्षणापासून वंचित आहेत अशा बालकांचा शोध घेणे/सर्वे करणे.
- समतामूलक शिक्षण म्हणजे समाजातील सर्व बालकांसाठी जाणीवपूर्वक शाळेची रचना करणे, ज्यामुळे शाळेत समाजाच्या सर्व स्तरातील बालकांना आनंददायी शिक्षणाची सोय होऊ शकेल.
- वंचित व दुर्बल, दिव्यांग, वाडी वस्तीवरील मुले शाळाबाह्य आणि वयानुरूप दाखल झालेल्या मुलांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना इतर बालकांसोबत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
- सर्व बालकांची भाषिक, शारीरिक, भौतिक, सामाजिक, भावनिक इत्यादी घटक लक्षात घेऊन सर्व बालकांचे शाळेच्या मुख्य प्रवाहात समावेशन करणे.
- शाळा व शाळेच्या वर्गापर्यंत पोहोचताना विद्यार्थ्यांना विवध अडथळा पार करून आनंददायी व मनोरंजनातून शिक्षण देणे.
- शाळेत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण क्षमतांचा विकास करणे.

**समता सहकार्य समूहाची उद्दिष्टे :**

- समता शिक्षण मनुष्यबळ प्रशिक्षणावर भर देणे.
- गुणवत्ता विषयक सर्व श्रेणीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भर देणे.
- शिक्षण हक्क कायद्यानुसार ०६ ते १४ वर्षे गटातील सर्व बालकांना समान संधी व गुणवत्ता वाढवणे.
- वंचित व दुर्बल, दिव्यांग, वाडी वस्तीवरील मुले शाळाबाह्य आणि वयानुरूप दाखल झालेली असणाऱ्या असणारे बालकांना शिक्षणाचे मुख्य प्रवाहात टिकवण्यासाठी शिक्षण पूर्ण करताना कोणते अडथळे येणार नाहीत या दृष्टीने उपाययोजना करणे.
- पालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करून ते आपल्या पाल्यांना नियमितपणे शाळेत शिकण्यास प्रोत्साहन देतील यासाठी उपायोजना करणे व समुपदेशन करणे.
- पालकांमध्ये आपले मूल ही शिकू शकते असा आत्मविश्वास निर्माण करणे.
- बालकांमध्ये येणाऱ्या सुरक्षितता दूर करण्यासाठी शाळा स्तरावर सुविधा उपलब्ध करून देणे.

**समूहाचा प्रमुख व सदस्य यांची निवड प्रक्रिया**

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | मुख्याध्यापक | मार्गदर्शक |
| २) | शाळेतील जेष्ठ शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात विद्यार्थी/विद्यार्थिनी समान असावेत) | सदस्य |
| ४) | वंचित व दुर्बल, दिव्यांग, वाडी वस्तीवरील मुले शाळा बाह्य आणि वयानुरूप दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे एक पालक | सदस्य |

**अ) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकांच्या मदतीने समता सहकार्य समुहाची स्थापना करणे.**

१) क्षमतेनुसार निवड झालेल्या सदस्याना त्यांच्या कामाबाबतची जबाबदारी निश्चित करणे.

२) समता समूह सहकार्य समुहाचे वार्षिक नियोजन करणे.

**समूहाचे कामकाज सुरु करण्यासाठी कोणत्या सविस्तर सूचना देता येतील :**

१) समता समूह सहकार्य या समूहाच्या कार्याचे वार्षिक नियोजन करणे.

२) दर महिन्यातून एक बैठक घेणे व बैठकीदरम्यान नवनवीन उपक्रम सुचविण्यास प्रोत्साहन देणे.

३) समता समूह सहकार्य समुहाचे प्रत्येक सभेचे इतिवृत्त ठेवणे.

४) समता समूह सहकार्य समुहाचे उपक्रम अमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार व पूर्वतयारी करणे.

५) समता समूह सहकार्य समुहाचे अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणे.

६) समता समूह सहकार्य समुहाचे अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

७) समूह अंतर्गत घ्यायचे सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करून घेणे यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदारी देणे उदा. कार्यक्रमाचे पूर्वनियोजन, कार्यक्रमाची रूपरेषा व सूत्रसंचालन इत्यादी.

८) समता सहकार्य समुह अंतर्गत शाळा स्तरावर येणाऱ्या समस्यांचे निराकरण न झाल्यास केंद्रस्तरीय समूहाकडे, केंद्रस्तरीय समस्यांचे निराकरण न झाल्यास तालुकास्तरावर व तालुकास्तरावर निराकरण न झाल्यास जिल्हास्तरावरील शिक्षणाधिकारी यांच्याकडे समस्या कळवावी ही प्रक्रिया शीघ्र होईल याची सर्व स्तरांवर जबाबदारी घेण्यात यावी.

## वार्षिक वेळापत्रक : महिनानिहाय उपक्रम नियोजन

शाळेमध्ये समता सहकार्य समुह अंतर्गत आयोजित करण्यासाठी सुचवलेल्या कृती शाळेमध्ये समता सहकार्य समुह अंतर्गत आयोजित करण्यासाठी विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक स्थिती विचारात घेऊन शाळांनी पुढील कृती घ्याव्यात.

| महिना | उपक्रम | कृती |
|---|---|---|
| जून | समता समूह स्थापना | • समूहाची स्थापना, सदस्यांची निवड जबाबदारीचे वाटप, समता सहकार्य समूह बाबत माहिती देणे.<br>• शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ बाबत माहिती देणे. |
| जुलै | आरोग्य तपासणी शिबिर | • दुर्गम भागातील लोकांसाठी मोफत आरोग्य तपासणी.<br>• समता सहकार्य समूह मधील उपक्रमांसाठी कार्यशाळा घेणे. |
| ऑगस्ट | योजनांची माहिती | • आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत विविध योजनांची माहिती देणे. |
| | स्वातंत्र्य दिन | • राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोख्यावर आधारित खेळ व मनोरंजानात्मक सांस्कृतिक कार्यक्रम.<br>• मध्यान्हभोजन उपक्रम |
| सप्टेंबर | गृहभेटी | • गृह आधारित शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची गृहभेटी व मार्गदर्शन.<br>• आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत कायदेशीर सल्ला. |
| ऑक्टोबर | गांधी जयंती<br>स्वच्छता अभियान | • अहिंसा आणि सामाजिक सलोख्यावर आधारित कार्यक्रम.<br>• सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम. |

| महिना | उपक्रम | कृती |
|---|---|---|
| नोव्हेंबर | बालदिन<br>बाल हक्क जागृती मोहीम | • मुलांसाठी शैक्षणिक आणि मनोरंजक कार्यक्रम.<br>• मुलांच्या हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम. |
| डिसेंबर | मानवी हक्क दिन<br>सामाजिक सुरक्षा योजना | • मानवी हक्कांविषयी जनजागृती आणि चर्चासत्रे.<br>• वृद्धांसाठी आणि अपंग व्यक्तींसाठी सरकारी योजनांची माहिती. |
| जानेवारी | जागरूकता मोहीम<br>समता दिंडी | • सामाजिक समतेवर व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित करणे.<br>• समाजात समानता आणि बंधुत्वाची भावना वाढवण्यासाठी दिंडीचे आयोजन करणे. |
| फेब्रुवारी | आर्थिक साक्षरता शिबिर | • महिलांसाठी बचत गट आणि सूक्ष्म वित्त योजनांची माहिती. |
| मार्च | जागतिक महिला दिन | • महिलांसाठी आरोग्य शिबिर आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण. |
| एप्रिल | सामाजिक न्याय दिन<br>शैक्षणिक मदत | • वंचित घटकांसाठी सरकारी योजनांची माहिती आणि मदत केंद्र<br>• आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप. |
| मे | | पुढील वर्षाचे नियोजन |

## समता सहकार्य समुह दिनविशेष

| कार्यक्रम/महत्त्व | दिनविशेष (तारीख) |
|---|---|
| समता दिन | १२ मार्च |
| मानवाधिकार दिन | १० डिसेंबर |
| कामगार दिन | १ मे |
| जागतिक दिव्यांग दिन | ३ डिसेंबर |
| जागतिक सामजिक न्याय दिन | २० फेब्रुवारी |
| जागतिक महिला दिवस | ८ मार्च |
| मातृदिन | १० मे |
| बालरक्षक दिन | ४ जून |
| विश्व आदिवासी दिन | ९ ऑगस्ट |
| साक्षरता दिवस | ८ सप्टेंबर |
| मानसिक आरोग्य दिन | १० ऑक्टोंबर |

**समूहाच्या उपक्रमांची व्याप्ती काय असावी?**

- समतेची विविध क्षेत्रे, स्तर यांची माहिती करून घेणे.
- विद्यार्थ्यांमध्ये समतेचे महत्त्व रुजवणे.
- विविध प्रकारच्या समतांवर कार्यशाळा ( शिक्षक सदस्यांसाठी) आयोजित करणे.
- गट चर्चा, सादरीकरण यांचे नियोजन करणे.

**समूह कामकाजाची प्रक्रिया :**

- मासिक सत्रांचे आयोजन
- मासिक प्रगती अहवाल तयार करणे.
- प्रत्येक सत्रानंतर फीडबॅक घेणे.
- पुढील सत्रात मागील सत्राच्या फीडबॅक वर केलेल्या कामाची कल्पना देणे/ नोंद ठेवणे.

**शाळेतील समूहांतर्गत समन्वय प्रक्रिया :**

- मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली मासिक सत्रांचे आयोजन करणे.
- विविध समूहातील उपक्रमांचे नियोजन व सादरीकरण यांची देवाण घेवाण करणे.
- शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या योगदानाची नोंद ठेवणे.

**शिक्षण विभाग व SCERT कडून साहाय्य :**

- कार्यशाळा : शिक्षकांसाठी समता सहकार्य या विषयांवर कार्यशाळा
- संसाधने : संबंधित विषयावरील पुस्तके व डिजिटल माहिती
- प्रमाणपत्रे : उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना

**संसाधने/पुस्तके/सन्मान साहित्य :**

ग्रंथालयातील पुस्तके व ऑनलाईन माहिती

**समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी अन्य साहाय्यभूत मुद्दे :**

- स्थानिक तज्ज्ञांची मार्गदर्शक व्याख्याने
- पालकांचा मासिक सत्रात सहभाग
- वर्तमान पत्रातील कात्रणे, युट्यूब वरील व्हिडिओज.

❑❑❑

# ३२. आर्थिक साक्षरता समूह

**प्रस्तावना :**

आधुनिक युगात आर्थिक साक्षरता ही केवळ प्रौढांसाठीच नव्हे, तर विद्यार्थ्यांसाठीही अत्यावश्यक कौशल्य झाले आहे. व्यक्तीच्या आर्थिक निर्णयक्षमतेवर त्याच्या भविष्याच्या आर्थिक स्थैर्याचा पाया अवलंबून असतो. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना आर्थिक शिक्षण देणे म्हणजे केवळ त्यांच्या विद्यमान गरजांसाठीच नव्हे, तर भविष्यातील आर्थिक आत्मनिर्भरतेसाठी ही मूलभूत ज्ञान, कौशल्य आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे होय.

आर्थिक साक्षरता समूह (Financialy Litercy Club) हा विद्यार्थ्यांसाठी आर्थिक शिक्षणाचा एक अभिनव उपक्रम आहे, ज्यामध्ये त्यांना वास्तविक जीवनातील आर्थिक स्थितीशी जोडले जात आहे. या माध्यमातून विद्यार्थी पैशांची योग्य संरचना, बचतीचे महत्त्व, गुंतवणुकीच्या पद्धती, आणि वित्तीय धोरणांचे मोल समजून घेऊ शकतील.

**आर्थिक साक्षरता समूहाची गरज :**

- **आर्थिक स्वावलंबनासाठी तयारी :** आर्थिक साक्षरता हे केवळ मोठ्यांसाठी मर्यादित नसून ते विद्यार्थ्यांनाही त्यांच्या भविष्यातील आर्थिक निर्णय घेण्यासाठी सक्षम बनवते. कमी वयातच बजेट तयार करणे, बचत करण्याचे महत्त्व, आणि पैशांचा योग्य वापर शिकवणे गरजेचे आहे.
- गुंतवणुकीची तत्त्वे आणि जोखमीचे व्यवस्थापन : विद्यार्थ्यांना भविष्यात गुंतवणूक करताना जोखीम आणि परताव्याचे संतुलन समजून घेता यावे, यासाठी त्यांना गुंतवणुकीच्या विविध पर्यायांची माहिती शालेय स्तरावर देणे गरजेचे आहे.
- सध्याच्या आर्थिक प्रणालीचा परिचय : आधुनिक काळात डिजिटल पेमेंट, नेट बँकिंग, प्रणाली, आणि विविध आर्थिक तंत्रज्ञानाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. या प्रणालींचा सुरक्षित आणि प्रभावी वापर शिकविणे आजच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक झाले आहे.
- निर्णयक्षमता विकसित करणे : वयाच्या कोणत्याही टप्प्यावर घेतलेले चुकीचे आर्थिक निर्णय मोठ्या अडचणी निर्माण करू शकतात. म्हणूनच, योग्य आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी लहान वयापासून प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.
- सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदारीची जाणीव: शालेय जीवनातच आर्थिक साक्षरतेचे महत्त्व समजल्यास विद्यार्थी त्यांच्या कौटुंबिक आर्थिक व्यवस्थापनात आणि सामाजिक जबाबदारी पार पाडण्यात योगदान देऊ शकतात.

- भविष्यातील आर्थिक आव्हानांसाठी तयारी : वाढती महागाई, जागतिकीकरण, आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना लहान वयातच आर्थिक नियोजनाची आणि व्यवस्थापनाची सवय लागणे आवश्यक आहे.
- उद्योग आणि रोजगारक्षमतेसाठी पायाभूत ज्ञान : विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्राशी संबंधित करिअरची माहिती मिळावी आणि त्यामध्ये रस निर्माण व्हावा, यासाठी आर्थिक साक्षरता समूह उपयुक्त ठरतो.
- आर्थिक फसवणुकीपासून संरक्षण : आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना आर्थिक फसवणुकीपासून वाचविण्यासाठी आर्थिक सुरक्षिततेची मूलभूत माहिती देणे गरजेचे आहे.

**उद्दिष्टे :**

- आर्थिक ज्ञान वाढविणे : विद्यार्थ्यांना अर्थव्यवस्थेची मूलतत्त्वे, बचत, बजेट तयार करणे, गुंतवणुकीचे प्रकार, आणि कर्ज व्यवस्थापन शिकविणे.
- व्यावहारिक अनुभव देणे : विद्यार्थ्यांना विविध आर्थिक उपक्रम, खेळ, वर्कशॉप्स, आणि प्रकल्पांच्या माध्यमातून आर्थिक तत्त्वे प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देणे.
- जाणीव निर्माण करणे : आर्थिक नियोजन, उत्पन्न-खर्च संतुलन, आणि डिजिटल पेमेंट प्रणाली यांसारख्या संकल्पनांची माहिती देऊन आधुनिक आर्थिक साधनांचा उपयोग करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.
- स्वावलंबी बनविणे : विद्यार्थ्यांना आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता आणि जबाबदारीचे भान देणे, जेणेकरून ते वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर आर्थिक समस्या सोडवू शकतील.
- भविष्यातील करिअरदृष्टी विकसित करणे : वित्तीय क्षेत्रातील करिअरविषयी विद्यार्थ्यांना माहिती देऊन त्यांच्यात त्या क्षेत्राबद्दलची रुची निर्माण करणे.
- समूह कार्य व नेतृत्व कौशल्ये विकसित करणे : आर्थिक साक्षरतेशी संबंधित विविध कृतींमधून विद्यार्थी एकत्र काम करताना नेतृत्व कौशल्ये आणि निर्णयक्षमता विकसित करू शकतील. आर्थिक साक्षरतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे जीवन अधिक सक्षम आणि उज्ज्वल करण्याचा हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

**आर्थिक साक्षरता समूह अंतर्गत उपक्रम बजावणीसाठी मार्गदर्शक सूचना :**

**१) उपक्रमाची पूर्वतयारी :**

- **समूहाची स्थापना :**

  शाळेत आर्थिक साक्षरता क्लब सुरू करण्यासाठी, मुख्याध्यापक व संबंधित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली क्लबची स्थापना करणे. या क्लबमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्ग व वय लक्षात घेऊन निवड करणे.

शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक स्तरासाठी आर्थिक साक्षरता समूहाची रचना पुढीलप्रमाणे करण्यात यावी :

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विज्ञान/गणित विषयाचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील विज्ञान/गणित विषयाचा शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |
| ४) | समूह विषयाशी संबंधित कार्य करण्यास समाजातील इच्छुक तज्ज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५) | शालेय व्यवस्थापन समिती व पालक | सदस्य |

वरीलप्रमाणे सदस्यांची निवड एका शैक्षणिक वर्षासाठी करावी. वर्षभराच्या कामकाजानंतर आढावा घेऊन समूहाच्या विषयाशी संबंधित कामकाजामध्ये विद्यार्थ्यांच्या रुचीनुसार समूहात आवश्यक बदल करण्याचा निर्णय घेण्याची मुभा राहील.

- **आवश्यक संसाधने तयार करणे :** आर्थिक साक्षरतेसाठी दृक्श्राव्य साहित्य, पुस्तके आणि डिजिटल संसाधनांची तयारी करणे.
- **वाचन व अध्ययन-अध्यापन साहित्य :** विद्यार्थ्यांना पूरक तसेच योग्य वाचन साहित्य, ई-लर्निंग साधने, आणि मल्टीमीडिया साहाय्य (व्हिडिओ, प्रेझेंटेशन्स) उपलब्ध करून देणे.

## २) कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे :

- **आर्थिक साक्षरतेवर कार्यशाळा आयोजित करणे :** विद्यार्थ्यांसाठी बजेट तयार करणे, बचत करणे, कर्जाचे व्यवस्थापन, गुंतवणूक, आणि डिजिटल पेमेंट यावर कार्यशाळा आयोजित करणे.
- **तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे :** आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन देणे.
- **प्रात्यक्षिक सत्रे :** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणाद्वारे आर्थिक साक्षरतेची संकल्पना समजावून सांगणे.

## ३) प्रेरणा आणि सहभागीता वाढविण्यासाठी उपक्रम :

- **स्पर्धा आणि खेळ :**
  - ➢ 'बजेट तयार करा' किंवा 'स्टॉक मार्केट' यासारखे खेळ आणि स्पर्धांचे आयोजन करणे.

- आर्थिक साक्षरतेवर आधारित निबंध लेखन, पोस्टर तयार करणे आणि प्रश्नमंजूषा आयोजित करणे.

- **गट प्रकल्प :**
  - विद्यार्थ्यांना गटात विभागून त्यांना आर्थिक नियोजन, बचत योजना आणि छोटे व्यवसाय तयार करायला सांगणे.
  - इतर गटांच्या प्रकल्पांचे निरीक्षण करणे व चर्चा करणे.

### ४) आर्थिक व्यवहाराशी संबंधित कृती/उपक्रम :

- **छोटे व्यवसाय उपक्रम राबवणे :** विद्यार्थ्यांना शाळेत लहान व्यवसाय प्रकल्प (उदा. छोटे स्टॉल्स किंवा सेवा) सुरू करायला सांगणे.
- **आर्थिक प्रकल्प तयार करणे :** विद्यार्थ्यांना व्यवसाय योजना, मार्केटिंग योजना आणि बजेट तयार करण्यास सांगणे.
- **गुंतवणूक आणि बचत योजनांचा अभ्यास :** विद्यार्थ्यांना स्टॉक मार्केट, म्युच्युअल फंड आणि फिक्स्ड डिपॉझिट यावर प्रकल्प करण्यास सांगणे.

### ५) डिजिटल आर्थिक साक्षरता :

- **डिजिटल पेमेंट प्रणालीचे प्रात्यक्षिक :** UPI, नेट बँकिंग आणि डिजिटल वॉलेट्स यांचा वापर करून विद्यार्थ्यांना डिजिटल व्यवहार शिकवणे
- **ऑनलाइन सुरक्षा आणि सायबर गुन्ह्याचे शिक्षण :** विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेविषयी माहिती देणे आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक कशी टाळावी यावर मार्गदर्शन करणे.

### ६) वित्तीय साक्षरता मूल्यांकन आणि पाठपुरावा :

- **प्रगतीचे मूल्यांकन :** विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेवर आधारित त्यांच्या ज्ञान, कौशल्य, व वर्तनाचे मूल्यमापन करणे.
- **पालकांचा सहभाग :** पालकांशी चर्चा करून त्यांच्या मुलांच्या आर्थिक साक्षरतेच्या प्रगतीविषयी फीडबॅक घेणे.
- **अहवाल तयार करणे :** कार्यशाळा, स्पर्धा, आणि इतर उपक्रमांचा अहवाल तयार करून शाळेच्या प्रशासनाकडे सादर करणे.

## आर्थिक साक्षरता समूहाची जबाबदारी व कार्ये :

आर्थिक साक्षरता समूह शालेय विद्यार्थ्यांना वित्तीय ज्ञान आणि कौशल्ये देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडतो. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पैशाचे योग्य व्यवस्थापन, गुंतवणूक, बचत आणि आर्थिक निर्णय

घेण्याची क्षमता विकसित केली जाते. खालीलप्रमाणे आर्थिक साक्षरता समूहाची जबाबदारी आणि कार्य दिले आहेत :

## १) जबाबदारी :

- **विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता देणे :**
  - ➢ विद्यार्थ्यांना पैशाच्या व्यवस्थापनाचे महत्त्व शिकवणे तसेच आर्थिक निर्णय घेण्यासाठी त्यांना सक्षम करणे.
  - ➢ इतर वित्तीय साधनांचा, जसे की बचत खाती, कर्ज, गुंतवणूक आणि जीवन विमा, उपयोग कसा करावा हे शिकवणे.
- **कार्यशाळा आणि सत्रांचे आयोजन :**
  - ➢ विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरतेवर कार्यशाळा, सेमिनार आणि प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे.
  - ➢ तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित करणे जे विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन देतील.
- **स्पर्धांचे आयोजन :**
  - ➢ गणना, बजेट तयार करणे, आणि बचत योजना तयार करण्यासंबंधी स्पर्धांचे आयोजन करणे.
  - ➢ वित्तीय समज वाढवण्यासाठी विविध प्रकारच्या गट कार्यशाळा आयोजित करणे.
- **गुंतवणूक आणि वित्तीय योजनांबद्दल मार्गदर्शन :**
  - ➢ विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गुंतवणूक साधनांची माहिती देणे.
  - ➢ विद्यार्थ्यांना सरावाची संधी देण्यासाठी 'स्टॉक मार्केट' किंवा 'डिजिटल पेमेंट प्रॅक्टिस' सत्रे आयोजित करणे.
- **आर्थिक साक्षरतेच्या मूल्यांकनाचे आयोजन :**
  - ➢ विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे नियमितपणे मूल्यांकन करणे आणि आवश्यक त्या सुधारणा सुचवणे.
  - ➢ विद्यार्थी–पालक बैठकांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेबाबत फीडबॅक घेणे.

## २) आर्थिक साक्षरता समूहाची कार्ये :

- **विद्यार्थ्यांना शालेय आर्थिक व्यवस्थापन शिकवणे :**
  - ➢ शाळेच्या दैनंदिन खर्चाचे नियोजन कसे करावे हे शिकवणे.
  - ➢ शालेय प्रकल्प, उद्योजकता उपक्रमांसाठी पैसे कसे गोळा करावे आणि व्यवस्थापन करावे. याचे प्रशिक्षण देणे.

- **आर्थिक साक्षरता संबंधित पुस्तके व साधनांची व्यवस्था करणे :**
  - ➢ विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता संबंधित साहित्य पुरवणे, जे वाचनाच्या दृष्टीने उपयोगी ठरेल.
  - ➢ शाळेच्या ग्रंथालयामध्ये आर्थिक साक्षरता वाचनीय साहित्य ठेवणे.
- **सामाजिक जबाबदारी जागरूकता :**
  - ➢ विद्यार्थ्यांना कर्ज, कर्ज फसवणूक, तसेच अयोग्य आर्थिक निर्णय कसे टाळावे यावर मार्गदर्शन करणे.
  - ➢ विद्यार्थी आर्थिक धोरणांच्या प्रभावाचे आणि विविध संस्थांमधून उत्पन्न मिळवण्याचे महत्त्व शिकवून त्यांना सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.
- **डिजिटल आर्थिक व्यवहार :**
  - ➢ विद्यार्थ्यांना डिजिटल पेमेंट, इंटरनेट बँकिंग आणि मोबाइल वॉलेट्स वापरण्याची प्रशिक्षण देणे.
  - ➢ विद्यार्थ्यांना ऑनलाइन वित्तीय फसवणूक आणि धोके यावर जागरूक करणे आणि त्यासंबंधी माहिती देणे.
- **अर्थसाहाय्य शिबिरे व प्रकल्प :**
  - ➢ शालेय स्तरावर अर्थसाहाय्य शिबिरे आयोजित करणे, ज्यात विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रकल्प तयार करण्याची संधी दिली जाईल.
  - ➢ शाळेच्या छोटे व्यवसाय कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करणे.

## आर्थिक साक्षरता समूहाचे वार्षिक नियोजन :

| महिना | इयत्ता १ ते ४ | इयत्ता ५ ते ७ | इयत्ता ८ ते १० |
|---|---|---|---|
| जून | • 'पैशाचे महत्त्व' चर्चा.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या नाण्यांद्वारे पैशाचे मूल्य शिकवणे. | • 'बचत कशी करावी?'<br>• बचतीची आवश्यकता समजावणे.<br>**उदाहरण :** पिग्गी बँक वापरणे आणि विद्यार्थ्यांना बचत कशी करावी हे शिकवणे. | • 'वित्तीय नियोजन'<br>• छोट्या प्रकल्पांची रूपरेषा.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना त्यांच्या मासिक खर्चाचे नियोजन तयार करायला सांगणे. |
| जुलै | • पैसे आणि त्याचे मूल्य.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना नाणी आणि नोटांचा वापर करून खरेदी–विक्री प्रक्रिया दाखवणे. | • घरातील खरेदी–विक्रीचे उदाहरण.<br>**उदाहरण :** वर्गातील 'बाजार' रचना करणे आणि विद्यार्थ्यांना वस्तू खरेदी करण्यास सांगणे. | • कर्ज आणि त्याचे परिणाम.<br>**उदाहरण :** कर्ज घेतल्यावर होणाऱ्या व्याजाचे उदाहरण देणे आणि ते समजावून सांगणे. |

| महिना | इयत्ता १ ते ४ | इयत्ता ५ ते ७ | इयत्ता ८ ते १० |
|---|---|---|---|
| ऑगस्ट | • 'धंदा/व्यवसाय/लघुउद्योग कसे कार्य करतात'<br>• साधे खरेदी-विक्री कार्य.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना एक छोटा व्यापार स्थापित करून वस्तूची विक्री शिकवणे. | • बाजारातील किंमती आणि बचत खाती.<br>**उदाहरण :** विद्यार्थी स्वतःच्या बजेटमध्ये बचत किती करू शकतात यावर चर्चा करणे. | • गुंतवणूक साधने आणि त्यांचे फायदे व तोटे.<br>**उदाहरण :** म्युच्युअल फंड्स, स्टॉक्स व इतर गुंतवणुकीचे उदाहरण देणे. |
| सप्टेंबर | • 'पैशाची बचत कशी करावी?'<br>• बचत बँक आणि कंटेनर.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना पिग्गी बँक वापरून बचत करण्यासाठी प्रोत्साहित करणे. | • घरातील खर्चाचे नियोजन.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना त्यांचे घरातील खर्च वर्गीकरण करून त्याचे नियोजन तयार करण्यास सांगणे. | • डिजिटल पेमेंट आणि त्याची सुरक्षा.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना किंवा इतर डिजिटल पेमेंट प्रणाली कशी वापरायची हे शिकवणे. |
| ऑक्टोबर | • पैशाचे आदान-प्रदान<br>• 'कसे होते?''<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना पैशाचे आदान-प्रदान दाखवून देणे, एक नाणे किंवा नोट प्रत्येक विद्यार्थ्याला देणे. बंदे-सुटे संकल्पना, नाणी-नोटांचे निरीक्षण. | • बँक, दुकाने यांना प्रत्यक्ष भेट व बँकेमधील विविध फॉर्म कसे भरावेत याचे प्रात्यक्षिक तसेच दुकानात खरेदी-विक्री प्रक्रियेचा अभ्यास व आर्थिक अभिलेखे पद्धतीचा अभ्यास करणे. विमा आणि त्याचे महत्त्व.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना जीवन आणि आरोग्य विमा याचे महत्त्व आणि उपयोग सांगणे. | • म्युच्युअल फंड्स, स्टॉक मार्केट आणि गुंतवणूक.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना त्यांचा एक छोटा गट तयार करून स्टॉक मार्केट गेम खेळवणे. |
| नोव्हेंबर | • 'तुमच्याकडे असलेल्या पैशाचे वेगवेगळे प्रकार'<br>• नाणी, नोट, प्लास्टिक मनी, डिजीटल रुपी इतर.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना नाणी आणि नोटांचे वर्गीकरण आणि त्या वापराच्या पद्धती समजावणे. | • 'बजेट तयार करणे.'<br>• खर्च आणि बचत याचे संतुलन.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना कुटुंबातील बजेट तयार करायला सांगणे. | • बँक खात्याचे प्रकार आणि फायदे.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना बँक खाती उघडण्याच्या पद्धती समजावणे आणि त्यांचे फायदे समजावून सांगणे.<br>बँक, दुकाने यांना प्रत्यक्ष भेट |

| महिना | इयत्ता १ ते ४ | इयत्ता ५ ते ७ | इयत्ता ८ ते १० |
|---|---|---|---|
| | | | व बँकेमधील विविध फॉर्म कसे भरावेत याचे प्रात्यक्षिक तसेच दुकानात खरेदी–विक्री प्रक्रियेचा अभ्यास व आर्थिक अभिलेखे पद्धतीचा अभ्यास करण्यास सांगणे. |
| डिसेंबर | • ''विविध वस्तू आणि त्यांच्या किंमत''<br>• पैशाचे निर्णय.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना विविध वस्तू विकत घेताना वस्तूची किंमत, त्याची आवश्यकता व प्राधान्याक्रम ठरविणे, वस्तूची निवड प्रक्रिया या विविध अनुषंगिक बाबींचा विचार करून पैसे वापराबाबतचे निर्णय घेणे आवश्यक आहे याबाबत चर्चा घडवून आणणे. | • 'खर्चाचे योग्य नियोजन'<br>• खर्चाची यादी तयार करणे.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना त्यांच्या आठवड्याचे खर्च नोंदवून बचत कशी करावी हे शिकवणे. | • गुंतवणूक पर्यायांची तुलना आणि अभ्यास.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना बँक, FD म्युच्युअल फंड्स आणि स्टॉक्स यांची तुलना करण्यास सांगणे. GST व IT, TDS या संकल्पनांविषयी माहिती संकलित करण्यास सांगणे. |
| जानेवारी | • 'आर्थिक मूल्ये'<br>• पैशाचा आदर व मूल्य.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना पैशाचे योग्य उपयोग कसा करावा आणि त्याचे महत्व सांगणे. | • 'आर्थिक धोरणे'<br>• साधे उदाहरण व चर्चा.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना घरातील आर्थिक धोरण समजावणे आणि त्यावर चर्चा करणे. | • छोट्या व्यावसायिक योजनांची कल्पना.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना एक छोटा व्यवसाय प्रकल्प तयार करून ते सादर करायला सांगणे. |
| फेब्रुवारी | • 'खर्च आणि त्याचे महत्व'<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना मौल्यवान वस्तूंचे उदाहरण देऊन त्यावर चर्चा करणे. | • 'कर्जाचे विविध प्रकार'<br>• कर्ज घेण्याचे फायदे व तोटे.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना कर्ज घेण्याचे फायदे आणि त्याच्या परतफेडीचे उदाहरण देणे. | • आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी बचत.<br>**उदाहरण** : विद्यार्थ्यांना सेवानिवृत्तीसाठी बचत करण्याची महत्वाची माहिती देणे. |

| महिना | इयत्ता १ ते ४ | इयत्ता ५ ते ७ | इयत्ता ८ ते १० |
|---|---|---|---|
| मार्च | • 'पैशाचे निर्णय'<br>• हिशोब ठेवणे.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना खर्च आणि बचत याचे संतुलन साधण्याचा सराव होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या विविध कृती/घरातील कार्यक्रम यावर वयोगटानुरूप चर्चा घडवून आणणे.<br>उदा. वाढदिवस, लग्नसमारंभ इ. | • 'खर्च आणि बचत याचे संतुलन'<br>• आर्थिक व्यवस्थापन.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना घरातील मासिक खर्चाच्या यादीवर चर्चा करण्यास प्रवृत्त करणे. | • 'विद्यार्थी उद्योजकता'<br>• प्रकल्प सादरीकरण.<br>**उदाहरण :** विद्यार्थ्यांना उद्योजकता संदर्भातील आपली योजना तयार करून सादर करण्यास सांगणे.<br>देशाचा व महाराष्ट्र अर्थसंकल्प यावर चर्चा आयोजित करणे. |

## आर्थिक साक्षरता दिन व उत्सव : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील

आर्थिक साक्षरता दिन हा वित्तीय साक्षरतेचा प्रसार आणि महत्त्व समजावण्यासाठी दरवर्षी विशेष दिनांमध्ये साजरा केला जातो. विविध देशांमध्ये आर्थिक साक्षरता आणि आर्थिक शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध दिवस आणि उत्सव आयोजित केले जातात.

### १) राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक साक्षरता दिन :

**भारत :**

- **आर्थिक साक्षरता दिन (National Financial Literacy Day) :**

  **तारीख :** १ जुलै

  **उद्देश :** भारत सरकारने १ जुलै रोजी आर्थिक साक्षरता दिन म्हणून घोषित केला आहे. या दिवशी आर्थिक साक्षरतेबद्दल तसेच विविध शासकीय योजनांबद्दल जनजागृती करण्याचे काम केले जाते, तसेच नागरिकांना बचत, गुंतवणूक, कर्ज, विमा आणि पेन्शन यासारख्या आर्थिक साधनांचा उपयोग कसा करावा हे शिकवले जाते.

- **आर्थिक साक्षरता अभियान :**

  भारतात आर्थिक साक्षरतेच्या प्रसारासाठी राष्ट्रीय बँक वित्तीय शिक्षण व प्रशिक्षण संस्था (NBEFL) आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) सक्रिय आहेत. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा, सेमिनार्स आणि इतर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

## २) आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक साक्षरता दिन व उत्सव :

- **आंतरराष्ट्रीय आर्थिक साक्षरता दिन (National Financial Literacy Day) :**

  **तारीख :** १२ ऑक्टोबर

  **उद्देश :** जागतिक स्तरावर आर्थिक साक्षरतेची महत्त्वाची भूमिका मानली जाते. सदर दिवशी जागतिक आर्थिक संस्थांद्वारे प्रसार व प्रचार केला जातो ज्यात विविध देशांतील नागरिकांना वित्तीय निर्णय घेण्याची क्षमता वाढवणे, वित्तीय शिक्षणाच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करणे आणि व्यक्तीच्या जीवनात आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी प्रयत्न करणे.

- **विविध आंतरराष्ट्रीय उत्सव व कार्यक्रम :**

  **World Investor Week (WIW) :** प्रत्येक वर्षी ऑक्टोबर महिन्यात आयोजित केला जातो. या सप्ताहात वित्तीय साक्षरतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी जागतिक स्तरावर विविध उपक्रम, कार्यशाळा, आणि संवाद साधले जातात.

- **Global Money Week :** विविध कार्यक्रम आणि कार्यशाळांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरतेचा प्रसार केला जातो. यामध्ये विशेषतः मुलांसाठी आणि तरुणांसाठी आर्थिक शिक्षणाचे आयोजन केले जाते.

### आर्थिक साक्षरता समूह सक्षमीकरणासाठी विभागाकडून देण्यात येणारे शैक्षणिक साहाय्य :

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ,पुणे तसेच जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत आर्थिक साक्षरताविषयक विविध चित्रफिती, माहितीपट, तज्ज्ञ मार्गदर्शन ऑनलाइन कार्यशाळा, संबंधित संदर्भीय पुस्तके, अनुषंगिक संदर्भीय महत्वाच्या व्हिडिओ लिंक्स उपलब्ध करून देण्यात येतील. याचा वापर सर्व शाळांतील समूहांनी करावा.

### आर्थिक साक्षरता समूहासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य :

- इयत्ता पहिली ते दहावीची पाठ्यपुस्तके – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत शाळांना उपलब्ध करून देण्यात आलेली गणित पेटी
- https://www.jkslbc.com/pdf/FLM/FLCC/English/FLMaterial.pdf
- www.jmcschoolgn.edu.in
- https://www.rbi.org.in
- https://youtu.be/oiRbD5rM5qc?feature=shared

❑❑❑

# ३३. आपत्कालीन व्यवस्थापन समूह

## प्रस्तावना :

आज राष्ट्राच्या भौगोलिक सीमा निश्चित असून आपले सार्वभौमत्त्व अबाधित राखण्यासाठी देशाची स्वतंत्र संरक्षण यंत्रणा आहे. आपल्या राज्यातील लोकांचे जीवन आणि राहणीमान समृद्ध व्हावे या उद्देशाने शासन व्यवस्था कार्य करत असते. अनेक लोकोपयोगी लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. सुखी व समृद्ध जीवन जगण्यासाठी प्रत्येक समाज कार्यमग्न आहे. असे असताना समाजाला कधी–कधी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा सामना करावा लागतो. आपत्ती म्हणजे काय जीवन आणि मालमत्तेचा नाश करणारी, अचानक उद्‌भवणारी अत्यंत दुःखद घटना होय. जसे की, पूर, भूकंप, रस्ते व रेल्वे अपघात, आग, इत्यादी. मात्र शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून आपत्ती ही वेगळ्या प्रकारची असते उदाहरणार्थ पोहताना जीवाला धोका निर्माण होणे किंवा विविध जनावरांपासून (भटकी कुत्री) त्रास होणे.

## आपत्तीचे प्रकार :

### १) नैसर्गिक आपत्ती :

पृथ्वीच्या अंतर्भागातील हालचालींमुळे, पर्यावरणीय असंतुलनामुळे उद्‌भवणारी कोणतीही नैसर्गिक घटना ज्यामुळे जीवित आणि मालमत्तेची हानी होते तिला नैसर्गिक आपत्ती असे म्हणतात. उदा. पूर, भूकंप, दुष्काळ, त्सुनामी, विजांचा कडकडाट होऊन वीज पडणे, इत्यादी.

### २) मानवनिर्मित आपत्ती :

मानवी निष्काळजीपणा, चूक आणि यत्रणेच्या अपयशामुळे उद्‌भवणाऱ्या इतर आपत्तींना मानवनिर्मित आपत्ती म्हणतात. उदा. जीवघेणे रस्ते अपघात, बॉम्बस्फोट, वसाहती आणि कारखान्यांमधील आग, रेल्वे अपघात, इ.

- **आपत्तींची विविध उदाहरणे**

| नैसर्गिक आपत्ती उदाहरणे | मानवनिर्मित आपत्ती उदाहरणे |
|---|---|
| भूकंप, पूर, दुष्काळ, चक्रीवादळ, नैसर्गिक भुस्खलन, आकाशातून वीज पडणे, ढगफुटी, त्सुनामी, थंडीची लाट, उष्णतेची लाट, जंगलातील आग, ज्वालामुखीचा उद्रेक, इ. | जीव घेणे रोड, रेल्वे, विमान अपघात, वसाहती आणि कारखान्यांमधील आग, धोके आणि वायू प्रदूषण, बॉम्बस्फोट, मानवनिर्मित भूस्खलन–मातीची धूप, रासायनिक आपत्ती, जैविक आपत्ती, आण्विक आपत्ती, इ. |

विद्यार्थ्यांमध्ये शालेय वयातच जर आपत्तीसंदर्भात जागृती घडवली, तर त्यांच्या जीवनात भविष्यात निर्माण होऊ पाहणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. निसर्गावर

मात करण्याच्या प्रयत्नात आपत्ती वाढते आहे, त्यातून वित्त व जिवित हानी होते आहे. मुळात आपण नैसर्गिक संकटे टाळू शकत नाहीत, मात्र संकटे आली तर त्यावर मात करण्याच्या दृष्टीने पावले पडायला हवीत. विद्यार्थ्यांच्या मनात जाणीव जागृती घडावी म्हणून हे विद्यार्थी समूह निश्चित उपयोगी पडणार आहेत. हा विषय प्रत्यक्ष जीवन व्यवहाराच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा आहे.

### आपत्ती व्यवस्थापन विषय समूह :

### उद्दिष्ट्ये

१. शालेय मूल, शिक्षक आणि इतर कर्मचारी यांचे जीव वाचवण्यासाठी आणि इजा टाळण्यासाठी प्रशिक्षण, जागरूकता निर्माण करणारी कामे आणि शाळा सुरक्षा उपक्रम घेणे.

२. जोखीम कमी करणाऱ्या उपाययोजनांद्वारे शाळांना आपत्ती आणि हिंसाचारापासून सुरक्षित ठिकाण बनवणे.

३. जोखीम, धोका आणि असुरक्षेचे मूल्यांकन (HRA) करून आणि शालेय आपत्ती व्यवस्थापन योजनेंतर्गत योग्य उपाय स्वीकारून संरचनात्मक (दोन्ही संरचनात्मक आणि असंरचनात्मक परंतु संरचनात्मक उपायांवर अधिक लक्ष केंद्रित करून जोखीम कमी करणे.

४. सक्षम विद्यार्थी आणि शालेय समुदायाच्या माध्यमातून, समाजातील घटकांना आपत्ती जोखीम कमी करण्याच्या पद्धती स्वीकारण्यास मानसिकदृष्ट्या तयार करणे.

५. तयारी, निवारण, अनुकूलन आणि एकूण आपत्ती जोखीम कमी करण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे. सौम्यीकरण आपत्तीच्या काळात आणि आपत्तींनंतरही शाळा शैक्षणिक उपक्रम सुरू ठेवण्यास सक्षम आहे याची खात्री करणे.

### उपक्रम

### महाराष्ट्र सुरक्षित, संवेदनक्षम आणि शाश्वत शाळा उपक्रम

१. शालेय, सुरक्षितता आणि शाश्वततेची मूलतत्त्वे

२. आपत्ती, हवामानबदल आणि शाश्वतता मूलभूत संकल्पना

३. महाराष्ट्र सुरक्षित, सक्षम आणि शाश्वत शाळांचा दृष्टिकोन

४. महाराष्ट्र सुरक्षित, संवेदनक्षम आणि शाश्वत शाळा उपक्रमाची अंमलबजावणी

५. प्रमुख सदस्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या

### आपत्ती व्यवस्थापन विषय समूहाची रचना :

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर/माध्यमिक स्तरासाठी आपत्तीव्यवस्थापन समूहाची स्थापना पुढील प्रमाणे करावी. समूह प्रमुख शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा विषयाचे ज्ञान असलेला, आपत्ती

व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेला शिक्षक असावा. यांची निवड करत असताना त्यांचा सेवेतील अनुभव आणि त्यांनी राबविलेले उपक्रम या आधारावर करण्यात यावी. विद्यार्थ्यांची निवड स्वयंस्फूर्तपणे करावी. दर दोन वर्षांनी विषय समूहाची रचना करावी.

| अ.क्र. | पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| १) | शक्यतोवर शाळेतील सर्वोच्च स्तराचा शिक्षक | मार्गदर्शक तथा समूह प्रमुख |
| २) | शाळेतील इतर स्तरांपैकी एका स्तरातील शिक्षक | सदस्य |
| ३) | प्रत्येक इयत्तेतील एक विद्यार्थी/विद्यार्थिनी (समूहात समान संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत.) | सदस्य |
| ४) | शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष | सदस्य |
| ५) | शाळेचे मुख्याध्यापक | सदस्य |

**आपत्ती व्यवस्थापन समूहाची जबाबदारी व कार्ये :**

शालेय स्तरावर प्राथमिक स्तर आणि माध्यमिक स्तरासाठी स्थापन केलेल्या आपत्ती व्यवस्थापन समूहाची जबाबदारी व कार्ये पुढीलप्रमाणे –

१) मुख्याध्यापकांनी शाळेत शिक्षकाच्या मदतीने आपत्ती व्यवस्थापन समूहाची स्थापना करणे.

२) सदस्यांची त्यांच्या विषयातील आवडीनुसार/क्षमतेनुसार निवड करून कामकाजाच्या स्वरूपानुसार जबाबदारी निश्चित करणे.

३) आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत उपक्रमांचे वार्षिक नियोजन तयार करणे.

४) पूर्व नियोजनानुसार दर दोन आठवड्यांनी बैठक घेणे. बैठकी दरम्यान उपक्रम सूचविण्यासाठी सर्व सदस्यांना प्रोत्साहित करणे.

५) आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत घेतलेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत ठेवणे.

६) आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक पत्रव्यवहार, पूर्वतयारी करणे.

७) आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांना प्रसिद्ध देणे.

८) आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत उपक्रम घेण्यासाठी निधीची उपलब्धता व झालेला खर्च यांचा ताळमेळ ठेवणे.

९) नैसर्गिक व मानवनिर्मित संभाव्य आपत्तींचे अंदाज घेऊन पूर्वतयारी करणे.

समूहांतर्गत घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्यांमार्फत करवून घेणे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळेल यासाठी त्यांना विविध जबाबदाऱ्या देणे. उदा. पूर्वनियोजन, सूत्रसंचालन व इतर कामे.

१०) शाळेचा नकाशा दर्शनी भागात लावणे. जेणेकरून आपत्ती आल्यास शाळेतून बाहेर पडण्याचे मार्ग माहित असतील.

११) आपत्ती व्यवस्थापनाच्या संसाधन साहित्याच्या देखभाली बाबत अहवाल सादर करणे.

**आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी सूचना :**

१) प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या आनंददायी शनिवारी सोबतच्या कृतींपैकी स्थानिक गरजा, साहित्य उपलब्धता व परिस्थितीनुसार कृती घ्यावी.

२) प्रत्येक पुढची कृती घेण्यापूर्वी मागच्या शनिवारी घेतलेल्या कृतीची उजळणी करावी, नंतरच नवीन कृती घ्यावी.

३) प्रत्येक कृती घेण्यापूर्वी त्या कृतीसाठी आवश्यक साहित्याची उपलब्धता व वेळेचे नियोजन करावे. संपूर्ण तयारी झाल्यानंतरच कृती घ्यावी.

४) प्रत्येक कृतीत वर्गातल्या १००% विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा. दिव्यांग विदयार्थ्यांचाही सहभाग घ्यावा. विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे योग्य प्रकारे निरसन करावे.

५) कृती घेत असताना कोणत्याही विद्यार्थ्याला शारीरिक व मानसिक इजा होणार नाही. याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांमध्ये वाद, तंटे होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) कृती संपल्यानंतर कृतीतून अपेक्षित संदेश विद्यार्थ्यांपर्यंत गेला आहे की नाही याची पूर्ण खात्री करावी.

७) कृतीसाठी निवडलेली जागा सुरक्षित असावी.

८) शाळेत प्रथमोपचार पेटी असावी.

९) सूचित केल्याप्रमाणे प्रत्येक कृती संपूर्ण घ्यावी.

१०) एखादया शनिवारी अपरिहार्य कारणांमुळे नियोजित कृती घेता न आल्यास कृती पुढील टप्प्यात घेण्याचे नियोजन करावे. कोणत्याही परिस्थितीत कृती टाळू नये.

११) कृतीसाठी उपयोगात आणलेले साहित्य कृती संपल्यानंतर योग्य व सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

१२) पुस्तकातील घोषवाक्ये, कृतीतून दिला जाणारा संदेश यांचा परिपाठात समावेश करण्याचे नियोजन शाळास्तरावर करावे.

१३) कृती दरम्यान घेतलेली छायाचित्रे अथवा ध्वनिचित्रफिती या समाजमाध्यमावर प्रसारित न करता शालेय दप्तरी जतन करुन ठेवाव्यात.

१४) काही प्रात्यक्षिकांसाठी गरज पडल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, पोलीस स्थानक, वैदयकीय अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील तज्ज्ञ व प्रशिक्षित व्यक्तीचे मार्गदर्शन घ्यावे.

## आपत्ती व्यवस्थापन समूहाच्या कामकाजासाठी प्रक्रिया/नियमावली :

आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्यांमध्ये काही नियम आखणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे समुहाचे नियम पुढील प्रमाणे तयार करावेत.

**अ. विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

१. प्रत्येक विद्यार्थ्याने उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
२. आपत्ती व्यवस्थापनविषयक जिज्ञासा वाढविण्यासाठी प्रश्न विचारावेत.
३. उपक्रम दरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत.
४. उपक्रम दरम्यान इतर विद्यार्थ्यांसोबत सहकार्याने काम करावे.
५. शालेय शिस्त व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे.

**ब. शिक्षकांसाठी सूचना**

१. उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.
२. उपक्रम दरम्यान सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सूचना सुनिश्चित कराव्यात.
३. सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
४. उपक्रम व कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे.
५. आनंददायी पद्धतीने उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

## शाळेतील इतर समूहासोबत समन्वय प्रक्रिया

शाळेतील इतर समूहांशी समन्वय साधताना वार्षिक नियोजनावेळी सर्व समूहप्रमुखांनी उपक्रमनिहाय सादरीकरण करून उपलब्ध वेळ आणि सर्व समूह अंतर्गत राबवायचे उपक्रम यांचा विचार करावा. तसेच काही उपक्रम एकत्रितपणे घेण्याचे नियोजन करावे. उपक्रमाची द्विरुक्ती होऊ नये यासाठी पूर्वनियोजन करून सर्व समुह अंतर्गत समूह प्रमुखांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवावेत.

**शालेय आपत्ती व्यवस्थापन समूह यशस्वी होण्यास आवश्यक घटक**

१. आर्थिक तरतूद.
२. उपक्रम अंमलबजावणीसाठी महिन्यातील वेळ.
३. उपक्रम घेण्यासाठी उपक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य.
४. मार्गदर्शन करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन तज्ञ मार्गदर्शक.

## आपत्ती व्यवस्थापन समूह अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक नियोजन :

| अ.क्र. | महिना | घ्यावयाची कृती |
|---|---|---|
| १ | जून | वीज कोसळणे, दरड कोसळणे, भूस्खलन |
| २ | जुलै | अतिवृष्टी, ढगफुटी, पूर, पुरामुळे वीजेचा धक्का, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आजाराविषयी |
| ३ | ऑगस्ट | चक्रीवादळ, वादळवारा, गारपीट डॉक्टरांचे व्याखान आयोजित करणे. |
| ४ | सप्टेंबर | आग लागणे, वणवा. गावातील विविध सामाजिक कार्यक्रमात आपत्ती व्यवस्थापनाची माहिती देणे. |
| ५ | ऑक्टोबर | रस्ता व इतर अपघात, प्रथमोपचार CPR आणीबाणी प्रतिसाद |
| ६ | नोव्हेंबर | वातावरणीय बदल : मानवी आरोग्य प्रदूषण, शीतलहरी, उष्णतेची लाट, धुके, धुरके, |
| ७ | डिसेंबर | भूकंप आणि त्सुनामी, ज्वालामुखी, समुद्राचे उधाण |
| ८ | जानेवारी | युद्ध आणि युद्धजन्य परिस्थिती रासायनिक आणीबाणी व जैविक आपत्ती |
| ९ | फेब्रुवारी | चेंगराचेंगरी, शाळेतील आपत्ती, दंगली |
| १० | मार्च | पाळीव वन्यजीव प्राण्यांचे हल्ले |

### साहित्य –

- प्रथमोपचार पेटी
- रेतीने भरलेल्या बादल्या
- फायर एस्टिंगविशर
- पोलीस, अग्निशमन यंत्रणा, गावातील डॉक्टर यांचे अद्ययावत नंबर
- शाळेतील धोक्याच्या ठिकाणी सूचना फलक (वीज, पाण्याच्या टाकी, प्रयोग शाळा साहित्य इ.)

## उपक्रमनिहाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दिनविशेष :

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| १ | २ फेब्रुवारी | जागतिक आर्द्रभूमी दिन |
| २ | २७ फेब्रुवारी | आंतरराष्ट्रीय ध्रुवीय अस्वल दिन |
| ३ | ३ मार्च | जागतिक वन्यजीव दिन |
| ४ | १४ मार्च | आंतरराष्ट्रीय नद्यांसाठी कृती दिन |

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| ५ | १८ मार्च | राष्ट्रीय बायोडिझेल दिवस |
| ६ | २० मार्च | जागतिक चिमणी दिन |
| ७ | २१ मार्च | आंतरराष्ट्रीय वन दिन |
| ८ | २२ मार्च | जागतिक जल दिन |
| ९ | ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन |
| १० | २२ एप्रिल | पृथ्वी दिन |
| ११ | महिन्यात दुसरा शनिवार | जागतिक स्थलांतरित पक्षी दिन |
| १२ | मे महिन्यात तिसरा शुक्रवार | बाईक टू वर्क डे |
| १३ | २२ मे | जैवविविधता दिवस |
| १४ | ५ जून | जागतिक पर्यावरण दिन |
| १५ | ८ जून | जागतिक महासागर दिन |
| १६ | १७ जून | संयुक्त राष्ट्र वाळवंट आणि दुष्काळविरोधी जागतिक दिन |
| १७ | ११ जुलै | जागतिक लोकसंख्या दिन |
| १८ | २९ जुलै | आंतरराष्ट्रीय वाघ दिन |
| १९ | १२ ऑगस्ट | जागतिक हत्ती दिन |
| २० | १६ सप्टेंबर | ओझोनस्तर संरक्षण आंतरराष्ट्रीय दिन |
| २१ | २१ सप्टेंबर | शून्य उत्सर्जन दिवस |
| २२ | २२ सप्टेंबर | वाहनमुक्त दिवस |
| २३ | ऑक्टोबर मधील पहिला सोमवार | जागतिक निवास दिन |
| २४ | १३ ऑक्टोबर | आंतरराष्ट्रीय आपत्ती जोखीम कमी करणारा दिवस |
| २५ | ऑक्टोबर मधील चौथा बुधवार | शाश्वततेचा दिवस |
| २६ | २४ ऑक्टोबर | आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिन |
| २७ | ६ नोव्हेंबर | युद्ध व सशस्त्र संघर्षातील पर्यावरण शोषण प्रतिबंध दिन |

| अ.क्र. | महिना व दिनांक | दिनविशेष |
|---|---|---|
| २८ | ५ डिसेंबर | जागतिक मृदा दिन |
| २९ | ११ डिसेंबर | आंतरराष्ट्रीय पर्वत दिन |

## सदर समूहांच्या सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन यादी :

१) प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा.

२) गटांसाठी मार्गदर्शक पुस्तके व साहित्य पुरवणे.

३) गटांच्या सर्वोत्तम उपक्रमांचा प्रचार व प्रसार.

४) गटांचे वार्षिक मूल्यमापन व प्रोत्साहन योजनांची अंमलबजावणी करणे.

५) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी यांना सादरीकरणाची संधी देणे.

६) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विषयानुसार शिक्षक, विद्यार्थी याच्यासाठी स्पर्धेचे आयोजन करणे.

## समूहाच्या प्रभावी कामकाजासाठी सहाय्यभूत/संसाधने/पुस्तके/साहित्य :

**१) ऑनलाईन :** उपक्रमांसाठी, वेबसाइट्स, तज्ञांचे मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजन.

**२) ऑफलाईन :** संदर्भपुस्तके, पोस्टर्स, चाट्‌र्स, प्रकल्प साहित्य.

**३) संदर्भ पुस्तके :** महराष्ट्र, पुणे व च्या वेबसाइट्सवरील उपलब्ध संदर्भ साहित्य.

## शाळेने सादर करावयाच्या उपक्रम निहाय वार्षिक अहवालाचे मुद्दे :

**उपक्रमनिहाय अहवाल :**

१) समूहाची उद्दिष्टे

२) सहभागींनी केलेले कार्य

३) उपक्रमाचा परिणाम / यश

**वार्षिक अहवाल :**

१) सर्व उपक्रमांचे एकत्रित विश्लेषण

२) यशस्वी उपक्रमांची उदाहरणे

३) पुढील वर्षासाठी शिफारशी.

## समूहाच्या परिणामकारक कामकाजासाठी सहाय्यभूत ठरणारे मुद्दे :

१) समूहासाठी ठराविक जागा उपलब्ध करणे.

२) समूहांना नामांकने देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**या समूहांमुळे शाळेस होणारे फायदे :**

**१) आपत्तीबाबत जागरूकता वाढते. सुरक्षेच्या उपाययोजना समजतात.**

**२) तात्काळ प्रतिसाद देण्याची तयारी होते.**

- आपत्तीच्या वेळी शाळा/महाविद्यालयात पहिला प्रतिसाद देणारे म्हणून काम करू शकतात.
- प्राथमिक उपचार, सुरक्षित स्थळी स्थलांतर, इ. बाबतीत मदत करू शकतात.

**३) नेतृत्व गुण व जबाबदारीची जाणीव :**

- नेतृत्वगुण, टीमवर्क, आणि संवाद कौशल्ये विकसित होतात.
- समाजा प्रती जबाबदारीची भावना निर्माण होते.

**४) शाळा किंवा परिसर अधिक सुरक्षित बनतो.**

**५) आपत्ती व्यवस्थापन नियोजनात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो.**

- धोकादायक भाग ओळखणे, सूचना फलक तयार करणे, सराव चाचण्या (mock drills) घेणे इत्यादी उपक्रमांत सक्रिय सहभाग असतो.

**६) करिअर संधींसाठी आधार :**

- आपत्ती व्यवस्थापन किंवा सामाजिक कार्यक्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांना अनुभव मिळतो.
- शासन किंवा आपत्ती व्यवस्थापन संस्थांसोबत काम करण्याची संधी मिळू शकते.

**७) समूहशक्तीचा उपयोग :**

- विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना वाढते.
- एकत्र काम करून संकटांवर मात करण्याचा आत्मविश्वास वाढतो.

**८) समाजात जनजागृती करता येते.**

- विद्यार्थी इतर नागरिकांना आपत्तीबाबत माहिती देऊ शकतात.
- विशेष मोहिमा, प्रात्यक्षिके, प्रदर्शनं यांद्वारे समाजात जागरूकता निर्माण करता येते.

❑❑❑

# ३४. स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन समूह

**पार्श्वभूमी :**

'स्पर्धात्मक परीक्षा प्रोत्साहन क्लब' हा उपक्रम शिष्यवृत्ती आणि स्पर्धात्मक परीक्षा जसे NTSE, ऑलिंपियाड्स आणि इतर ॲप्टिट्यूड आधारित मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि तयार करण्यासाठी स्थापन केला आहे. हा क्लब विद्यार्थ्यांना या परीक्षा पास होण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये, रणनीती आणि आत्मविश्वास निर्माण करतो.

**प्रस्तावना :**

हा क्लब विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता आणि स्पर्धात्मक भावना निर्माण करण्यासाठीचा एक उपक्रम आहे. यामध्ये ॲप्टिट्यूड चाचण्या आणि स्पर्धात्मक आव्हानांचे पद्धतशीरपणे निराकरण करण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

**क) संकल्पना**

हा क्लब इयत्ता १ ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी तयार केला आहे आणि चार गटांमध्ये विभागलेला आहे :

- **गट १ (इयत्ता १ ते २) :** पझल्स आणि शब्दसंग्रह खेळांद्वारे स्पर्धात्मक परीक्षेच्या प्रारंभिक स्वरूपाची ओळख करून देणे.
- **गट २ (इयत्ता ३ ते ५) :** पझल्स, तर्कशास्त्र कार्य आणि शालेय स्तरावरील स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणे.
- **गट ३ (इयत्ता ६ ते ८) :** NMMS आणि ऑलिंपियाड्ससाठी तयारी, तर्क आणि सामान्य ज्ञानावर केंद्रित सत्रे आयोजन करणे.
- **गट ४ (इयत्ता ९ ते १०) :** विज्ञान ऑलिंपियाड्स आणि प्रवेश परीक्षांसाठी तयारी, आत्मविश्वास वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणे.

**संकल्पना :**

- **परीक्षेची तयारी :** विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे.
- **कौशल्य विकास :** तर्कशास्त्र, समस्या सोडवणे आणि वेळ व्यवस्थापन कौशल्यांचा विकास करणे.
- **उत्कृष्टतेला प्रोत्साहन :** स्पर्धात्मक भावना आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे.
- **आंतरशाखीय शिक्षण :** गणित, विज्ञान आणि सामान्य ज्ञान यांसारख्या विषयांना एकत्रित करून शैक्षणिक कृती कार्यक्रम तयार करणे.

- **सर्वांगीण विकास :** आत्मविषय, विचारक्षमतेचा विकास आणि कार्यसंघ भावना वाढवणे.

## १) समूहाचा प्रमुख :

**अ) प्रमुख :** समूहाचा प्रमुख स्पर्धा परीक्षा किंवा सामान्य ज्ञान, तर्कशास्त्र इत्यादी विषयांमध्ये पारंगत असलेला शिक्षक असावा.

**ब) निवड प्रक्रिया :**

- संबंधित शिक्षकाची कामगिरी, त्यांची तत्परता आणि विद्यार्थी मार्गदर्शनाचा अनुभव यावर आधारित मुख्याध्यापक निवड करतील. प्रमुखाची नियुक्ती दरवर्षी पुनरावलोकन करून नूतनीकरण केली जाईल.
- प्रमुखाची नियुक्ती दरवर्षी पुनरावलोकन करून नूतनीकरण केली जाईल.

## २) सदस्य :

- इयत्ता १ ते १० मधील विद्यार्थी.
- प्रत्येक वर्गातील १ विद्यार्थी किंवा १–२ तुकड्यांतील योग्य उमेदवार निवडले जातील.

**निवड प्रक्रिया :**

- विद्यार्थ्यांची निवड प्रश्नमंजुषा, शिक्षकांच्या शिफारसी आणि त्यांच्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये रस यावर आधारित केली जाईल.
- समूह सदस्यांचा कार्यकाळ एका शैक्षणिक वर्षासाठी असेल.

## ३) समूहांच्या उपक्रमांची व्याप्ती काय असावी?

विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार उपक्रम विभागावेत :

- **गट १ (इयत्ता १–२) :** विविध कोडी, शब्दसंग्रह खेळ, परस्पर गोष्टी सांगणे.
- **गट २ (इयत्ता ३–५) :** प्राथमिक पातळीवरील तर्कशास्त्र सत्रे, शालेय स्पर्धांचे आयोजन.
- **गट ३ (इयत्ता ६–८) :** NMMS, ऑलिंपियाड्स तयारी, सामान्य ज्ञान स्पर्धा.
- **गट ४ (इयत्ता ९–१०) :** ऑलिंपियाड्स, प्रवेश परीक्षांची तयारी.

विशिष्ट काळासाठी सत्र, कार्यशाळा, मॉक चाचण्या आणि मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करणे.

## ४) समूहाचे कामकाज सुरु करण्यासाठी सविस्तर सूचना :

- मुख्याध्यापकांनी प्रकल्पाचे उद्दिष्टे स्पष्ट करावीत.
- प्रमुख शिक्षकांनी सल्लागारांचे आणि सदस्यांचे प्रशिक्षण आयोजित करावे.
- वार्षिक कार्यक्रम पत्रिका तयार करून त्यानुसार उपक्रम आयोजित करावेत.

- वार्षिक कार्यक्रमपत्रिका तयार करून त्यानुसार उपक्रम आयोजित करावेत.
- विद्यार्थ्यांसाठी प्रारंभिक ओळख सत्रे आयोजित करून उपक्रमांबाबत माहिती द्यावी.

## ५) वार्षिक दिनदर्शिकेमध्ये उपक्रम/बाबी

**उपक्रम :**

**लहान गटांसाठी (इयत्ता १ ते ५) :**

- शब्दकोडी, सोपी गणितीय आव्हाने आणि शब्दसंग्रह वाढवण्यासाठी खेळ.
- परस्पर संवादात्मक गोष्टी सांगणे, स्पर्धात्मक परीक्षेच्या प्रारंभिक स्वरूपाची ओळख.

**मोठ्या गटांसाठी (इयत्ता ६ ते १०) :**

- NMMS, ऑलिंपियाड्स आणि प्रतिभा शोध परीक्षांसाठी चाचण्या.
- तर्कशास्त्र आणि सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी सत्रे.
- सामान्य ज्ञान क्लब किंवा मानसिक क्षमता क्लबसह संयुक्त कार्यक्रम.
- स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शनासाठी तज्ज्ञांचे सत्र
- वेळ व्यवस्थापन, तणाव हाताळणी आणि आत्मविश्वास वाढवण्यावर मार्गदर्शन.
- स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेणे.
- परीक्षांसाठी उपयुक्त संदर्भ साहित्य उपलब्ध करून देणे.
- स्पर्धा परीक्षांच्या अनुषंगाने प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करणे.
- स्पर्धा परीक्षेस यशस्वी होणाऱ्या स्पर्धकांचे मार्गदर्शन मुलाखत.
- मार्गदर्शनपर व्याख्याने.

### वार्षिक दिनदर्शिका :

**जून ते मार्च दरम्यानचे नियोजन (इयत्ता १ ते १० साठी)**

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| जून | शब्द पझल्स, परस्पर गोष्टी सांगणे. | प्राथमिक तर्कशास्त्र सत्रे, गणितीय समस्या सोडवणे. | NMMS, ऑलिंपियाड तयारीसाठी मॉक चाचण्या. | विज्ञान ऑलिंपियाड तयारी, तज्ज्ञ मार्गदर्शन. |
| जुलै | शब्दसंग्रह वाढवण्याचे सत्र. | शालेय स्तरावरील स्पर्धात्मक चाचण्या. | तर्कशास्त्र, सामान्य ज्ञान सत्रे. | सामान्य ज्ञान, प्रश्नमंजूषा आणि वेळ व्यवस्थापन सत्रे. |

| महिना | गट १ (इयत्ता १ ते २) | गट २ (इयत्ता ३ ते ५) | गट ३ (इयत्ता ६ ते ८) | गट ४ (इयत्ता ९ ते १०) |
|---|---|---|---|---|
| ऑगस्ट | संवाद कौशल्य वाढवण्यासाठी खेळ. | गणितीय आणि तर्कशास्त्र सराव सत्र. | मानसिक क्षमता चाचण्यांचे सत्र. | ऑलिंपियाड आणि प्रवेश परीक्षांसाठी सराव चाचण्या. |
| सप्टेंबर | चित्रकथा आणि पझल्सचा समावेश असलेले सत्र. | मानसिक गणित स्पर्धा. | सामान्य ज्ञान स्पर्धा आणि NMMS, तयारी. | तणाव हाताळण्याचे व आत्मविश्वास सत्र. |
| ऑक्टोबर | लहान शब्दसंग्रह स्पर्धा. | तर्कशास्त्र आणि वेळ व्यवस्थापन सत्रे. | ऑलिंपियाड तयारीसाठी मार्गदर्शन. | यशस्वी विद्यार्थ्यांच्या मुलाखती. |
| नोव्हेंबर | गोष्टी सांगणे, शब्द खेळ. | सराव चाचण्या, प्रश्नोत्तर सत्र. | NMMS तयारीचे सत्र. | परीक्षेसाठी तज्ज्ञ मार्गदर्शन. |
| डिसेंबर | पझल्स व खेळांच्या माध्यमातून पुनरावलोकन. | ॲप्टिट्यूड स्पर्धांचे आयोजन. | जिल्हा व राज्यस्तरीय NMMS तयारी. | सामान्य ज्ञान आणि तर्कशास्त्र सत्र. |
| जानेवारी | सादरीकरण सत्र, संवाद कौशल्य सुधारणा. | सराव चाचण्या व प्रश्नोत्तर. | ऑलिंपियाड्सचा आढावा, सराव सत्रे. | अंतिम मॉक चाचण्या आणि मुलाखत. |
| फेब्रुवारी | पुनरालोकन व उत्साहवर्धन सत्र. | अंतिम सराव चाचण्या व मुलाखती. | NMMS व ऑलिंपियाडच्या अंतिम तयारीचे सत्र. | स्पर्धा परीक्षेच्या यशस्वी विद्यार्थ्यांसोबत चर्चा. |
| मार्च | वार्षिक पुनरालोकन व निष्कर्ष. | वार्षिक निष्कर्ष सत्र व प्रगती अहवाल. | वार्षिक प्रगती सत्र आणि जिल्हा स्पर्धांचे नियोजन. | प्रेरणादायी व्याख्यान आणि सत्र. |

**महत्त्वाच्या गोष्टी :**

- **साप्ताहिक उपक्रम :** क्विझेस, शब्दसंग्रह, आणि तर्कशास्त्र सराव.
- **त्रैमासिक उपक्रम :** शालेय ॲप्टिट्यूड चाचण्या व इतर गटांशी सहकार्य.
- **वार्षिक स्पर्धा :** NMMS ऑलिंपियाड आणि शिष्यवृत्ती परीक्षांचे आयोजन.

## ६) समूहासाठी प्रक्रिया/नियमावली :

- ठराविक वेळापत्रकानुसार सत्रांचे आयोजन करणे.
- उपक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि सहभाग नोंदवणे.

- प्रत्येक सदस्याला त्याच्या कामगिरीबद्दल पुनरावलोकन आणि अभिप्राय देणे.

## ७) शाळेतील समूहांमधील समन्वय प्रक्रिया :

- शाळेच्या मुख्याध्यापकांनी समूह प्रमुखांसोबत दरमहा समन्वय बैठक आयोजित करावी.
- विविध समूहांतील उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करून नियोजन करावे.
- यशस्वी उपक्रमांचे अनुभव आणि शिकवण सामायिक करावी.

## ८) शिक्षण विभाग व SCERT कडून साहाय्य :

**संसाधने :**

- अभ्यास साहित्य, प्रश्न बँका, डिजिटल साधने.
- तर्कशास्त्र व स्पर्धात्मक परीक्षांसाठी वर्कशॉप्स.

**प्रोत्साहन :**

- राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी शाळांना प्रोत्साहित करणे.
- उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार आणि प्रमाणपत्रे देणे.

## ९) Online/Offline संसाधने व साहित्य :

**पुस्तके आणि संसाधने :**

- तर्कशास्त्र आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी मानक पुस्तके, उदा. आर. एस. अग्रवाल यांच्या तर्कशास्त्र पुस्तकांची मदत घेणे.
- लहान विद्यार्थ्यांसाठी गोष्टींची पुस्तके आणि पझल्स उपलब्ध करणे.

**खेळ आणि डिजिटल साधने :**

- ऑनलाइन मॉक चाचण्या आणि क्विझेस प्रत्यक्ष सराव करण्यासाठी उपयुक्त असतात.
- शैक्षणिक ॲप्स जे बौद्धिक आणि तर्कशास्त्रावर आधारित असतात.

**ग्रंथालय आणि अध्ययन साहित्य :**

- शालेय ग्रंथालयातील ऑलिंपियाड्स, NTSE, आणि ॲप्टिट्यूड चाचण्यांवरील साहित्य.

## १०) उपक्रमनिहाय व वार्षिक अहवालाचा प्रारूप :

- **शीर्षक :** उपक्रमाचे नाव व तारीख.
- **उद्दिष्ट :** उपक्रमाचा उद्देश.
- **सदर गट/विभाग :** सहभागी वर्ग व गटांची माहिती.

**उपक्रमाची माहिती :**

- सहभागाची संख्या.
- उपक्रमांचे स्वरूप (सादरीकरण, पझल्स, चर्चा)
- परिणाम : विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण.
- शिफारसी : भविष्यातील सुधारणा/उपक्रमांचे प्रस्ताव.

**११) अन्य साहाय्यभूत मुद्दे :**

- विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यांकन.
- समाजातील तज्ज्ञ व्यक्तींना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करणे.
- पालकांचे सक्रिय सहभाग प्रोत्साहित करणे.

**१२) शाळेस होणारे फायदे :**

- विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परीक्षांबद्दलची तयारी आणि आत्मविश्वास वाढेल.
- शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावेल.

❑❑❑

# श्रेयनामावली

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. ज्योती शिंदे | उपसंचालक | IT विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २. | डॉ. इब्राहिम नदाफ | उपसंचालक | सेवापूर्व विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३. | श्रीम. वर्षाराणी भोपळे | उपसंचालक | समता विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४. | श्री. अरुण जाधव | उपसंचालक | समाजशास्त्र विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ५. | डॉ. अरुण सांगोलकर | विभागप्रमुख | इंग्रजी विभाग, जीवन शिक्षण रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ६. | डॉ. मनिषा यादव | विभागप्रमुख | गणित विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ७. | श्रीम. तेजस्विनी आळवेकर | विभागप्रमुख | विज्ञान विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे |
| ८. | डॉ. संदीप मुळे | विभागप्रमुख | IT विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ९. | श्री. प्रदिपकुमार कुडाळकर | विभागप्रमुख | आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १०. | श्रीम. संगिता शिंदे | सहायक संचालक | मूल्यमापन विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ११. | श्रीम. प्रिया शिंदे | सहायक संचालक | VGPG विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १२. | डॉ. मनिषा ताठे | अधिव्याख्याता | विज्ञान विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १३. | श्री. अभय परिहार | अधिव्याख्याता | सेवापूर्व विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १४. | डॉ. अजयकुमार फुंदे | अधिव्याख्याता | इंग्रजी विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १५. | श्रीम. दिपाली जोगदंड | अधिव्याख्याता | VGPG विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १६. | श्रीम. वृषाली गायकवाड | अधिव्याख्याता | गणित विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १७. | डॉ. बालमणी नंदाला | अधिव्याख्याता | हिंदी, उर्दू विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १८. | डॉ. निता जाधव | अधिव्याख्याता | मराठी विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १९. | श्रीम. सुशीला जाधव | ग्रंथपाल | ग्रंथालय विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २०. | श्री. बाळासाहेब गायकवाड | विषय सहायक | समाजशास्त्र विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २१. | तौसिफ परवेज | विषय सहायक | हिंदी, उर्दू विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २२. | श्रीम. सुनिता काटम | विषय सहायक | आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २३. | श्रीम. पल्लवी इंगोले | विषय सहायक | इंग्रजी विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २४. | श्रीम. मिथिला भोसले | विषय सहायक | सेवापूर्व विभाग, रा. शै. सं. प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २५. | श्रीम. हर्षा पिसाळ | उपशिक्षिका | लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे. |
| २६. | श्री. नारायण शिंदे | उपशिक्षक | जि. प. प्राथ. केंद्र शाळा बाज, ता. जत, जि. सांगली. |
| २७. | श्री. देविदास गोसावी | उपशिक्षक | जि. प. उच्च प्राथ. शाळा जामठी, ता. जि. बुलढाणा |
| २८. | श्री. अजित राक्षे | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा मोहाट, ता. जावळी, जि. सातारा. |